**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी**. राज्यात दरवर्षी दोन लक्ष बालकांचा कुपोषण व तत्सम आजाराने होत असलेला मृत्यू

**मु.शी**.: राज्यात दरवर्षी दोन लक्ष बालकांचा कुपोषण व तत्सम आजाराने होत असलेला मृत्यू या विषयावर सर्वश्री हेमंत टकले,माणिकराव ठाकरे, विनायक मेटे, संजय दत्त, ॲड. उषा दराडे, डॉ. सुधीर तांबे, श्री. अरुण गुजराथी,श्रीमती अलका देसाई, सर्वश्री सतीश चव्हाण, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे,मोहन जोशी,रमेश शेंडगे, भाई जगताप प्रा.सुरेशनवले,सर्वश्री राजन तेली,जैनुद्दीन जव्हेरी,एस.क्यु.जमा सुभाष चव्हाण,श्रीमती दीप्ती चवधरी,वि.प.स.यांचा प्रस्ताव

,

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो. :-

"राज्यात दरवर्षी दोन लक्ष बालकांचा कुपोषण व तत्सम आजाराने होत असलेला मृत्यू, विदर्भातील अमरावती जिल्हयातील मेळघाट येथे एप्रिल ते सप्टेंबर, 2010 मध्ये 205 पेक्षा जास्त मुलांचा मृत्यू होणे, यापूर्वी सध्दा मेळघाटसह वर्धा व इतर जिल्हयात कुपोषणामुळे बालकांचा झालेला मृत्यू, नाशिक जिल्हयात आढळून आलेल्या 31209 कुपोषित बालकांपैकी 152 बालकांचा झालेला मृत्यू, औरंगाबाद जिल्हयात 11500 बालके व ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यात 1 हजार 89 व मोखाडा तालुक्यातही असलेली हजारो कुपोषित बालकांची संख्या तसेच नंदुरबार, अहमदनगर, गडचिरोली व यवतमाळ जिल्हयात सुध्दा शेकडो कुपोषित बालके आढळून येणे, राज्यातील 32.2 टक्के बालके कुपोषित असून 7544 बालके कुपोषणाच्या चौथ्या अवस्थेत असणे, कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी व या रोगाचे उच्चाटन करण्यासाठी मोठया प्रमाणात खर्च केला जातो, परंतु कुपोषणाच्या समस्येवर पूर्णपणे मात करण्यात न येणे, या रोगाचे प्रमाण कमी

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

करण्यासाठी तसेच या रोगांचे पूर्णपणे उच्चाटन करण्यासाठी शासनाने केलेली उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावाचे उत्तर सार्वजनिक आरोग्य विभागचे मंत्री देणार आहेत की महिला व बाल विकास विभागाचे मंत्री देणार आहेत ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्यावेळी एखाद्याच्या मृत्यूचा प्रश्न येतो त्यावेळी सार्वजनिक आरोग्य विभाग पिक्चरमध्ये येतो. ज्यावेळी कुपोषणाचा प्रश्न येतो त्यावेळी महिला व बाल विकास विभाग व काही प्रमाणात आदिवासी विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्राम विकास विभाग हे विभाग त्यांच्या मदतीला येतात. माझे असे म्हणणे आहे की, या चर्चेचे उत्तर महिला व बाल विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन विभागांकडून मिळणे आवश्यक आहे असे मला वाटते.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये कुपोषणाच्या प्रश्नासंबंधी या सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यावेळी मी उत्तर देतांना असे सांगितले होते की, गडचिरोली, गोंदिया व भंडारा या जिल्हयामध्ये कुपोषणासंबंधी गेल्या दहा वर्षात झालेल्या कामाचा आढावा घेतल्यानंतर या विभागांचा जास्त प्रमाणात प्रभाव पडल्याचे आढळले नाही. त्यामुळे कुपोषणासंबंधी नवीन स्ट्रॅटेजी ठरविण्याचा शासनाला निर्णय घ्यावा लागला.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांचे हे उत्तराचे भाषण आहे काय?

**उपसभापती** : आपण विचारलेल्या मुद्दयासंबंधी ते स्पष्टीकरण करीत आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आमची भाषणे झाल्यानंतर उत्तर सांगितले पाहिजे.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयासंबंधी मंत्री महोदय क्लॅरिफिकेशन करीत आहेत. मंत्री महोदयांनी आपले म्हणणे पुढे सुरु करावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, अधिवेशन संपल्यानंतर सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये एक बैठक घेण्यात आली. त्यावेळी आठ विभागांचे सचिव आणि मंत्र्यांना बोलाविण्यात येऊन सरकारने कुपोषणासंबंधी नवीन स्ट्रॅटेजी तयार केली. त्या बैठकीमध्ये असा निर्णय झाला की, महिला व बाल विकास विभागाला या कार्यक्रमासाठी नोडल मिनिस्ट्री म्हणून नेमण्यात आले आहे. त्यामुळे या चर्चेला महिला व बाल विकास मंत्री उत्तर देतील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या राज्याच्या दृष्टीने एका अतिशय महत्वाच्या प्रश्नावर या सभागृहामध्ये मी चर्चा उपस्थित करीत आहे. ही चर्चा मागील अधिवेशनामध्ये किती वेळा उपस्थित करण्यात आली, त्यानंतर यासंबंधी काय काय घडले, किंवा यामध्ये किती सुधारणा झाली हे सर्व पाहिल्यानंतर हे कधीही न सुटणारे प्रश्न आहेत. उदा. ज्याप्रमाणे महाराष्ट्र-कर्नाटक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

श्री. हेमंत टकले...

सीमा प्रश्नावर भरपूर चर्चा झाली, परंतु पुढे काहीच घडत नाही. निदान आपल्या हातामध्ये ज्या गोष्टी आहेत, त्या आपल्याला करणे आवश्यक आहे आणि ते आपल्याला निश्चितपणे हाती घ्यावे लागेल. राज्याच्या आरोग्य व्यवस्थेच्या दृष्टीने आदिवासी विभागात हा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यावर लक्ष केंद्रित करुन हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी शासनाने फार गंभीरपणे या विषयाकडे बघितले पाहिजे. वास्तविक पहाता आपण हे जे चित्र पहात आहोत त्याबाबत असे म्हटले जाते की, येणाऱ्या दहा ते वीस वर्षात या देशामध्ये तरुणांची संख्या सर्वात अधिक होणार आहे. भारत देश हा जगामध्ये तरुणांची सर्वात जास्त पिढी असलेला मोठा देश ठरणार आहे. कालांतराने ती पिढी वृध्दत्वाकडे जाईल, परंतु तरुणत्वाकडे येणारी जी नवी पिढी आहे, जन्माला येणारी जी नवी पिढी आहे त्याकडे आपले दुर्लक्ष झाले तर केवढया मोठया मनुष्यबळाला विकासापासून वंचित करणार आहोत हा या चर्चेच्या माध्यमातून निर्माण होणारा मूलभूत प्रश्न आहे. खरे म्हटले तर "सर्वांसाठी आरोग्य", "नॅशनल रुरल हेल्थ मिशन" सारख्या योजना, राज्य सरकारची आरोग्य यंत्रणा, राज्य सरकारचा आदिवासी विकास विभाग, राज्य सरकारचा पाणीपुरवठा विभाग व राज्य सरकारचे इतर विभाग या सर्वांनी मिळून एकत्रित प्रयत्न केले तरी हा प्रश्न कां सुटत नाही? हे न उलगडणारे कोडे आहे आणि म्हणून ही अवस्था पाहिली तर विशेषत: आदिवासी विभागातील पाडया-वस्त्यांमध्ये असणाऱ्या चालीरिती व त्यांचे जीवनमान, त्यांच्यामध्ये असलेली कष्ट करण्याची प्रवृत्ती या अनुषंगाने त्यांच्या घरापर्यंत पोहोचणाऱ्या आरोग्याच्या योजना कागदावर खूप चांगल्या वाटतात. त्या योजनांचे प्रेझेंटेशन अतिशय चांगल्या पध्दतीने केले जाते. परंतु प्रत्यक्षात फिल्डवर गेल्यानंतर त्याठिकाणी तशाप्रकारे काहीही घडत नाही अशाप्रकारचे विदारक अनुभव या निमित्ताने या राज्यामध्ये पहावयास मिळतात हे अतिशय दुर्दैवी आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

ठाणे जिल्हा मुंबई शहरापासून सगळयात जवळ असलेला जिल्हा आहे. मागे एका चर्चेमध्ये असे सागण्यात आले होते की, ठाण्यातच नाही तर मुंबईच्या झोपडपट्टयांमध्ये कुपोषित बालके सापडतात. याचा अर्थ सगळया यंत्रणेमध्ये निश्चितपणे काही तरी कमतरता आहे.ज्यामुळे त्याठिकाणी योग्य त्या उपाययोजना होत नाहीत. ठाणे जिल्हा मोठा आहे. आदिवासी बहूल जिल्हा आहे. वासिंद, अगई, सेंद्रुण, शेणवा, जोडखांब असेल या ठिकाणी ही कुपोषित बालके आढळून येतात. या सगळया भागासाठी यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे आणि या यंत्रणेमार्फत औषधांचा पुरवठा करण्यात येतो. हा औषधांचा पुरवठा करताना काळजी घ्यावी लागते. जर एखादी स्वंयसेवी संस्था पुढे येऊन या गोष्टी व्यवस्थितपणे करु शकत असेल तर ते शासनाला का शक्य होत नाही. या प्रश्नाचे उत्तर शासनाने शोधणे आवश्यक झालेले आहे. ही सगळी माणसे एका वंचित समाजासारखी आपल्या देशामध्ये रहात आहेत. त्यांच्यासाठी स्वातंत्र्य आलेले आहे. पण त्याचा अर्थ त्यांना समजलेला नाही. त्यांना रोजगार हवा आहे पण त्यांना रोजगार मिळत नाही. त्यांना दोन वेळचे जेवण, रहायला आसरा आणि किमान आरोग्य सेवा या सुविधा सुध्दा मिळत नाहीत. त्यामुळे हे राज्य कल्याणकारी राज्य आहे असे म्हणणे सुध्दा थोडेसे धारिष्ठयाचे वाटेल.

सभापती महोदय, कुपोषित बालकांच्या संदर्भात ज्या ज्या यंत्रणाचा उल्लेख करतो त्या यंत्रणांचा वापर करताना मग ती आरोग्य यंत्रणा असेल, त्याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असतील किंवा इतर काही सुविधा असतील. पण तेथे कधीच साधनसामुग्री योग्य पध्दतीने ठेवलेली नसते. तेथे पुरेसे मनुष्यबळ देण्यात येत नाही. जर तेथे कोणी काम करु लागला तर त्या केंद्रावर आरोग्य सेवा देण्या ऐवजी त्याचा भलताच मार्ग निवडून त्या ठिकाणच्या लोकांचा ओढा दुसरीकडे कसा जाईल या दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात येतो. एकूणच परिस्थिती अशी आहे की, या सगळया यंत्रणेवर विश्वास ठेवावा की नाही अशीच या अशिक्षित आदिवासी समाजातील लोकांची धारणा झ ाली तर काही गैर झाले असे म्हणता येणार नाही. आदिवासींचा किंवा कुपोषित बालकांच्या समस्यांचा विचार करत असताना आपण श्रेणी-1, श्रेणी-2,श्रेणी-3 आणि श्रेणी-4 या दृष्टिकोनातून विचार करतो. या सगळयांचा चढता क्रम आहे. त्याठिकाणी बालकांचे जन्म होण्यापूर्वीच मातांची काळजी घेण्यासाठी केंद्र उभारण्यात आले आहेत. पण त्याठिकाणी ही सगळी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

उपाययोजना करण्यात येते की नाही याकडे दुर्लक्ष केले जाते. एकूणच या सगळया व्यवस्थेमध्ये आत्मीयतेचा अभाव आहे. जी शासन यंत्रणा त्या ठिकाणी काम करीत आहे. त्यांच्यामध्ये बेदरकार प्रवृत्ती आहे. त्यामुळे सगळा आर्थिक प्रवाह शेवटच्या माणसापर्यंत न जाता तो भलत्याच ठिकाणी जाऊन त्यातून निर्माण होणारे भ्रष्टाचाराचे प्रश्न आणि त्या भ्रष्टाचारावर होणारी चर्चा हे सर्वच चित्र बघितल्यानंतर आपल्या राज्यामध्ये किमान काही गोष्टीं प्राधन्याने हाती घेण्याची आवश्यकता आहे. त्यामध्ये आरोग्य आणि शिक्षण या बाबींना मूलभूत महत्व देण्याची आवश्यकता आहे. आदिवासींसाठी असलेल्या आश्रमशाळा असतील, आदिवासींचा कुपोषणाचा प्रश्न असेल तर या सगळयाच प्रश्नासाठी बजेटमध्ये वेगळी तरतूद केलेली असेल तर त्या बाबतची अंमलबजावणी का होत नाही हा प्रश्न गंभीर आहे.

मेळघाट जागतिक नकाशावर आलेला आहे. त्या ठिकाणी ज्याला आपण कंट्रोल मेकॅनिझम म्हणतो तशी एखादी व्यवस्था निर्माण केली आणि ती व्यवस्थित राबविली जात नसेल तर त्याचे कंट्रोल्स कुठे असले पाहिजेत? आज विज्ञानाचा आणि तंत्रज्ञानाचा वापर करुन आपण बसल्या जागी त्या भागामध्ये काय घडत आहे याची माहिती घेऊ शकतो. इतकी सगळी साधनांची संपन्नता असतानासुध्दा आपल्याला दुर्दैवाने वारंवर कुपोषणाचा चढता आलेख बघायला मिळत असेल तर त्याबाबतची उपाययोजना फार गांभीर्याने हाती घेण्याची गरज पडलेली आहे. या समाजामध्ये सुध्दा काही शिक्षित वर्ग आहे. आदिवासीमध्ये शिक्षण घेतलेले लोक आहेत. आदिवासी एरियात जाऊन काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्था आहेत. मध्यंतरी माझ्या वाचनात आले की, डॉ. अभय बंग यांनी यासंदर्भात काही तोडगा सुचविलेला होता त्याचा शासन गांभीर्याने विचार करत आहे.

यानंतर श्री. बरवड......

अमुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

एकटे डॉ. अभय बंग नाही तर आपण कोणत्याही जिल्ह्यात जा, माझ्या नाशिक सारख्या जिल्ह्यात गेलात तर मी खात्रीपूर्वक सांगू शकतो की, सुरगाणा, पेठ परिसरात आमच्या पक्षामार्फत या कुपोषित बालकांसाठी एक उपक्रम दोन वर्षे चालला होता. परंतु हे सातत्य टिकविण्यासाठी त्याला शासनाचे मजबूत पाठबळ असणे आवश्यक आहे. त्यांना जो आहार दिला जातो, त्यांची जी काळजी घेतली जाते, जन्म झाल्यानंतर मुलाची जी काळजी घ्यावयास पाहिजे, या सगळ्या गोष्टींकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले वारंवार दिसून येते. राज्याचे प्रश्न फार मोठे आहेत. इन्फ्रॉस्ट्रक्चर खूप मोठ्या प्रमाणात पाहिजे, वीज मोठ्या प्रमाणात निर्माण झाली पाहिजे, सिंचनासाठी पाणी मिळाले पाहिजे परंतु ज्याला जगवावयाचे आहे त्या माणसाला आपण जगविणार नसाल तर आपल्या या सगळ्या भव्यदिव्य योजना कोणाच्या कामी येणार आहेत आणि याबाबतचे उत्तर कोणाला देणार आणि हे सगळे कोणाच्या भल्यासाठी , कोणाच्या कल्याणासाठी करणार आहात ? जर खरोखर मनापासून करावयाचे असेल तर या समस्येच्या मुळात जाण्यासाठी, परवा शासनाने घोषित केले की, विदर्भ पॅकेज असेल, मराठवाडा पॅकेज असेल, कोकण पॅकेज असेल या सगळ्या पॅकेजेसचा दर महिन्याला आढावा घेतला जाईल आणि कोठे कमतरता आहे हे शोधले जाईल त्याप्रमाणे या कुपोषणाच्या बाबतीत सुध्दा दरमहा नव्हेतर दर पंधरा दिवसाला आढावा घेण्याची गरज आहे. त्या ठिकाणी जर योग्य प्रकारची आरोग्य यंत्रणा उभी राहात नसेल तर त्याचा उपाय शोधताना कोणत्या तरी माध्यमातून मग मोबाईल डिस्पेन्सरी असेल, मोबाईल पध्दतीच्या इतर गोष्टी असतील, औषधांचा पुरवठा असेल, धान्य घरपोच पोहोचविण्याची योजना शासनाने हाती घेतली त्यामध्ये तीन महिन्याचे धान्य दिले जाते ते धान्य त्या भागात काम करणाऱ्या आशा सारख्या भगिनी असतील त्यांच्या मार्फत ज्यांच्या घरामध्ये मूल जन्माला येणार असेल त्या घरापर्यंत घेऊन जाणे, ते मूल जन्माला येण्याच्या तीन चार महिने आधी त्याच्यासाठी ज्या औषधाच्या योजना असतील, त्याच्यासाठी ज्या औषधांची आवश्यकता असेल, त्याच्या नावानिशी औषधांचा जो कोटा असेल तो देऊन स्वत: त्या ठिकाणी जाऊन त्यांना ते समजावून देऊन त्याप्रमाणे औषधोपचार झाला पाहिजे. हा औषधोपचार देताना त्या ठिकाणी योग्य अशा आहाराची सुध्दा नितांत आवश्यकता असते. ती आहार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. हेमंत टकले ...

योजना सुध्दा शासनाने यामध्ये अंतर्भूत केली पाहिजे असे मला वाटते. यामध्ये शासनाची, राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती असेल, संघटनेचे बळ असेल, स्वयंसेवी संस्थांचे मार्गदर्शन असेल तसेच ज्यांना आपण सहाव्या वेतन आयोगाचा पगार देऊन शासनाच्या सेवेत घेतो त्या सगळ्यांकडून योग्य पध्दतीने काम करणे आणि कामचुकारपणा करणाऱ्यांना शिक्षा करणे अशा प्रकारची कठोर उपाययोजना केली तर या प्रश्नाच्या मुळाशी जाण्यासाठी काही ना काही थोड्याशा पुढच्या टप्प्यावर आलेलो आहोत असे म्हणण्यास कोठे तरी वाव राहील. शासनाने या सगळ्याचा गांभीर्याने विचार करावा.

सभापती महोदय, कुपोषित बालकांची जी संख्या आहे त्याबाबत सांगावयाचे म्हणजे मी एका अंध संस्थेचे काम करतो आणि मी सांगतो की, मला 2030 साली ही संस्था बंद करावयाची आहे. या मागचा हेतू असा आहे की, 2030 साली या देशात अंधांची संख्याच शिल्लक राहू नये, सगळ्यांना दृष्टी असावी. मला असे वाटते की, कुपोषणाच्या बाबतीत सुध्दा निश्चित उद्दिष्ट ठरविले पाहिजे. आपल्या हातामध्ये आणखी चार वर्षे आहेत. येत्या प्रत्येक वर्षामध्ये आपण कोणत्या टप्प्यावर कोठे पाहोचणार आणि आम्हाला एकदा सन्मानाने शासनाचे उत्तर ऐकावयाचे आहे की, आम्ही कुपोषणाच्या प्रश्नावर राज्यामध्ये मात केलेली आहे आणि आम्ही आदिवासीच्या शेवटच्या कुपोषित बालकाला मृत्यूपासून वाचविलेले आहे आणि तो उद्याच्या भारताच्या नवीन पिढीचा तरुण म्हणून पुढे येईल आणि या देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीमध्ये मोलाची भर घालील. अशा प्रकारची एक मोठी योजना शासनाने करावी. अतिशय तत्परतेने, कार्यतत्परतेने आणि प्रामाणिकपणे यंत्रणेवर पूर्णपणे देखरेख ठेऊन, ज्या ठिकाणी भ्रष्टाचार आढळून येईल, कामचुकारपणा आढळून येईल त्याला त्याची शिक्षा ताबडतोब देण्याची व्यवस्था करावी. शासनाने हे सगळे करावे अशी विनंती करण्यासाठी मुद्दाम आजही चर्चा घडवून आणली आहे. शासनाने याबाबतीत गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 10:50

श्री.माणिकराव ठाकरे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयावर आज या सदनामध्ये चर्चा होत आहे. कुपोषण हा संपूर्ण जगामध्ये आणि देशामध्ये चर्चेचा विषय झालेला आहे. त्याचप्रमाणे तो महाराष्ट्राला देखील भेडसावत आहे. महाराष्ट्र हे सुधारलेले राज्य आहे, पुरोगामी विचारांचे राज्य म्हणून आपण त्याचा उल्लेख करीत आलो आहोत. महाराष्ट्र राज्यामध्ये विशेषत: आदिवासी भागातील बालके कुपोषित असणे, त्यांना राज्यामध्ये असलेल्या साधन सामुग्रीचा उपयोग न होणे हा सर्वांच्या दृष्टीने अत्यंत चिंतेचा विषय आहे. त्यादृष्टीकोनातून राज्य शासनाने मागील काळामध्ये पावलेही उचलली आहेत. या महत्वाच्या विषयाकडे शासन गांभीर्याने पहात असल्यामुळेच महिला व बालविकास असे वेगळे खाते निर्माण केले आहे. त्या खात्याच्या माध्यमातून राज्यातील बालकांसंबंधीचे प्रश्न सोडविता आले पाहिजेत, त्या प्रश्नांच्या जवळ गेले पाहिजे, त्या अनुषंगाने त्या विभागाने अनेक उपायोजना सुचविल्या आहेत. याबाबत वेगवेगळया समित्या स्थापन झाल्या आहेत. त्या समित्यांनी सादर केलेले अहवाल शासनाने स्वीकारले आहेत. तरी देखील आज पाहिजे त्या प्रमाणामध्ये कुपोषण समाप्त करण्यामध्ये शासनाला यश मिळू शकले नाही ही वस्तुस्थिती आहे, ती लपविण्याचे कारण आहे असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, हा विषय बहुतांश करुन आरोग्य विभागाशी निगडीत आहे. आरोग्य विभागाचा प्रत्येक विभागाशी संबंध येतो. खालच्या स्तरावर काम करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या अधिका-यांचा वेगवेगळया बालकांशी संबंध येतो. शेवटी हा विषय आरोग्य खात्याकडे जात असल्यामुळे त्या विभागाने त्यासाठी आवश्यक ती तरतूद केली पाहिजे, आवश्यक ती व्यवस्था केली पाहिजे. मागील काळामध्ये शासनाने या प्रश्नावर मात करण्यासाठी मोठया प्रमाणावर आर्थिक तरतूद केलेली आहे. परंतु त्यापैकी झालेल्या खर्चाचा आढावा घेतला तर अमरावतीसारख्या जिल्हयातील कुपोषित भागासाठी शासनाने दिलेल्या निधीपैकी 20 टक्के सुध्दा पैसा खर्च झालेला नाही. कुपोषण समाप्त करण्यामध्ये शासन गांभीर्याने पावले उचलत असतानाही व आवश्यक तेवढा निधी देऊनही अधिकारी प्रतिसाद देत नसतील तर त्यासाठी कडक उपाययोजना केल्या पाहिजेत.

2....



NTK/ D/ ST/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, कुपोषणाचा संबंध आरोग्य खात्याशी आहे तसा तो शिक्षण खात्याशी सुध्दा आहे. सुशिक्षित महिला असेल तर आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करण्याची काळजी घेते, योग्य प्रकारचे अन्न बालकांना देऊ शकते. आरोग्य व स्वच्छतेची काळजी घेते, उपलब्ध असलेली औषधे आपल्या मुलांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था ती माता करु शकते. सभापती महोदय, राज्यामध्ये अशिक्षित माताचे प्रमाण 56 टक्के इतके आहे. या मातांना सुशिक्षित करण्याचे काम शासनाला करावे लागेल. या समाजामध्ये अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, अंधविश्वास, अज्ञान, अशिक्षितपणा आहे. या सगळयांचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर होतो आणि पहिला आघात त्यांच्या बालकावर होतो.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ 10:55

श्री. माणिकराव ठाकरे...

म्हणून त्या दृष्टीकोनातून या महिला सुशिक्षित झाल्या पाहिजेत. त्यांना ज्ञान मिळाले पाहिजे. त्यांचे अज्ञान दूर झाले पाहिजे. मूल जन्मल्याबरोबर त्याला चीक देऊ नये अशाप्रकारचा गैरसमज आणि रुढी आहे. वास्तविक जन्माला आलेल्या मुलाला आईच्या स्तनपानातून चीक मिळाला पाहिजे आणि तो जर बालकाला दिला जात नसेल तर ते मातेचे अज्ञान आहे. मेळघाटातील तसेच राज्यातील अन्य भागातील कुपोषित बालकांमध्ये कॅल्शियमची कमतरता आढळते. मेळघाटामध्ये नागली पिकाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. या नागली पिकामध्ये मोठया प्रमाणावर कॅल्शियम घटक आहे. परंतु मुलांना कशा प्रकारे आहार द्यावा आपण स्वत: कोणत्या प्रकारचा आहार घ्यावा याबाबतच्या मातांच्या अज्ञानामुले मुलांना चांगला पौष्टिक आहार मिळत नाही. माता सुशिक्षित असल्या तर त्या आपल्या मुलांचे चांगल्या प्रकारे संगोपन करु शकतात. म्हणून आरोग्य आणि शिक्षण विभागांनी या दृष्टीने काम करण्याच्या बाबतीत पावले उचलण्याची गरज आहे.सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कुपोषण दूर होण्याच्या दृष्टीने ज्या ज्या योजना राबविल्या जात आहेत त्यामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. वॉर्मरुममध्ये, बालसदनामध्ये लहान मुले आणि मातांना दोन दोन महिन्याकरिता आणून तेथे त्यांचे पालन पोषण केले जाते. मुलांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाल्यानंतर त्यांना घरी पाठविले जाते. अशा प्रकारचे वॉर्मरुम, बालसदन राज्यामध्ये काही ठिकाणी सुरु केलेले असले तरी त्यांची संख्या खूप अपुरी आहे. माझ्या माहितीप्रमाणे राज्यामध्ये या बालसदनांची संख्या 50 ते 55 आहे. त्यामध्ये वाढ होण्याची गरज आहे. मी राज्यातील अनेक बालसदनांना भेटी दिल्या. काही ठिकाणी बालकांचे पालन पोषण अतिशय उत्तमरीत्या सुरु आहे. काही बालसदनांचे समजासेवी संस्थांनी देखभाल दुरुस्ती, रंगरंगोटी करुन त्यांचे सुशोभिकरण केलेले आहे, त्या ठिकाणी चांगली स्वच्छता ठेवलेली आहे. काही संस्थांनी विविध प्रकारची औषधे उपलब्ध करुन दिलेली आहेत.

सभापती महोदय, राज्यातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसर, वर्धा, अहमदनगर, नाशिक, ठाणे या जिल्ह्यामध्ये कुपोषित बालकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याचे आढळून आलेले आहे. त्या ठिकाणी अशा कुपोषित बालकांचे चांगल्या त-हेने पालनपोषण होण्याकरिता वॉर्मरुम निर्माण करण्याची व्यवस्था आरोग्य विभागाच्या माध्यमातून केली गेली पाहिजे. असे केले तरच राज्यातील कुपोषित बालकांची संख्या कमी होऊ शकेल. कुपोषित बालकांच्या त्यांच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

वजनानुसार 1 ते 4 श्रेण्या केलेल्या आहेत. या श्रेण्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून केलेल्या आहेत किंवा कसे हे मला माहीत नाही. परंतु एकूण परिस्थितीचा आढावा घेतला तर राज्यात 40टक्के बालके कुपोषित आहेत. त्यांचे पालनपोषण चांगल्या प्रकारे होण्यासाठी राज्यामध्ये मोठया प्रमाणावर वॉर्मरुमची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, गभर्वती मातांना आपण आर्थिक मदतही दिली गेली पाहिजे. शासनाच्या माध्यमातून अशा गर्भवती मातांना 400 रु. रोख आणि 400 रुपये औषधांसाठी दिले जातात.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे......

या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, 400 रुपयांमध्ये आजच्या काळात पुरेशी औषधे मिळतात का? सर्दी पडसे झाल्यास 400 रुपयांत औषधाच्या दुकानामध्ये पुरेशी औषधे मिळत नाहीत. असे असताना चार-सहा महिन्यांच्या काळासाठी 400 रुपयांची औषधे देणार असू तर त्यामध्ये निश्चितपणे सुधारणा झाली पाहिजे. ही अत्यंत अल्पशी मदत आहे. यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. नगदी स्वरुपामध्ये जी मदत दिली जाते त्यामध्ये सुध्दा सुधारणा झाली पाहिजे. मी स्वत: वॉर्म रुमची पाहणी करुन आलो आहे. त्या ठिकाणी चांगल्या प्रकारचे धान्य पुरविले जाते. काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून ड्रायफ्रूट्स पुरविले जातात आणि बालकांना चांगल्या दर्जाचा आहार मिळाल्यामुळे त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे दिसून आले. अशा प्रकारची वॉर्म रुम राज्यात इतर ठिकाणी निर्माण केली गेली तर अत्यंत चांगल्या पध्दतीने कुपोषणाची समस्या दूर करता येईल.

सभापती महोदय, राज्यामध्ये रोजगार हमी योजना राबविली जाते, स्वयंरोजगाराची योजना राबविली जाते. त्या माध्यमातून कुपोषणाची समस्या दूर करण्यास फारसा उपयोग होणार नाही. कुपोषित बालकांच्या मातांना आर्थिक मदत देण्याबरोबरच औषधे व शिक्षणाची व्यवस्था उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्यांच्यामधील अज्ञान दूर करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. त्यांच्यासाठी जो खर्च केला जातो तो कुपोषित बालकांपर्यंत आणि त्यांच्या मातांपर्यंत पोहोचला पाहिजे. मध्यंतरी शासनाने कुपोषणाच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी एका समितीची नियुक्ती केली होती. समिती स्थापन करणे, त्या समितीचे अध्यक्ष व अन्य सदस्यांची नियुक्ती करणे एवढ्यापुरता हा विषय मर्यादित न राहता त्या समितीकडून वस्तुनिष्ठ अहवाल प्राप्त करुन घेतला पाहिजे. अन्यथा कोणाची तरी वर्णी लावायची म्हणून समिती नेमली जाते असे होता कामा नये. कुपोषणाच्या समस्येबाबत समिती नेमल्यानंतर त्या समितीच्या आतापर्यंत 15 ते 20 बैठका झाल्या असे म्हटले जाते. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाला का? समितीने आपल्या अहवालात कोणत्या शिफारशी केल्या आहेत? शासनाने त्या शिफारशी स्वीकारल्या असतील तर सभागृहाला माहिती दिली पाहिजे. शिफारशी स्वीकारल्या नसतील तर त्या केव्हा स्वीकारणार आहात हेही सांगितले पाहिजे. कुपोषित बालकांच्या संदर्भात सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था काम करीत आहेत. त्यांच्या परिषदा आयोजित केल्या पाहिजेत. वेगवेगळया घटकांकडून परिषदांबाबत आग्रह धरला जातो.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे......

परंतु आदिवासी वर्ग, मागासलेल्या व दुर्लक्षित घटकांना अशा परिषदांमध्ये सामील करुन घेतले पाहिजे. त्यांच्याकडून या संदर्भात काही माहिती प्राप्त होते का हे पाहिले पाहिजे. ती माहिती प्राप्त करुन सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सुचविल्याप्रमाणे पॅकेजबाबत घोषणा करता आली तर जरुर करण्यात यावी. आज शासनाकडून कुपोषण दूर करण्यासाठी जो निधी उपलब्ध करुन दिला जातो त्यापैकी 20 टक्के निधी देखील खर्च होत नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. अधिकाऱ्यांमध्ये वचक निर्माण झाला पाहिजे. दिलेला निधी खर्च करण्यासाठी कोणत्या दिशेने काम करायचे, शासनाचे धोरण काय आहे हे त्यातून ध्वनित झाले पाहिजे. त्यादृष्टीने शासनाने पावले उचलावीत अशी आग्रहाची विनंती करुन मला विचार मांडण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

--------

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रस्तावावर बोलण्यासाठी किती नावे आलेली आहेत हे सभागृहाला अवगत करावे अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : एकूण 26 माननीय सदस्य या प्रस्तावावर बोलणार आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रत्येक पक्षाला उपलब्ध असलेल्या वेळेनुसार माननीय सदस्यांना वेळ उपलब्ध करुन द्यावा. अन्यथा वेळेबाबत अतिक्रमण होते आणि निर्णय देत असताना अडचण निर्माण होते. आम्हाला देखील विचार मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. पक्षनिहाय वेळेचे वाटप करावे.

**उप सभापती** : कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यात येईल आणि भाषणाच्या बाबतीत कुपोषण होणार नाही अशी दक्षता घेतली जाईल. आता माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस आपले भाषण सुरु करतील.

----

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सर्वश्री हेमंत टकले व इतर माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये कुपोषणाच्या संदर्भात उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, सुरुवातीला दोन प्रश्नांची उत्तरे शासनाकडून अपेक्षित आहेत. सन 2009-2010 च्या आर्थिक पाहणीमध्ये आदिवासी आणि अतिदुर्गम क्षेत्रातील प्रकल्पांमधील सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षक, अंगणवाडी सेविका, वाहनचालक यांची रिक्त पदे पावसाळा सुरु होण्यापूर्वी तातडीने भरणे, प्रकल्प कार्यालयाची वाहन नादुरुस्त, निकामी, वा निर्लेखित झाले असेल, नवीन वाहनाचा पुरवठा करण्यात आला नसल्यास........

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

नंतर एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ ST/ पूर्वी श्री. भोगले...... 11:05

श्रीमती शोभा फडणवीस .........

तातडीची बाब म्हणून वाहन पुरवठा करण्याची विनंती करणे, जेणेकरुन पावसाळ्यापूर्वी अशा वाहनांचे अधिग्रहण करुन पुरवठा करणे शक्य होईल. अंगणवाडी केंद्रांमध्ये रोज चार्ट उपलब्ध नसल्यामुळे पावसाळ्यापूर्वी तो चार्ट उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारचे निर्णय सन 2009-10 च्या आर्थिक पाहणीमध्ये घेण्यात आले होते. त्यानुसार व्यवस्था झालेली आहे काय याचे उत्तर देण्याची गरज आहे. मेळघाटातील कुपोषणाच्या संदर्भात सीआयडीकडून चौकशी करावी अशी मागणी होती. परंतु माझे म्हणणे असे आहे की, अशा प्रकारे सीआयडीकडून चौकशी करुन काय उपयोग काय झ ाला ? कारण त्या माध्यमातून आजपर्यंत कोणालाही शिक्षा झालेली नाही. आणि अधिकाऱ्यांना किंवा जे जबाबदार असतील त्यांना शिक्षा होत नसेल, त्यांची चोकशी होत नसेल तर खऱ्या अर्थाने त्याचा रिपोर्ट सुध्दा मिळू शकेल काय हा प्रश्न तितकाच महत्वाचा असून त्याचाही विचार होणे आवश्यक आहे. कुपोषण हा काही एक भाग नाही. कुपोषणासारखी गोष्ट कशामुळे घडते हे पाहिले तर ती म्हणजे आर्थिक कोंडीमुळे कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येईल. कारण आज 12 टक्के एवढी मोठ्या प्रमाणात महागाई वाढलेली आहे. असे असताना अशाच प्रकारे दररोज 50 रुपये सुध्दा न मिळणाऱ्या लोकांकडून त्यांनी प्रोटिनयुक्त अन्न खावे ही अपेक्षा कशाच्या आधारावर करणार आहात ? अति दुर्गम भागात गेल्यानंतर दिसून येईल की या लोकांच्या जेवणात तेलाचाच पत्ता नसतो, कारण महागाई आहे. ते लोक भाजीपाला खाऊ शकत नाही. मग भोपळा, कोहळा आणि दोडक्यासारख्या भाजा मिठाबरोबर खाऊन जीवन जगणाऱ्या लोकांच्या कुपोषणाचा विषय आपण कसा हाताळणार हा महत्वाचा प्रश्न आहे. ज्यावेळेस मी गडचिरोलीमधील सिरोंचा, एटापल्ली, आलापल्ली आणि भामरागडसारख्या दुर्गम भागात गेले तेव्हा लक्षात येते की, या भागात आजवर कोणतेही अधिकारी आलेले नाहीत. आम्ही जातो तेव्हा आम्हाला शॉकच बसतो अशी परिस्थिती आहे. कारण या भागात आजही लाल मुंग्यांची चटणी आणि भात खाल्ला जातो, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 63 वर्षे झाली तरी हे अपेक्षित आहे काय ? आपण त्यासंबंधीची व्यवस्था कशी करणार आहात याचा खुलासा झाला पाहिजे. आज अशा पध्दतीने कुपोषणाचा विचार होतो तेव्हा मी उदाहरण म्हणून सांगू इच्छिते की, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेब सुध्दा बोलले. जर्मनीच्या एका समितीने संपूर्ण जगातील कुपोषणाबाबतचा सर्व्हे केला त्यात भारताचा क्रमांक 67 वा लागतो म्हणजे भारत हाच कुपोषणग्रस्त

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

....2...

श्रीमती शोभा फडणवीस ........

आहे मग महाराष्ट्र राज्य कसे मागे राहणार, ही विचार करण्यासारखी बाब आहे. याचा विचार केला तर खऱ्या अर्थाने त्यांना काय दिले पाहिजे याबाबतही उपाययोजना केल्या पाहिजेत. कुपोषण हा राजकारणाचा विषय नाही तर कुपोषणातून देशातील नव्या पिढीला वाचविण्याचा विचार होणे आवश्यक आहे. कुपोषणासारखे विषय उपस्थित करुन त्यावर आपण सभागृहात दरवर्षी चर्चा करतो पण त्या चर्चेतून काय निष्पन्न होते हा महत्वाचा भाग आहे. कारण कुपोषणावरील चर्चेला सभागृहात उत्तर दिले जाते. वर्षभरानंतर मात्र पुन्हा तोच विषय सभागृहात मांडला जातो व हा प्रश्न तसाच कायम राहतो अशी परिस्थिती आहे. यातून एकाही प्रश्नाचे उत्तर आजपर्यंत मिळाले नाही किंवा आदिवासींच्या कुपोषणाचे प्रमाण कमी झाले नाही ही शोकांतिका आहे.

सभापती महोदय, महागाई हा विषय त्यात महत्वाचा आहे. त्याचप्रमाणे कुपोषणात मोठ्या प्रमाणावर प्रोटिनयुक्त जेवण देणे आवश्यक आहे, याचाही विचार होणे आवश्यक आहे. आपण अंगणवाड्यांबाबत प्रदर्शन भरवून आदिवासी महिलांना बोलावून सांगतो की, प्रोटिनयुक्त आहार खाल्ला पाहिजे, जेवणात अंडी खाल्ली पाहिजे, पालेभाज्या खाल्ल्या पाहिजेत, कडधान्य खाल्ले पाहिजे पण या सर्व वस्तू विकत घेण्यासाठी ज्यांच्याकडे पैसेच नाहीत ते लोक हे सर्व विकत घेऊन प्रोटिनयुक्त जेवण कसे घेऊ शकता, याचा विचार करणार की नाही ? याचे कारण एकच आहे ते म्हणजे आदिवासी भागात निर्माण झालेली आर्थिक कोंडी, यातून मार्ग काढण्याची गरज आहे. याबाबत शासन काय करणार आहे याचा विचार केला पाहिजे. खऱ्या अर्थाने आज एका गोष्टीचे दुःख वाटते की आपण अधिकाऱ्यांना सहावा वेतन आयोग दिला, निरनिराळे अधिकार बहाल केले परंतु पैसे मिळाल्यानंतर ते सेवाभावी मानसिकता विसरुन गेले, त्यांची डयुटी विसरुन गेले. एटापल्ली व आलापल्ली सारख्या भागात गेल्यानंतर दिसून येते की, गेल्या 5 वर्षापूर्वी नवीन रेशन कार्ड्स देतो म्हणून आदिवासींची रेशन कार्ड्स तहसीलदारांनी जमा केली आणि आजपर्यंतही ती कार्ड्स त्यांना मिळाली नाहीत. याबाबत तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी देखील केल्या परंतु अद्यापही त्याचा उपयोग झाला नाही. त्याचबरोबर माननीय पालकमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनाही मी लेखी पत्र दिले की, पाच वर्षापूर्वी जमा केलेली रेशन कार्ड्स आदिवासींना नव्याने वितरित न करता ती कार्ड्स रेशन दुकानदार वापरतो आणि त्यांच्या वाट्याचा माल बाजारात चढ्या भावाने विकतो.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

अशी परिस्थिती असेल तर कुपोषण कसे काय कमी होऊ शकेल ? त्यामुळे कुपोषण थांबविण्यासाठी शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. आम्ही आदिवासी खेडयात-पाडयात जातो त्यावेळेस त्या ठिकाणी आम्हाला पटवारी, बाबु लोकांची चांगली घरे दिसतात. आदिवासी मात्र आपल्या घरावर दोन कौलं सुध्दा टाकू शकत नाही अशी परिस्थिती आहे. श्रीमंताची या ठिकाणी आम्ही चर्चा करीत नाही परंतु नक्षलवाद का वाढला याचा सुध्दा विचार करण्याची आता वेळ आलेली आहे. आदिवासी बांधवांना पाच वर्षापासून रेशन दुकानावरील 2 रु. किलोच्या दराने जे धान्य मिळते ते देखील त्यांना मिळत नाही. या कार्डवरील धान्य रेशन दुकानदार त्यांना देत नाही तर ते धान्य स्वत: घेऊन इतर ठिकाणी विकून भरमसाठ पैसे कमावत असतो. त्यामुळे आदिवासींना त्वरित रेशन कार्ड उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. मी ठाणे जिल्हयातील आदिवासी पाडयांवर गेले होते त्यावेळी मला त्या ठिकाणच्या आदिवासींच्या रेशन कार्डावरील आदिवासीच्या नावावर पांढरी पट्टी लावून त्यावर दुस-याचे नाव लिहिले असल्याचे दिसून आले होते. यासंदर्भात मी माहिती घेतली तेव्हा मला असे आढळून आले होते की, त्या रेशन कार्डवरील धान्य दुसरीच व्यक्ती घेते व ते धान्य तिस-या व्यक्तीला विकून भरमसाठ पैसे कमावले जातात. त्यामुळे आदिवासी लोक त्यांच्या कार्डवरील धान्याचा उपयोग स्वत:साठी करु शकेल यासाठी शासनाने उपाययोजना आखण्याची आवश्यकता आहे. आदिवासींचे रेशनकार्ड त्यांच्यापर्यंत पोहचलेले नाही. त्यामुळे आदिवासींचा कोणी विचार करणार आहे की नाही? याबाबत सर्व्हे केला जाणार आहे की, नाही ? आदिवासींना रेशनकार्ड दिले जातील काय ? या ठिकाणी केवळ आदिवासीच नाही तर त्या ठिकाणी राहणारे सर्वच समाजाच्या गरिबांना रेशनकार्ड पुरवण्याची व्यवस्था ख-या अर्थाने होणे आवश्यक आहे. त्यामुळे या बाबत शासनाने उत्तर देण्याची व त्यावर उपाय योजना करण्याची गरज आहे.

सन 2008 मधील पोषण निर्देशांकामध्ये 17 राज्यामध्ये महाराष्ट्र शासन दहाव्या क्रमांकावर आहे. हे कदाचित शासनाला माहिती आहे की, नाही याची मला कल्पना नाही. परंतु जर पोषणाच्या कमतरतेमुळे बालमृत्यूच्या प्रमाणात वाढ होत असेल तर त्याची जबाबदारी ख-या अर्थाने आरोग्य विभागाची आहे. मृत्यू दर थांबविणे सर्वात गरजेचे आहे. प्रोटीनयुक्त अन्न न

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

मिळाल्यामुळे बाल मृत्यूचे प्रमाण वाढते आहे. शाळेमध्ये तर रक्तक्षयाने आजारी असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त आहे. रक्तक्षय हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा प्रश्न आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना रक्तक्षयानंतर क्षय रोगाची लागण झालेली आहे. अंगात रक्ताचे प्रमाण कमी झाले की, ॲनिमिया होत असतो. मातेच्या शरीरात रक्त नसेल तर मुलांच्या शरीरात कसे काय रक्त येणार ? मातेच्या शरीरात रक्त कमी असल्यामुळे पर्यायाने बाळाच्या शरिरातही रक्त कमी येते. मातेलाच चांगले अन्न मिळत नसल्यामुळे बाळाचे कुपोषण होते. मुलांना प्रोटीनयुक्त खावावयास मिळाले नाही तर ते सुदृढतेच्या मैदानात उतरु शकणार आहेत का ? त्यामुळे याचा विचार आपण कधी करणार आहात ? कुपोषण हा विषय चर्चेचा नाही तर कुपोषण हा विषय निपटवण्याचा आहे व ख-या अर्थाने महाराष्ट्राला सदृढ करण्याचा हा विषय आहे.

सभापती महोदय, अंगणवाडीच्या माध्यमातून पूरक आहार गर्भवती माता व लहान मुलांनाही पुरवला जातो. पूरक आहार शिजवण्याचे काम ज्या बचत गटांना दिले जाते त्यांना 3-3 महिने पैसे दिले जात नाही, ठेकेदारांचे पैसे मात्र शासन कधीही थांबवित नाही परंतु बचत गटांना मात्र 3:3 महिने पैसे दिले जात नसल्यामुळे ख-या अर्थाने मुलांचे आणि गर्भवती मातांचे कुपोषण होत असते. हे जे कुपोषण होते त्याला शासनच जबाबदार आहे. महाराष्ट्र राज्य विकसनशील राज्य आहे असे म्हणण्याची तरी आपली लायकी आहे काय ? कुपोषण थांबविण्यासाठी केवळ घोषणा होतात परंतु कुपोषण थांबविण्यासाठी पैसे दिले जात नसेल तर ते योग्य होणार नाही. मुळातच बचतगट मागासलेला आहे. कर्ज काढून बचतगट काम करीत असतो आणि असे असतांना त्यांना त्यांचे पैसे दिले जात नसेल तर ते योग्य होणार नाही. ठेकेदाराचे पैसे मात्र एक दिवस सुध्दा ठेवले जात नाही. तो तुमच्या दारात येऊन काय करतो याची मला माहिती नाही. परंतु बचत गटाचे 3-3 वर्षे पैसे देणार नसाल तर कुपोषण कसे काय थांबू शकेल ? आम्ही कुपोषणासाठी योजना राबवितो असे म्हणण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ? 4 महिने तुमच्यामुळे आदिवासींचे कुपोषण झाले असेल आणि त्यानंतर त्यांना कितीही खाण्यास दिले तर त्याचे कुपोषण भरुन येणार आहे काय ?

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, आपण पिंजं-यातील पोपटाला काय पाहिजे ते खाऊ घालत असतो. परंतु शासनावर अवलंबून असलेल्या आदिवासींचे मात्र शासनाच्या निष्काळजीपणामुळे कुपोषण होत आहे असे म्हटले तर ते चूक होणार नाही. कुपोषण हे निष्काळजीपणामुळेच होत आहे हे आपल्याला मान्यच करावे लागेल.

सभापती महोदय, मेळघाट येथील खिडकी कलम येथे गेले होते त्यावेळी 10 दिवसात दोन जणांचा मृत्यू झाला होता. यासंदर्भात माहिती घेतली तेव्हा मला असे आढळून आले की, त्या ठिकाणी 3 दिवस वीज नसल्यामुळे त्या ठिकाणच्या आदिवासींनी पिण्याचे पाणी नदीवरुन आणल्यामुळे त्यांना गॅस्ट्रो झाला व गॅस्ट्रोमुळे तेथे 2 जणांचा मृत्यू झाला होता.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 11:15

श्रीमती शोभा फडणवीस........

त्या मुलांना दवाखान्यात दाखल करता आले नाही. आपण महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत. महाराष्ट्रात चांगल्या योजना राबविल्या बाबतचे मोठमोठे बोर्ड लावत आहोत. त्याची दूरदर्शनवर जाहिरात देत आहात. हम कितने खुश हैं, कितने अच्छे हैं. ती मुले दगावणाचे कारण म्हणजे त्या गावात रस्ता नव्हता. त्यामुळे त्या मुलांना वेळेत दवाखान्यात दाखल करता आले नाही. त्याशिवाय ते प्राथमिक आरोग्य केंद्र गावापासून 20 कि.मी.अंतरावर होते. तेव्हा या मुलांच्या मृत्यूस कोण जबाबदार आहे ? ज्याठिकाणी रस्ता नसेल त्याठिकाणी आरोग्याचे फिरते पथक नेमण्यात येईल असे शासनामार्फत सांगण्यात आले होते. परंतु हे फिरते पथक कधी फिरताना दिसत नाही. ते कुठे फिरत असते याची कोणाला माहीत नाही. शासनाच्या योजना फक्त कागदोपत्री असतात. त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होताना दिसत नाही. अधिकारी फक्त संबंधितांकडून योजना कशाप्रकारे राबविली जाते याची माहिती घेतात आणि संबंधित त्यांना असत्य माहिती देतात. त्या माहितीच्या आधारे मंत्रीमहोदय येथे उत्तर देतात. परंतु अधिकारी त्या योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी होते किंवा कसे याची पाहणी करीत नाहीत. अशा पध्दतीने योजनेची अंमलबजावणी झाली असे आपणास वाटत असेल तर आयुष्यभर आपण कुपोषण दूर करु शकणार नाही. उलट कुपोषण वाढतच राहील.

सभापती महोदय, श्रेणी-3 आणि श्रेणी-4 मध्ये किती बालके आहेत याबाबतची सत्य माहिती आपणास कधीच मिळणार नाही. कारण अधिकारी अंगणवाडी सेविकांना सांगितले जाते की, सत्य माहिती देऊ नका. त्यामुळे आपणासमोर सत्य माहिती कधी येत नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी नियमितपणे अंगणवाडीतील बालकांची तपासणी करुन त्यांचे नेहमी वजन चेक केले पाहिजे. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकच डॉक्टर असतो, मग तो आऊट डोअरला जाईल की, आरोग्य केंद्रात आलेल्या रुग्णांना तपासेल याची देखील विचार झाला पाहिजे. आरोग्य केंद्रात नर्सेस नसतात आणि असल्या तरी त्या तपासणीसाठी कुठे जात नाहीत. मग डॉक्टर आणि नर्सेस एकत्रित माहिती सादर करतात. त्यांनी दिलेल्या माहितीवर आपण विश्वास ठेवतो. परंतु आपल्यासमोर सत्य माहिती कधीच येत नाही याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस........

सभापती महोदय, मी याठिकाणी कुपोषणामुळे किती बालकांचा मृत्यू झाला याची विभागवार आकडेवारी देऊन सभागृहाचा वेळ घेत नाही. परंतु रोजगार न मिळणे हे देखील कुपोषणाचे एक कारण आहे. जोपर्यंत आपण रोजगार उपलब्ध करुन देणार नाही तोपर्यंत आपण कुपोषण थांबवू शकणार नाही. कारण त्यांच्याजवळ पैसे उपलब्ध झाल्यावर ते चांगल्या प्रकारचे प्रथिनयुक्त अन्न खाऊ शकतील. आज किती ठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे सुरु आहेत ? आपल्या राज्यात रोहयोची कामे सुरु नसल्यामुळे लोक बाजूच्या छत्तीसगड, गुजरात राज्यात कामासाठी जात आहेत. आज लोकांना पिण्यासाठी शुध्द पाणी मिळत नाही, चांगले अन्न खावावयास मिळत नाही येथूनच खरी कुपोषणास सुरुवात होते.

सभापती महोदय, वन विभाग देखील कुपोषणास कारणीभूत आहे. कारण वन विभागात कोणतेही काम सुरु करावयाचे असल्यास त्यास प्रथम वन विभागाची परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी लगेच मिळत नाही. मेळघाट येथे वाईल्ड लाईफ सेंच्युरी असल्यामुळे तेथे रस्त्याचे काम करु दिले जात नाही. रोहयोची कामे करावयाची असल्यास त्यासाठी वन विभागाची परवानगी घ्यावी लागते. दुसरे म्हणजे वन अधिकारी आदिवासींना जंगलात फिरू देत नाहीत. त्यामुळे त्यांना कंदमुळे, मश्रुम सारखी प्रथिनयुक्त फळे मिळत नाहीत. आज अशी परिस्थिती आहे की, पंचतारांकित हॉटेलमध्ये मश्रुम मिळते. यापूर्वी आदिवासींना जंगलातील मश्रुम सहज उपलब्ध होत होते परंतु,ते आता त्यांना मिळत नाही. आज मेळघाट, नंदूरबार, धुळे, गडचिरोली इत्यादी जिल्ह्यांत वन अधिकाऱ्यांमुळे तेथील आदिवासींना रोजगार उपलब्ध होत नाही. तेव्हा याबाबत देखील विचार करावयास पाहिजे.

राज्यात ठेकेदारांचा सुळसुळाट आहे. या ठेकेदारांकडून अनेक गैरकामे होत आहेत. अधिकारी स्वत:च्या पैशात मश्गुल आहेत. अधिकारी सत्य माहिती पुढे येऊ देत नाहीत. तेव्हा आपण कुपोषणसारख्या प्रश्नाला न्याय कसा देणार आहात याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

अप्रसिद्ध प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 11.20

श्रीमती शोभा फडणवीस...

ख-या अर्थाने कुपोषण थांबवावयाचे असेल तर शासनाने आपली मानसिकता बदलवली पाहिजे त्याचबरोबर अधिका-यांनी देखील आपली मानसिकता बदलवली पाहिजे आणि कुपोषण थांबविण्यासाठी निश्चित प्रकारची उपाययोजना केली पाहिजे एवढे सांगून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री हेमंत टकले यांनी कुपोषणामुळे होणाऱ्या बालकांचा मृत्यू या विषया संबंधीचा प्रस्ताव मांडलेला आहे त्याबद्दल सत्तारुढ पक्षाचे मी अभिनंदन करीत आहे. आतापर्यत विरोधी पक्षाकडून या विषयावरील प्रस्ताव मांडला जात होता आणि त्यावर चर्चा केली जात होती परंतु या वेळी प्रथमच सत्तारुढ पक्षाकडून या विषयावरील प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्यामुळे इतकी वर्षे आम्ही जे काही ओरडलो ते सत्तारुढ पक्षाला ऐकावयाला आले असे मला वाटते. माझ्या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये जवळजवळ 30 ते 35 वेळा मी कुपोषणासबंधीचा प्रस्ताव मांडला होता.

सभापती महोदय, कुपोषणावर उपाययोजना सुचविण्यासाठी आतापर्यत अनेक समित्या नेमण्यात आल्या होत्या आणि त्यांचे अहवालही प्रसिध्द झालेले आहेत. कुपोषण थांबविण्यासाठी मेळघाट पॅटर्न पासून डॉ. अभय बंग यांच्या अहवालापर्यत अनेक गोष्टी झाल्या आहेत.राजमाता जिजाऊमाता बाल पोषण मिशन नावाची संस्था देखील स्थापन करण्यात आली होती परंतु अजून पर्यत कुपोषणाचे प्रमाण कमी झालेले नाही असे दुर्देवाने या सभागृहात सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, साथी आणि सेहत या संस्थांना राज्य शासनाने नेमले असून त्या संस्थने देखील शासनाला अहवाल सादर केला होता. राज्य शासनाने या संस्थेला नेमले असे मी म्हटले त्याचे कारण असे की, या संस्थेने राज्य शासनाची बाजू फार मोठया प्रमाणावर मांडली असून त्यांना मोठया प्रमाणावर राज्य सरकारकडून निधी मिळालेला आहे."महाराष्ट्र राज्यातील खाद्यान्न सुरक्षा आणि कुपोषणाच्या संदर्भातील मिथके आणि वास्तव." या शीर्षका खाली त्यांनी अहवाल दिला असून त्यात असे म्हटलेले आहे की, " महाराष्ट्राने जरी आर्थिक स्तरावर प्रगती केलेली असली तरी राज्यातील निम्म्याहून अधिक लोकांना आजही पर्याप्त अन्न प्राप्त होत नाही. पुरेसे अन्न न मिळाल्यामुळे ज्यांना अर्धपोटी रहावे लागते अशा कुपोषणग्रस्त लोकांची संख्या महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर आहे." सभापती महोदय, मिथक नववे यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की ,"एकात्मिक बाल विकास आहार केन्द्रामध्ये, म्हणजेच अंगणवाडयामध्ये येणा-या बालकांचे वजन नियमित व योग्य प्रकारे घेतले जात नाही इतर काही अभ्यासातून असे सूचित होते की,

3...



VTG/ D/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 11.20

डॉ.दीपक सावंत ....

एकात्मिक बाल विकास  योजनेने मांडलेल्या आकडेवारीहून प्रत्यक्षात कुपोषित बालकांचे प्रमाण आपल्याकडे जी  आकडेवारी आहे त्यापेक्षा किती तरी अधिक आहे." त्यानंतर त्यांनी मिथक अकरावे यामध्ये असेही म्हटलेले आहे की," महाराष्ट्रामध्ये कुपोषणाची समस्या इतकी सार्वत्रिक आहे की आता  जवळपास सगळीकडे स्वीकारली गेली आहे.वास्तव गंभीर आहे. राज्यातील जवळजवळ 45 हजार बालकांच्या मृत्यूला त्या मुलातील कुपोषण कारणीभूत असते. सुमारे 500 स्त्रिया त्यांच्या गरोदरपणात आणि बाळंतपणात मृत्युमुखी पडतात. कुपोषणामुळे  संसर्ग, आजारपण आणि मृत्यू होण्याचा धोका वाढतो " अशा प्रकारे साथी आणि सेहत या संस्थेने काही बाबी आपल्या अहवालात सांगितले आहे. त्याचबरोबर कुपोषणावर "Report on Health Inquiries in Maharashtra" या नावाचा देखील त्यांनी अहवाल दिला आहे. साथी आणि सेहत या संस्थेने एकूण तीन अहवाल प्रसिध्द केले आहेत.

सभापती महोदय , राज्यातील पंधरा अति संवेदनशील जिल्हयात अनेक योजना राबविण्यात येतात.अमरावती जिल्हयातील मेळघाट, तसेच नंदूरबार, अक्कलकुला ,नाशिक जिल्हयातील काही गावे किंवा ठाणे जिल्हयातील वाडा, मोखाडा या तालुक्यामध्ये अनेक योजना राबविण्यात येत आहेत आदिवासी विकास विभाग,महिला व बाल विकास विभाग, आरोग्य विभाग तसेच रोजगार हमी योजना विभाग, पाणी आणि स्वच्छता विभागातर्फे काही योजना राबविण्यात येतात, परंतु या योजना फक्त कागदावरच आहेत. कुपोषण थांबविण्यासाठी माहेर योजना, जननी सुरक्षा योजना, नव संजीवनी योजना,मातृत्व अनुदान योजना, आशा योजना,अंगणवाडी सेविका योजना, राबविण्यात येत असून पाडा स्वंयसेवक योजना  आता बंद करण्यात आली आहे.  त्याचबरोबर एनजीओंना भरघोस अनुदान योजना नव्याने सुरु करण्यात आलेली आहे हे एनजीओ खरोखर  काम करतात काय ? कोण कोणत्या एनजीओ काम करतात यासंबंधी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान यांच्याकडे मी माहितीच्या अधिकारखाली माहिती मागितली होती.तेव्हा त्यांनी असे सांगितले की नंदुरबार जिल्हयामध्ये श्रीराम अहिरराव मेमोरिअल ट्रस्ट, नाशिकमध्ये गोदावरी फाऊंडेशन..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KGS/ ST/ KTG/ 11:25

डॉ.दीपक सावंत...

ठाणे येथील वनवासी कल्याण केंद्र, अमरावती येथील अपेक्षा होमिओ सोसायटी, गडचिरोली येथील इंडियन इंस्टिटयुट ऑफ युथ वेल्फेअर, अशा एनजीओंना आपण आरसीएच फ्लेक्सिफुलतर्फे तीन वर्षापर्यंत 15 लाख रुपये देतो. या 15 लाख रुपयांचा खरोखर उपयोग होतो की नाही? तो होत नाही असे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते. केवळ मेळघाटमध्ये नाही तर सर्व अति संवेदनशील विभागामध्ये आशा, अंगणवाडी सेविका आणि या एनजीओंमध्ये श्रेय लाटण्यावरुन भांडणे होत असतात. याचे कारण असे की, इंस्टिटयुशनल डिलिव्हरी झाली तर त्यांना 700 रुपये मिळतात आणि जर घरी डिलिव्हरी झाली तर 500 रुपये मिळतात. त्यामुळे नेमके यामध्ये एजंट कोण आहेत यावरुन भांडणे होत असतात. तसेच, हे अनुदान कागदावर लाटले जाते हे सुध्दा आपण लक्षात घ्यावे. माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे 400 रुपये रोख आणि 400 रुपये औषध स्वरुपामध्ये अनुदान दिले जाते. या 400 रुपयांच्या अनुदानाबाबत मागील वेळी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्यावेळी मी सांगितले होते. या 400 रुपयांच्या दिल्या जाणाऱ्या अनुदानाबाबत माझ्याकडे पंचनामा अहवाल आहे. मागील ऑगस्ट महिन्यापासून ऑक्टोबर महिन्यापर्यंत झालेल्या डिलिव्हरीच्या 400 रुपयांप्रमाणे पावत्या फाडण्यात आल्या नव्हत्या. मेळघाटमधील कळमखार प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या अंगणवाडी सेविकेच्या घरी गेल्यानंतर मला ही सत्य परिस्थिती पहावयास मिळाली. मी याठिकाणी जे सांगत आहे ते चुकीचे आहे असे आपणास वाटत असेल तर याबाबत आपण चौकशी करावी. सभापती महोदय, त्या गरीब आदिवासी महिलेला लिहिता वाचता येत नसतांना तिच्या नावाचा बेअरर चेक दिला जातो. त्या चेकचे पैसे काढण्यासाठी अंगणवाडी सेविका, आशा किंवा एनएनएम यापैकी कुणीतरी जाते. त्यातील फक्त 100 रुपये काढून घेतले जातात आणि बाकीचे पैसे एकतर तिला दिले जातात किंवा दिले जात नाहीत. कित्येक ठिकाणी अंगठा घेतला जात नाही तर काही ठिकाणी सह्यांचा कॉलम मोकळा ठेवलेला होता ही वस्तुस्थिती आहे. अशाप्रकारे तुम्हाला त्यांचे कुपोषण दूर करावयाचे आहे कां त्यांना आर्थिक मदत करावयाची आहे कां?

सभापती महोदय, बुडीत रोजगाराच्या बाबतीत सुध्दा तीच परिस्थिती आहे. एखादे बालक कुपोषित झाले व त्याला दवाखान्यात ॲडमिट करावे लागले तर सोबत असलेल्या त्याच्या आईला बुडीत रोजगारासाठी 40 रुपये प्रतिदिन भत्ता मिळतो. हा बुडीत रोजगार भत्ता आठ दिवसानंतर दिला जातो, तोपर्यंत त्यांनी काय खायचे? कायदा बनविणाऱ्यांना मी असे विचारतो की, जर आठ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

दिवस बालक हॉस्पिटलमध्ये राहिले तर 8x40=320 रुपये होतात. हे 320 रुपये त्या महिलेला एक महिन्यानंतर मिळतात. अशा परिस्थितीत त्यांची घरातील चूल कशी पेटणार, त्यांच्या घरातील आणखी दोन-चार असलेल्या मुलांना खायला कोण घालणार? मग ते फरार होतात. त्या मुलांना बकोटीला मारतात आणि निघून जातात आणि मग आपण फरार रुग्ण म्हणून एफआयआर दाखल करतो ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही लोकांना मदत करण्यासाठी कायदा बनविता की, लोकांना बुडविण्यासाठी बनविता? दुसरीकडे आपण अदिवासींची कुपोषित बालके ही रुग्णालयामध्ये ॲडमिट होत असल्याचे सांगता. या संदर्भात माझ्याकडे मेळघाटातील साजरावाडी, भिवामल, खारी, दादरा, गंभेरी, नागझिरा, सारजू या गावामधील जून, जुलै व ऑगस्ट या महिन्यांमध्ये झालेल्या बालमृत्यूंची आकडेवारी आहे. सभापती महोदय, यापैकी तीन चतुर्थांश बालमृत्यू घरी झाले आहेत. एक चतुर्थांश मृत्यू रस्त्यामध्ये झाले आहेत आणि एक तृतीयांश मृत्यू हे प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा धारणीच्या जिल्हा रुग्णालयामध्ये झाले आहेत. सभापती महोदय, आदिवासी पाडयापासून रुग्णालयापर्यंत जाण्यासाठी रस्ता नाही. सायलीखेडयाच्या किंवा बारुखेडयाच्या रुग्णांना रुग्णालयात जायचे असेल तर त्याठिकाणी रस्ता नाही. माननीय आदिवासी विकास मंत्र्यांना मी विचारु इच्छितो की, आपण त्याठिकाणी जाऊ शकता काय?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

राजश्री शाहू योजनेतून 250 रुग्णवाहिका देण्यात आल्या त्या रुग्णवाहिका कुठे आहेत? सन 2006 साला मध्ये 18 करोड रुपये उबदारपेटी बनवायला दिले आहेत. किती ठिकाणी एन.आय.सी.यु. आहेत किती ठिकाणी या उबदारपेटया आहेत? जेथे या उबदार पेटया आहेत त्याठिकाणी पालीची अंडी आणि उंदराच्या लेंडया पहावयास मिळतात. मग त्या उबदारकक्षात ठेवलेले बालक इन्फेक्शनने मरणार नाही तर काय होणार? कुपोषणाने मरण्यापेक्षा रुग्णालयाच्या चुकीच्या हाताळणीने ही बालके मरतात. मग सन्माननीय मंत्री महोदय, श्री. शेट्टी सांगतात की, आम्ही नोडल एजन्सी म्हणून हे काम महिला व बालविकासकडे दिलेले आहे. महिला व बाल विकास विभाग यासंदर्भात काय करणार? मेळघाटात एप्रिल पासून बालरोग तज्ञ नाहीत मग तेथील कुपोषित बालकांना कोण बघणार? साद्रावाडी पासून चिखली धारणीपर्यंत कुपोषित बालके आहेत. चिखलदरा प्राथमिक आरोग्य केंद्रात चार ते पाच मिहिन्यापासून ऐन पावसाळयाच्या काळात जेव्हा कुपोषणाचा भर असतो तेव्हा तेथे बालरोग तज्ज्ञ गेले नाहीत. हायकोर्टाने आणि सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेले आहेत. त्याची अमलबजावणी कुठे झालेली आहे? शासन कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट करीत आहे.

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभागाने अतिशय चांगल्या, योजना राबविल्या आहेत. या विभागाने असे म्हटले होते की,"तयार केलेल्या आहाराचा पुरवठा करावयाचा असल्यामुळे अंगणवाडीमध्ये आहार पुरवठा केल्यानंतर स्थानिक प्रयोगशाळेतून वर्षातून दोन वेळा अचानक तपासणी करावी." ही तपासणी करण्यासाठी शासनाकडे प्रयोगशाळा आहेत काय? नसतील तर मग अशा पध्दतीने कशासाठी लिहिण्यात येते? पुढे असे म्हटले आहे की, "0 ते 6 वर्षे वयोगटातील गर्भवती स्त्रिया, मुले, स्तनदा माता यांना पूरक पोषण आहार पुरविला जातो. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार महिन्यातून 25 दिवस याप्रमाणे 300 दिवस पूरक आहार पुरविण्यात येतो. या योजनेंतर्गत 8 ते 10 ग्रॅम प्रथिने, 300 कॅलरीज उष्मांकयुक्त पूरक आहार देण्यात येतो." आणि थेरपेटिक फुड देण्यात येते. माननीय मंत्री महोदया या विभागाची पाहणी करण्यासाठी कधी गेल्या आहेत काय? माननीय मंत्री महोदयांनी या अंगणवाडयांमध्ये जाऊन बघावे. उपकेंद्र आणि अंगणवाडी एका घरात चालविली जाते. फक्त खिचडी बनवून दिली म्हणजे झाले काय? पूरक पोषण आहाराचे कॉन्ट्रॅक्ट कोणाला द्यायचे याबाबत गेल्यावर्षी या सभागृहात रणकंदन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

झाले होते. पेपर फॉईलमध्ये पॅक करुन व्यवस्थित फुड द्यायचे होते. त्याप्रमाणे ते दिले काय?दिले असेल तर या सभागृहामध्ये त्यासंबंधीचे एक सॅम्पल दाखविण्यात यावे. माननीय मंत्री महोदयांना माझे आव्हान आहे. मेळघाटमध्ये, वाडा-मोखाडयामध्ये टेक होम रेशन अशा शासन संज्ञेनुसार ते कुठे दिले आहे ते सांगावे.? ज्या तीन महिला बचत गटांना कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले होते त्याबाबत या सभागृहात रणकंदन झाले होते. माननीय मंत्री महोदया त्यावेळी कॅबिनेट मंत्री नव्हत्या. त्यावेळी श्री. सुभाष झनक हे कॅबिनेट मंत्री होते. त्यावेळी आम्ही त्यांना विचारले होते की, एवढया टेक्निकल गोष्टी पाळणे महिला बचत गटाला कळणार आहे काय? सभापती महोदय, हे सगळे कुपोषणाशी निगडित प्रश्न आहेत. या नंतर मी सार्वजनिक आरोग्य खात्यावर बोलणार आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य खात्याची जबाबदारी कधी येते? ज्यावेळी मृत्यू होतो त्यावेळी सार्वजनिक आरोग्य खात्याचा संबंध येतो. मॅम आणि सॅम हे नवीन वर्गीकरण आले आहे. शासनाला आता ग्रेड-1, ग्रेड-2, ग्रेड-3, ग्रेड-4 नको आहे. मध्यम गटातील मुले आणि तीव्र कुपोषित गटातील मुले. सिव्हियर अथवा मॉडरेट म्हणजे मॅम आणि सॅम. सभापती महोदय, हे कशावरुन ठरविण्यात येते तर हे उंचीवरुन, वजनावरुन आणि वयावरुन ठरविण्यात येते. यासदर्भात वजन कशा प्रकारे केले जाते? सभापती महोदय, आपण माझ्या बरोबर आलात तर मी आपल्याला हे सर्व दाखवू शकतो. वजनाचा मोठा काटा असतो. त्याला झुला बांधलेला असतो. त्यामध्ये मुलाला ठेवतात. तो वजनाचा काटा झाडाला अडकवण्यात येतो. त्या झोळीमध्ये बालक असते. ते बालक हलत असते त्यामुळे वजनाचा काटा इकडे-तिकडे होतो. वजनाचा काटा .5 ने बदलला तरी ते मूल तीव्र गटातून मध्यम गटामध्ये जाते आणि मध्यम गटामधून तीव्र गटामध्ये जाते. त्याचा फायदा अधिकारी घेतात.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ..

यासाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. मूल झोळीमध्ये ठेवल्यानंतर ते हातपाय हलविणारच. मुलाने हातपाय हलविले तर मुलाला झोळीत ठेऊन झाडाला लटकविले किंवा घरी खिळ्याला लटकविले तरी वजनामध्ये परिवर्तन येणार की नाही ? माननीय मंत्रिमहोदयांनी प्रॅक्टीकल गोष्टी पहाव्यात. जर वजन चुकीचे झाले तर शासन रेकॉर्डवर सांगणार की, आमच्या अहवालानुसार इतकीच मुले आहे. गेल्या 30 दिवसांमध्ये 98 बालकांचा मृत्यू झाला. माननीय मंत्रिमहोदया, आपण त्या ठिकाणी का गेला नाहीत ? सार्वजनिक आरोग्य खात्याचे माननीय मंत्रिमहोदय मेळघाटमध्ये का गेले नाहीत ? गेल्यावर्षी तत्कालीन माननीय राज्यपाल महोदय श्री. जमीर साहेब यांनी मेळघाटचा दौरा केला होता त्यावेळी एका आदिवासी मुलीने त्यांना सांगितले की, आम्हाला भीक नको, आम्हाला आमचा हक्क द्या. त्यांना तो हक्क मिळाला का ? त्यांना हक्क मिळाला नाही. आज आदिवासी माणसे, आदिवासी मुले, आदिवासी कुटुंबे त्यांच्या हक्कापासून वंचित आहेत. सप्टेंबरमध्ये 51 मृत्यू झाले तरी सरकारला जाग येत नाही. यामध्ये एकट्या झिलपी गावामध्ये 5 मृत्यू झाले तसेच दादरा गावामध्ये 4 मृत्यू झाले. या 200 ते 250 लोकसंख्येच्या गावांमध्ये 4-5 मृत्यू होत असतील तर एवढे भयानक सत्य आपल्यासमोर आहे. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदय काही करणार आहेत की नाही ?

सभापती महोदय, आपण 400 रुपयांची औषधे सांगितलेली आहेत. या 400 रुपयांच्या औषधांमध्ये फोलरॉन टॅब्लेट, ॲफ्कल, कॅल्सीन सिरप, फेरस सल्फेट ही औषधे असतील. यामध्ये फौलरॉनच्या 90 गोळ्या असतात आणि कॅल्सीनच्या 2 बोटल्स देतात. म्हणजे ही औषधे फक्त 200 रुपयांची असतात आणि आपण 400 रुपयांचा क्लेम करता. असे जर असेल तर त्या गर्भवती मातांचे आरोग्य कसे सुधारणार ? आता सन्माननीय सदस्यांनी रक्त पांढरीचा विषय सांगितला. रक्तपांढरी सुध्दा ॲनिमियामुळे होते. हेमोग्लोबिनचे प्रमाण कमी झाल्यामुळे ते होते. त्या गर्भवती महिलेला आर्यन, कॅल्शीयम दिले नाही तर काय होणार ? आता डी.डी. किटच्या बाबतीत सांगण्यात आले. गेल्या वर्षी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विषय उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय, श्री. आर. आर. पाटील तसेच माननीय मंत्रिमहोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

सांगितले होते की, आम्ही त्यांना घरी पाठवितो. एकाला घरी पाठविले. सी.आय.डी. चौकशी केली. अजून सी.आय.डी. चौकशीचा अहवाल येत नाही. मग शासन कुपोषणाच्या बाबतीत किती गंभीर आहे ? डी.डी. किट मधल्या ब्लेडने त्या महिलेची नाळ कापण्याचा क्रुरपणा आपण करता. किती अहवालाची चौकशी होते ? याची खरेदी एमएसएसआयडीसी मार्फत होते. आदिवासी खात्याची खरेदी खादी ग्रामोद्योगामार्फत केली जाते. बेडशीट्स नाहीत, काही नाही. आपण याची चौकशी करणार काय ? 38 लाख रुपयांच्या खरेदीची चौकशी करावी. आपण सांगता की, सबसेंटरला 10 कोटी रुपयांचे किट दिले. कोणत्या सबसेंटरला किट दिले आहेत ? आपण मला एक तरी किट दाखवा. किट ए, किट बी दाखवा. मेळघाट पॅकेजमध्ये शासनाने काय सांगितले होते ? दोन वर्षापूर्वी तत्कालीन राज्यमंत्री श्री. सतीश पाटील यांनी या ठिकाणी मेळघाट पॅकेज घोषित केले होते. मेळघाट पॅकेजमध्ये पंचतारांकित हॉटेल, रेल्वे सुविधा, पक्के रस्ते, 50 हजार हेक्टरमध्ये सेझ ा, औद्योगिक वसाहत, त्यामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, पॉलिटेक्निक आणि इंजिनिअरींग कॉलेज, मोफत घरे, मद्यनिर्मिती असे सर्व सांगितले होते. मेळघाटमध्ये यापैकी काहीही झालेले नाही.

सभापती महोदय, खावटी कर्जाच्या बाबतीत याहीपेक्षा भयानक सत्य आहे. शासनाने चौकशी करावी. खावटी कर्जामध्ये जे अन्न देतो, जो गहू दिला जातो, जो तांदूळ दिला जातो तो बाजारभावापेक्षा तिप्पट दराने का घेतला ? याचे पुरवठादार कोण आहेत. त्याचे कॉन्ट्रॅक्टर कोण आहेत. कोणत्या पी.एस. च्या भावाकडे त्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले आहे हे आपण विचारावे. खावटीमध्ये कर्ज द्यावयाचे तर आपल्याला रोख रक्कम देता येत नाही त्यामुळे आपण वस्तू स्वरुपात कर्ज देतो. वस्तू स्वरुपात द्यावयाचे असेल तर बाजारात खावटी कर्जाचा तांदूळ कोणत्या दराने मिळतो ? जोपर्यंत या सर्व प्रकरणाची चौकशी सी.आय.डी. मार्फत होत नाही तोपर्यंत कुपोषण थांबणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ दीपक सावंत.....

कारण हे अधिकारी मंत्र्यांना बदनाम करतात, मंत्री बदनाम आहेत की नाही याबाबत ज्यादिवशी हातामध्ये पुरावा येईल त्यादिवशी मी त्यांच्याबाबत सुध्दा बोलीन. या कुपोषणाला नोकरशाही आणि रिक्त पदे जबाबदार आहेत असे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात सुरु असलेल्या चर्चेत भाग घेताना मी केवळ दोनच मुद्यांवर माझे विचार व्यक्त करणार आहे. ज्याठिकाणी कुपोषण आहे त्या भागातील दळणवळणाची साधने कशी आहेत, रस्ते कसे आहेत, तेथील रस्ते किती जलद गतीने होतात या दृष्टीकोनातून आदिवासी विकास खात्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी या विषयावर चर्चा झाली होती त्यावेळी मंत्री महोदयांनी सांगितले होते की, आदिवासी खात्याने सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेली तरतूद पूर्णपणे खर्च होत नाही. जोपर्यंत त्या भागात दळणवळणाची सोय होत नाही तोपर्यंत ख-या अर्थाने त्या भागातील कुपोषण कमी होणार नाही. दळणवळणाच्या कामामध्ये अधिका-यांकडून होत असलेला भ्रष्टाचार खऱ्या अर्थाने थांबत नाही तोपर्यंत यामध्ये काही सुधारणा होणार नाही. या खात्याचा नव्याने चार्ज घेतल्यानंतर मंत्री महोदयांनी सांगितले होते की, खात्याचे सचिव त्यांना नीट माहिती देत नाहीत. या खात्याचे सचिव त्यांना भेटत नाहीत. भेटले तरी ते माहिती देत नाहीत. या चर्चेच्या निमित्ताने याबाबतचेही उत्तर आम्हाला अपेक्षित आहे.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाच्या माननीय मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो. या सभागृहात मी मागील 11 वर्षांपासून काम करीत आहे. महिला व बालविकास विभागामार्फत बालकांना कुपोषित भागामध्ये आहार पुरविला जातो त्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अनेक वेळा चर्चा घडवून सांगितलेले आहे. या आहाराच्या दर्जाची पाहणी केली तरी या खात्यासाठी खूप केल्यासारखे होईल. हा आहार पुरविणारे अधिकारी कोण आहेत ? कुपोषितग्रस्त बालकांचे गाल आत जात आहेत आणि आहार पुरविणा-या अधिका-यांचे गाल वर आल्याचे दिसतात. मी मार्केटिंग फेडरेशनमध्ये काम करतो. वर्षानुवर्षे तेच ठेकेदार काम करीत असल्यामुळे त्यांची या कामामध्ये मक्तेदारी निर्माण झालेली आहे. हे ठेकेदार सर्व मंडळातील अधिका-यांना भेटतात. यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. एकेक वस्तू 400-500 रुपयांनी खरेदी केली जाते. आज ही चर्चा होण्यापूर्वी मी आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत सभागृहात एकत्रच आलो. त्यांनी मला सांगितले की, या खात्यामध्ये काहीही फरक झालेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी चर्चेला सुरुवात करीत असताना तीच चर्चा आणि तेच

2.....

08-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.जयंत प्र.पाटील.....

उत्तर यामध्ये बदल झालेला नाही असे सांगितले. मेळघाटमधील कुपोषणाचा विषय नेहमी चर्चेत असतो. या अधिवेशनाच्या निमित्ताने त्या भागाला दिलासा मिळेल असे शासनाने नवीन धोरण जाहीर करावे. मला वाटते की, गेल्या वेळी आरोग्य खात्याकडूनही उत्तर दिले गेले होते. यासंदर्भात एक कमिटी नेमून संबंधित खात्याचे सर्व मंत्री महोदय आणि अधिकाऱ्यांचा त्यात समावेश केला होता. यावेळी महिला व बालविकास विभागाचे मंत्रीही उत्तर देणार आहेत. मला वाटते की, एक खिडकी या योजनेच्या धर्तीवर सरकारने ठराविक धोरण स्वीकारले असेल त्यानुसार वेगळी दखल घेतली जाईल असे या चर्चेच्या निमित्ताने जाहीर करावे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो, सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

----------

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.खंदारे 11:45

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कुपोषणासारख्या संवेदनशील विषयाची चर्चा आपण येथे करीत आहोत. आपला भारत देश हा संपूर्ण जगामध्ये आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, हा कुपोषणाचा प्रश्न ते प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित करीत आहेत आणि हाच प्रश्न आज सत्ताधारी पक्षाच्या वतीने उपस्थित करण्यात आलेला आहे. माझ्या सारख्या शहरी भागातून आलेल्या कार्यकर्त्यांसाठी ही फार मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. कुपोषणाच्या संदर्भात बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी विविध आकडेवारी दिली. आपल्या राज्यामध्ये अनेक प्रकारच्या चांगल्या योजना आहेत. या योजनांना चांगले आर्थिक पाठबळही लाभलेले आहे. तरी देखील हा प्रश्न सुटत नाही हे ऐकून आमच्या सारख्याच्या मनामध्ये अनेक शंका उपस्थित होतात. राबविल्या जाणा-या योजनांमध्ये कुठेतरी कमतरता असावी असे मला जाणवते. राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यासाठी पालकमंत्री नेमलेले आहेत. माझी या निमित्ताने पालकमंत्र्यांना अशी विनंती आहे की ते जेव्हा जेव्हा जिल्ह्याचे दौरे करतात त्यावेळी त्यांनी कुपोषणग्रस्त भागाचा आढावा घ्यावा आणि जी काही परिस्थिती असेल त्यानुसार व्यवस्था करण्याचे आदेश यंत्रणांना द्यावेत. पालकमंत्र्यांना माझी आणखी एक विनंती अशी आहे की, त्यांनी कुपोषित बालके असलेल्या भागाचा अधिका-यांना कोणतीही पूर्वसूचना न देता दौरा करावा जेणेकरुन सत्य परिस्थिती त्यांना समजू शकेल.

सभापती महोदय, कुपोषणाची अनेक कारणे आहेत. गर्भवती माताना चांगल्या प्रकारचा आहार मिळत नाही, बालकाचे पालनपोषण करण्याच्या बाबतीत त्यांचे अज्ञान आहे. असे जे काही प्रश्न आहेत त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. गभर्वती मातांना खिचडीचा आहार दिला जातो असे सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले. मी सांगू इच्छितो की, मुंबईच्या बाजारपेठेमध्ये "रेडी टू इट" अशा प्रकारची तयार पाकीटे उपलब्ध आहेत. तेव्हा ज्यामध्ये गर्भवती माता आणि बालके यांच्यासाठी आवश्यक असणारी पोषक द्रव्ये आणि घटक आहेत अशा प्रकारचा रेडी टू इट आहार पाकिटाच्या माध्यमातून त्यांना दिला गेला तर त्यांना चांगल्या प्रकारचा आहार मिळण्याची व्यवस्था होऊ शकेल. कारण आता त्यांना जो काही आहार दिला जातो तो योग्य प्रकारे शिजवून दिलेला नसतो किंवा धान्य योग्य प्रकारचे नसते. मध्यंतरी मुलांना खिचडीमध्ये साप शिजवून दिल्यामुळे

..2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे....

त्यांना विषबाधा झाल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आली होती. म्हणून चांगल्या आणि स्वच्छ वातावरणामध्ये तयार केलेली पौष्टिक आहाराची रेडी टू इट अशी पाकिटे त्यांना दिली तर ती एक चांगली गोष्ट होईल.

सभापती महोदय, आरोग्याच्या संदर्भात शासनाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या चांगल्या योजना राबविल्या जातात. अनेक खाजगी तसेच धर्मादाय संस्थांना हॉस्पिटल बांधण्यासाठी जागेच्या किंमतीमध्ये सवलत दिली जाते, करामध्ये सवलत दिली जाते, एफएसआयमध्ये सवलत दिली जाते. अशा हॉस्पिटल्सनी राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये महिन्यातून एकदा आरोग्य सुविधा, डॉक्टर्स उपलब्ध करुन देण्याचे निर्बंध त्यांच्यावर घातले पाहिजेत जेणेकरुन कुपोषण असलेल्या परिसरातील महिलांना, बालकांना चांगली आरोग्य सेवा मिळू शकेल. आपल्या देशात आणि राज्यात सेवाभावीवृत्तीने काम करणा-या अनेक संस्था आणि उद्योगपती आहेत. अझीम प्रेमजी यांनी त्यांच्या ट्रस्टच्या माध्यमातून शिक्षणसाठी 8 हजार कोटी रुपये खर्च केलेले आहेत. अशा प्रकारे शासनाने स्वयंसेवी संस्था आणि टाटा,बिर्ला,अंबांनी यासारख्या मोठ्या उद्योगपतींना या कुपोषणाच्या संदर्भात सहाय्य करण्यास सांगितले तर तेही या कामी पुढा
कार घेतील .....

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे............

आणि या योजना चांगल्या पध्दतीने राबविल्या जातील. आज योजना अस्तित्वात आहेत परंतु ज्या पध्दतीने योजनांची अंमलबजावणी झाली पाहिजे त्या पध्दतीने ती होताना दिसून येत नाही, योजनांमध्ये भ्रष्टाचार होतो असे चित्र आपल्यासमोर उभे आहे. हे चित्र या पुरोगामी महाराष्ट्राला भूषणावह नाही. अनेकदा आपण दूरदर्शनवरील डिस्कव्हरी चॅनेलवर आफ्रिकेतील विदारक चित्र पाहतो. परंतु महाराष्ट्रातील वृत्तपत्रांमधून कुपोषणाबद्दल जी माहिती आणि फोटो प्रसिध्द होतात ते पाहिल्यानंतर आपण आफ्रिकेशी बरोबरी करु लागलो आहोत की काय अशी शंका मनामध्ये निर्माण होते. या चर्चेच्या निमित्ताने मी शासनाला सूचना करु इच्छितो की, पुढील चार वर्षात या महाराष्ट्रात एकही कुपोषित बालक असता कामा नये अशा निर्धाराने पावले उचलली पाहिजेत. त्यादृष्टीने योजनांचे मॉनिटरिंग झाले पाहिजे. जे समाजसेवक आहेत, ज्या स्वयंसेवी संस्था आहेत, लोकप्रतिनिधी आहेत त्यांना योजनांमध्ये सहभागी करुन घेऊन योजनांचे मॉनिटरिंग केले तर निश्चितपणे ही समस्या दूर करण्यामध्ये फायदा होऊ शकतो. कुपोषणाच्या बाबतीत एक महत्वाचा मुद्दा म्हणजे आदिवासी बांधवांना आज रोजगार उपलब्ध नाही. त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असते. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, त्यांचे राहणीमान, त्यांच्या सवयी विचारात घेऊन त्यानुरुप रोजगार उपलब्ध करुन दिला तर निश्चितपणे फायदा होईल. कुपोषणाची समस्या असलेला भाग प्रामुखाने जंगलामधील आहे. त्या भागामध्ये मध गोळा करणे किंवा इतर तत्सम उद्योग आहेत, वनीकरणाच्या माध्यमातून रोपांची लागवड करणे याद्वारे आदिवासींना रोजगार उपलब्ध करुन देता आला तर निश्चितपणे त्यांच्या हाताला काम मिळेल आणि त्यांची आर्थिक स्थिती काही प्रमाणात सुधारेल. माझी पुन्हा एकदा शासनाला विनंती आहे की, या सर्व योजनांचे मॉनिटरिंग सक्षमपणे झाले पाहिजे. किंबहुना त्या मॉनिटरिंगवर अंकुश ठेवण्यासाठी चांगल्या पध्दतीची यंत्रणा उभारता आली तर ती उभारण्याचा जरुर प्रयत्न केला जावा आणि पुढील चार वर्षात कुपोषणाची समस्या सोडविण्याचा शासनाने निर्धार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : या प्रस्तावावर आणखी 21 माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. दुपारी 12.15 वाजता मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होणार आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी पाच-पाच मिनिटामध्ये आपले विचार मांडावेत अशी विनंती आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, उत्तराचे भाषण दुपारी ठेवावे. माननीय सदस्यांना या महत्वपूर्ण विषयावर विचार मांडण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात यावा.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी आपले भाषण सुरु करावे.

-----

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व इतर यांनी उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि त्यासंबंधी माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे. मी याठिकाणी काही महत्वाचे मुद्दे मांडू इच्छिते.

सभापती महोदय, संख्याशास्त्राचा उल्लेख मी याठिकाणी करणार नाही. अगोदरच्या वक्त्यांनी कोणत्या जिल्हयात किती प्रमाणात कुपोषण आहे याबद्दल समग्र विवेचन केले आहे. एक सामाजिक संस्था चालवित असताना ठाणे जिल्हयातील आदिवासी भागात काम करण्याचा मला योग आला. त्याठिकाणी काम करीत असताना जे दृष्टीस आले ते मी सभागृहाला सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार या आदिवासी जनतेसाठी पुरोगामी महाराष्ट्रामध्ये बऱ्याच अंशी आपला निधी खर्च करीत आहे. परंतु ज्या ज्या खात्याच्या यंत्रणा काम करीत आहेत त्या खात्याच्या मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे की, सत्काराचे हार आणि फेटे यामध्ये न अडकता या आदिवासी बांधवांचे बेसिक प्रश्न आहेत आहे त्या प्रश्नानुरुप काम होणे निकडीचे आहे. ज्या अधिकाऱ्यांना या भागामध्ये नेमले जाते त्या अधिकाऱ्यांना आदिवासींच्या प्रश्ना विषयी फारशी आस्था आहे असे मला दिसून येत नाही. मी ज्या सामाजिक संस्थेसाठी काम करते ती संस्था शासनाकडून कोणतीही ग्रँट घेत नाही.

नंतर आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .......

हे प्रथम मी नमूद करु इच्छिते. आम्ही जेव्हा आदिवासी भागात जातो तेव्हा प्रामुख्याने अनेक उणीवा आम्हाला दिसून येतात. तलासरीसारख्या आदिवासी तालुक्यात गेल्यानंतर आम्ही तेथील आदिवासी बाया-बापड्यांना बोलावून त्यांच्याबरोबर चर्चा करतो तेव्हा संध्याकाळचे पाच वाजले की एकही भगिनी आमच्या कार्यक्रमात थांबत नाही. त्याचे कारण त्यांना मिळेल ती एस.टी. पकडून आपल्या दुर्गम भागातील घरी जावे लागते. त्याचबरोबर ठराविक स्टॉपला उतरुन त्यांना घरापर्यंत जंगलातून पायी चालत सुध्दा जावे लागते. यासंबंधीचा अहवाल आपल्याला आदिवासीच्या अधिकाऱ्यांनी दिला आहे काय, दिला नसेल तर तो का दिला नाही याचा देखील या अधिकाऱ्यांना जाब विचारणे आवश्यक आहे असे मला वाटते. आपण या आदिवासींना खिचडी देतो, त्यांना रोजगार देण्याचाही प्रयत्न करतो परंतु ज्या गर्भवती माता असतात त्यांच्या आरोग्याविषयी काय काळजी घेतो हे आदिवासी विभागाने ठरविले आहे काय हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. याचे उत्तर मात्र "शून्य" असेच मिळेल. अत्यंत गरीब आणि गर्भवती माता काम करीत असतात. तीन-चार दिवसांची बाळंतीण आपल्या तान्ह्याला चार वर्षाच्या लेकराच्या स्वाधीन करुन कामावर जाते. कारण स्वत:च्या तसेच आपल्या मुलांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी तिला कामावर जाणे अनिवार्य असते, या परिस्थितीचा अहवाल आपल्या अधिकाऱ्यांनी दिला काय याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. आपण आदिवासींना खिचडीचे वाटप करतो त्यासंदर्भात महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून आम्ही प्रश्नही उपस्थित केला होता. तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की, आम्ही आदिवासींसाठी एक पॅकेज देणार आहोत. या समितीच्या तीन-चार बैठका झाला परंतु अद्यापही ते पॅकेज आमच्यासमोर आले नाही. चौथ्या बैठकीपर्यंत आम्हाला त्यासंबंधीचा कुठलाही रिझल्ट मिळाला नाही. शासनाने हे काम कोणाला द्यावे हा शासनाचा प्रश्न आहे व त्यात मी जाऊ इच्छित नाही पण जे काही देणार ते त्या लोकांपर्यंत पोहचणार की नाही हे पाहणे महत्वाचे आहे. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, या अधिकाऱ्यांपैकी ज्यांना इच्छा नसेल त्यांना घरी पाठविले तरी चालेल परंतु आपले काम करताना स्वत:चे उत्तरदायित्व आणि आस्था असेल तरच ते चांगल्या प्रकारे काम करु शकतील आणि अशाच अधिकाऱ्यांना आदिवासी भागात पाठवावे, अशी माझी विनंती आहे.

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

सभापती महोदय, त्याचप्रमाणे ज्या बालवाड्या चालविल्या जातात त्यांना लागूनच पाळणा घराची सोय सुध्दा केली पाहिजे. कारण माता आपले चार-पाच दिवसाचे मूल सांभाळण्यासाठी आपल्या चार वर्षाच्या बालकाजवळ ठेवून कामाला जाते. अशा बालकांना या पाळणा घरात ठेवून त्यांना सांभाळण्याची जबाबदारी सुध्दा घेणे आवश्यक आहे. आपण शहरात आपल्या बाळाला पाळणा घरात ठेवतो व त्यापोटी महिन्याला 3000 रुपये देत असतो. निदान या आदिवासीच्या मुलांच्या पाळणा घरासाठी 300 रुपये दर महिना तरी शासनाने खर्च करावा अशी मी सूचना करते. जेणेकरुन त्याची चांगल्या प्रकारे देखभाल होऊ शकेल. आदिवासींच्या प्रश्नावर बोलत असताना आदिवासींबद्दल अनास्था असलेल्या अधिकाऱ्यांना पाठविले जाते असे होता कामा नये अशीही विनंती करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

---------

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, राज्यातील कुपोषणाच्या संदर्भात सभागृहात उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेच्या अनुषंगाने माझे विचार मी व्यक्त करणार आहे.

महोदय, माझी प्रथम अशी विनंती राहणार आहे की, कुपोषणावरील चर्चेवर अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे असल्याने या चर्चेवरील उत्तर 12.15 वाजता न घेता नंतर ठेवावे, जेणेकरुन सन्माननीय सदस्यांना आपले विचार मोकळेपणाने व्यक्त करता येतील. कुपोषणासारख्या विषयावर सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. पण त्याचे ठोस असे उत्तर अद्यापही मिळाले नाही. कारण कुपोषणावरील चर्चेचे उत्तर सुध्दा कुपोषितच असते त्यामुळे कुपोषणासारख्या विषयाची थट्टा होता कामा नये याचेही भान ठेवावे अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

सभापती महोदय, महाराष्ट्राला 21 व्या शतकातही कुपोषणाची समस्या भेडसावत आहे असे विचार या ठिकाणी व्यक्त करण्यात आलेले आहेत. या सुवर्णमहोत्सवी वर्षात 2-2 लाख बालकांचा मृत्यू होणे ही बाब महाराष्ट्राला लाजिरवाणी आहे. कुपोषणाच्या संदर्भात अनेक वेळा विचार मांडून सुध्दा त्या बाबत शासनाकडून ठोस असे काम होतांना दिसत नाही. कुपोषणाच्या संदर्भात विचार मांडून आमचे घसे कोरडे होतात परंतु फरक मात्र काही पडत नाही. शासन कुपोषण थांबवण्यासाठी योजना आखते परंतु त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्यामुळे त्याचा फायदा आदिवासींपर्यंत पोहचू शकत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितले की, जोपर्यंत आदिवासींच्या खेडयापाडयात रस्ते जाणार नाहीत, चांगले रस्ते तयार होणार नाही तोपर्यंत त्यांचे कुपोषण थांबणार नाही. आदिवासी जर अत्यवस्थ झाला तर त्याला आरोग्य सुविधा मिळवण्यासाठी 4-4 तास अंतर कापून रुग्णालयात यावे लागते. ठाणे जिल्हयामध्ये सुध्दा रस्त्यांची अवस्था अशीच आहे. ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या भागात मोठया प्रमाणात रस्ते निर्माण होण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत ठाणे जिल्हयाचे विभाजन होणार नाही तोपर्यंत ठाणे जिल्हयाचा आणि ठाणे जिल्हयातील आदिवासींचा विकास होणार नाही. त्यामुळे ठाणे जिल्हयाचे लवकरात लवकर विभाजन करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासींसाठी मोठया प्रमाणात निधी येत असतो परंतु त्यातील 3 टक्के निधी सुध्दा खर्च होत नाही. आदिवासींवर बजेटच्या 9 टक्के रक्कम खर्च होणे आवश्यक आहे परंतु आदिवासींवर त्यांचा निधी खर्च होत नाही ही वस्तुस्थिती आहे. अजून सुध्दा आदिवासींचा 8 हजार कोटी रुपयांचा बॅकलॉग आहे. आदिवासींसाठी योजना तयार केल्या जातात परंतु त्या राबवल्या जात नाहीत. शासनाने आदिवासींसाठी राजमाता जिजाऊ कुपोषण मिशन नावाची योजना सुरु केली होती. ज्या जिजाऊ मातेने शिवबाला जन्म दिला आणि शिवबाने इतिहास घडवला. अशा जिजाऊ मातेचे नाव योजनेला दिले परंतु योजना मात्र राबवली गेली नाही. केवळ योजनांना मोठमोठी नावे दिली जातात त्यामुळे अशी मोठमोठी नावे तरी शासनाने या योजनांना देऊ नये असे मला या निमित्ताने सुचवावयाचे आहे. सहा महिन्यांपासून ही योजना बंद पडलेली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

ही योजना केवळ कागदावरच राहिलेली आहे. त्यामुळे या योजनेच्या संदर्भात शासन कोणती भूमिका घेणार आहे याची माहिती या निमित्ताने सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. या योजनेमध्ये अधिका-यांचा आणि विभागाचा समन्वय नसल्यामुळे ही योजना बंद पडली असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, आरोग्य खात्यामध्ये काम करणारे डॉक्टर्स कधीच आपल्याला जागेवर दिसत नाहीत. योजनांचे अधिकारी आपल्याला कधीच जागेवर मिळत नाही त्यामुळे ख-या अर्थाने या योजनेचा बोजवारा उडाला आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, पोषण आहारामध्ये तृणधान्य, कडधान्याचा वापर केला जात असतो. योग्य प्रकारे पोषण आहार शिजवला तर त्यामध्ये 200 प्रकारचे जीवनसत्व मिळू शकतात व वेगवेगळे धातूंची मूलद्रव्ये मिळू शकतात. असे असतांनाही पोषण आहार कुचकामी ठरलेला आहे. पोषण आहार योग्य प्रकारे पुरवला जात नसल्यामुळे, शिजवला जात नसल्यामुळे कुपोषणाची समस्या कमी होण्यापेक्षा ती वाढतच चालली आहे अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, पोषण आहाराचा बचत गटाच्या माध्यमातून तसेच निरनिराळ्या ठेकेदारांच्या माध्यमातून पुरवठा होत असतो. पोषण आहार पुरविणा-या बचत गटांना तसेच निरनिराळ्या ठेकेदारांना पोषण आहाराचे पैसे 3-3,4-4 महिने दिले जात नाही.

सभापती महोदय, शासनाच्या योजना राबविणारे अधिकारी, कर्मचारी योग्य रीतीने काम करीत नाहीत. एका बाजूने महाराष्ट्रात भूखंडाचा धुमाकूळ माजला आहे तर दुस-या बाजूला कुपोषणासाठी निधी दिला जात नाही, अधिकारी आपल्या जबादा-या योग्य प्रकारे पार पाडीत नाहीत. त्यामुळे ज्या अधिका-याला जे काम दिलेले आहे ते काम त्याने योग्य प्रकारे पार पाडले पाहिजे. जर तो अधिकारी आपले काम योग्य प्रकारे करीत नसेल तर अशा अधिका-यांवर कडक कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.संजय केळकर..........

सभापती महोदय, माझी दुसरी मागणी आहे की, कुपोषणा संदर्भात एनजोओंचा सहभाग घेतला पाहिजे. या क्षेत्रात अनेक एनजोओ चांगले काम करीत आहेत. त्यांना फक्त पुरस्कार किंवा शाबासकी न देता त्यांचा प्रत्यक्षात सहभाग करुन घेतल्यास एनजोओ आणखी चांगल्या प्रकारे काम करु शकतील.

सभापती महोदय, आपण एकाच विषयावर विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून चर्चा घडवून आणतो. अशाच अनेक आयुधांच्या माध्यमातून आपण कुपोषणावर अनेक वेळा चर्चा केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात कुपोषण कमी झालेले नाही. तेव्हा माझी मागणी आहे की, कुपोषणाच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक समिती गठीत करावी. ही समिती आदिवासी भागात दोन-चार महिन्यांनी अचानक भेटी देतील. अचानक दिलेल्या भेटीमुळे आपणास प्रत्यक्ष चित्र सामोर येईल. आम्ही अशाप्रकारे 25 आश्रमशाळांना भेटी दिल्या. त्या भेटीमध्ये विद्यार्थ्यांना तेल, साबण, गणवेश वेळेवर पुरविण्यात येत नसल्याचे आढळून आले होते. आम्ही ही माहिती आदिवासी मंत्र्यांना सादर केलेली आहे. तेव्हा माझ्या मागणीचा विचार करावा अशी विनंती करुन वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी उपस्थित केलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांची मते मांडली. आतापर्यंत विदर्भात नागपूर अधिवेशनामध्ये कुपोषणावर अनेकवेळा चर्चा झालेली आहे, परंतु त्याचा म्हणावा तसा परिणाम आपणास पहावयास मिळाला नाही याची मला मनापासून खंत वाटते.

कुपोषणामुळे होणाऱ्या बालकांच्या मृत्यूकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. तसेच या विधिमंडळात फक्त उपचार म्हणून चर्चा तर होत नाही ना अशी माझ्या मनात शंका येते. याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले त्या मुद्यांची मी पुनरुक्ती करणार नाही.

सभापती महोदय, नाट्यमंचावर अभिनेते व अभिनेत्री नाटक सादर करतात. परंतु त्यांच्या नाटकाचा सूत्रधार पडद्यामागे असतो. तशीच परिस्थिती या कुपोषणाच्या बाबतीत आहे. कुपोषण म्हटले की, आदिवासी विभाग, बाल कल्याण विभाग आणि आरोग्य विभाग, हे विभाग आपल्या डोळ्यासमोर येतात. परंतु रोजगार हमी योजना विभाग आणि ग्राम विकास विभाग हे विभाग देखील या प्रश्नाशी निगडीत आहेत. ग्रामीण भागात रोजगार मिळत नाही. खालच्या पातळीवर म्हणजे जिल्हापरिषद आणि ग्रामपंचायतीकडे योजना सोपविलेल्या आहेत....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचे भाषण 12 वाजून 15 मिनिटापर्यंत पूर्ण झाल्यास माननीय मंत्रीमहोदयांना दुपारी 12.15 ते 12.45 इतका वेळ उत्तरासाठी पुरेसा होईल काय ? कारण दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होणार आहे. श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, उत्तरासाठी इतका वेळ फारच अपुरा आहे...

**उप सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी त्यांचे भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मानव विकास निर्देशांक कमी झाला म्हणून मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली. आज कुपोषण व मानव विकास निर्देशांकाची काय सद्य:स्थिती आहे याचे लेखी निवेदन व त्या संदर्भातील स्पष्टीकरण आम्हाला मिळाले पाहिजे. याठिकाणी ग्राम विकास मंत्री श्री.जयंत पाटील उपस्थित आहेत. त्यांचा या विषयातला अभ्यास चांगला आहे. माझ्या माहितीनुसार मानव विकास मिशनसाठी लागणारे मनुष्यबळ व आर्थिक बळ याकडे सरकारचे दुर्लक्ष झालेले आहे. विविध विभागांना मानव विकास मिशन ही अकारण नाक खुपसणारी यंत्रणा वाटते. त्यामुळे या मानव विकास मिशन विभागातील अनेक चांगल्या अधिकाऱ्यांना बाजूला करण्याचे काम विदर्भ, मराठवाडा विभागात झाले आहे. आज त्या विभागाची काय परिस्थिती आहे ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे....

हे जर आपण तपासून पाहिले तर बहुतेक ठिकाणी हे मिशन खिळ खिळे झालेले पहावयास मिळेल. माझ्याकडे अनेक ठिकाणाहून जी माहिती आलेली आहे त्यातील बॅकवर्ड रिजन ग्रॅट फंड संबंधीची माहिती अत्यंत महत्वाची आहे जो भाग अविकसित आहे त्या भागात कुपोषण आणि अनुशेषासारखे प्रश्न सोडविण्यासाठी केन्द्र सरकारकडून महाराष्ट्रातील तेरा जिल्हयांना बॅकवर्ड रिजन ग्रॅट फंड गेल्या चार वर्षापासून देण्याचा उपक्रम सुरु आहे. त्या बाबतीत अनेक वेंळा विधिमंडळामध्ये मी चर्चा उपस्थित केली होती त्या संदर्भात अत्यंत अपु-या स्वरुपाची मदत मिळाली आहे. नंदूरबार, धुळे, गोदिंया, परभणी ,नादेड, हिंगोली या सारख्या जिल्हयांमध्ये कुपोषित बालकांची संख्या जास्त दिसून येते आणि अशाच जिल्हयासाठी केन्द्र सरकारने बॅकवर्ड रिजन ग्रॅट फंड दिलेला आहे.हा विकास निधी राज्य सरकार कशा प्रकारे वापरत आहे ? केवळ धान्याच्या वाटपापुरता किंवा प्रोटीन्सची औषधे व्यवस्थितपणे पोहोचवली जावीत एवढया पुरता मर्यादित हा प्रश्न नाही. केन्द्र सरकारकडून जो निधी दिला जातो त्याचे व्यवस्थापन योग्य प्रक ारे केले जाते किंवा नाही हेसुध्दा माननीय मंत्री महोदयांनी पाहिले पाहिजे तसेच माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्याच्या स्तरावर देखील या विषयाचा आढावा घ्यावयास पाहिजे असे मला वाटते.

सभापती महादेय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. अन्न धान्य वितरणाचा देखील महत्वाचा प्रश्न असून आज शहरामध्ये देखील कुपोषित बालके आढळून येत आहेत. विशेषत: शहरामध्ये गरीब लोकांचे केन्द्रीकरण होत आहे. ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळत नाही त्यामुळे अनेक कुटुंबे शहरात स्थलांतरित होत असतात आणि या कुटुंबामध्ये कुपोषण मोठया प्रमाणावर आढळून येते. पुण्यामध्ये पिंपरी चिंचवड आणि मुंबईमध्ये मानखुर्द, चेंबूर, कुर्ला गोवंडी या भागामध्ये कुपोषणाचे प्रश्न आढळून येत आहेत. या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, जी रेशनची दुकाने बंद करण्यात आलेली आहेत ती पुन्हा सुरु करुन त्या ठिकाणी धान्याचे वाटप योग्य प्रकारे केले जाते की नाही याकडे लक्ष देण्यात यावे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. अंगणवाडी सेविकांवर मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे. एखादी व्यक्ती काम करीत असतांना समाधानी

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे....

नसेल तर त्याचा कामावर विपरित परिणाम होत असतो याचा देखील आपण विचार केला पाहिजे आज अंगणवाडी सेविकांवर कामाचा ताण वाढलेला आहे. दर अधिवेशानामध्ये मागण्या मान्य करण्यासाठी त्यांच्याकडून मोर्चे काढण्यात येत असतात तेव्हा त्यांच्यावर अधिक कामाचा बोजा वाढविण्यापेक्षा त्यांच्या कामामध्ये उत्साह कसा निर्माण करता येईल, त्यांना अधिक प्रेरणा कशी देता येईल हे पाहिले पाहिजे. तसेच प्रेम आणि विश्वास देण्या बरोबरच त्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या बाबतीत महिला व बाल कल्याण विभागाने विचार केला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. त्याचप्रमाणे आरोग्य विभागामध्ये आशाचे काम करणा-या ज्या स्वयंसेविका आहेत त्यांनासुध्दा प्रवास खर्च वेळेवर देण्याच्या बाबतीत व संरक्षण देण्याच्या बाबतीत लक्ष दिले गेले पाहिजे.बचत गटाकडील आहार पुरविण्याचे काम काढून घेऊन रेडी टू इट साठी हे काम कंत्राटदाराला देण्यात आलेले आहे. त्याबाबतीत मी मध्यंतरी मुद्दा मांडला होता त्यावेळी केन्द्र सरकारकडून तशा सूचना आल्या असल्याचे उत्तर महिला व बाल विकास मंत्र्यांनी दिले होते. पंरतु याबाबतीत रेडी टू इट च्या निमित्ताने एक मोठी लॉबी कार्यरत आहे आणि अंगणवाडी सेविकांची दमछाक केली जाते. बचत गटाचे पैसे वेळेवर दिले जात नाहीत त्यामुळे चार चार महिने ते वाटप नियंत्रित करु शकणार नाहीत तसेच लोकांपर्यंत वेळेवर धान्य पोहोचू शकत नाही अशा प्रकारच्या अनेक अडचणी मला त्यात दिसून येत आहेत.

लातूर जिल्हयातील निलंगा आणि शिरुर अनंतपाळ या ठिकाणी सप्टेंबर 2010 मध्ये एक घटना घडली होती. 360 अंगणवाडयामध्ये मल्टी व्हिटॅमिन व्हिटामॅक्सच्या 15 हजार 300 बाटल्या आढळून आल्या होत्या, त्याबाबतीत 23 ऑगस्ट 2010 रोजी कार्यकर्त्यानी तक्रार करुन देखील 31 ऑगस्टपर्यंत त्या घटनेचा पंचनामा झाला नव्हता आणि जिजामाता कुपोषण मिशन यांचे काम कशा प्रकारे मजबूत होईल या दृष्टीने विभागीय स्तरावर प्रयत्न केले गेले पाहिजेत भ्रष्टाचाराच्या ज्या घटना घडल्या आहेत त्याकडे अधिक गंभीरपणे पहावयास पाहिजे. आदिवासी विकास मंत्र्यांना मला असे सांगावयाचे आहे की,तुमच्या कारकिर्दीत ज्यांनी आदिवासी विकास योजनेमध्ये भ्रष्टाचार केला आहे अशा दोन अधिका-याविरुध्द शिक्षा झालेली आहे हे आपण मला दाखवा. वर्षानुवर्षे हे खटले सुरु राहतात

डॉ.नीलम गो-हे...

त्याचे पुढे काय होते ? काही वेळा एखाद्या अधिका-याला निलंबित केले असेल तर त्याला पगार दिला जातो व सहा महिन्यानंतर त्याला पुन्हा कामावर घेण्यात येते किंवा दुस-या जिल्हयात त्याची बदली केली जाते. एखाद्या अधिका-याने भ्रष्टाचार केल्यानंतर त्याच्याविरुध्द कारवाई न करता आपण फक्त सचिवांकडून कार्यक्षमतेची अपेक्षा कशी धरणार आहात ?.मघाशी सन्माननीय सदस्य श्री प्रकाश बिनसाळे यांनी असा मुद्दा मांडला की माननीय मंत्री महोदय अचानक तपासणी करण्यासाठी जात नाहीत. अचानकपणे पाहणी करण्यासाठी गेल्यानतंर काय पहावयास मिळणार आहे याची त्यांना अगोदरच कल्पना आलेली असते म्हणून ते अचानक पहाणी करण्यासाठी जात नाहीत. पालक मंत्र्यांकडून आपण काही अपेक्षा ठेवलेल्या आहेत परंतु पालक मंत्र्यांना त्या जिल्हयात गेल्यानंतर इतर कामाची पहाणी करण्यासाठी पुरेसा वेळ देखील नसतो. त्यामुळे कुपोषणाच्या विषयाकडे बहुतेक पालक मंत्री लक्ष देत नाहीत. राज्य महिला आयोग, कुपोषण विरोधी मिशन या साठी एक टास्क फोर्स विभागीय आयुक्त स्तरावर एकत्रितपणे स्थापन करावा आणि जे कोणी भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गुंतलेले आहेत त्यांना पुढच्या अधिवेशनापर्यत शिक्षा
झालेली दिसावी यासाठी द्रुतगती न्यायालय स्थापन करावे तरच भ्रष्टाचारावर वचक बसू शकेल अशी मला सूचना करावयाची आहे. एवढे बोलूल मी माझे भाषण संपविते.

-----`

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मंत्री महोदय, अजून 20 माननीय सदस्यांना या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा असल्यामुळे आपण उत्तर केव्हां देणार आहात?

श्रीमती वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) (बसून बोलतात) : सभापती महोदय, आपण उत्तराचे भाषण उद्या ठेवावे.

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये याठिकाणी प्रस्ताव मांडला आहे,त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. माननीय सदस्य श्री. हेमंत टकले सर आणि माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत या दोघांची या विषयाबद्दल असलेली तळमळ मला माहीत आहे. या दोघांनी आदिवासी विभागामध्ये कुपोषणग्रस्तांकरिता केलेले काम सर्वांना माहीत आहे. परंतु सत्ताधारी पक्षाकडून मांडण्यात आलेल्या या ठरावाच्या दृष्टिकोनामध्ये असलेल्ी माझी मतभिन्नता व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हा प्रश्न केवळ दयेचा किंवा मदतीचा आहे असे मानले जात आहे. शासनाची ही मदत वंचितांपर्यंत पोहोचत नाही असे मानले जात आहे. आपण मला माफ करावे, हा प्रश्न केवळ वंचितांचा नाहीतर शोषितांचा आहे, शोषण करणाऱ्यांचा आहे. सभापती महोदय, या ठरावामध्ये कुपोषण किंवा तत्सम आजाराने ग्रस्त असल्याचे म्हटले गेले आहे. कुपोषण किंवा तत्सम आजार ही देणगी कोणत्याही संसर्गाने मिळत नाही. हा एड्स किंवा पोलिओचा आजार नाही. या राज्यातील किंवा देशातील शोषण व्यवस्थेमधून जन्माला आलेले हे आजार आहेत. ही देणगी येथील शोषकांनी दिलेली आहे हे मला याठिकाणी सांगितले पाहिजे. सभापती महोदय, या संदर्भातील या देशातील काही आकडेवारी मी आपणास सांगतो. शहरी भागात दरडोई मासिक खर्च किती आहे? आपल्या राज्यामध्ये दरडोई मासिक खर्च 1148 रुपये आहे आणि ग्रामीण भागामध्ये 568 रुपये आहे. केंद्र सरकारच्या अर्जून सेनगुप्ता समितीने दिलेल्या अहवालामध्ये असे सांगितले आहे की, देशातील गरीब माणसाची रोजचा खर्च 20 रुपयांपेक्षा जास्त करण्याची ताकद नाही. म्हणजे 600 रुपयांपेक्षाही कमी ताकद आहे असे त्यांनी सांगितले आहे. ही देशाच्या पातळीवरील आकडेवारी असेल तर महाराष्ट्रातील स्थिती यापेक्षा किती भयावह आहे? शहरी भागातील श्रीमंत वर्गाची आकडेवारी बाजूला काढली तर शहरी भागातील झोपडपट्टीमधील दारिद्रय रेषेखालील माणसांची स्थिती यापेक्षा वेगळी नाही आणि म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, हा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. कपिल पाटील....

प्रश्न केवळ वंचितांपुरता मर्यादित नसून तो विषमतेशी निगडीत आहे. या राज्यामध्ये विषमता ही जातीशी निगडीत आहे, वर्गाशी निगडीत आहे, स्त्री-पुरुष लिंगभेदाशी निगडीत आहे हे मला आवर्जून सांगितले पाहिजे.

या देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे उत्पन्नामध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि दारिद्र्यामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे या राज्यातील 30 टक्के लोक दारिद्रय रेषेखालील आहेत हे आपल्या राज्याला शोभादायक नाही. देशातील सरासरी प्रमाणापेक्षा महाराष्ट्रात जास्त गरीब लोक आहेत. आपल्या राज्यामध्ये बालमृत्यूंचे प्रमाण किती आहे? एक वर्षाच्या आतील बालकांचे मृत्यूंचे प्रमाण 42 आहे आणि केरळमध्ये फक्त 16 आहे. कुपोषण आणि बालमृत्यूच्या संदर्भात आपली तुलना करावयाची झाली तर ती फक्त ओरिसा आणि बिहार या राज्यांबरोबर करावी लागते. त्यांच्यापेक्षा आपले राज्य किंचित पुढे आहे ही सर्वात वाईट गोष्ट आहे. 0 ते 4 या वयोगटातील 46 टक्के मुले कुपोषणग्रस्त आहेत. आपण बिहार आणि ओरिसाच्या किंचित पुढे आहात म्हणून ती गौरवास्पद बाब नाही तर अतिशय शरमेची गोष्ट आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

सभापती महोदय, प्रश्न नेमका कशाचा आहे? मी अन्य प्रश्नांच्या तपशीलात जाणार नाही. आदिवासी विभागासाठी दिलेला निधी दर वर्षी उचलून दुसऱ्या खात्यांकडे वळविला जातो. मी गेल्या वेळी या सभागृहात या संदर्भात 'दरोडा' हा शब्द वापरला. पण त्या शब्दाबद्दल या ठिकाणी आक्षेप घेण्यात आला. त्यामुळे 'दरोडा' हा शब्द जर असंसदीय वाटत असेल तर तो मी वापरणार नाही. पण तो पैसा दुसरीकडे देण्यात येत आहे. त्याचा अपहार करण्यात येत आहे. (अडथळा) हा 'दरोडाच' आहे. पण त्याबद्दल मागच्यावेळी सन्माननीय सदस्य हेमंत टकले आणि सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी आक्षेप घेतला होता त्यामुळे तो शब्द कामकाजातून काढून टाकण्यात आला होता. वास्तविक पहाता हा 'दरोडाच' आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप कामगार चळवळीतील असल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, आदिवासी विभागाचे 800 कोटी रुपये जर जलसिंचन खोऱ्यांसाठी वापरले जात असतील तर आदिवासी बालकांचे कुपोषण होणार नाही तर मग काय होणार? जर शासनाचा पैसा उरत असेल तर तो पैसा आदिवासी विभागातील शिक्षणासाठी आणि आदिवासी विभागातील आरोग्यासाठी वापरला गेला पाहिजे आणि तो तशा पध्दतीने वापरला जात नाही ही अडचण आहे. एवढी एक अडचण शासनाने दूर करावी. या प्रश्नाचे उत्तर आदिवासी कल्याण किंवा महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्र्याकडून अपेक्षित नाही. सन्माननीय मंत्री महोदया या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न करतात त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे पण या प्रश्नाचे उत्तर माननीय अर्थमंत्र्यांनी दिले पाहिजे आणि त्यांनी आश्वासन दिले पाहिजे की, यापुढे आदिवासी विकास विभागाचा एकही पैसा आम्ही दुसरीकडे देणार नाही. महिला आणि बालकांच्या आरोग्यासाठी आणि विकासासाठी ठेवलेला एकही पैसा आम्ही दुसरीकडे देणार नाही असे माननीय अर्थ मंत्र्यांनी सांगावे. हा प्रश्न केवळ काही ठिकाणी डॉक्टर्सची पथके पाठवून आणि इंजेक्शन्स पाठवून सुटणार नाही. शासनाने त्या ठिकाणी शिक्षण द्यावे, आरोग्याच्या पुरेशा सुविधा द्याव्यात आणि रोजगार उपलब्ध करण्याची संधी द्यावी. पण आदिवासी विभागातील लोकांचा रोजगार बुडवणारी आर्थिक नीति आखण्यात येते. आज पर्यंत राज्याने आणि देशातील सगळया धोरणकर्त्यांनी आदिवासी विभागाला आणि शहरी भागातील गरिबांना ओरबाडण्याचे काम केलेले आहे. सगळी साधनसंपत्ती शासन ओरबाडून नेते आणि मग असे म्हणते की, गरिबी आहे. त्याठिकाणी बालके कुपोषणाने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

मेल्या नंतर इंजेक्शन्स पाठविण्यात येतात. असा खटाटोप करण्याची गरज नाही. आदिवासी विभागात इंजेक्शन्सची, साधनांची, ब्लँकेटस्ची आणि खिचडीच्या पॅकेटचीसुध्दा गरज नाही. त्या ठिकाणी रोजगार उपलब्ध करुन द्यावा. स्वाभिमान द्यावा. तेथील सर्व लोक स्वत: कमावून स्वाभिमानाने जगायला तयार आहेत. शासन त्यांना वंचित म्हणते आणि मग दयेची भीक घालते. ही भीक घालण्याचे कृपा करुन बंद करण्यात यावे. कुपोषण फक्त आदिवासी विभागात, गडचिरोली जिल्हयात, ठाणे जिल्हयात आणि अमरावती जिल्हयातील मेळघाटात आहे असे मानण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, डॉ. अभिजित वैद्य यांनी दोन वर्षापूर्वी पुणे भागातील हमालांची पहाणी केली होती. मी थोडया वेळा पूर्वी डॉ. दीपक सावंत यांना विचारत होतो की, माणसाला किमान कॅलरीज किती लागतात? त्यांनी असे सांगितले की, शहरी भागातील माणसासाठी दररोज 2100 कॅलरीज पाहिजेत आणि ग्रामीण भागातील माणसाठी 2400 कॅलरीज पाहिजेत. तसेच शहरी भागातील कष्टकरी माणसाला कमीत कमी 2400 कॅलरील पाहिजेत. पुण्यातील कष्टकरी हमालांची दररोजची सरासरी कॅलरीज शोधून काढली ती 1100 पेक्षा खाली होती. याचा अर्थ त्या हमालांना इतर कोणत्याही ग्रामीण भागातील मजुरांपेक्षा जास्त मजुरी मिळते त्यांची परिस्थिती इतर कोणत्याही आदिवासी भागापेक्षा थोडीशी चांगली आहे. तरीही त्यांच्या कॅलरीज एवढया कमी असण्याचे कारण असे की, आपल्या मुलांच्या भविष्यासाठी, आपल्या मुलांच्या पोटासाठी आणि आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी ते अधिक खर्च करावयाला मागतात त्यामुळे ते स्वत:च्या पोटाला चिमटा काढतात, इतकी भयावह स्थिती ज्या राज्यातील सर्व कष्टकरी कामगार वर्गांची आणि असंघटित मजुरांची असेल तर कुपोषणावरील चर्चा केवळ शासनाने इंजेक्शन्सचा पुरवठा करुन आणि खिचडीच्या पॅकेजने सुटेल असे मानण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, येथील दलाल आणि कंत्राटदारांच्या भ्रष्टाचाराचा वेगळा मुद्दा आहे. शासनाची इच्छाशक्ती असेल तर एका मिनिटात तो भ्रष्टाचार आणि कंत्राटदार बंद करु शकते. पण प्रश्न कंत्राटदारांचा नाही. कंत्राटदार अपहार करतात पण धोरणकर्तेच जेव्हा निधीचा अपहार करतात तेव्हा त्याला काय म्हणायचे? सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे फक्त कंत्राटदारांचेच गाल फुगलेले नाहीत तर ते इतर खात्यांतील लोकांचेसुध्दा फुगलेले आहेत

..3..



SMT/ KGS/ KTG/ 12:20

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.......

ते फुगण्याचे कारण काय? म्हणून सभागपती महोदय, माझी आग्रहाची विनंती आहे. कृपा करुन या राज्यातील सगळया कुपोषणग्रस्त भागातील आदिवासी मजुरांचा आणि ग्रामीण भागातील मजुरांचा आणि शहरी भागातील कष्टकरी मजुरांचा जो पैसा आहे तो पैसा शासन चोरणार नाही याची हमी द्यावी. आणि दुसरी हमी अशी द्यावी की, आम्ही त्यांना शिक्षण देऊ. त्यांच्या रोजगाराच्या संधी चोरणार नाही. त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देऊ या दोन गोष्टी केल्या तर या राज्यातील एकही बालक कुपोषणाने मरणार नाही. एकही माता कुपोषणग्रस्त रहाणार नाही आणि आपल्या पोटच्या पोराला आपले सकस दूध देऊ शकेल. आता तिच्या स्तनामध्ये सकस दूधच राहिले नाही इतकी ती माता कुपोषणग्रस्त बनलेली आहे. तिच्या प्रश्नाला शासन उत्तर देणार नसेल तर केवळ व्यवस्थेची, प्रशासनाची दुरुस्ती करुन हा प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

----

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आदरणीय श्री. हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाच्या निमित्ताने माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी बरोबर सांगितले की, इकडून हा प्रस्ताव आलेला आहे. म्हणूनच हा प्रस्ताव आणण्यामागचा उद्देश पवित्र आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. तुम्ही आम्ही या सभागृहातील दोन्ही बाजूचे जेवढे सन्माननीय सदस्य आहोत. त्यांच्या जशा वेदना आणि संवेदना आहेत तशाच या प्रस्तावाच्या माध्यमातून माझ्याही संवेदना आहेत.. हे खरे आहे की, गेल्या सहा सात वर्षामध्ये मी सुध्दा पाहिलेले आहे की, विधानसभा सभागृहामध्ये आणि या सभागृहामध्ये नेहमी याबाबतीत चर्चा होते. त्यामध्ये तीच चर्चा होते आणि तीच उत्तरे येतात अशा प्रकारची परिस्थिती आहे. त्याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. याच गोष्टीची नोंद माननीय मंत्रिमहोदयांनी घेणे आवश्यक आहे. विशेषत: महिला व बालकल्याण खात्याच्या आमच्या माननीय मंत्रिमहोदयांनी आताच कार्यभार हाती घेतलेला आहे. यामध्ये समाजकल्याण खात्याचा सुध्दा संबंध आहे. ज्यावेळेला कुपोषणाचा विषय येतो त्यावेळी कोणत्याही एका विभागाशी संबंधित हा विषय नाही. समाजकल्याण विभाग, महिला व बालकल्याण विभाग किंवा आदिवासी विकास विभाग एकटे यावर निर्णय घेऊ शकते काय ? याचे उत्तर 'नाही ' असे आहे. म्हणून मी म्हणालो की, आपण कुपोषणासारख्या अतिशय संवेदनशील विषयावर चर्चा करीत आहोत आणि त्याचे उत्तर आम्ही अपेक्षित करतो. यावर काय कार्यवाही होते यासंदर्भात आम्ही सगळे या ठिकाणी गंभीर आहोत. या चारही विभागाचे एकत्रित कोऑर्डिनेशन असले तरच या विषयाला न्याय मिळेल असा माझा समज आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग असेल, महिला व बालकल्याण विभाग असेल किंवा आदिवासी विकास विभाग असेल या सगळ्या विभागांचा यामध्ये संबंध आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी एक गोष्ट मुद्दाम आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. मी बाकीच्या तपशिलामध्ये जाणार नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अतिशय मुद्देसूद आणि आकडेवारीसह सगळ्या गोष्टी मांडलेल्या आहेत. त्यामुळे मी त्या गोष्टींमध्ये जाणार नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे एक वाक्य मला खूप आवडले आणि वेदना देऊन गेले. प्रत्येकाने त्याबाबतीत लक्ष देणे गरजेचे आहे. त्यांनी सांगितले की, आम्हाला मेहरबानी नको. आम्ही कुपोषित असण्यापेक्षा आम्ही जास्त शोषित आहोत. जे शोषण करतात त्यांच्या बाबतीत शासन काय करणार याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली तर ते जास्त परिणामकारक होईल असा माझा समज आहे.

सभापती महोदय, राज्याच्या एकूण बजेटच्या 9 टक्के बजेट म्हणजे साधारणत: 3000 ते 3100 कोटी रुपये एवढे आदिवासी विकास विभागाचे बजेट आहे. राज्याच्या एकूण बजेटच्या जवळजवळ 11टक्के बजेट म्हणजे जवळजवळ 3500 ते 3700 कोटी रुपये एवढे बजेट समाजकल्याण विभागाचे आहे. राज्याच्या बजेटमधील अतिशय महत्वाचा हिस्सा हा ग्रामविकास असेल, महिला व बालकल्याण विभाग असेल यांच्यासाठी आहे. आदिवासी विकास विभागाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर वर्षाला 3100 कोटी रुपये या विभागाला मिळतात. आपण महाराष्ट्र राज्य स्थापनेचे पन्नासावे वर्ष साजरे करीत आहोत. राज्याचे एकंदर बजेट पाहिले तर 1992-93 पासून 9 टक्के प्रमाणे गेल्या 18 वर्षात आदिवासी विकास विभागाला जवळपास 60 ते 70 हजार कोटी रुपये रक्कम प्राप्त झाली. आपण जर प्रत्येक आदिवासी कुटुंबाच्या नावे दरडोई 10 लाख रुपये केले असते तर या आदिवासींना शासनाच्या भिकेची गरज भासली नसती, असे मी नम्रपणे सांगू इच्छितो. आपली यंत्रणा, प्रशासन, लोकशाहीची चौकट, लोकशाहीच्या सर्व परंपरा हे सर्व पाळावयास पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. आपले अधिकारी जी माहिती आपल्याला देत असतील त्या आधारावर माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी उत्तर देतात.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

त्या आकडेवारीवर आधारित तीच चर्चा तेच उत्तर का तयार होते याच्या मुळाशी जाण्याचा शासन प्रयत्न करणार आहे काय, हे मी उद्विग्न होऊन म्हणत आहे. खरे तर या चर्चेची आवश्यकता नाही. यासाठी शासनाला सरळ साधा निर्णय घेता येईल. कुपोषित बालकांचा प्रश्न किंवा कुपोषणाचा प्रश्न हा एका विभागाशी संबंधित नाही. या प्रश्नाचा 4 विभागांशी संबंध आहे. या चारही विभागांची समन्वय समिती निर्माण केली जाईल काय ? अशाप्रकारची समन्वय समिती तयार करुन एकमेकांच्या पायात पाय घालण्यापेक्षा हातात हात घालून काम करता येईल काय यादृष्टीने व्यवस्था करावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, या कुपोषणाची कारणे काय आहेत, त्याचे उत्तरच या प्रश्नात सामावलेले आहे. ते फार कठीण आहे असे कोणत्याही विभागाने समजण्याचे कारण नाही. जन्माला आलेल्या प्रत्येक बालकाच्या आरोग्याची व आहाराची काळजी घेतली पाहिजे. स्तनपान या विषयासाठी तर पैसा लागत नाही. त्यासाठी प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. या कामासाठी ज्या स्वयंसेवी संस्था काम करीत आहेत त्यांच्या कामाचा 4-6 महिन्यांनी किंवा ठराविक कालावधीत आढावा घेतला तर प्रत्येक वेळेला तेच उत्तर देण्याची वेळ येणार नाही. माननीय आदिवासी विकास मंत्री हे संवेदनशील मंत्री आहेत. त्यांनी यापूर्वी वन खात्याचे मंत्री म्हणूनही काम केलेले आहे. वन विभागामध्येच आदिवासी विभागाचा समावेश आहे. या आदिवासी भागात स्वच्छतेचा अभाव आहे, त्यासाठी फार काही करण्याची आवश्यकता नाही. आदिवासींच्या कुटुंबाचा आकार मोठा असतो, त्यांच्यात अंधश्रध्दा, समाजातील स्त्रियांचे स्थान, रुढी, परंपरा याचा त्यांच्यावर खूप प्रभाव असतो. आदिवासी विभागाला एन.जी.ओं.नी मदत केली पाहिजे याबद्दल दुमत नाही. सरकारी यंत्रणा आपले काम करीत असली तरी ती अपुरी पडत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे हा प्रश्न गुंतागुंतीचा झाला आहे, तरी सुध्दा सगळयांना बरोबर घेऊन काम करावे लागेल. त्यांच्या कामाचे मूल्यमापन करावे लागेल, मोजमाप करावे लागेल. त्यासाठी 2-4 महिन्यांनी सरप्राईज व्हिजिट देऊन आढावा घ्यावा लागेल. (अडथळा) आदर्श प्रकरणापेक्षा हा भयानक विषय आहे. कारण राज्याच्या बजेटचा मोठा भाग आदिवासी विकास विभागासाठी खर्च होतो. त्याबाबत सन्माननीय...

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ KTG/ ST/

श्री.भाई जगताप......

सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. आदिवासी विकासाचा निधी दुसऱ्या विभागाकडे वळविला जात आहे असे ते म्हणाले. तरी सुध्दा माननीय मंत्री महोदय आदिवासी विकास विभागासाठी संपूर्ण बजेटच्या 9 टक्के बजेट दिले जाते असे सांगण्याचे धाडस करतात. तरतूद केलेल्या निधीपैकी जर दुस-या विभागाकडे निधी वळता केला जात असेल तर याकडे शासनाने लक्ष घातले पाहिजे. या निधीचा कुपोषित माता, बालकांसाठी उपयोग व्हावा अशी मी विनंती करतो आणि याठिकाणी थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:35

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये आणलेल्या कुपोषणाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हा कुपोषणाचा प्रस्ताव प्रत्येक अधिवेशनामध्ये विरोधी पक्षातर्फे आणला जात होता. परंतु त्यावर या सरकारने कधीच विचार केला नाही. आता सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले आणि त्यांच्या सहका-यांनी हा प्रस्ताव येथे आणल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो कारण निदान त्यांच्या तरी शब्दांना सरकार दरबारी वजन प्राप्त होईल आणि हा कुपोषणाचा प्रश्न मिटेल असे मला वाटते. महाराष्ट्रामध्ये 2 लाख बालकांचा कुपोषण आणि तत्सम आजाराने मृत्यू होणे ही अतिशय गंभीर बाब आहे. ग्रामीण भागामध्ये हजारी 40 बालकांचा आणि शहरी भागामध्ये हजारी 31 बालकांचा कुपोषण आणि तत्सम आजारामुळे मृत्यू होतो. जन्माला येणारी 60 टक्के बालके ही त्यांचा पाहिला वाढ-दिवस साजरा करण्यापूर्वीच या जगाचा निरोप घेतात आणि दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे 50 टक्के बालमृत्यूची नोंदच केली जात नाही. माणसाला जगण्यासाठी अन्न,वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गोष्टीची आवश्यकता आहे. कुपोषण थांबवायचे असेल तर कुपोषित भागातील गर्भवती मातांना आणि मुलांना पौष्टिक आहार मिळाला पाहिजे. तेथील लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला पाहिजे. आरोग्य विषयक सुविधा निर्माण करुन दिल्या पाहिजेत. चांगले शिक्षण दिले पाहिजे, आरोग्य सेवा तात्काळ उपलब्ध व्हावी यासाठी चांगले रस्ते आणि दळणवळणाची सोय असली पाहिजे. तसेच समाजाचा घटक म्हणून प्रत्येकाने सामाजिक दायित्व म्हणून आपापली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. माझे वडील लक्ष्मण मानकर यांच्या नावाने ट्रस्ट स्थापन करण्यात आलेला आहे. या ट्रस्टच्या माध्यमातून गडचिरोली, चंद्रपूर आणि अमरावती जिल्हयातील आदिवासी भागामध्ये 111 एकलव्य शाळा चालविल्या जात आहेत. त्या शाळांमधून गावातील मुलांना शिक्षित केले जाते, युवकांना प्रशिक्षित केले जाते. आदिवासी भागात शिक्षणाचा असलेला अंधार दूर करण्याचा प्रयत्न आमच्या ट्रस्टच्या माध्यमातून केला जात आहे. एक सामाजिक बांधिलकी म्हणून विविध संस्थांनी पुढकार घेतला तर त्या भागातील कुपोषणाची समस्या दूर होण्यास मदत होईल. म्हणून सामाजिक संस्थांचा या कामी उपयोग करुन घेतला पाहिजे. आमच्या संस्थेने शासनाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत न घेता समाजसेवेचे व्रत चालू ठेवलेले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

सभापती महोदय, आपणाला ख-या अर्थाने कुपोषण थांबवायचे असेल तर गर्भवती माता आणि बालकांना चांगल्या प्रकारची औषधे उपलब्ध करुन दिली पाहिजेत. आज शासकीय रुग्णालयातून आर.सी.ची औषधे असतात. ती औषधे कमी दर्जाची असतात. शासकीय रुग्णालयातील डॉक्टरच रुग्णालयातील आर.सी.ची औषधे घेण्यापेक्षा बाहेरुन औषधे घेण्याचा सल्ला देतात. गर्भवती माता आणि बालकांना पोषण आहार म्हणून जे काही धान्य दिले जाते ते इतके् निकृष्ट दर्जाचे असते की त्याचे नमुने देखील या सभागृहामध्ये आणून दाखविण्यात आलेले आहेत. कुपोषणाचे दुसरे एक कारण म्हणजे आदिवासी समाजामध्ये मुलगी 12-13 वर्षाची झाली की तिचे लग्न करुन दिले जाते. लहान वयात मुलीचे लग्न झाले तर तिला होणारी संतती ही कुपोषित असते. कारण मुलीची पूर्ण शारीरिक वाढ झालेली नसते. म्हणून त्या समाजामध्ये असलेली बालविवाहाची पध्दत बंद केली पाहिजे. त्यासाठी सामाजप्रबोधन करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यांना चांगले शिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासी भागातील वनौषधी नष्ट होत चालल्या आहेत. मलेरिया आणि ब्रेन मलेरियाचे उच्चाटन करण्याचे काम आता होत आहे ही चांगली गोष्ट आहे. मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, वनसंपदा नष्ट झाल्यामुळे त्याचा वन्य प्राण्यांवर देखील पारिणाम झालेला आहे. माकडे ही माणसांची वंशज मानली जातात. आता जंगलातील माकडे आपण पाहिली तर ती देखील कुपोषित असल्यासारखी वाटतात. कारण वन्य प्राणी जगू शकतील अशी वनस्पती आपण नष्ट करीत आहोत.

सभापती महोदय, गावामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे आहे. एका कुपोषित बालकाला तातडीने 60 कि.मी.वरील रुग्णालयात दाखल करावयाचे होते. परंतु त्यासाठी त्याच्या आई-वडिलांकडे 60 रुपये नसल्यामुळे ते आपल्या मुलाला घेऊन रुग्णालयात पोहोचू शकले नाहीत.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर............

अशी दुर्दशा या गरीब माणसांची आहे. म्हणून अशा सर्व दुर्गम भागात औषधालय, दवाखाने असले पाहिजेत. त्याठिकाणी कर्मचारीवर्ग, डॉक्टर्स असले पाहिजेत. आदिवासी जनतेला तातडीने वैद्यकीय मदत पोहोचली पाहिजे. त्या भागातील दळणवळणाच्या सुविधांमध्ये वाढ झाली पाहिजे. हा विषय फार मोठा आहे, जटील आहे याची आपल्याला कल्पना आहे. या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. कुपोषणाच्या विषयावर कितीही बोलले गेले तरी हा विषय संपणार नाही. परंतु कुपोषणाची समस्या संपवावयाची असेल तर सामाजिक दायित्व स्वीकारुन सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे आणि या समस्येवर मात केली पाहिजे एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 12:40

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, कुपोषण आणि बालमृत्यू ही समस्या फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही, भारतापुरती मर्यादित नाही तर संपूर्ण जगाला भेडसावणारी ही समस्या आहे. धक्कादायक बाब अशी की, भारत हा विकसनशील देश आहे, या देशात सुध्दा फार मोठया प्रमाणात कुपोषणाची समस्या आहे. भारतामध्ये दरवर्षी जवळपास 20 लाख बालके कुपोषित आणि तत्सम आजारांना बळी पडतात. त्यापैकी निम्मी बालके तीव्र कुपोषित असल्याचे आढळून आले आहे.

सभापती महोदय, एकात्मिक बालविकास योजनेच्या अहवालानुसार 0 ते 6 वयोगटातील 47 टक्के बालके ही कुपोषित असून त्यांचे वजन प्रमाणापेक्षा कमी असल्याचे दिसून आले आहे. एकीकडे भारत जगात महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात असताना भारतातच सुंमारे 30 टक्के कुटुंबातील सदस्यांना दरदिवशी 1700 कॅलरीज इतके देखील अन्न मिळत नाही, ही अतिशय खेदजनक बाब आहे. आंतरराष्ट्रीय मानकाप्रमाणे दरदिवशी प्रत्येक प्रौढ व्यक्तीला 2100 कॅलरीजची आवश्यकता असते. अतिशय महत्वाचा भाग म्हणजे 30 टक्के कुटुंबे आपल्या उत्पन्नातील 70 टक्के भाग अन्नाच्या गरजेसाठी खर्च करतात. तरी सुध्दा त्यांना अर्धपोटी रहावे लागते. 80 टक्के महिला आणि लहान बालकांना अन्नातून 50 टक्के इतकाच लोह खनिजाचा पुरवठा होतो. परिणामी शरीराला 50 टक्के लोह खनिजाची कमतरता भासते. महाराष्ट्रातील हे चित्र अतिशय विदारक आहे. महाराष्ट्र शासनाने अनेक योजना राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु या योजनांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होणे अतिशय आवश्यक आहे. प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचला गेला तरच सरकारच्या या योजना यशस्वी झाल्या असे म्हणता येईल. परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसून येत नाही.

सभापती महोदय, आदिवासी भागातील आरोग्य सुविधा अत्यंत अपुऱ्या आहेत. दर 1 लाख लोकसंख्येमागे सरासरी केवळ 3 प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. दर 3 हजार लोकसंख्येमागे एक उपकेंद्र असावे असा निकष असताना प्रत्यक्षात मात्र 7 ते 8 हजार लोकसंख्येमागे एक उपकेंद्र अस्तित्वात आहे. त्यामुळे सर्वात प्रथम आरोग्य केंद्रांची संख्या वाढविण्याची अत्यंत गरज आहे. जव्हार तालुक्यातील आकरे गावातील हृदयद्रावक घटनेकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. एका आदिवासी महिलेने केवळ 400 रुपयांत आपले मूल विकले. बेरोजगारी, गरिबी, दारिद्र्य, कुपोषण

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी..............

या सगळ्या समस्यांमध्ये आदिवासी माणूस गुरफटला आहे. त्यातून त्यांची सुटका होणे कठीण आहे. कुपोषणाने नष्ट झालेली प्रतिकारशक्ती फक्त मृत्यूकडे वळविते. त्यामुळेच बालमृत्यूचे प्रमाण फार मोठया प्रमाणावर आहे. त्यादृष्टीने योग्य ती उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. ज्या योजना आहेत त्यांची अंमलबजावणी व्यवस्थित होणे महत्वाचे आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात मानकाप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालयांची सुविधा उपलब्ध असावी. त्याचप्रमाणे अनुशेष भरुन काढण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करते. आरोग्य सुविधा बळकट करण्याची आवश्यकता आहे. 24 तास आरोग्य सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. वैद्यकीय आरोग्य केंद्रे, आरोग्य पथके, ग्रामीण आरोग्य पथके यामधील रिक्त पदे तातडीने भरली जावीत.

नंतर 2बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी .........

त्याचप्रमाणे आदिवासी भागातील अशक्त माता हेच कुपोषणाचे मुख्य कारण आहे याचाही विचार महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून होण्याची गरज आहे. अशी विनंती करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

-------

**उप सभापती** : या प्रस्तावावरील उर्वरित चर्चा व वेळ माननीय सभापतींसोबत चर्चा करुन ठरविण्यात येईल. आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.45 ते 1.00 पर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.खर्चे.. 13:00

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यातील सर्वच महानगरपालिकांनी मलनि:स्सारणाची व्यवस्था योग्यप्रकारे राबविण्याबाबत करावयाची उपाययोजना**

**(1) * 9541 श्री.प्रकाश बिनसाळे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नवी मुंबई वगळता राज्यातील सर्वच महानगरपालिकांनी मलनि:स्सारणाची व्यवस्था केलेली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(4) तसेच सर्वच महानगरपालिकांची मलनि:स्सारण व्यवस्था योग्य प्रकारे राबविणे बाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री.भास्कर जाधव**, **श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही. बहुतांश महानगरपालिकांमध्ये अंशत: मलनिस्सारणाची व्यवस्था अस्तित्वात आहे.

(2), (3) व (4) शासनास या विषयाची जाणीव असून राज्यातील एकूण 23 महानगरपालिकांपैकी 9 महानगरपालिकांच्या मलनिस्सारण प्रकल्पांना "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण" अभियांनाअंतर्गत आणि 3 महानगरपालिकांच्या मलनिस्सारण प्रकल्पांना "लहान व मध्यम शहरांमध्ये नागरी पायाभूत सुविधांचा विकास" योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. अंशत: मलनिस्सारणाची व्यवस्था असलेल्या किंवा मलनिस्सारणाची व्यवस्था नसलेल्या उर्वरित महापालिकांमध्ये मलनिस्सारण व्यवस्था बाबतची अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन त्यास संबंधित प्राधिकरणाची मान्यता घेणे व शासनाच्या महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान व इतर योजनाअंतर्गत निधी प्राप्त होण्याकरीता प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता पाठविणे अशा स्वरुपाची कार्यवाही सुरु आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9541...

श्री.प्रकाश बिनसाळे : या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी स्पेसिफीक उत्तर दिलेले नाही. माझा पहिला प्रश्न असा की, राज्यातील किती महानगरपालिका वर्ग "अ", "ब" "क" व "ड" वर्गात मोडतात ? उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियाना अंतर्गत नऊ महानगरपालिकांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे तर "लहान व मध्यम शहरामध्ये नागरी पायाभूत सुविधांचा विकास " या योजने अंतर्गत तीन महानगरपालिकांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. माझा प्रश्न आहे की या महानगरपालिकांना प्रत्येकी किती अर्थसहाय्य देण्यात आले आहे ? तसेच उत्तरामध्ये नमूद करण्यात आले की, अंशत: मलनिस्सारणाची व्यवस्था असलेल्या किंवा मलनिस्सारणाची व्यवस्था नसलेल्या उर्वरित महानगरपालिकांमध्ये मलनिस्सारण व्यवस्थे बाबतचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन त्यास मान्यता घेण्याचे काम सुरु आहे. या संदर्भात माझा प्रश्न आहे की, या आराखड्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न माझी परीक्षा घेण्यासाठी विचारलेला दिसतो. "अ" वर्गामध्ये एकच महानगरपालिका आहे ती म्हणजे मुंबई महानगरपालिका. "ब" वर्गामध्ये पुणे, नागपूर या दोन महानगरपालिका आहेत. "क" वर्गामध्ये ठाणे, नवी मुंबई, नाशिक आणि पिंपरी-चिंचवड या चार महानगरपालिका आहेत. तर "ड" वर्गामध्ये उर्वरित 16 महानगरपालिका आहेत. नऊ महानगरपालिकांना जेएनएनयुआरएम आणि तीन महानगरपालिकांना युआयडीएसएसएमटी मार्फत प्रत्येकी किती अनुदान मिळाले याबाबतची माहिती माझ्याजवळ उपलब्ध आहे, ती मी पटलावर ठेवतो. एकूण 2 हजार 625 कोटी 38 लाख रुपयांचे हे प्रकल्प आहेत. उर्वरित महानगरपालिकांना नगरोत्थान महाअभियान व इतर योजना अंतर्गत निधी प्राप्त करुन देण्याचा शासनाचा मानस आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "... अश्ंत: मलनिस्सारणाची व्यवस्था अस्तित्वात आहे" असे नमूद केलेले आहे. आम्हाला त्याचा अर्थबोध होत नाही. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी समुद्र वा नदीच्या जवळपास जी मलनिस्सारण व्यवस्था अस्तित्वात आहे त्याठिकाणी 12 नॉटीकल अंतरावर मलनिस्सारण सोडले पाहिजे असा नियम आहे. तेव्हा या नियमाच्या अधीन राहून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते काय ?

यानंतर श्री.गायकवाड..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ ST/ प्रथम श्री.अजित शगम 1.05

ता.प्र.क्र.9541..

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला होता त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांचा मूळ प्रश्न असा होता की ,नवी मुंबई वगळता राज्यातील सर्वच महानगरपालिकांची मलनि:स्सारणाची व्यवस्था केलेली नाही हे खरे आहे काय ? त्या प्रश्नाला उत्तर देतांना मी असे म्हटले होते की हे खरे नाही. बाकीच्या महानगरपालिकाच्या संदर्भातील विगतवारीचे मी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला होता त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,विशिष्ट ठिकाणी अशा प्रकारचा मैला एकत्रितपणे गोळा करण्यासाठी टॅक तयार करण्यात येतो. वेगवेगळया पाईप लाईन जोडून वेगवेगळया भागातील मैला तेथे एकत्र आणला जातो परंतु ही योजना राबवत असताना ज्या शहरात दरडोई दर दिवशी 135 लिटर्स एवढे पाणी आपण देऊ शकतो त्या ठिकाणी ही योजना राबविली जाते. याचे कारण असे आहे की, त्या टॅकमध्ये जो काही मैला येतो त्यावर एकत्रितपणे प्रक्रिया करुन त्याचे खत तयार केले जाते त्याचबरोबर यासाठी जे पाणी वापरण्यात आले होते त्यावर प्रक्रिया करुन पिण्या व्यतिरिक्त इतर वेगवेगळया कारणासाठी त्या पाण्याचा वापर करण्याचा प्रस्ताव त्या योजनेमध्ये अंतर्भूत असतो.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, तीन महानगरपालिकांना मलनिस्सारण प्रकल्पांना लहान व मध्यम शहरांमध्ये नागरी पायाभूत सुविधांचा विकास या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे असे उत्तरात म्हटलेले आहे तेव्हा या तीन महानगरपालिकांसाठी किती अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे त्याचबरोबर वाढीव पैशाकरता त्यांनी प्रस्ताव पाठविलेला आहे तो प्रस्ताव मंजूर करण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भात प्रत्येक महानगरपालिकेला कशा पध्दतीने निधी पुरविण्यात आला होता त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे उत्तर देतांना मी मघाशी सांगितले होते.त्यामध्ये तीन महानगरपालिकांना देण्यात आलेल्या निधीच्या माहितीचा देखील समावेश आहे . त्याचबरोबर वाढीव रक्कमेच्या प्रस्तावाबाबत मी सांगू इच्छितो की,2012 पर्यत ही योजना सुरु राहणार असल्यामुळे लवकरात लवकर दिलेली रक्कम खर्च करावी जेणेकरुन उर्वरित रकमे संबंधीचा प्रस्ताव मंजूर करुन घेता येईल अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9541..

श्री.सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी से मेरे दो प्रश्न हैं. मेरा कहना है कि जिन 9 महानगरपालिकाओं के लिए जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण योजना बनायी है, वहां पर कितना प्रतिशत फंड महाराष्ट्र सरकार का है, कितना प्रतिशत फंड केन्द्रीय सरकार का है तथा कितना प्रतिशत फंड महानगरपालिका का है.मेरा दूसरा प्रश्न यह है कि नागपूर में जो सिवरेज ट्रीटमेंट प्लांट बनाया गया है उसकी वजह से पॉल्युशन बहुत हो रहा है. वहां पर रहने वाले आस-पास के लोगों को काफी तकलीफ हो रही है. मैं पूछना चाहता हूं कि क्या आप उसकी सही जानकारी सभा के पटल पर रखेंगे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या योजनेसाठी मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेशातील इतर मनपांना केंद्र सरकारकडून 35 टक्के, राज्य सरकारकडून 15 टक्के फंड मिळणार असून स्थानिक स्वराज्य संस्थेने 50 टक्के भार उचलावयाचा आहे. त्याचप्रमाणे इतर मनपांकरिता केंद्र शासन 50 टक्के, महाराष्ट्र शासन 20 टक्के व स्थानिक स्वराज्य संस्था 30 टक्के तर नांदेड वाघाळा मनपा करिता केंद्र शासनाकडून 80 टक्के, महाराष्ट्र शासनाकडून 10 टक्के तर स्थानिक स्वराज्य संस्थेकडून 10 टक्के निधी मिळणार आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दोडामार्ग व सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात डंपरमधून चोरट्या पध्दतीने सोने मिश्रीत लोह खनिजाची वाहतूक होत असल्याबाबत**

**(२) * ९७९९ श्री.परशुराम उपरकर , डॉ.दिपक सावंत , श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३०१० ला दिनांक २७ मार्च, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग व सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यांतील विना परवाना लोह खनिज मोठ्या प्रमाणात चोरट्या पध्दतीने काढलेल्या खनिजापैकी, जिल्हाधिकाऱ्याकडून सोने मिश्रित खनिजांचा डंपर पोलिसांनी ताब्यात घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डंपर रेडी येथून गोव्याकडे जाताना पकडला, त्यातील खनिज पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रयोगशाळेच्या अहवालात काय निष्पन्न झाले, व अशा चोरट्या पध्दतीने खनिज काढणारे रॅकेट पकडण्याकरिता काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता**: (१) हे खरे नाही. तथापि, अशा आशयाच्या निनावी खबरी आधारे दि.११.०८.२०१० रोजी ट्रक क्रमांक CJ-०४ JA०१८१ पोलिसांनी ताब्यात घेऊन तपासणी केली असता सदर ट्रक मध्ये रेडी येथील मे.टाटा मेटॅलिक कंपनीचा जैन इंटरप्राईजेस यांनी विकत घेतलेला स्क्रॅपचा माल रेडी ते भिलाई असा वाहतूक करुन नेत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी सन २००१ मध्ये शासनाने नियम तयार केले असून त्यानुसार अशी प्रकरणे आढळल्यास दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. तसेच खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा स्तरावर दक्षता पथके स्थापन करण्यात आली असून त्यांचे मार्फत अचानक तपासणी केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.परशुराम उपरकर :सभापती महोदय, तिस-या प्रश्नाला उत्तर देतांना असे म्हटलेले आहे की,दंडात्मक कारवाई करण्यासाठी नियम तयार केले आहे. सपाटीकरणाच्या नावाखाली किती गावामध्ये माती उत्खनन झालेले आहे आणि त्यांच्याविरुध्द आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम किती आहे व ती रक्कम जमा करण्यात आली आहे काय ? यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की,, सर्व्हे नंबर ३५ मध्ये १ कोटी ३७ लाख दिनांक २५.२.२००० रोजी आणि १ कोटी ४६ लाख रुपये दिनांक २९.३.२००० रोजी दंड आकारण्यात आला होता तो दंड जमा करण्यात आला आहे काय ? त्याचबरोबर केन्द्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून ३९ प्रकल्पांचा पुनर्विचार करावा असे सांगितले आहे हे खरे आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की ,एकूण दहा व्यक्ती विरुध्द आतापर्यंत कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ७ कोटी ७२ लाख ४२ हजार ७४रुपये वसूल करण्यात आलेले आहेत एवढेच नव्हे तर एमएमआरडी ॲक्टप्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे काम देखील केलेले आहेत.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9799....

श्री. सचिन अहिर...

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेला दुसरा प्रश्न वेगळा आहे. त्यांनी वेगळया माध्यमातून प्रश्न विचारल्यास त्यांना माहिती देण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी याठिकाणी जे उत्तर दिले आहे त्यामध्ये साधारणपणे 10 लोकांनी 10 ठिकाणी छापा टाकला व दंडात्मक कारवाई केली असे सांगितले आहे. उत्तरामध्ये दक्षता पथक स्थापन केल्याचे म्हटले आहे. अशी किती दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत? तसेच, त्यांच्या कारवाईचा अहवाल आपल्याला प्राप्त झाला आहे काय? यापूर्वी देखील अशाप्रकारचे उत्तर या सभागृहामध्ये देण्यात आले होते. तेव्हा ही दक्षता पथके आणखी सक्षम झाली पाहिजेत असे शासनाला वाटत नाही काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, होय. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली असून त्यामध्ये पोलीस अधीक्षक, उप वन संरक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणजे आरटीओ, उप निवासी जिल्हाधिकारी आणि डीएमओ म्हणजे डिस्ट्रिक्ट मायनिंग ऑफिसर यांचाही समावेश करण्यात आला आहे. सभापती महोदय, यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा असल्यामुळे यामध्ये आपण जीपीएस ही सिस्टिम आणू शकतो काय हा देखील विचार आपण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. जेणेकरुन एका मायनिंग ओवर्समधून खनिजे घेऊन जाणाऱ्या ट्रकवर सक्तीने जीपीएस सिस्टीम बसविल्यानंतर मॉनिटरव्दारे त्या सिस्टीमचा वापर केल्यानंतर हे वाहन कुठे जात आहे याचा आपल्याला शोध घेता येईल. जेणेकरुन त्याठिकाणी राजरोसपणे सुरु असलेल्या अवैध खनिजांच्या उत्खननाला आपल्याला आळा घालता येईल या दृष्टीने शासनाचे प्रयत्न आहेत. आपण खनिज उत्खननास अनेक वेळा परवानगी देतो त्यामधून आपल्याला रॉयल्टी मिळते. परंतु जे स्वत: जमीन मालक आहेत व ते अशाप्रकारे बेकायदेशीर खनिज उत्खननाचे काम करीत आहेत. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर आपण त्यांच्यावर कारवाई करीत असतो.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये "निनावी खबरी" असे म्हटले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, अशा निनावी खबऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

ता.प्र.क्र. 9799....

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सन 2004 मध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील भू गर्भ शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आर. आर. पाटील आणि भू विज्ञान खनिकर्म विभागातील सेवानिवृत्त रसायनशास्त्रज्ञ डॉ. आर.एस. हजारे यांनी एक अहवाल दिला होता. त्या अहवालामध्ये त्यांनी सावंतवाडी तालुक्यामधील लोह खनिजामध्ये सोन्याचे प्रमाण प्रति टन 67 ग्रॅम एवढे आहे असे म्हटले आहे. त्याबाबत तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी त्यावेळचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राम ताकवले यांना एक पत्र लिहिले होते. माझा याबाबत असा प्रश्न आहे की, बॉक्साईट लोह खनिजामध्ये सोने असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. तसेच, त्या खनिजामध्ये प्लॅटिनम हा धातू सुध्दा सापडलेला आहे. तेव्हा ही देशातील अमूल्य अशी संपत्ती देशाबाहेर जात आहे, त्याला आपण प्रतिबंध करणार आहात काय? तशी कायद्यात तरतूद करणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्य वारंवार एक गोष्ट सांगत आहेत ती खरी आहे. डॉ. हजारे नावाच्या एका व्यक्तीने सेवानिवृत्त झाल्यानंतर एनजीओ म्हणून काम सुरु केले आहे. त्यांनी वेगवेगळया सेमिनारमध्ये याबाबत उल्लेख केला आहे. त्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती असल्यामुळे त्याबाबत आपल्याला काही करता येईल काय याबाबत ज्युऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया या संस्थेकडून तीन वेळा सर्व्हे करण्याचे काम केले आहे व सर्व्हेच्या अहवालामध्ये असे स्पष्ट झाले आहे की, त्यामध्ये काही प्रमाणात सोन्याचा अंश आहे. त्यामध्ये सोन्याचे फारच मायनर प्रमाण असल्यामुळे हा सोन्याचा अंश मेजर कामासाठी वापरता येत नाही. त्यावर कोणतीही प्रक्रिया करता येत नाही किंवा त्यामधून सोने ॲबस्ट्रॅक्ट करता येत नाही. हा थोडासा सोन्याचा अंश असलेले खनिज गोव्यामध्ये पाठविले जाते. आणि गोव्यामध्ये असलेल्या मेजर कोर्समध्ये मिक्स करुन त्यावर प्रक्रिया करण्याचे काम केले जाते आपण म्हणता त्याप्रमाणे सोन्याचे ॲबस्ट्रॅक्ट यामध्ये मिळाले नाही आणि म्हणून अशाप्रकारची माहिती मिळाल्यानंतर त्या आधारावर रॉयल्टी लावण्याचे काम आपण करतो. हे नमुने तपासण्याचे काम आपण नोव्हेंबरमध्ये केले आहे. याबाबत माननीय सदस्यांची विनंती असेल तर हे प्रकरण आपण पुन्हा एकदा केंद्र शासनाकडे पाठवू आणि त्यामध्ये रॉयल्टी वाढविता येत असेल तर ती वाढविण्याचा देखील प्रयत्न करता येईल.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्रा.9799....

श्री. राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये बऱ्याच ठिकाणी जे लिज मंजूर झालेले आहेत ते ठराविक व्यक्तिना मंजूर झालेले आहेत. या व्यक्ती सातत्याने त्यांची सब लिस्ट देतात. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी प्रॉब्लेम निर्माण झालेले आहेत. त्यामुळे शासनाचा तोटा होतो. उदाहरण म्हणून डेक्कन मायनिंग आपण घेऊ या. अशा काही मायनिंग आहेत की, त्या लिज प्रमाणे काम करीत नसतील तर त्यांचे लिज रद्द करणार काय? माझा दुसरा प्रश्न असा की, या लिजच्या संदर्भात कोणतेही नियम पाळले जात नाहीत, लिज आहे या नावाखाली बेकायदेशीर उत्खनन केले जाते आणि बेकायदेशीररीत्या मोठया प्रमाणात साठे केले जातात. त्यांच्यावर शासन कायदेशीर कारवाई करणार काय? मी या ठिकाणी स्पेसिफिक गट नंबर देतो, 5212 हा लिज मंजूर झालेला आहे. पण त्याठिकाणी मारामारीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. 3-3 लोकांना सब लिस्ट दिलेले आहे. या सगळया प्रश्नावर काय कारवाई करणार? आणि त्यांचे लिज रद्द करणार काय? चुकीच्या पध्दतीने उत्खनन करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई करणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात मी या अगोदरच सांगितलेले आहे. ज्यावेळी अशा प्रकारे अवैध माईनिंगचे काम होते त्यावेळी कारवाई करण्याचे काम केलेले आहे. यापुढे देखील ती कारवाई चालू राहील.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या विलेपार्ले (पूर्व), उपनगरातील भूखंड क्र.108 व क्र.109 या राखीव भूखंडावर विकासकाने केलेले बांधकाम**

**(3) * 9179 श्री.पांडुरंग फुंडकर** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईचा विलेपार्ले (पूर्व), उपनगरातील नगररचना क्र.5, सन 1994 मध्ये मंजूर केली असून भूखंड क्र.108 हा मनोरंजनाचे मैदान म्हणून व भूखंड क्र. 109 हा हाऊसिंग फॉर डिस हाऊसड म्हणून राखून ठेवण्यात आला असतांना मे.पार्थ डेव्हलपर्स या विकासकाने या भूखंडावर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या योजनेला मान्यता देतांना 33 टक्के जागा मोकळी सोडून बांधकाम करावे अशी अट असल्यामुळे 3179.50 चौ.मी भूखंडापैकी 1049.33 चौ.मी. भूखंड मोकळा ठेऊन तो महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक असतानाही केवळ 480.00 चौ.मी.चा भूखंड पार्थ डेव्हलपर्स या विकासकाने मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, 480.00 चौ.मी. भूखंड विकासकाने महानगरपालिकेस हस्तांतरित केल्यामुळे 569.33 चौ.मी. भूखंडावर विकासकाने अतिक्रमण केले, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, नियमाप्रमाणे 1049.33 चौ.मी. भूखंड क्रीडांगणासाठी मोकळा ठेऊन महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात यावा व 569.33 चौ.मी.भूखंडावर केलेले अनधिकृत बांधकाम तोडण्यात येऊन म्हाडा, मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी व विकासकावर कारवाई करण्याची मागणी मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी त्यांच्या क्र.विपने/मविप/262/2010, दिनांक 7 एप्रिल, 2010 रोजीच्या पत्रान्वये मा.नगरविकास राज्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता**: (1) मुंबईच्या विलेपार्ले (पूर्व) येथील भूखंड क्र.108 हा मनोरंजनाचे मैदान म्हणून व भूखंड क्र.109 हा हाऊसिंग फॉर डिस हाऊस म्हणून राखून ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे. सदर भूखंडावर नगर रचना मंजुरीपूर्वी झोपडपट्टी अस्तित्वात असल्याने समर्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेस महानगरपालिकेकडून दिनांक 13.2.1997 रोजी परिशिष्ट-2 वितरीत करण्यात आले होते. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सदर भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला दिनांक 9.10.1998 रोजी मंजूरी दिली असून, एकूण 198 पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

(2) व (3) विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. 33(10) मधील परिशिष्ट 4 उपनियम 7.4 मधील तरतूदीनुसार 33% मोकळी जागा जिथे इमारतीच्या उंचीतील बंधनामुळे व इतर कारणांमुळे आवश्यक तेवढी कमी करता येते. सदर योजना राबविण्यात येणाऱ्या भूखंडावर फक्त 9.015 मी.उंचीपर्यंत इमारत बांधण्याची परवानगी आहे. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सुधारीत आशयपत्रात विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार योजनेत 33% ऐवजी 15.12% इतकी मोकळी जागा मनोरंजन मैदानाकरिता महानगरपालिकेला विनामूल्य हस्तांतरीत करण्याची अट घातली आहे. त्यानुसार मनोरंजन मैदानाकरिता आरक्षित भूखंड महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यात येत आहे.

(4) हे खरे आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(5) या प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीत अनियमितता दिसून येत नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेल्या दोन तीन अधिवेशनापासून हा प्रश्न विविध आयुधांद्वारा या सभागृहात मांडला जात आहे. विलेपार्ले उपनगरातील या भूखंड क्रमांक 108 व भूखंड क्रमांक 109 मध्ये अनेक अनियमितता झालेल्या आहेत. यासंदर्भात शासनाने प्रत्येक वेळी वेगवेगळे उत्तर दिलेले आहे. भूखंड क्रमांक 108 हा मनोरंजनाच्या मैदानासाठी राखीव होता. भूखंड क्रमांक 109 हा हाऊसिंग फॉर डिस हाऊस् याकरिता राखून ठेवलेला होता. भूखंड क्रमांक 108 वर झोपडपट्टी होती आणि भूखंड क्रमांक 109 हा मोकळा होता. त्यावर अतिक्रमण झालेले नव्हते. शासनाने झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन भूखंड क्रमांक 108 या मनोरंजनासाठी आरक्षित असलेल्या मैदानावरच करायला हवे होते परंतु त्यांनी झोपडपट्टी नसलेल्या मोकळया भूखंडावर म्हणजे भूखंड क्रमांक 109 वर पुनर्वसन केले ही अत्यंत गंभीर अनियमितता त्याठिकाणी झालेली आहे. सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर मी या ठिकाणी वाचून दाखवितो.सभापती महोदय, "महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक TPB-4391/4080-A/UD11/RD अंतर्गत तरतूद केली होती की, हे रिझर्वेशन असले तरी त्यावर अतिक्रमण होत आहे त्यामुळे जर त्या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना होणार असेल तर त्या बांधकामास परवानगी द्यायला हरकत नाही. मात्र आरक्षित क्षेत्रातील 10 टक्के म्हणजे 480 चौ.मी. क्षेत्र त्यांनी राखीव ठेवले पाहिजे असे त्यामध्ये नमूद केले आहे".अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी त्यावेळी दिलेले आहे. आज माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, या अधिसूचनेकडे दुर्लक्ष करुन कुठला तरी नियम शोधून 33 टक्क्याऐवजी 15.12 जागा मनोरंजन मैदानाकरिता महापालिकेला हस्तांतरित करण्याची अट टाकावयाची आहे. सभापती महोदय, कधी 10 टक्के तर कधी 15.12 टक्के जागा मोकळी सोडायची हा काय प्रकार आहे? यातील 10 टक्के खरे आहे की, 15.12 टक्के खरे आहे.? सभापती महोदय, अशा पध्दतीने दोन्ही भूखंडाचा वापर करत असताना मोठया प्रमाणात

..4...



SMT/ D/ ST/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यासंदर्भात चौकशीची मागणी केली होती. पण या प्रश्नाच्या उत्तरात माननीय मंत्री महोदयांनी असे म्हटले आहे की, चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, झोपडपट्टीचे पुनर्वसन कोणत्या भूखंडावर करण्यात आलेले आहे, हे भूखंड जिल्हाधिकाऱ्याच्या ताब्यात नसताना त्यांनी त्या संदर्भात आदेश दिले हे खरे आहे काय? तसेच वेगवेगळी उत्तरे तयार करुन देणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि विकासकाला ज्यांनी चुकीची माहिती दिली त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे?अग्नीशमन अधिकाऱ्यांनी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रा बाबत शासनाने चौकशी केली आहे काय?

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9179 .....

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, भूखंड क्रमांक 108 मध्ये आपल्याकडे आरक्षण होते ही वस्तुस्थिती आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, आरक्षणाचे दोन भाग आहेत. एक म्हणजे डेव्हलपमेंट प्लॅन प्रमाणे आरजीपीजीचे आरक्षण ठेवलेले असते आणि दुसरे आरक्षण म्हणजे ओपन स्पेस असते. या अगोदर देखील या सभागृहामध्ये सांगितले होते त्याप्रमाणे अगोदर जर झोपडपट्टी झाली असेल तर एसआरएच्या नियमाप्रमाणे ओपन स्पेस घेऊन काही जमीन आपल्या ताब्यात राहण्याच्या दृष्टीकोनातून आठ ते दहा टक्के पर्यंत आपण ओपन स्पेस म्हणून ते करु शकतो. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारले की, त्या ठिकाणी आरजीपीजीचे आरक्षण असताना आणि हायकोर्टाने आदेश दिल्यानंतर हे रिझर्वेशन कसे काय उठविले ? याबाबत असे सांगितले आहे की, उपकलम 7.4 नुसार अशी तरतूद आहे की, आपण 33 टक्के आरक्षण ठेवले पाहिजे आणि बाकीच्या जमिनीमध्ये आपण इमारती बांधण्यासाठी परवानगी देऊ शकतो. या विशिष्ट प्रकरणामध्ये ही जागा विलेपार्ले येथे असल्यामुळे आणि त्या ठिकाणी विमानाच्या लँडींगची जागा असल्यामुळे, त्या ठिकाणी एअरपोर्ट जवळ असल्यामुळे, सिव्हिल एव्हिएशनमुळे उंचीच्या बाबतीत 9 मीटरचे रिस्ट्रिक्शन आहे. उंचीच्या बाबतीत 9 मीटरचे रिस्ट्रिक्शन असल्यानंतर एसआरएच्या मुख्याधिकाऱ्याला अधिकार आहे की, 33 टक्केपैकी काही आरक्षण आपण कमी करु शकतो त्याप्रमाणे त्यांनी त्याच्या अधिकाराचा वापर करुन 15.2 टक्के एवढे आरक्षण ठेवण्याचे काम केलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, तेथील काही भाडेकरुंनी याबाबतची काही प्रकरणे कोर्टात नेण्याचा प्रयत्न केला. कोर्टाने सुध्दा हा निर्णय योग्य असल्याचे सांगितले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पहिला जो प्रश्न विचारला त्याबाबत याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे. त्यांनी दुसरा प्रश्न अग्निशमनच्या बाबतीत विचारला. त्याबाबतीत सुध्दा कार्यवाही केलेली आहे. अग्निशमनच्या बाबतीत वेगळी संस्था असते. यामध्ये मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र लागते. ते घेण्याचे काम केलेले आहे. ती चौकशी सुध्दा पूर्ण करण्याचे काम केलेले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9179 .....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय पार्थ डेव्हलपर्सला का पाठीशी घालत आहेत हे मला कळत नाही. या सभागृहात त्यांनी सांगितले होते की, जर सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये काही किंतू असेल तर याची फेरतपासणी केली जाईल आणि मग यावर उत्तर देऊ. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी याबाबतीत दोन तीन वेळा प्रश्न उपस्थित केला. कायदा कसा लवचिक करावयाचा हे माननीय मंत्रिमहोदयांकडून आपण शिकले पाहिजे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, हे एअरच्या फनेलमध्ये येते आणि त्याचा आधार घेऊन आपण त्यांना 15 टक्के सूट दिली. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 15.12 टक्के इतकी मोकळी जागा मनोरंजन मैदानाकरिता महापालिकेला विनामूल्य हस्तांतरित करण्याची अट घातली आहे. हा प्लॉट हस्तांतरित झाला का ? याबाबत सद्य:स्थिती काय आहे ? हा प्लॉट हस्तांतरित झाला नसेल तर तो कधी होणार आहे याची नेमकी तारीख ठरविली आहे काय ? मी सुध्दा पार्ले येथेच राहतो. तेथील लोकांच्या मनामध्ये या विषयी अनेक समज, गैरसमज आहेत. म्हणून शासन याची सगळी चौकशी निवृत्त न्यायाधीशामार्फत किंवा सी.आय.डी. मार्फत करणार काय ? कारण एसआरएमधील हा सर्वात मोठा घोटाळा आहे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, त्यांना आपण 2006 साली हे सांगितले होते. यामध्ये तरतूद अशी आहे की, एकूण पुनर्वसन झाल्यानंतर विनामूल्य महापालिकेकडे तो एरिया सरेंडर करावयास पाहिजे. आतापर्यंत त्यांनी तो सरेंडर केलेला नाही. 2006 साली त्यांना तसे सांगितले आहे. तशी अट घातलेली आहे. आता आपण त्यांना जी परवानगी दिलेली आहे त्यामध्ये 198 जे पात्र झोपडपट्टीधारक आहेत त्यांचे पुनर्वसन करण्याचे काम त्यांनी केलेले आहे आणि भविष्य काळामध्ये सेल एरिया जोपर्यंत ते हस्तांतरित करणार नाहीत तोपर्यंत त्यांना ओ.सी. देण्याचा प्रश्न येणार नाही. हे सर्व करण्याचे काम शासनाने केलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब यांचा आदर ठेऊन मी सांगतो की, त्यांनी सांगितल्याप्रमाणे शासनाने याची वारंवार चौकशी केलेली आहे. एवढेच नव्हे तर हे प्रकरण कोर्टात गेले. हायकोर्टाने हे प्रकरण हाय पॉवर कमिटीकडे रेफर

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9179 ..... श्री. सचिन अहिर ...

केले. हाय पॉवर कमिटीने सुध्दा 2008 साली निर्णय घेतला आणि नुकतेच 2010 साली सुध्दा निर्णय घेऊन यामध्ये काही तथ्य नाही असे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी वारंवार मागणी केल्यानंतर वारंवार चौकशी करण्याची भूमिका शासनाने घेतली परंतु वेळोवेळी न्यायालयाकडून निर्णय आल्यानंतर मला असे वाटते की, परत पुढे जाऊन चौकशी करणे अयोग्य होईल. म्हणून तो मुद्दा या निमित्ताने मांडण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, इमारत बांधताना 6 मीटर जागा सोडणे आवश्यक आहे. तेथील नागरिकांनी माझ्याकडे निवेदन दिलेले आहे की, त्या ठिकाणी इमारत बांधताना 6 मीटर जागा न सोडता तीन ते चार फूट जागा सोडलेली आहे. शासनाने याची चौकशी केली का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9179...... श्री.पांडुरंग फुंडकर.....

अशा पध्दतीने अग्निशमन अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी न करता चुकीचे प्रमाणपत्र दिलेले आहे. या पार्थ डेव्हलपरने 66,000 चौरस मीटर इतके बांधकाम केलेले आहे. शासनाने त्याला इतक्या बांधकामाची मंजुरी दिली होती का, त्याने इतका एफएसआय कसा वापरला ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, दुस-या प्रश्नाचे उत्तर मी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपणच सांगितल्यामुळे मी त्याबाबत उत्तर दिले नव्हते. आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारल्यामुळे मी सांगतो की, 2912.50 चौ.मी. व 2900.69 चौ.मी. अशा एकूण 6316 चौ.मी.वर ही योजना राबविण्यासाठी परवानगी दिलेली आहे. सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये विशेषत: इ ोपडपट्टीमध्ये तसेच जुन्या इमारतीमध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते सांगत आहेत त्याप्रमाणे दोन इमारतीतील अंतर शिथिल केले जाते. कारण प्लॉट एरिया कमी असतो. प्लॉट एरिया कमी इ ााल्यानंतर शासनाला तसे रिस्ट्रिक्शन घालता येत नाही. त्यामुळे शासनाने तशी कार्यवाही केलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे समाधान होण्यासाठी सी.एफ.ओ.कडे पुन्हा या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगितले जाईल. त्यांनी तेवढे क्षेत्र सोडणे गरजेचे आहे की नाही याचा तपास करण्यास सांगितले जाईल. त्याप्रमाणे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना कळविले जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

**अमरावती (जि.अमरावती) शहराच्या भुयारी गटार योजनेसाठी उपलब्ध झालेल्या निधीचा प्रत्यक्ष वापर**

**(४) * ९०१८ श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक ७०८१ ला दिनांक २१ जुलै, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनपुरस्कृत लहान व मध्यम शहराकरिता पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमामध्ये अमरावती शहराच्या भुयारी गटार योजनेसाठी जो ३८.७५ कोटी रुपयांचा निधी दिनांक १२ मे, २००९ रोजी वितरित केलेला आहे त्यापैकी दिनांक ३० जून, २०१० पावेतो फक्त १३.३२ कोटी रुपये खर्च झाला व उर्वरित निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत,

(२) या योजनेच्या विविध उपकामांच्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे,

(३) तसेच, या योजनेच्या कार्यपूर्तीचे काय नियोजन करण्यात आले आहे ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहरांकरीता नागरी पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रमांतर्गत अमरावती शहराच्या भुयारी गटार योजनेसाठी केंद्र शासन व राज्य शासनाच्या अनुदानाचा पहिला हप्ता म्हणून वितरित करण्यात आलेला रु.३८.७५ कोटीचा निधी महानगरपालिका अमरावतीकडून प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दिनांक २०/०१/२०१० ला देण्यात आला. निधी प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदारांनी सदर प्रकल्पाचा टप्पा-१ चे काम सुरु केले. तथापि आवश्यक आर.सी.सी. पाईप्सची उपलब्धता व पावसाळ्यामुळे कामाची प्रगती राखता आली नाही. यामुळे अपेक्षित निधी खर्च झालेला नाही.

(२) सदर प्रकल्पाचा टप्पा-१ अंतर्गत शहरातील ६ भागामध्ये मलवाहिन्या टाकण्याचे काम सुरु आहे. १९.४० कि.मी. पाईप प्राप्त व ७.५० कि.मी. पाईप टाकण्यात आले आहेत. तसेच मलशुध्दीकरण केंद्राचे संकल्पन मंजूर झाले आहे. त्वरितच काम सुरु करण्यात येत आहे.

(३) सदर योजनेमधील टप्पा-१ ची कामे दिनांक २७/०८/२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच प्रकल्पाच्या टप्पा २ व ३ च्या कामाची निविदा प्रक्रिया सत्वर पूर्ण करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास निदेश देण्यात आले आहेत.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहराकरिता पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत अमरावती शहराच्या भुयारी गटार योजनेसाठी एकूण रु.141.93 कोटी रुपयाच्या प्रकल्पाला 3 टप्प्यात मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे केंद्र सरकारने रु.34 कोटी 45 लाख व महाराष्ट्र शासनाने 4 कोटी 30 लाख असा एकूण रु.48 कोटी 75 लाख इतका निधी 12 मे, 2009 रोजी महानगरपालिकेला वितरित केलेला आहे. महानगरपालिकेने हा निधी मार्च महिन्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित केला आहे. या हस्तांतरणाला 1

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KGS/ ST/

ता.प्र.क्र.9018......                                                    श्री.वसंतराव खोटरे.....

वर्षाचा कालावधी होऊनही काम धिम्या गतीने सुरु आहे. त्यामुळे 38 कोटीचा निधी खर्च होऊ शकला नाही. हे काम 3 टप्प्यात करावयाचे असले तरी काम संथ गतीने सुरु असल्यामुळे निधी खर्च झालेला नाही. याचा अर्थ अधिकारी काम करीत नाहीत. जे अधिकारी काम करीत नाहीत, ज्यांनी या कामाला दिरंगाई केली आहे त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ? दुस-या व तिस-या टप्प्याच्या कामाची निविदा प्रक्रिया सत्वर सुरु करण्याचे निदेश दिलेले आहेत असे उत्तरात नमूद केलेले आहे. ही प्रक्रिया 15 दिवसाच्या आत पूर्ण होईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, दुस-या प्रश्नाबाबत मी सांगेन की, निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. आता कोणतीच प्रक्रिया शिल्लक राहिलेली नाही. यूआयडीएसएसएमटी योजनेतील ही योजना आहे. या योजनेला केंद्र सरकारने मंजुरी दिलेली आहे. केंद्र व राज्य सरकारने एकूण रु.38 कोटी 75 लाखाचा हिस्सा दिलेला आहे. त्यानंतर महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे ही योजना देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार हे काम त्यांच्याकडे हस्तांतरित केलेले आहे. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या कामांचे टेंडर काढलेले आहे. कंत्राटदार निश्चित झालेला आहे. आता हे काम सुरु आहे. हे खरे आहे की, हे काम संथ गतीने सुरु आहे. मध्यंतरी पावसाचा काळ विचारात घेता आता या कामाला गती देण्याचे काम सुरु झ ालेले आहे. बाकीच्या सर्व प्रक्रिया सुरु झालेल्या असून 2012 पर्यंत या कामाची मुदत असल्यामुळे या मुदतीत महानगरपालिकेकडून हे काम पूर्ण करुन घेण्यात येईल.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:30

ता.प्र.क्र.9018....

श्री. वसंतराव खोटरे : हे काम मार्च 2010 अखेर पूर्ण करण्यात येईल असे मागील वेळेस शासनाच्या वतीने उत्तर देण्यात आले होते. तेव्हा हे काम त्वरित करण्यासाठी माननीय मंत्री महोदय अधिका-यांना सूचना देतील काय ?

श्री. भास्कर जाधव : होय.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील जुन्या रीक्षा व टॅक्सी नष्ट करण्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(५) * १०३०४ डॉ.निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.हुसेन दलवाई :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरटीओ आणि वाहतूक पोलिसांनी व्यापक मोहिम राबवून जुन्या टॅक्सी आणि रीक्षा स्क्रॅप कराव्यात, त्यांचे चित्रीकरण करावे आणि रोज किती गाड्या स्क्रॅप केल्या त्याचा अहवाल शासनाला घावा, असे आदेश माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्यादरम्यान मा.गृहमंत्री यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार जुन्या टॅक्सी आणि रीक्षा स्क्रॅप करण्याबाबतचा अहवाल शासनास सादर झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर**, **श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) परिवहन विभाग व वाहतूक पोलीसांच्या मदतीने मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या टॅक्सी व ऑटोरिक्षाविरुध्द व्यापक मोहिम राबविण्याचे निर्देश मा.गृहमंत्री यांनी दि.२५.८.२०१० रोजीच्या बैठकीत दिले आहेत.
(२) होय.

(३) मोटार वाहन कायदा व नियमाचे उल्लंघन करणाऱ्या टॅक्सी व ऑटोरिक्षांवर दि.९.८.२०१० ते २७.८.२०१० या कालावधीत दोन मोहिमा राबवून ११६५ टॅक्सी व ४८८ ऑटोरिक्षा जप्त करण्यात आल्या. त्यापैकी २४४ टॅक्सी व ५४ ऑटोरिक्षा स्क्रॅप करण्यात आल्या व या मोहिमेचा परिणाम म्हणून वाहन मालकाने स्वत:हून १०५७ टॅक्सी स्क्रॅप करुन घेतल्या. सदर तपासणी मोहिमेअंतर्गत विविध गुन्ह्यांखालील वाहन चालकांकडून दंडापोटी रु.१७,१०,६५९/- व करापोटी रु.१०,५३,१११/- इतका महसूल गोळा करण्यात आला आहे.

डॉ. नीलम गो-हे : मुंबईमध्ये व्यापक मोहीम राबविण्यात येत असली तरी राज्यातील मोठ्या महानगरपालिकातील टॅक्सी आणि रिक्षा यांच्या संदर्भातील प्रश्न मिटलेला नाही. या मोहिमेचे चित्रिकरण करण्यात येते असे सांगितले जाते. परंतु हे चित्रिकरण कोण पहाते. या जप्त केलेल्या वाहनांपैकी 50 टक्के टॅक्सी आणि रिक्षा रात्रीच्या वेळी रस्त्यावर येतात की नाही हे कोण बघणार ? या टॅक्सी आणि रिक्षा मालकांना पुन्हा तोच व्यवसाय करावयाचा असेल तर त्यासाठी त्यांना संरक्षण देण्याची शासनाची भूमिका आहे काय ? या व्यवसायामध्ये मोठमोठया खाजगी संस्था उतरल्यामुळे टॅक्सी आणि रिक्षावाले या धंद्यातून हद्दपार होण्याची वेळ आलेली आहे. याबाबतीत सरकारचे काय धोरण आहे ?

..2..



MSS/ D/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10304...

श्री. गुलाबराव देवकर : मुंबई शहरामध्ये टॅक्सी आणि रिक्षा तपासण्याची मोहीम हाती घेतलेली आहे. त्यामध्ये काही टॅक्सी आणि रिक्षा जप्त करुन स्क्रॅप केलेल्या आहेत. याबाबतचे चित्रिकरण केले जात नाही. परिवहन विभागामार्फत टॅक्सी आणि रिक्षा यांची तपासणी करुन ते जप्त करण्याचे काम केले जाते. परिवहन विभागाचे प्रमुख अधिकारी यावर देखरेख ठेवण्याचे काम करतात. ज्यांची वाहने स्क्रॅप केली जातात त्यांच्याबाबतीत शासनाचे काही धोरण नाही.

श्री. भाई जगताप : परिहवन विभागाने घेतलेला उपक्रम स्तुत्य आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मुंबईसारख्या शहराची अवस्था फार वाईट झालेली आहे. मी शासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करतो. परंतु मुंबईपुरते बोलायचे झाल्यास स्क्रॅप करण्यासारख्या वाहनांची संख्या 15 ते 20 हजाराच्या पुढे आहे. उत्तरामध्ये 1165 टॅक्सी आणि 488 ऑटोरिक्षा अशी आकडेवारी दिलेली आहे. परिवहन विभागाकडे वाहनांचे रजिस्ट्रेशन होते. त्यामुळे वाहंनाची संख्या किती आहे हे त्या विभागाला माहीत आहे. म्हणून प्रत्येक वाहनाची तपासणी अनिवार्य करण्यात येणार आहे काय ? तसेच जप्त केलेल्या टॅक्सी किंवा रिक्षा परत मागच्या दाराने रात्री रस्त्यावर येतात की नाहीत हे पाहण्यासाठी यंत्रणा राबविण्याची आवश्यकता आहे. त्याबाबतीत शासन निश्चित धोरण आखणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : टॅक्सी आणि रिक्षांच्या संख्येच्या प्रमाणात केलेली कारवाई कमी प्रमाणात आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. ही मोहीम दि. 9 ऑगस्ट, 13 ऑगस्ट, 20 ऑगस्ट आणि 27 ऑगस्ट 2010 रोजी राबविलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KGS/ 13:35

श्री.गुलाबराव देवकर....... ता.प्र.क्र.10304....

ही मोहीम राबवित असताना परिवहन विभागाकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डप्रमाणे परवाना संपला असेल अशांची यादी पथकातील अधिकाऱ्यांसोबत दिली जाते आणि अशा वाहनांची अडवणूक करुन त्यांची तपासणी केली जाते. अशी परवाना संपलेली वाहने ताब्यात घेऊन ती स्क्रॅप करण्याचे काम केले जाते. एमएमआरडीएच्या नियमाप्रमाणे स्क्रॅप केलेल्या वाहनांना एका वर्षाच्या आत ती वाहने बदलण्याची मुदत दिली जाते. जी वाहने रद्द केलेली असतील त्या वाहनांच्या मालकांना नवीन परवाना देण्याचे धोरण राबविले जाते.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, शासनाचे धोरण काय आहे? शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला तर ते महत्वाचे होईल. ज्या भागामध्ये वाहतूक करणारे जूने परवानाधारक टॅक्सीमालक आहेत ते मराठी भाषिक आहेत. त्यांनी स्वत:ची सहकारी संस्था केली किंवा वाहतुकीची योजना मांडली तर त्याला शासन अनुमती देईल काय? पुण्यातील हिंजवडी भागासाठी त्यांची योजना तयार आहे. मुंबई-पुणे टॅक्सी योजना राबविली जाते. पुणे ते नगर, नाशिक, शिर्डी टॅक्सी योजना सुरु आहे. ग्राहकांना कूल कॅब सेवा हवी आहे. अशा टॅक्सी मालकांनी त्या त्या भागात एकत्रित येऊन परवाना मागितला तर शासन अनुमती देईल काय?

श्री.गुलाबराव देवकर : नवीन परवाना देण्याचे धोरण शासनाने सध्या जाहीर केलेले नाही. शासनाचा विचार आहे. सध्या प्रस्तावित असून फायनल निर्णय घेतलेला नाही.

श्री.विनोद तावडे : (जागेवर बसून)...शासनाने निविदा काढलेल्या आहेत.

श्री.गुलाबराव देवकर : निविदा आलेल्या नाहीत. निविदा आल्यानंतर फायनल निर्णय घेतला जाईल.

श्री.दिवाकर रावते : जुन्या टॅक्सी आणि रिक्षा आता बाद कराव्यात या संदर्भातील हा प्रश्न आहे. मुंबईमध्ये एकाच क्रमांकाच्या चार-पाच रिक्षा बेकायदेशीरपणे चालविल्या जात आहेत याची शासनाला कल्पना आहे का? त्या संदर्भात काय कारवाई करणार आहात? नांदेड शहरामध्ये 10 हजार बेकायदेशीर रिक्षा चालविल्या जात आहेत. त्या संदर्भात कोणती कारवाई केली जाईल?

श्री.गुलाबराव देवकर : ही मोहीम या पुढच्या काळात अतिशय तीव्र करण्याचे धोरण शासन हाती घेणार आहे. बेकायदेशीर वाहने चालत असतील तर ती ताब्यात घेऊन स्क्रॅप करण्याचे काम करणार आहोत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10304....

श्री.दिवाकर रावते : या सभागृहाला असे आश्वासित करावे की, पुढील एक महिन्यात किंवा दोन महिन्यात ही कारवाई करण्यात येईल.

श्री.गुलाबराव देवकर : चार ते सहा महिन्यात कारवाई केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जुन्या टॅक्सी बंद करण्याबाबत सभागृहात आश्वासन दिले होते. 15 वर्षावरील जुन्या टॅक्सींचे परवाने सहा महिन्यात रद्द करण्यात येतील असे आश्वासन सभागृहात दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता केव्हा होणार आहे? अनेक टॅक्सीच्या आतील भागात कार्पेट नसते, इंजिनमधून धूर येतो, वाहनचालकाच्या शर्टोला बटणे नसतात तर युनिफॉर्ममध्ये देखील नसतात. त्यांच्यावर शासन कडक कारवाई करणार आहे का?

श्री.गुलाबराव देवकर : या संदर्भात कडक कारवाई करण्याचे शासनाचे धोरण आहे. हा धोरणात्मक विषय आहे. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवला जाईल आणि निश्चितपणाने यासंबंधी विचार केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचा अवमान होत आहे. टॅक्सी ड्रायव्हरने युनिफॉर्म घातला नाही ही बाब मंत्रिमंडळासमोर मांडली जाईल असे मंत्रीमहोदयांनी सांगितले.

श्री.गुलाबराव देवकर : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी प्रश्न विचारला......

श्री.विनोद तावडे : परिवहन आयुक्तांनी मुंबईतील चार हजार परवाने रद्द केले आहेत.

श्री.गुलाबराव देवकर : नवीन टॅक्सी परवाने देण्याचे धोरण जाहीर केलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विचारल्याप्रमाणे, एखाद्या टॅक्सी ड्रायव्हरने युनिफॉर्म घातला नसेल तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असे मंत्रीमहोदयांनी सांगावे.

श्री.गुलाबराव देवकर : या संदर्भात वेळोवेळी तपासणी केली जाते.

**सभापती** : या अनुषंगाने दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य या प्रश्नाबाबत जागरुक आहेत, म्हणून माझी इच्छा आहे की, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी अधिवेशन काळातच आपल्या दालनामध्ये या सर्व प्रश्नकर्त्या सन्माननीय सदस्यांना बोलवावे आणि या प्रश्नाबाबत त्यांच्या ज्या भावना आहेत त्या समजून घेऊन कारवाई करावी.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, होय.

------

नंतर 2 के.2...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील म्हाडा वसाहतींना झोपडपट्टी पुनर्वसनाचे**
**कलम लावून पुनर्विकास करण्याचा केलेला प्रयत्न**

(6) * 9295 श्री.किरण पावसकर, श्री.रामदास कदम, डॉ.दिपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.हुसेन दलवाई, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, प्रा.सुरेश नवले, डॉ.निलम गोऱ्हे, श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाचे स्पष्ट धोरण असतानाही बड्या बिल्डरांच्या फायद्यासाठी संपूर्ण वसाहत "झोपू" योजनेचे कलम लावून पुनर्विकासासाठी देण्याच्या हालचाली प्रशासकीय पातळीवर सुरु झाल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली 33(5) लागू असतांना "झोपू" योजनेसाठी असलेल्या डिसी रुल 33(10) कलम तीन "क" अन्वयेही या वसाहतींचा विकास करता येईल असे धोरण म्हाडा सभापतींना अंधारात ठेवून मंडळाच्या वास्तू रचनाकारांकडून घेतले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, अशाप्रकारे भूमिका घेण्यामागची कारणे काय आहेत व सभापतींनाही विश्वासात न घेता बिल्डरांसाठी काम करणाऱ्या वास्तू रचनाकारांच्या निलंबनाबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) व (2) वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी अशा आशयाची टिप्पणी मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांचेकडे सादर केली होती. तथापि, त्यास मुख्य अधिकारी यांनी मान्यता दिलेली नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती किंवा मुंबई मंडळास सादर करण्यात आलेला नाही.

(3) व (4) मुंबई मंडळातील वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञांची बदली करण्यात आली असून त्यांचेकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

....2...

08-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) KK-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/

ता. प्र. क्र. 9295.........

श्री. किरण पावसकर : महोदय, म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासासाठी राज्यशासनाच्या डी.सी. रुल्समधील नियम 33 (5) असून झोपडपट्टी पुनर्विकासाच्या संदर्भात डी.सी. रुल्स 33 (10) आहे. ज्यामध्ये मुख्य वास्तू रचनाकार प्रवीण साळुंखे यांनी मुंबई गृहनिर्माण मंडळाचे मुख्याधिकारी डॉ. सतीश भिडे नियम 33 (5) ची योजना झोपडपट्टी पुनर्विकास म्हणजेच नियम 33 (10) साठी लागू करावी, असे पत्र पाठविले व तशी अनुकुलता दर्शविली आहे. त्यासंबंधीच्या उत्तरामध्ये मात्र केवळ संबंधित अधिकाऱ्याची बदली करण्यात आल्याचे म्हटले आहे. यापूर्वी सुध्दा हा प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यात आला असता तेव्हा काही सदस्यांनी विचारले होते की, 33 (10) आणि 33 (5) काय आहे ? अशा प्रकारे डी.सी. रुल्समधील 33 (5), 33 (1) किंवा 33 (24) यांचे उल्लंघन झाले तर मंत्री किंवा मुख्यमंत्र्यांना देखील बदलले जाते एवढे कडक आहेत. या नियमात आजपर्यंत अनेक भ्रष्टाचाराची कुरणे बाहेर आलेली आहेत. यामध्ये शासनाच्या वतीने मंत्री आणि मुख्यमंत्री सुध्दा बदलले जाऊ शकतात पण काही अधिकारी मात्र या नियमांचा भंग करताना दिसतात तर त्यांची केवळ बदलीच करण्यात येते. त्यांच्यावर शासन नियंत्रण ठेवणार की नाही ? कारण अशा नियमांचा भंग करणाऱ्या अधिकाऱ्यांची नुसतीच बदली करुन चालणार नाही तर त्यांना निलंबित करणार काय ? त्याचबरोबर हायराईज नावाची जी कमिटी नेमली आहे त्या कमिटीमध्ये सदस्य असलेल्या शैलेश माहीमतुरा नावाच्या आर्किटेक्चरला तीन करोडची लाच घेताना पकडण्यात आले. त्यासंबंधीची चौकशी सुध्दा झाली पण कारवाई काय केली हे मात्र समजले नाही, त्याचे स्पष्टीकरण करावे. त्यानंतर आशिवरा येथील रॉयल एन्ड्स आणि महावीरनगर मालाड येथील भ्रष्टाचार रोखण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत हे लक्षात घ्यावे लागेल की, एका अधिकाऱ्याने अशा प्रकारचा प्रस्ताव मुख्याधिकारी, म्हाडा यांच्याकडे दिला असून त्यात त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, हा शासनाचा धोरणात्मक निर्णयासंबंधीचा विषय असल्यामुळे असे काही करता येत नाही त्यामुळे तो प्रस्ताव आपोआपच रद्द झाला. परंतु मधल्या काळात त्यासंबंधीच्या बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाल्यामुळे शासनाकडून त्याची चौकशी करुन खुलासा मागविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच

....3....

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

PFK/ KGS/

ता. प्र. क्र. 9295.........

संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात आली की यासंबंधीचे शासनाचे धोरण निश्चित असताना असा प्रस्ताव का आणला ? त्याची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्याची तात्काळ बदली करण्यात आली व त्यांच्याकडून समाधानकारक खुलासा न आल्यास पुढील कारवाई देखील करण्यात येईल. तसेच हे आर्किटेक्ट असून ते आपल्या पे-रोलवर नसल्याने त्याला वेळ पडली तर काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेच माहीमतुऱ्याचा जो प्रश्न आहे त्या प्रकरणाशी म्हाडा किंवा गृहनिर्माण विभागाचा संबंध नसून तो हायराईज कमिटीशी संबंधित आहे. त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, म्हाडाच्या जागेवर नियम 33 (10) खालील पोट नियम 3 (क) मध्ये योजना मंजूर केल्या जातात त्यात फार मोठा भ्रष्टाचार होतो. असा पोट नियम 3 (क) म्हणजे बिल्डरने एखाद्या छोट्या जागेचा विकास करावयाचे म्हटले तर संपूर्ण झोपडपट्टीतील 70 टक्के लोकांची संमती असल्याशिवाय त्याला तसा विकास करता येत नाही. त्यात मात्र ज्यावेळेस शासन सूट देते तेव्हा त्या भागातील नागरिकांवर अन्याय होतो म्हणून ही 3 (क) ची योजना आहे. अशा प्रकरणाची चौकशी करुन या योजनेच्या माध्यमातून जेथे जेथे 70 टक्के रहिवाशांच्या संमतीशिवाय जेथे जेथे विकास कामे चालू असतील ती रद्द करणार काय ?

यानंतर श्री. अजित ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9295...

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मूळ प्रश्न हा कन्नमवार नगर पुरता मर्यादित आहे. सन्माननीय सदस्य अधिकची माहिती देत असतील तर त्याबाबत निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, संबंधित अधिकारी हे म्हाडाच्या पे-रोलवर नसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करता येत नाही असे माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे दिसते....

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले होते की, संबंधित अधिकारी हे म्हाडाच्या पे-रोलवर नाहीत. परंतु ते अधिकारी म्हाडाच्या पे-रोलवर आहेत अशी मी आपल्या अनुमतीने उत्तरात दुरुस्ती करतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी उत्तरात दुरुस्ती केलेली आहे...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री यांना म्हाडा आणि गृहनिर्माण संदर्भात चांगली माहिती आहे. आता त्यांनी सांगितले की, संबंधित आर्किटेक्ट हे म्हाडाच्या पे-रोलवर आहेत. तेव्हा शासन त्या अधिकाऱ्यास निलंबित करेल काय ?

श्री.सचिन अहिर : संबंधित अधिकाऱ्याची बदली केलेली आहे.

**सभापती** :माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितलेले आहे की,संबंधित अधिकाऱ्याची बदली करण्याची कारवाई केली आहे. परंतु हे प्रकरण मोठे आहे, तेव्हा त्यांच्यावर कडक कारवाई करावी असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, संबंधित आर्किटेक्टनी सी.ओ.कडे बदली संबंधीचा प्रस्ताव पाठविला होता. सी.ओ. यांनी त्यांचा प्रस्ताव नाकारला. खरे म्हणजे ही इंटर्नल नोट आहे. दरम्यान ही बातमी वर्तमानपत्रात छापून आली. त्या बातमीच्या आधारे शासनाने त्यांची बदली केली. सन्माननीय सदस्यांची मागणी असेल तर शासन त्यांची विभागीय चौकशी सुरु करेल. परंतु त्यांना एकदम निलंबित करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9295...

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, विकास नियंत्रण नियमावलीतील कलम 33(5) आणि 33 (10) यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. याची माहिती समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांना जास्त आहे. त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली या संबंधातील जास्त माहिती घेतलेली आहे. हे प्रकरण तसे गंभीर आहे. एक जबाबदार अधिकारी अशा प्रकारचा प्रस्ताव देतो हे योग्य नाही. ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांच्यावर कारवाई म्हणून त्यांची बदली करण्यात आली. हे प्रकरण वाटते तेवढे सोपे नाही. ही बाब उघडकीस आली नसती तर संबंधितांना किंवा त्या अधिकाऱ्यास फायदा झाला असता. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यास निलंबित करुन त्याची चौकशी करावी. चौकशीत तो अधिकारी निर्दोष आढळून आला तर त्यास पुन्हा सेवेत घ्यावे...

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. ता. प्र.क्र.9295 श्री.भाई जगताप..

हे प्रकरण साधे आणि सोपे नाही. मुंबई सारख्या ठिकाणी डी.सी. रुल्समधील कलम 33(10) खाली आज बाजार सुरु आहे आणि त्या बाजाराचे हे एक उत्तम उदाहरण आहे.ही बाब अगोदरच लक्षात आली म्हणून ठीक झाले परंतु जर लक्षातच आली नसती तर काय झाले असते ? हे प्रकरण गंभीर असल्यामुळे संबंधित कर्मचा-याच्या विरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : मी सांगितल्या प्रमाणे फार तर फार ...

श्री.भाई जगताप : माननीय मंत्री महोदय फार तर फार असे उत्तर कसे देऊ शकतात.

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांची अपेक्षा कदाचित त्यांच्या दृष्टीकोनातून रास्त असेल परंतु मी मघाशी सांगितल्याप्रमाणे फार तर फार आपण त्या व्यक्तीची विभागीय चौकशी करु, ती चौकशी करणेसुध्दा गंभीर बाब आहे.

श्री.दिवाकर रावते : खात्या अंतर्गत त्यांची चौकशी होईपर्यंत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर :एक महिन्यासाठी त्यांना रजेवर पाठवू आणि त्यांची विभागीय चौकशी करु आणि त्यामध्ये जर ते दोषी आढळून आले तर त्यांच्याविरुध्द पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : हा प्रश्न उपस्थित करण्यामागचा आमचा जो उद्देश आहे तो अजूनही सफल होत नाही. नियमांचे उल्लंघन करुन काही अधिकारी मोठया बिल्डर्ससाठी काम करीत असतात आणि म्हाडातील असे किती तरी अधिकारी सेवा निवृत्त झाल्यानंतर किंवा सेवानिवृत्तीच्या अगोदर मोठया बिल्डर्सकडे काम करुन लाखो रुपये पगार मिळवत आहेत.जेव्हा हे अधिकारी पदावर असतात तेव्हा ते अधिकारी बिल्डर्सना मदत करीत असतात म्हणून सेवा निवृत्ती नंतर त्यांना लाखो रुपयांचे पगार दिले जातात. अशा अधिका-याच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? आज शासन या अधिका-यांना पाठीशी घालत आहे. तेव्हा असे न करता त्याच्याविरुध्द कारवाई केली पाहिजे ही कारवाई केल्यानंतर तो कॅटमध्ये वा मॅटमध्ये जाईल परंतु ज्या मंत्र्यांना काढण्यात आलेले आहेत ते मंत्री कोठे जातील ? तेव्हा प्रशासानावर अंकुश रहावा म्हणून संबंधितावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री सचिन अहिर : मूळ प्रश्नाशी उपप्रश्न संबंधित नाही..

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चिंचवड (जि.पुणे) येथील आरक्षण क्र. २११ वरील व्यापारी संकुलाच्या कामात पालिकेला झालेला तोटा**

**(७) * १०२४३ श्रीमती अलका देसाई, श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचवड (जि.पुणे) येथील आरक्षण क्रमांक २११ वर लाभार्थ्यांसाठी छोटे-छोटे गाळे देवून पुनर्वसन करण्यासाठी व्यापारी संकुलाच्या कामाचा प्रकल्प पालिकाच पूर्ण करु शकत असतानाही या प्रकल्पाचे काम विकासकास देण्यात आले असल्याने या कामात पालिकेला ८५ लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागल्याचे माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (१) व (२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे चिंचवड येथील आ.क्र.२११ यावर व्यापारी केंद्र बांधण्याचे काम सुरु झाले होते. तेथील तळमजला व पहिला मजला आरसीसी व काही प्रमाणात वीट काम केल्यानंतर सदर काम बंद आहे. त्यावर आतापर्यंत सुमारे रक्कम रु.८५ लाख इतका खर्च झालेला आहे. व्यापारी संकुलाचे उर्वरित काम पूर्ण करण्यास महानगरपालिकेस अजून रु.१.२० कोटी ते रु.१.५० कोटी रकमेची आवश्यकता होती. तथापी, असे प्रकल्प महानगरपालिकेच्या निधीतून न करता सार्वजनिक खाजगी सहभाग तत्त्वावर पूर्ण करण्याच्या महानगरपालिकेच्या धोरणात्मक निर्णयास अनुसरुन निविदा प्रक्रिया हाती घेऊन देकार मागविण्यात आले होते. तथापी, खाजगी विकासकाच्या निवडीस महानगरपालिकेंतर्गत सक्षम प्राधिकाऱ्यांची अंतिम मान्यता देणे बाकी आहे. प्राप्त निविदा देकार अंतिमत: मंजूर करण्यापूर्वी आर्थिक विश्लेषण करुन सदर प्रकल्प महानगरपालिकेने स्वनिधीतून हाती घेऊन दूकान, गाळे विक्री केल्यास किंवा सार्वजनिक किंवा खाजगी सहभाग तत्त्वावर पूर्ण केल्यास महानगरपालिकेस किती लाभ होईल याचा तौलनिक अभ्यास करुन महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने निर्णय घेण्याचे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की या संकुलाचे आराखडे केव्हा मंजूर करण्यात आले होते ? त्यावर 85 लाख रुपये खर्च का करण्यात आला होता ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, बीओटी तत्वावर जर हे काम द्यावयाचे होते तर 85 लाख रुपये खर्च का करण्यात आले होते ? यानंतर माझा तिसरा प्रश्न असा आहे की,जे लहान गाळेधारक आहेत त्याना विकासकाने दुकाने द्यावीत यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोणते धोरण स्वीकारलेले आहे ?



VTG/ KGS/ प्रथम श्री.अजित शिगम 13.50

ता.प्र.क्र.10243...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारलेला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भातील आराखडे 2005-2006 साली तयार करण्यात आले होते. हे बांधकाम जर बीओटी तत्वावर जर द्यावयाचे होते तर 85 लाख रुपये का खर्च करण्यात आले होते ही बाब शासनाच्यासुध्दा निदर्शनास आलेली आहे.त्यामुळे महानगरपालिकेच्या निधीतून जर हे गाळे बांधण्यात आले तर अधिक फायद्याचे ठरेल की बीओटी तत्वावर बांधकाम करणे फायद्याचे ठरेल याची तपासणी करण्यास महानगरपालिकेला सांगण्यात आले आहे.

डॉ.नीलम गो-हे : नगरविकास खात्याच्या मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे परंतु आमची त्यांच्याकडून आणखी चांगले उत्तर मिळण्याची अपेक्षा आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या या बांधकामामध्ये वाढीव खर्च झाल्याचे कागदपत्रावरुन दिसून येत आहे. महानगरपालिकेने हे बांधकाम करणे योग्य असतांना खाजगी विकासकाचा फायदा करण्यासाठी महानगरपालिकेने हा व्यवहार केला असावा काय, अशी आम्हाला शंका येते या संदर्भात तौलानिक अभ्यास केल्यानंतरच सरकारने आदेश दिले होते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे... ता.प्र.क्र. 10243....

कोणत्याही परिस्थितीमध्ये हे काम खाजगी विकासकाला न देता स्वत: महानगरपालिकेने या केंद्राचे बांधकाम करावे असे निर्देश आपण देणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, यामध्ये दोन गोष्टी अंतर्भूत आहेत. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे, ती स्वायत्त संस्था असल्यामुळे एका ठराविक मर्यादेपर्यंत शासनाला त्यांच्या कामामध्ये हस्तक्षेप करता येतो. परंतु सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे शासनाला सुध्दा ही बाब थोडीशी संशयास्पद वाटते. सन 2006 मध्ये आपण बांधकाम सुरु केल्यानंतर सन 2009 मध्ये आपला विचार बदलण्याचे कारण काय? पहिल्या आयुक्तांनी एक निर्णय घेतला, त्यांच्या जागी आलेल्या दुसऱ्या आयुक्तांनी आपल्या मनाला वाटेल त्या पध्दतीने निर्णय घ्यावा काय? त्यामुळे शासनाच्या दृष्टीने सुध्दा ही एक चौकशीची बाब आहे आणि म्हणून त्या संदर्भात स्पष्ट शब्दामध्ये सांगितले आहे की, शासनाचे यामध्ये जोपर्यंत समाधान होत नाही तोपर्यंत कोणत्याही खाजगी डेव्हलपरला त्याठिकाणी गाळे बांधण्यासाठी परवानगी देण्यात येऊ नये अशाप्रकारच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन सेवेतील तिकिटांचा काळाबाजार व वाहकांचे तिकिट ट्रे चोरीस जाण्याच्या घडलेल्या घटना**

**(८) * ९६६९ श्री.विनायकराव मेटे , श्री.रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत परिवहन सेवेतील तिकिटांचा काळाबाजार व वाहकांचे तिकिट ट्रे चोरीस जाण्याच्या घटनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे जुलै व ऑगस्ट, २०१० या महिन्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमामध्ये माहे जुलै, २०१० व ऑगस्ट, २०१० मध्ये तिकीट ट्रे चोरीस गेल्याचे तसेच तिकीट काळाबाजाराचे प्रकरण आढळून आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन सेवेमध्ये गेल्या पाच-सहा वर्षापासून तिकिटांचा काळाबाजार सुरु आहे. त्या संदर्भात लेखी उत्तरामध्ये अगदी थातूरमातूर उत्तर देण्यात आले आहे. हा संपूर्ण घोटाळा मार्च ते ऑगस्ट या दरम्यान झालेला आहे. त्यामध्ये वाहकांचे ट्रे चोरीला गेले, वापरण्यात आलेली तिकिटे पुन्हा देण्यात आली. या बाबत या उपक्रमाच्या एका लहान अधिकाऱ्यांनी चौकशी केली. यामध्ये एका वाहकाला निलंबित करण्यात आले. तसेच, एका बाजूला वाहकाला निलंबित केले असतांना दुसऱ्या बाजूला पुन्हा त्यांना रुजू करुन घेण्यात आले. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, ज्या वाहकांना यामध्ये दोषी ठरविण्यात आले आहे, त्यांना निलंबित केव्हा करण्यात आले आणि कामावर पुन्हा केव्हां घेण्यात आले? तसेच, त्या वाहकांबरोबर संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली काय नसेल तर, कां करण्यात आली नाही तसेच, हे टोळी प्रकरण आहे काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ KGS/ KTG/

ता.प्र.क्र. ९६६९...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला आहे की, माहे जुलै आणि ऑगस्ट २०१० या महिन्यात हे प्रकार उघडकीस आले आहेत काय? त्यांनी यामध्ये दोन महिन्यांचा उल्लेख केला असल्यामुळे त्यामध्ये अशाप्रकारच्या तीन घटना समोर आहेत त्या याठिकाणी देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये जे सहा वाहक सापडले त्यापैकी एकाच वाहकाला निलंबित करण्यात आले. बाकीच्या वाहकांना निलंबित करण्यात आले नाही. याचे कारण असे की, एकाकडे १४३ रुपये जास्त सापडले, दोघांकडे ७५.५० पैसे जास्त सापडले, एकाकडे ८७ रुपये जास्त सापडले आणि एकाकडे २९ रुपये जास्त सापडले आणि एका वाहकाकडे जुनी तिकिटे सापडल्यामुळे त्याला निलंबित करण्यात आले. याप्रकरणी चौकशी सुरु आहे. या संदर्भात त्या वाहकांना रुजू करुन घेण्याचे कारण असे की, त्यांच्याकडे थोडेफार वाढीव पैसे मिळाले. याचा अर्थ त्यांनी प्रवाश्यांना द्यावयाचे सुटे पैसे परत दिले नसावेत. याबाबत चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करुन त्यांना पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील राईसमील उद्योग डबघाईला आल्याबाबत

**(९) *  ९५८५        श्री.केशवराव मानकर , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.विनोद तावडे , श्री.जगदीश गुप्ता , श्री.संजय केळकर** : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राईस मिल उद्योजकांकडून लेव्ही स्वरुपात घेत असलेल्या धानाच्या भरडाईचे दर तसेच मार्केटींग फेडरेशनच्या माध्यमातून खरेदी करण्यात आलेल्या धानाचे दर शासनातर्फे अद्यापही निश्चित करण्यात आले नसल्यामुळे राज्यभरातील राईस मील उद्योग डबघाईस आला असून राज्यभरातील १५ लाख ५० हजार क्विंटल धानाची भरडाई थांबली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यापाऱ्यांनी धान खरेदी बंद केल्यामुळे मिळेल त्या भावात शेतकऱ्यांना धानाची विक्री करावी लागत असून शेतकऱ्यांना प्रति क्विंटलमागे २००-३०० रुपयांचा फटका बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंजाब आणि छत्तीसगड राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांना देखील तुकड्यांच्या प्रमाणामध्ये सवलत देऊन राईस मिल उद्योगाचा प्रश्न सोडविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे काय, नसल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे तसेच, धान भरडाईचे दर शासन किती कालावधीत निश्चित करणार आहे ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.अनिल देशमुख यांच्याकरिता** : (१) लेव्ही तांदूळाची खरेदी किंमत केंद्र शासनामार्फत ठरविण्यात येते. हंगाम २०१०-११ साठी लेव्ही तांदूळाची किंमत अद्याप केंद्र शासनाने जाहीर केलेली नाही. तथापि, गिरणीधारक संघटना व स्थानिक प्रतिनिधी यांच्या विनंतीनुसार गतवर्षीच्या लेव्ही दराच्या ९० टक्के दराने लेव्ही स्वीकृतीचे आदेश दिनांक २०.११.२०१० रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

हंगाम २०१०-११ साठी धान खरेदीचे दर निश्चित करण्यात आले असून त्यानुसार खरेदी सुरु आहे.

काही कारणांमुळे २००९-१० या हंगामातील धान भरडाई संथ गतीने सुरु आहे. तथापि, केंद्र शासनाने दिलेल्या ३१ डिसेंबर, २०१० पर्यंतच्या वाढीव मुदतीत धान भरडाई पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ KGS/ KTG/

ता.प्र.क्र. ९५८५...

(२) नाही.

(३) राज्य शासनाच्या विनंतीनुसार खरीप पणन हंगाम, २००९-१० मध्ये शिल्लक सीएमआर (तांदूळ) साठी तुकड्याच्या प्रमाणात कच्च्या तांदूळाकरिता ३ % सवलत देऊन तुकड्याचे प्रमाण २५ % ऐवजी २८ % असे केंद्र शासनाने विहित केले आहे.

केंद्र शासनामार्फत धान भरडाईचे दर निश्चित करण्यात आले आहेत.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, या प्रश्नाला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे, शासनाने उत्तर चांगले दिले आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी केलेल्या कार्यवाहीबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परंतु वहातुकीचे प्रश्न सोडवावयाचे राहिले आहेत. मूळ प्रश्नामध्ये विचारल्याप्रमाणे याठिकाणी राज्य भरातील १५ लाख ५० हजार क्विंटल धानाच्या भरडाईचा हा प्रश्न नाही तर त्या धानाच्या वहातुकीचा देखील यामध्ये प्रश्न आहे. वहातुकीचे दर एक कि.मी. ला ६३ पैसे इतके कमी आहेत.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9585...

श्री. केशवराव मानकर...

केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा हा प्रश्न आहे. विशेष बाब म्हणून या वर्षी मोकळया जागेत ठेवलेल्या धानाच्या वाहतुकीचे दर ठरविले आणि शेतकऱ्यांना मदत केली त्याबद्दल धन्यवाद. पण शेवटची एक विनंती आहे. धानाचा वाहतूक दर केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने ठरवायचा आहे. पण एफसीआय त्याला विरोध करीत आहे. खरे म्हणजे कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग दिल्यानंतर आपण त्यांना पुन्हा पाचवा वेतन आयोग देऊ शकतो काय? सभापती महोदय, 40 किलोच्या बोरीसाठी तीन ते चार रुपये हमाली आणि ती बोरी ट्रकमध्ये चढविण्यासाठी आठ रुपये लागतात. डिझेल आणि पेट्रोलचे भाव वाढलेले आहेत. अशा अवस्थेमध्ये एफसीआय बरोबर बसून भाडे निर्धारण करण्याचा, भाडे वाढवून देण्याचा आणि वाहतुकीचा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्राचा आहे, तो सोडविण्यासाठी विशेष कृती कार्यक्रमाअंतर्गत वाहतुकीचे दर वाढवून देणार काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, वाहतुकीच्या दराच्या संदर्भात केंद्र शासनाबरोबर बैठक झालेली आहे. वाहतुकीचे समाधानकारक दर ठरलेले आहेत. त्या संबंधीची ऑर्डर देखील लवकरात लकवर निघणार आहे.

श्री. केशवराव मानकर : वाढीव दर ठरविण्यात आलेले आहेत काय?

श्री. रणजित कांबळे : होय.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे**

**सभापती :** सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांचा एक औचित्याचा मुद्दा आहे त्यांनी तो मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयातील लोणार नगरपालिकेतील सी.ओ. व करसंग्राहक ज्योतिबा खंडोजी आंबोरे या दोन लोकांनी नगरपालिकेमध्ये खोटी पावती पुस्तके छापली आणि जनतेकडून लाखो रुपयांचा कर जमा केला. हे ज्यावेळी उघडकीस आले त्यावेळी तेथील सी.ओ. श्री. मुलानी यांनी फक्त त्या करसंग्राहकाला सस्पेंड केले. संस्पेंड केल्यानंतर कलेक्टरची परवानगी न घेता, कमिशनरची परवानगी न घेता पुन्हा काही दिवसांनी त्याला कामावर घेतले. संगनमताने हा लाखो रुपयाचा अपहार झाला. तेथील सी.ओ.ने कामचुकारपणा केला. आपल्या पदाचा दुरुपयोग केला म्हणून अशा मुलानीला ताबडतोब सस्पेंड केले पाहिजे अशा प्रकारची निवेदने वारंवार माननीय मंत्रिमहोदयांकडे पाठविण्यात आली. एका नगरसेवकाने त्याचा सारखा पाठपुरावा केला. मी दोन पत्रे माननीय मंत्री महोदयांना लिहिली पण त्याच्यावर कुठलीही कारवाई झालेली नाही.

सभापती महोदय, अधिवेशन सुरु झाल्यापासून ते आजपर्यंत श्री. हेमराज संचेती नावाचा नगरसेवक गेल्या आठ दिवसापासून या ठिकाणी आमरण उपोषणाला बसलेला आहे. माननीय मंत्री महोदयांच्या दालनात त्याला बोलावले होते पण माननीय मंत्री महोदयांच्या पी.ए.ने त्याला सांगितले की, चौकशी करुन काय कारवाई करायची ते आम्ही बघू. श्री. हेमराज संचेती याचे उपोषण अजूनही चालू आहे. मी स्वत: त्याच्या उपोषण मंडपाला भेट दिली होती. त्यांची तब्बेत बिघडत चाललेली आहे म्हणून माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, श्री. मुलांनी यांनी कर्तव्यात कसूर केली म्हणून त्यांना सस्पेंड करुन चौकशी करण्यात यावी आणि जेव्हा सत्य उघडकीस येईल तेव्हा त्यांच्यावर उचित कारवाई करण्यात यावी.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी अत्यंत गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करतो की, आज बुधवार आहे. शुक्रवारच्या आत यासंदर्भातील वस्तुस्थिती तात्काळ तपासली जाईल आणि त्या वस्तुस्थितीनुसार तेथील सी.ओ.वर कारवाई करुन त्यासंदर्भातील माहिती सदनाला दिली

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

श्री. भास्कर जाधव....

जाईल पण तोपर्यंत माननीय विरोधी पक्ष नेत्यांना माझी विनंती आहे की, श्री. संचेती नावाचे जे नगरसेवक उपोषणाला बसलेले आहेत त्यांना उपोषण सोडण्याची विनंती करावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये कमिशनरने चौकशी केलेली आहे. कमिशनरला तो दोषी आढळून आलेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

.

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

त्याचा सर्व रेकॉर्ड शासनाकडे आलेला आहे. शासनाने चौकशी करुन मग कारवाई करावी. मी अत्यंत जबाबदारीने बोलतो. आयुक्तांनी चौकशी केली. आयुक्तांचा चौकशी अहवाल आलेला आहे. शासन स्तरावर आयुक्तांचा अहवाल आल्यानंतरही शासनाकडून कारवाई होत नाही. आयुक्तांनी शासनाकडे अहवाल दिला असेल तर त्यांना ताबडतोब निलंबित केले पाहिजे.

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांनी याबाबतीत गांभीर्याने बघण्याचे ठरविले आहे. त्यांनी तातडीने कारवाई करावी.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ठीक आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेल्या अधिवेशनामध्ये राज्याचे युवा धोरण जाहीर करण्याचे आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी आणि शासनाने दिले होते. शिक्षण, रोजगार, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने युवकांसबंधी राज्य शासनाचे पुढच्या काही वर्षाचे धोरण जाहीर होण्याची आवश्यकता आहे. या अधिवेशनाचा एकच आठवडा शिल्लक राहिलेला आहे. राज्य शासन हे धोरण कधी जाहीर करणार याबाबत सांगावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आजच यासंदर्भातील एक बैठक भूतपूर्व युवक आणि क्रीडा मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांच्याकडे झाली. हे खाते नुकतेच श्री. पदमाकर वळवी यांच्याकडे आलेले असल्यामुळे थोडा कालावधी लागणार आहे. परंतु तो मसुदा अंतिम टप्प्यामध्ये पोहोचलेला आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वाढदिवसानिमित्त शुभेच्छा**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, युवा धोरणाचा विषय सभागृहात आल्यामुळे मी सांगू इच्छितो की, माननीय युवक आणि क्रीडा राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांचा आज वाढदिवस आहे. आपण त्यांना शुभेच्छा दिल्या पाहिजेत. ते माननीय मुख्यमंत्र्यांचे लाडके आहेत. त्यांना अधिक शुभेच्छा.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना मी माझ्यातर्फे आणि सभागृहातर्फे शुभेच्छा देतो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचा मुद्दा**

(चर्चा पुढे चालू)

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एका आंतरराज्य प्रश्नाच्या संदर्भात माझा औचित्याचा मुद्दा आहे. आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी आक्रमक भाषेचा वापर करुन महाराष्ट्राचा उपमर्द केला आहे आणि प्राणहिता नदीवर प्राणहिता चेव्हेल्ला धरणाचे काम कोणत्याही परिस्थितीत पुढच्या वर्षी सुरु होईल अशा प्रकारची घोषणा आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी नुकतीच केलेली आहे. खरे तर या धरणाला जल आयोगाने स्थगिती दिलेली आहे. असे असून देखील आपले अधिवेशन चालू असताना त्यांनी आक्रमक भाषा वापरलेली आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी असे सांगितले होते की, या धरणाबाबत जनतेचे हित लक्षात घेतले जाईल. यामध्ये प्रत्यक्षात गडचिरोली जिल्ह्यातील 5247 एकर जमीन जलमय होणार असल्यामुळे महाराष्ट्र सरकारने या धरणाला आक्षेप घेतलेला आहे. असे असताना आणि नागपूरमध्ये अधिवेशन चालू असताना आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी येऊन अशा पध्दतीची घोषणा करणे म्हणजे एका अर्थाने महाराष्ट्राच्या विकासाला आम्ही कवडीची सुध्दा किंमत देत नाही अशा प्रकारची भूमिका आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेली आहे. सन्माननीय सभापती महोदय, आपण या प्रश्नामध्ये स्वत: लक्ष घालून महाराष्ट्राच्या हिताचे संरक्षण करावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : याबीकडे मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे तसेच सन्माननीय पाटबंधारे विभागाचे मंत्री आणि सन्माननीय उपमुख्यमंत्री यांचेही लक्ष वेधीन.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सचिन अहिर ( उद्योग राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादितचा सन 2008-09 चा एकतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळाचा सन 1994-1995, 1995-1996, 1996-1997 व 1997-1998 चा अनुक्रमे पंधरावा, सोळावा, सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राजेंद्र गावित :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई ( बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन 2005-0006 व 2006-2007 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन 2004-2005 व 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन है. यहां पर माननीय मंत्री महोदय ने 1995 का अहवाल 15 वर्ष के बाद सभागृह के पटल पर रखा है. मैंने पहले भी सदन में कहा था कि 15 साल के बाद सदन के पटल पर अहवाल रखने का कोई औचित्य नहीं है. यह पेपर का वेस्टेज है, इसलिए मैं आपके माध्यम से सरकार से निवेदन करना चाहता हूँ कि सभागृह के पटल पर अहवाल जल्दी रखने के बारे में कोई नीतिगत सुधार किया जाए. सरकार को इस बारे में ध्यान देना चाहिए.

. . . . .यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 1994-95, 1995-96 या वर्षांचे अहवाल आज सादर केले जात असल्यामुळे त्याला काही अर्थ उरत नाही आणि त्यांचे म्हणणे बरोबर आहे. हे अहवाल सभागृहासमोर तातडीने कसे सादर केले जातील यादृष्टीने मंत्री महोदयांनी काळजी घ्यावी.

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, यासंदर्भात मी संबंधित विभागाच्या सचिवांना पत्र दिलेले आहे.

**सभापती** : आपण त्यांना बोलवून हे अहवाल लवकरात लवकर सभागृहाच्या पटलावर कसे ठेवता येतील यादृष्टीने सूचना द्याव्या.

श्री.राजेंद्र गावित : होय.

--------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.विनोद तावडे ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करतो.

**सभापती** : लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.रमेंश शेंडगे ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा चौथा अहवाल (2010-2011) सभागृहास सादर करीत आहे.

महोदय, हा अहवाल सादर करीत असताना सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या तत्कालीन समितीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित परिमंडळ यवतमाळ व औरंगाबाद येथील कार्यालयात दिलेल्या भेटीच्या वेळी व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या अनुषंगाने समितीला आढळून आलेल्या त्रुटींच्या संदर्भात समितीने या अहवालात शिफारशी समाविष्ट केलेल्या आहेत.

**सभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

------

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे

श्री.संजय दत्त ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे साठावा व एकशे एकसष्टावा अहवाल सभागृहास करतो.

**सभापती** : विधानपरिषद आश्वासन समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

------

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती अलका देसाई ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर करते.

**सभापती** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

-----

6.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: उपविधान समितीचा अहवाल सादर करणे

श्री.उल्हास पवार ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उपविधान समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करतो.

महोदय, हा अहवाल सादर करीत असताना सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, या अहवालात समितीने 23 प्रारुप अधिसूचना व 68 अंतिम अधिसूचना विचारात घेतल्या व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, गृह विभाग (परिवहन), गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क) व नगरविकास विभागाच्या प्रारुप व अंतिम अधिसूचनांच्या संदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षी घेतल्या. अधिसूचना विचारात घेताना वेळोवेळी समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, मराठी अधिसूचना निर्गमित करताना अधिका-यांच्या नावांचा नामोल्लेख मराठी अधिसूचनेमध्ये इंग्रजीमध्ये असतो. त्यामुळे मराठी अधिसूचना निर्गमित करताना अधिका-यांच्या नावांचा नामोल्लेख मराठी अधिसूचनेमध्ये मराठीतून करण्यात यावा अशी शिफारस समितीने शासनास केली आहे.

**सभापती** : उपविधान समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

-----

यानंतर श्री.शिगम......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

श्री. रामनाथ मोते...

**पृ.शी./मु.शी.**: इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री. रामनाथ मोते ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागासवर्ग कल्याण समितीचा (1) सिंधुदुर्ग, रायगड व रत्नागिरी जिल्हा परिषदांबाबतचा पहिला अहवाल (2) औरंगाबाद, हिंगोली व परभणी जिल्हा परिषदांबाबतचा दुसरा अहवाल (3) अमरावती, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा परिषदांबाबतचा तिसरा अहवाल आणि (4) नाशिक जिल्हा परिषदेबाबतचा चौथा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**सभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा पहिला, दुसरा, तिसरा आणि चौथा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "ठाणे महानगरपालिकेने मे. रुस्तमजी(अरबनीसा) ह्या विकासकाला सर्व्हीस रस्त्यावरुन जाण्याकरिता मार्ग असताना मुख्य मुंबई-नाशिक हायवेवरुन ॲप्रोच देण्यात आल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर 2010रोजी वा त्यासुमारास उघडकीस आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी "पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात मनुष्यनिर्मित सुमारे सहा हजार हेक्टर जमिनीवर पर्यटन विकास योजनेअंतर्गत होऊ घातलेली हिल स्टेशनची निर्मिती, या योजनेकरिता जमीन खरेदी कोणी केली याची माहिती सुध्दा जमीन मालकांना नसणे, या प्रकल्पामुळे बाधित होणा-या भूमिपुत्रांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनावणे व कपिल पाटील, यांनी "महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने आपल्या न्याय्य मागण्यांच्या संदर्भात दिनांक 1.12.2010 रोजी माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व शिक्षण मंत्री यांना निवेदन सादर केलेले असणे, आपल्या न्याय्य मागण्या पूर्ण न झाल्यास 9 डिसेंबर 2010 रोजी विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावर मोर्चा काढण्याची दिलेली नोटीस " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व जयंत प्र.पाटील यांनी "शालेय पोषण आहार योजनेची स्थानिक व विकेंद्रीत स्वरुपात होणारी अंमलबजावणी रद्द करुन केन्द्रीय स्वरुपात अंमलबजावणी करुन केंद्रीय पध्दतीने पुरवठादारांकडून धान्य, कडधान्य, मसाला व तेल पुरवण्याच्या नव्या पध्दतीत प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..



MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व जयंत प्र. पाटील यांनी "मुंबईतील गोरेगाव-दिंडोशी येथील अेकमे बिल्डर गुरुकुल शाळेजवळील झोपडपट्टी एस.आर.ए. योजनेअंतर्गत विकसित करीत असून 1987 पासून सुरु असलेल्या गुरुकुल शाळेची जमीनही हडपण्याचा बिल्डरचा प्रयत्न असून शाळेचेही पुनर्वसन टाळण्याचा प्राधिकरण प्रयत्न करीत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे व चंद्रकांत पाटील यांनी "शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याची सभागृहात घोषणा होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, रामनाथ मोते, भगवान साळुंखे व ना. गो. गाणार यांनी "राज्यातील अनेक वस्तीशाळांचे नियमित शाळेत रुपांतर करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊनही बीड जिल्ह्यातील 152 वस्तीशाळांवरील शिक्षकांना सेवेत सामावून न घेतल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते व विनोद तावडे यांनी "ठाणे जिल्ह्यात वजनमापे दुरुस्त परवानाधारकांची संख्या सुमारे 150 ते 200 असूनही इलेक्ट्रीक वजनकाटे दुरुस्त करण्यापूर्वी विभागाच्या निरीक्षकाची परवानगी घेणे बंधनकारक असल्याने डिसेंबर 2009 पूर्वी उत्पादित झालेल्या इलेक्ट्रॉनिक्स वजनकाट्यांना शिलबंद करण्याची व्यवस्था नसल्याने वजनकाटे व वायर गंजून बंद पडण्याचा धोका निर्माण झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी "नागपूर येथील सनदी अधिका-यांनी दि. 20.9.2010 रोजी गठित केलेल्या ग्रीनसिटी या हौसिंग सोसायटीला शासनाने जमीन वाटप

..4..





सभापती...

केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्हा निवड समितीने सन 2009मध्ये लिपिक-टंकलेखक पदासाठी घेतलेल्या परीक्षेत अनुक्रमे 164,164, 172 व 174 असे गुण मिळविलेल्या सर्वश्री. विशाल मदनकर, शिवदास शेळके, सिध्देश्वर बोरे व कु. निर्मला घोडके यांनी मागास प्रवर्गात अर्ज केले असतानाही त्यांना खुल्या प्रवर्गात दाखविल्यामुळे मागासप्रवर्गातील सवलतीचा लाभ त्यांना न मिळाल्यामुळे निवड होण्यापासून वंचित राहावे लागल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....नंतर श्री. भोगले....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "उस्मानाबाद जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या 18 संस्थांच्या 19 प्राथमिक, 11 माध्यमिक व 7 उच्च माध्यमिक आश्रमशाळांची गुणवत्ता दयनीय असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "मौजे जवळा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील पाटबंधारे कार्यालय दुसरबीड अंतर्गत येणाऱ्या मांडवा तलावाच्या जऊळका गावाशेजारी फुटलेल्या पुलाचे काम करण्याबाबत नागरिकांनी वारंवार निवेदने देऊनही त्याकडे स्थानिक अधिकाऱ्यांचे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मुंबई पाठोपाठ नवी मुंबईतील क्वीन नेकलेस समजल्या जाणा-या पाम बीच मार्गावर राज्यासह केंद्र सरकारच्या सेवेत असणाऱ्या सुमारे 80 आजी माजी सनदी अधिकाऱ्यांनी नियम डावलून तीन ते चार भूखंड विना निविदा बाजारभावापेक्षा स्वस्तात लाटून वनश्री सोसायटी करण्यात आल्याची बाब नुकतीच निदर्शस आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "महाराष्ट्रातील ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे ग्रामीण भागात शासकीय व खाजगी तंत्रशिक्षण महाविद्यालये सुरु करण्याची परवानगी देण्यात येऊन अतिदुर्गम आदिवासी ग्रामीण भागात 8-8 तास विद्युत भारनियमन, इंटरनेटचा अभाव आदी कारणामुळे अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

--------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक

**मु.शी.:L.A.BILL No.LXXX OF 2010**

**(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2011)**

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 80 दिनांक 31 मार्च 2011 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी मी तहकूब करीत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 50 मिनिटांनी पुन: सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.24 ते 2.50 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली.)

----------

नंतर 2टी.1...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ. शी.** : दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथे झालेले अवैध उत्खनन

**मु. शी.** : दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथे झालेले अवैध उत्खनन यासंबंधी श्री. विजय सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चोरट्या खनिज उत्खननाबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कडक निर्बंध घातलेले असतानाही दोडामार्ग तालुक्यातील कुडासा देवमळा येथे मंगळवार, दिनांक 16 नोव्हेंबर,2010 रोजी रात्रौ अवैधरित्या फार मोठे खनिज उत्खनन करण्याचा घडलेला प्रकार, उत्खनन केल्यानंतर अनेक डंपर्स खनिजासह नजीकच्या गोवा राज्यात वाहतूक करुन शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविण्यात येणे, या अवैध वाहतुकीसाठी दीडशे मीटर लांबीचा बेकायदेशीर रस्ता काढण्यात येणे, चोरट्या खनिज वाहतुकीच्या वाढत्या प्रकारांमुळे व त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे हेतुपुर:स्सर दुर्लक्ष होत असल्यामुळे ग्रामस्थांच्या मनातील वाढती असंतोषाची भावना, त्यासंदर्भात शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व अन्य उपाययोजना तसेच शासनाची याबाबतची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (खणिकर्म राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, 35 खनिज पट्टयातील खनीज काढले जाते तसेच 20 फूट खोल खड्डा खोदून त्यातील खनिज 35 डंपरांनी घेऊन गेल्याचे शासनानेच कबूल केले आहे. तसेच 53.75 ब्रास लोह खनीज घेऊन गेल्याचेही कबूल केले आहे. असे असेल तर मग याप्रकरणी शासन तपासणी करुन काय करणार आहे ?

श्री. सचिन अहिर : महोदय, निवेदनातच म्हटलेले आहे की, 53.75 ब्रास लोह खनिज मिश्रीत माती घेऊन गेल्याची माहिती मिळाली आहे. त्यासंबंधीची तपासणी झाल्यानंतर उत्खनन झाल्याचे लक्षात आले म्हणूनच त्यातील सॅम्पल्स लॅबमध्ये पाठविण्यात आले असून तेथे एकदा यामध्ये लोहचे प्रमाण असल्याचे निश्चित झाल्यानंतर गुन्हा दाखल करुन कारवाई केली जाईल.

श्री. परशुराम उपरकर : महोदय, शासनाने उत्तरात कबूल केले आहे तसेच सकाळी देखील सभागृहात सांगण्यात आले की, 7 कोटी रुपये दंड केलेला आहे. 7 कोटी रुपयाचा दंड आकारण्याइतकी माती राजरोसपणे नेत असताना तेथील अधिकारी झोपले होते काय, अशा अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली ? त्याचबरोबर 9 प्रकल्पाबाबत पुनर्विचार करण्याबाबत केंद्रीय मंत्रालयाकडून पत्र आलेले आहे हेही खरे आहे काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, शासनाच्या अधिकाऱ्यांनी प्रो-ॲक्टीव्हली कारवाई केल्यामुळे 10 प्रकरणांमध्ये 7 कोटी रुपये दंडाची वसुली करण्यात आली. या प्रकरणात सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे या भागातील शेतकरी रायबा गणेश देसाई यांनी त्यांच्याच शेतात उत्खनन केल्याची खबर मिळाली. त्याबाबतची तपासणी करुन ही कारवाई केली व त्यानुसार तेथील मातीचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. एकदा प्रयोगशाळेत या मातीत लोहाचे प्रमाण असल्याचे निश्चित झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. तत्पूर्वी केवळ मातीच काढली म्हणून कारवाई करण्यात अडचणी येतील.

डॉ. दीपक सावंत : महोदय, उत्खनन केले जाते तेव्हा त्यात त्या भागातील पोलीस अधिकारी, वाहतूक अधिकारी तसेच प्रशासनाचे अधिकारी हे सर्व सामील असतात. यासाठी शासनाने दक्षता पथक नेमलेले असून त्यातील पदेही रिक्त आहेत.......

यानंतर श्री. अजित .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

ही रिक्त पदे आपण भरणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा की, एखादा ओव्हर लोडेड ट्रक पकडल्यानंतर तो ट्रक जप्त करण्यात येतो. वाहनचालकाचा परवाना जप्त केला जातो. या प्रकरणी किती ट्रक जप्त करण्यात आले तसेच किती वाहनचालकांचे परवाने जप्त करण्यात आले ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या संदर्भात एक समिती गठीत करण्यात आली असून त्या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून त्या समितीवर पोलीस अधीक्षक, वन विभागाचे अधिकारी, मायनिंग विभागाचे अधिकारी आहेत. या समितीवरील कोणतेही पद रिक्त नाही. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, ट्रक वा वाहनचालकाचा परवाना जप्त करण्याची कारवाई आर.टी.ओ.विभागाकडून केली जाते. तेव्हा या संदर्भातील माहिती आर.टी.ओ.विभागाकडून घेण्यात येईल.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय,दोडामार्ग येथील तहसीलदार श्री.कांबळी यांनी या प्रकरणात एक जेसीबी जप्त केला होता. सदरहू जेसीबी दोडामार्ग पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्यात आला होता. असे असताना सदरहू जेसीबी सोडून का देण्यात आला ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ती नंतर देण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश हे मुंबई दौऱ्यावर आले असताना त्यांनी एक पत्रकार परिषद घेऊन सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यावरणाची हानी होऊ नये म्हणून तेथे होऊ घातलेल्या 39 प्रकल्पांबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी फेरविचार करावा अशी सूचना केली होती, हे खरे आहे काय,असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती पावले उचलली आहेत ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, केंद्र सरकारने वेस्टर्न घाट संदर्भात माधव गोडबोले समिती नेमली आहे. त्या समितीचा सर्व्हे सुरु आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, सिंधुदुर्ग जिल्हा "पर्यटन जिल्हा" म्हणून घोषित झालेला आहे. तेव्हा याठिकाणी प्रकल्पांना परवानगी द्यायची किंवा नाही याबाबत माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी सूतोवाच करण्याचा प्रयत्न केला होता. आतापर्यंत नवीन प्रकल्पांना परवानगी दिलेली नाही. माननीय मुख्यमंत्री यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर...

कार्यालयाकडून त्यांच्याशी पत्र व्यवहार झाला की नाही ही बाब तपासून घेऊन त्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल.

श्री सय्यद जमा. : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने इल्लीगल माइनिंग के बारे में जवाब दिया. मैं माननीय मंत्री महोदय से एक स्पेसिफिक प्रश्न पूछना चाहूंगा. मेरा कहना है कि महाराष्ट्र के अंदर बहुत सारी मिनरल्स हैं. आयरन ओर है, बॉक्साइट है तथा मॅगनीज इत्यादि मिनरल्स हमारे यहां पर हैं. ये मिनरल्स हमारे विदर्भ के गडचिरोली जिले मे हैं तथा कोंकण के सिंधुदुर्ग जिले में भी हैं. ये मिनरल्स बहुत ही प्रॅसिअस हैं. इसके बारे में महाराष्ट्र सरकार की स्टेट माइनिंग कॉरपोरेशन है. मेरा कहना है कि इल्लीगल माइनिंग को रोकने के लिए आपने जो नीति बनायी है वह नीति सन् 2001 की है. इसलिए मैं पूछना चाहूंगा कि क्या आप उस नीति को अपडेट करेंगे ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि हमारी इंडियन ब्युरो ऑफ माइन्स, जिऑलाजिकल सर्वे ऑफ इंडिया तथा महाराष्ट्र स्टेट माइनिंग कॉरपोरेशन की ओर से आप निजी कंपनियों को माइनिंग की परमीशन देते हैं. इस बारे में भारत सरकार का एमएमआरडीए एक्ट भी है और उसी नीति के अनुसार आप निजी कंपनियों को माइनिंग की परमीशन देते हैं. मेरा कहना है कि क्या सरकार माइनिंग का काम अपने ही विभाग को करने के लिए देगी, जिससे कि सरकार का रिवेन्यु बढ़ सके ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्ना बाबत सांगू इच्छितो की, आपण वेळोवेळी जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियाकडून सर्व्हे करुन घेतो. मायनिंग डेव्हलपमेंट फंड बाबत काही बंधने आहेत. ज्याठिकाणी उत्खनन होत असेल त्याच्या 25 कि.मी.च्या परिघामध्ये निधी देणे गरजेचे आहे. या गोष्टीचे पालन करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात येतील. मी याठिकाणी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मायनिंगबाबत वारंवार प्रश्न निर्माण होत आहेत. विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात हा प्रश्न जास्त आहे. म्हणून या बाबत एक केस स्टडी म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जी.पी.एस. सिस्टीम राबविण्यात येईल किंवा कसे हे सचिवांसोबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. अवैध मायनिंगचे प्रकार खूप वाढत आहेत. यामध्ये विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी, आर.टी.ओ.चे अधिकारी यांचे रॅकेट असते. तेव्हा या प्रश्नाबाबत सचिव स्तरावर चर्चा करुन तसेच गृह विभागाशी सल्ला मसलत करुन चौकशी करण्याचे आदेश देण्यात येतील.

यानंतर श्री.गायकवाड..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KTG/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 15.00

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, मायनिंगसाठी 45 जणांना परवाना देण्यात आला आहे. परंतु या सगळयाच ठिकाणी मायनिंग सुरु नाही. काही वेळा ज्या भागासाठी परवाना देण्यात आला आहे त्याच्या आजुबाजूला अनधिकृतपणे मायनिंग केले जाते तेव्हा 45 परवान्या पैकी किती ठिकाणी मायनिग सुरु आहेत ? त्याचबरोबर ज्यांना परवाने देण्यात आले आहेत त्यांनी परवान्याचे नूतनीकरण केलेले आहे की नाही ?

श्री.सचिन अहिर : जास्तीत जास्त मायनिग सुरु आहेत. मायनिंगसाठी परवाना दिल्यानंतर लीजसाठी पिरिअड ठरवून दिलेला असतो .त्या कालावधीत सबंधित जमीन मालकाकडून जमीन खरेदी करुन जिल्हाधिका-यांकडून परवानगी घेऊन मायनिंग करता येते. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मोठया प्रमाणावर मायनिंग सुरु आहे . साधारणपणे तीन तीन वर्षासाठी लीज असते परंतु काही वेळा ती मुदत वाढवून दिली जाते. राज्य सरकारने शिफारस केल्यानंतर केन्द्र सरकार लीजची मुदत वाढवून देण्यास मान्यता देत असते अशा प्रकारे वेळोवेळी लीजची मुदत वाढवून दिली जाते.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयात चंदन चोरीचे वाढत चाललेले प्रमाण

मु.शी. : सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयात चंदन चोरीचे वाढत चाललेले प्रमाण या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर, सय्यद पाशा पटेल, चंद्रकांत पाटील, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.धनंजय मुंडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय,मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"कोल्हापूर मध्ये दिनांक २९ सप्टेंबर, २०१० रोजी वा त्या सुमारास पोलिसांनी किणी टोल नाक्यावर कारवाई करुन चारशे लिटर चंदनाच्या तेलाचा साठा पकडणे, हे तेल अमेरिकेत पाठवत असल्याची गंभीर बाब उघड होणे, अशाच प्रकारे उरण, रायगड येथी जेएनपीटी बंदरात सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी २० टन रक्तचंदनाचा साठा जप्त करणे, याची किंमत पाच कोटी रुपया पेक्षाही जास्त असणे, सदर चंदनाची दुबई व कोरीया येथे तस्करी होत असल्याचेही निदर्शनास येणे, अद्यापही यातील चोरांचा तपास न लागणे, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चंदनाच्या तेलाची किंमत एक कोटी रुपयांपेक्षाही जास्त असणे, तेल काढण्यासाठी वापरण्यात आलेले लाकूड सांगली, कोल्हापूर, सातारा भागातील खाजगी तसेच वन विभागातील चंदनाच्या झाडांची चोरी करुन काढण्यात येणे, अनेक टोळ्या चंदन तस्करी मध्ये सामील असणे, चंदन चोरीचे प्रमाण दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढणे, सांगली व कोल्हापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालय तसेच अन्य काही सरकारी कार्यालयांच्या आवारातील चंदनाच्या झाडांची झालेली चोरी, चंदनचोर अद्यापही पोलिसांच्या हाती न सापडणे, शासनाने या चंदनचोरीची गांभीर्याने दखल घेऊन दोषींना त्वरीत अटक करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.



VTG/ D/ KTG/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 15.00

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

४...

- निवेदना नंतर -

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय,तस्करी करण्यासाठी 400 लिटर चंदनाचे तेल घेऊन जात असतांना कोल्हापूर जिल्हयातील किणी टोल नाक्याजवळ पकडण्यात आले होते.या तेलाची किंमत जवळजवळ एक कोटी रुपये आहे. अशा प्रकारे किणी टोल नाक्याजवळ घडलेली ही एकच घटना नसून जिल्हाधिकारी कार्यालया जवळील चंदनाचे झाड तोडत असतांना कोणाला तरी पकडण्यात आले होते त्याचबरोबर ताराबाई पार्क, टाऊन हॉल, कोल्हापूर या ठिकाणी असे प्रकार झालेले आहे तसेच सांगली जिल्हयात एक वर्षात अशा प्रकारचे 21 गुन्हे दाखल झालेले आहेत. केवळ चंदनाच्या वृक्षाची तोड केली म्हणून कारवाई न करता त्यापेक्षा वेगळया प्रकारचा कायदा करुन कारवाई करण्यात येणार आहे काय ? आज राज्यात मोठया प्रमाणावर चंदनाच्या झाडाची तोड होत आहे व त्यातून तेलाची तस्करी होत आहे व या प्रकरणात त्याच त्या गुन्हेगारांना पकडले जात आहे तेव्हा या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी वेगळया प्रकारच्या उपाययोजना करण्यात येणार आहेत काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या घटना घडलेल्या आहेत आणि .त्यामध्ये विविध आरोपींना अटक करण्यात आली आहे त्यांच्याविरुध्द आय.एफ.एस.च्या कोड प्रमाणे कारवाई देखील करण्यात आली आहे कोल्हापूरच्या किणी टोल नाक्या जवळील प्रकरणात तीन आरोपी स्कॉर्पिओमध्ये आढळून आले होते त्याचबरोबर ताराबाई पार्कमध्ये दुसरी घटना घडली असून त्यामध्ये अज्ञात इसम असल्याचे आढळून आलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात घडलेली घटना असो अथवा सांगली जिल्हयात घडलेली घटना असो त्या सर्व प्रकरणात गुन्हे दाखल करुन आरोपीना अटक केलेली आहे व त्याच्याविरुध्द कायदेशीर कारवाई केलेली आहे. या गुन्हेगारांना जामीन मिळू नये यासाठी कायद्यात तरतूद करण्यात येणार आहे काय ? असा सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला होता त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, यासाठी वन कायद्यातील कलम 61 (अ) मध्ये जप्त केलेली सर्व मालमत्ता सरकार जमा करण्याची तरतूद आहे त्या तरतुदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न पुढच्या काळात करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : कोल्हापूरच्या किणी टोल नाक्यावर चंदनाची तस्करी करणा-या ज्या आरोपीना पकडण्यात आले होते त्यांनी असे सांगितले की,मुंबई मधील जैन नावाच्या एका व्यापा-याला हे चंदनाचे तेल विकणार आहोत.पोलिसांनी या आरोपीकडे जी चौकशी केली होती आणि त्या आरोपीनी जो जाब जबाब दिला होता त्यात देखील त्यांनी हेच सांगितले होते. तेव्हा संबंधिताविरुध्द काही कारवाई करण्यात आली आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील :या बाबतीत अजूनही चौकशी सुरु आहे आणि या प्रकरणी काही धागेदोरे आढळून आल्यास आवश्यक असेल तर निश्चितपणे संबंधिताविरुध्द कारवाई केली जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईत बालकांना विद्रुप बनवून भीक मागण्यासाठी पाठविणा-या टोळयांचा वाढलेला सुळसुळाट

**मु. शी.** : मुंबईत बालकांना विद्रुप बनवून भीक मागण्यासाठी पाठविणा-या टोळयांचा वाढलेला सुळसुळाट यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" बालकांना विद्रुप बनवून भीक मागण्यासाठी पाठविणा-या टोळयांचा मुंबईत झालेला सुळसुळाट, मुंबईच्या विविध भागात, रस्त्यावर, ट्राफिक सिग्नल्सवर दर्गा,मंदिर,मस्जिद, चर्च इत्यादी ठिकाणी कित्येक बालके भीक मागत असल्याच्या अनेक घटना हल्ली निदर्शनास येणे, मुंबईत भिक्षा मागणारी सुमारे 5 ते 6 हजार मुले असल्यामुळे एवढया बाल भिका-यांना कमी क्षमतेच्या बाल सुधार गृहात कसे काय ठेवता येईल याबाबत जनतेत होत असलेली उपहासात्मक चर्चा, शासनाने या स्तुत्य उपक्रमाची तात्काळ सुरुवात करुन त्याबाबतची माहिती प्रसिध्दी माध्यमातून प्रकाशित करण्याबाबत जनतेतून होत असालेली मागणी याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

श्रीमती फौजिया खान ( महिला व बाल विकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



( निवेदना नंतर )

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सामाजिक दृष्टया अत्यंत महत्वाचा हा प्रश्न असून दिवसेंदिवस भीक मागणा-या मुलांची स्थिती भयानक होत चालली आहे. या बाबतीत माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे भीक मागत असतांना लहान मुले आढळून आल्यानंतर त्यांना बाल सुधारगृहात ठेवून त्यांना शिक्षण देण्यासाठी शासन काही ठोस पावले उचलणार आहे काय आणि ही पावले कोणती आहेत ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, पोलिसांमार्फत अशा मुलांना ताब्यात घेऊन बाल समितीच्या माध्यमातून आवश्यकता असेल तर बालगृहात दाखल करण्यात येते. त्यांना शिक्षण घेण्याकरिता जवळ शाळा असेल तर त्याठिकाणी पाठविण्यात येते. किंवा बालगृहामध्ये शिक्षणाची सोय असेल तर त्याठिकाणी त्यांना शिक्षण देण्यात येते. त्यामध्ये त्यांच्यासाठी व्होकेशनल ट्रेनिंगची तरतूद सुध्दा आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ज्या उद्देशाने ही लक्षवेधी सूचना विचारली आहे तो उद्देश बाजूला ठेवण्यात आला आहे. याठिकाणी फक्त ठोकळेबाज उत्तर देण्यात आले आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये असे म्हटले आहे की, "बालकांना विद्रुप बनवून भीक मागण्यासाठी पाठविणाऱ्या टोळयांचा मुंबईत झालेला सुळसुळाट, मुंबईच्या विविध भागात, रस्त्यावर, ट्रॅफिक सिग्नलवर, दर्गा, मंदिर, मस्जिद, चर्च इत्यादी ठिकाणी कित्येक बालके भीक मागत असल्याच्या अनेक घटना". या विषयाबाबत निवेदनामध्ये कुठेच उल्लेख करण्यात आला नाही. म्हणून माझा पहिला प्रश्न असा की, या निवेदनामध्ये अशाप्रकारे मुलांना विद्रुप बनवून त्यांना भीक मागावयास लावले जात नाही, हात-पाय तुटलेली आंधळी मुले भीक मागत नाहीत असे म्हटले आहे काय? मूळ प्रश्न असा आहे की, मुलांना विद्रुप करुन त्यांना भीक मागावयास लावणाऱ्या टोळयांचा आहे. या प्रश्नाचा मूळ गाभा आपण विसरला आहात. आज मुंबई शहरात ट्रेनमध्ये, बसमध्ये, रस्त्यावर एकूण किती बालके भीक मागतांना आढळली आहेत याचा डाटा आपणाकडे आहे काय? सन 2010 मध्ये एकूण 50 बालके मुक्त केल्याचे आपण म्हटले आहे. संपूर्ण मुंबई शहरामध्ये फक्त 50 बालकेच आढळली काय, त्याकरिता आपणाकडे कार्यक्षम यंत्रणा आहे काय, त्यासाठी आपण कोणत्या ठोस उपाय योजना करणार आहात?

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये दोन विभागांचा संबंध येतो. यामध्ये गृह विभागाचा संबंध आहे, त्याचप्रमाणे महिला व बालविकास विभागाचा सुध्दा संबंध आहे. यामध्ये मुलांना पकडून ताब्यात घेण्याची बाब गृह विभागाशी संबंधित आहे. त्या मुलांना पोलिसांमार्फत पकडून आमच्या विभागाकडे पाठविले जाते, त्यावेळी महिला व बाल विकास विभागाचा संबंध येतो. त्यावेळी सीडब्लूसी समितीमार्फत या मुलांना बालगृहामध्ये ठेवण्याचे काम केले जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. यामध्ये जर आपल्या विभागाचे मर्यादित स्वरुपाचे काम असेल तर आपण या प्रश्नाचे उत्तर कशासाठी देत आहात? आपण गृह विभागाच्या संबंधित मंत्री महोदयांना याठिकाणी बोलवावे.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण करण्याची मला संधी द्यावी. या लक्षवेधी सूचनेमध्ये बालगृहामध्ये मुलांना ठेवण्यासाठी जागा नाही असा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना आमच्या विभागाकडे पाठविण्यात आली आहे. त्यामुळे मी याबाबत सांगू इच्छिते की, आमच्याकडे दोन शासकीय संस्था कार्यान्वित असून त्यांची क्षमता 1 हजार 400 इतकी आहे आणि आमच्याकडे असलेल्या मुलांची संख्या 387 इतकी आहे. त्यामुळे आमच्याकडे असलेल्या रिक्त पदांची संख्या 1013 आहे. यामुळे ही लक्षवेधी सूचना आमच्याकडे आली आहे. माननीय सदस्यांनी याठिकाणी ठोस कारवाई काय करणार? असा प्रश्न विचारला आहे. त्यासाठी पोलिसांचे विशेष बाल पोलीस पथक असून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामध्ये त्यांना केअर अँड प्रोटेक्शन ॲक्टबाबत माहिती देणार आहोत. मुंबई शहरातील ही एक मोठी सामाजिक समस्या असल्यामुळे हे अधिवेशन संपल्यानंतर याबाबत गृह विभागाबरोबर चर्चा करणार आहोत. या संदर्भात पोलिसांचा अहवाल सुध्दा माझ्याकडे आहे. त्यामुळे आपण याठिकाणी मुलांना विकलांग आणि विद्रुप करुन भीक मागावयास लावणाऱ्या टोळयांबाबतचा अहवाल तुमच्याकडे आहे काय ? असा प्रश्न विचारला आहे. या संदर्भात पोलिसांच्या अहवालामध्ये सन 2009-10 मध्ये गुन्हे दाखल केले किंवा आरोपींना अटक केल्याची माहिती " निरंक" आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्याबरोबर बैठक आयोजित करु, आणि भिक्षेकरी प्रतिबंधक कायद्याचे प्रशिक्षण देण्याचे काम करु.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

समाजाचे जास्तीत जास्त प्रबोधन करण्याची गरज आहे. त्यादृष्टिकोनातून शासन प्रयत्न करील.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी लक्षवेधीच्या निमित्ताने गंभीर विषय उपस्थित झालेला आहे. रस्त्यावर, बसस्थानकावर आढळून येणाऱ्या मुलांच्या बाबतीत या ठिकाणी चर्चा करण्यात आलेली आहे. पण रेल्वेस्टेशनवर या देशातून आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वर्षभरामध्ये साधारणपणे पाच ते साडे पाच हजार लहान मुले पळून येतात. ही सगळी मुले उद्याची गुन्हेगार आहेत त्यामुळे त्या मुलांच्या संदर्भात काही ठोस उपाययोजना, काऊन्सिलींग करण्याची गरज आहे. यासंदर्भात काही सामाजिक संस्था काम करतात. त्यातील एका सामाजिक संस्थेमध्ये मी स्वत: काम करतो. त्या संस्था या मुलांचे काऊंन्सिलींग करतात, त्यांना ट्रेनिंग देतात, त्यांचे एक-एक महिन्याचे शिबिर घेतात त्यानंतर ही पळून आलेली मुले बोलायला लागतात व कुठल्या गावातून आलो ते सांगतात. त्याप्रमाणे त्यांच्या पालकांशी संपर्क साधून त्या मुलांचे आणि त्यांच्या पालकांचे मिलन घडवून आणण्यात येते आणि त्या मुलांना त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात येते. बालसुधारगृहामध्ये शासन हे काम करते ते योग्यच आहे. बालसुधारगृहा मार्फत हे काम करणे आवश्यक आहे. बालसुधारगृहे जास्त आहेत. पण या मुलांना काऊंन्सिलींग करण्याची गरज असते. ही सगळी मुले सहजगत्या पोलिसांच्या ताब्यात येत नाहीत. हे उद्याचे गुन्हेगार आहेत. या मुलांचे शोषण होते आणि यांना निरनिराळया प्रकारची व्यसनाधिनता लागते. या मुलांची संख्या लहान नाही. म्हणून शासनाच्या माध्यमातून, एन.जी.ओ.च्या माध्यमातून किंवा स्वतंत्रपणे काऊंन्सिलींग करण्याची योजना आखण्यात येईल काय? जेणे करुन या मुलांचे पुनर्वसन योग्य पध्दतीने होईल.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी याठिकाणी धोरणात्मक प्रश्न उपस्थित केलेला आहे. बालसुधारगृह असो,बालगृह असो निरीक्षकगृह असो किंवा महिलांच्या संस्थांच्या बाबतीत असो या बालसुधारगृहांमधून आलेली मुले ही वेगळया मन:स्थितीमधून आलेली असतात. त्याचप्रमाणे महिलाही आलेल्या असतात. त्यामुळे या मुलांच्या संदर्भात एन.जी.ओ.ची मदत घेणार काय अशा प्रकारचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. त्याप्रमाणे एन.जी.ओ.ची मदत घेण्याचा 100 टक्के प्रयत्न करण्यात येईल. काऊंन्सिलींग सेंटर्स या ठिकाणी निर्माण झाली पाहिजेत असा सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न होता.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ ST/

प्रा. वर्षा गायकवाड......

त्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय नक्की घेण्यात येईल. सगळया ठिकाणी काऊंन्सिलींग सेटर्स, व्हॅल्यू एज्युकेशन आणि मेडिटेशन, योगा सुरु करुन त्या माध्यमातून मुलांमध्ये पॉझिटिव्ह दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

----

..3.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ ST/

**पृ. शी.** : मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मुंबईत केवळ तीनच वसतिगृहे असणे

**मु. शी.** : मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मुंबईत केवळ तीनच वसतिगृहे असणे यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मुंबईत केवळ तीनच वसतिगृहे असून सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सन २००७ साली मंजूर झालेल्या आणखी एका वसतिगृहास अद्यापही जागा न दिल्याने हे वसतीगृह कागदावरच राहणे, सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे गेले तीन वर्षे शेकडो मुलांच्या निवासाचा निर्माण झालेला मोठा प्रश्न, या मुलांना वसतिगृह हा एकमेव आधार असून सध्या मुंबईत वरळी येथे सामाजिक न्याय विभागाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतीगृह, संत मिराबाई वसतिगृह आणि मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह अशी तीनच वसतिगृहे असल्याने यामध्ये १५४ मुली व २०० मुले इतक्याच मर्यादित विद्यार्थ्यांची सोय होणे, दरवर्षी मुंबईतील महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळूनही शेकडो विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था न होणे, परिणामी मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. सचिन अहिर ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना विचारण्यामागे असा हेतू होता की, जेवढया प्रमाणात मुलांच्या वसतिगृहांची आवश्यकता आहे तेवढया प्रमाणात मुंबईत वसतिगृहे आहेत काय तसेच महाराष्ट्रात किती वसतिगृहाची गरज आहे याचा काही अंदाज शासनाने बांधला आहे का?

सभापती महोदय, वरळीमधील हे वसतिगृह आहे. सन्माननीय मंत्री महोदयांचा तो मतदारसंघ आहे. म्हाडामार्फत बीडीडी चाळीचा पुनर्विकास करण्यात येत आहे. त्यामुळे तो भाग स्वच्छ आणि सुंदर करायचा आहे म्हणून हे वसतिगृह हलविण्यात येत आहे काय?वसतिगृहांची संख्या फार तुटपुंजी आहे. मुंबई शहरामध्ये आणि इतर मोठया शहरांमध्ये वसतिगृहांची संख्या वाढविण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे काय असल्यास या वसतिगृहांची बांधकामे कधीपर्यंतही पूर्ण होणार आहेत. ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, 271 शासकीय वसतिगृह आहेत. त्यामध्ये शासनाच्या स्वत:च्या मालकीचे असलेली सोडून 150 पेक्षा जास्त ठिकाणी भाडयाच्या इमारतीमध्ये वसतिगृहे आहेत. सभापती महोदय, याचा संपूर्ण बारकाईने अभ्यास करुन राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे आणि 100 वसतिगृह बांधण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. एवढेच नाही तर त्यापेकी 18 वसतिगृह भाडयाच्या इमारतीमध्ये सुरु केलेली आहेत. येणाऱ्या काळात 100 वसतिगृह बांधण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की,वरळीतील वसतिगृह वरळीतून बाहेर नेण्याचे काम होणार नाही. विशेष करुन शहर आणि उपनगरामध्ये फार मोठी तफावत आहे. वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता चेंबूरमध्ये 1000 क्षमतेचे वसतिगृह बांधण्याचे काम पूर्ण केलेले आहे. बीडीडी चाळीची पुनर्बांधणी ज्यावेळी होईल त्यावेळी या योजनेमध्ये वरळीमध्ये अत्याधुनिक वसतिगृह प्राधान्याने बांधण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ...

सन्माननीय सदस्यांनी जो तिसरा प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, आतापर्यंत 100 वसतिगृहांच्या कामांना मंजुरी दिलेली आहे. ज्या ठिकाणी जमीन मिळालेली आहे अशा 70 ठिकाणी कामाला सुरुवात केलेली आहे. काही ठिकाणी जमीन मिळालेली नाही. उदा. ठाणे, नाशिक इत्यादी शहरामध्ये जमीन मिळावयास पाहिजे होती. अशी 30 वसतिगृहे आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून 75 ठिकाणी कामे सुरु केलेली आहेत.. ती कामे प्रगतिपथावर आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाशी संबंधित अनेक वसतिगृहे अशी आहेत की, ज्या ठिकाणी अतिशय अस्वच्छ अवस्था आहे तसेच अतिशय नरकयातना अशी राहण्याची व्यवस्था आहे. आता ज्या भाड्याच्या जागा आहेत त्यांच्या बाबतीत किंवा अन्यत्र आधुनिकीकरणाचे काम कशा पध्दतीने करणार ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे आणि मी स्वत: देखील संत चोखामेळा वसतिगृहात गेलो होतो. ही वस्तुस्थिती आहे की, वसतिगृहांच्या बाबतीत एकंदर भयानक परिस्थिती आहे. म्हणून ही 100 वसतिगृहे बांधल्यानंतर पहिले काम हे करणार की, भाड्याने घेतलेल्या जागेतील वसतिगृहातील जे विद्यार्थी आहेत त्यांना त्या ठिकाणी हलविण्याचे काम केले जाईल. तसेच जे आधुनिकीकरण करावयाचे आहे त्यामध्ये सेंट्रलाईज्ड पध्दतीने मुलांना त्या ठिकाणी मिड डे मिल सुरु करता येईल काय हे पाहून ते जिल्हा पातळीवर सुरु करण्याचा प्रयत्न करीत आहोत. कारण त्या ठिकाणी कॅन्टीनची भयानक परिस्थिती असते. मुलांना गरम पाणी मिळत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी सोलर सिस्टिमचा वापर करु शकतो काय अशा प्रत्येक बारीकसारीक गोष्टी पाहून आधुनिकीकरणाच्या दृष्टीकोनातून विचार करुन ही वसतिगृहे निव्वळ वसतिगृहे न राहता विद्यार्थ्यांसाठी क्युरिक्युलर ॲक्टिव्हिटीजच्या दृष्टीने तसेच ॲकॅडमीक युटिलायझेशन करता येईल काय याचा प्रयत्न शासनाच्या वतीने केला जाईल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहांदयांनी विद्यार्थी संख्या वाढत आहे त्यामुळे नवीन वसतिगृहे तयार करण्याचे आश्वासन दिलेले आहे. परंतु ही नवीन वसतिगृहे पूर्ण होईपर्यंत त्या विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून त्यांना भाडे तत्वावर इमारती देऊन त्यांची सोय करणार काय ?

...2...

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, होय. मी उत्तरामध्ये सांगितले की, 100 वसतिगृहे सुरु होतील पण त्याची वाट न पाहता 18 ठिकाणी भाडे तत्वावर वसतिगृहे घेऊन त्या ठिकाणी त्यांना प्रवेश देण्याचा प्रयत्न करु.

---

**लक्षवेधी सूचना क्रमांक 5 पुढे ढकलण्याबाबत**

**उप सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 5 वरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : भारताचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्मदिवस "शेतकरी आत्मविश्वास व नवचैतन्य दिन" म्हणून साजरा करण्याबाबत

**मु. शी.** : भारताचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्मदिवस "शेतकरी आत्मविश्वास व नवचैतन्य दिन" म्हणून साजरा करण्याबाबत श्री. जयंत प्र. पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कृषी क्षेत्राची देदिप्यमान शिखरे गाठण्यासाठी त्याग हा महत्वाचा धागा आहे. भारताचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकरी समाजाच्या कल्याणासाठी आपल्या जीवनाचा भारत कृषक समाज, शिवाजी शिक्षण संस्था, शिवाजी लोक विद्यापीठ इत्यादीसाठी त्याग केला आहे. नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु झाले आहे. डॉ. पंजाबदाव देशमुख यांची जन्म तारीख 27 डिसेंबर रोजी असणे, तरी भारताचे पहिले कृषी मंत्री आणि कृषीरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांचा दि. 27 डिसेंबर हा जन्मदिवस शासनाच्या वतीने "शेतकरी आत्मविश्वास व नवचैतन्य दिन" म्हणून साजरा करण्यात यावा यासाठी शासनाचे लक्ष वेधून घेण्याकरिता मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

----

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे स्मारक आसोदा, जि. जळगाव येथे उभारण्याबाबत निर्णय न होणे

**मु. शी.** : थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे स्मारक आसोदा, जि. जळगाव येथे उभारण्याबाबत निर्णय न होणे याबाबत श्री. रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे स्मारक असोदा, जि. जळगाव येथे उभारण्यासाठी निकषास पात्र ठरणारी गावठाण जागा गट नंबर 2363 ते 2368 ही असोदा ग्रामपंचायतीने गावठाणाचे आरक्षण काढून बहिणाबाई चौधरी यांच्या स्मारकासाठी वापरण्याचा ठराव मंजूर करुन शासनाकडे पाठविणे, परंतु अद्यापही शासनाने यावर कोणताही निर्णय न घेणे, त्यामुळे येथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली व करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**पृ. शी.** : नॅशनल ॲक्रिडिएशन बोर्ड ऑफ हॉस्पिटल यांच्या गुणवत्तेचे प्रमाणपत्र मुंबईतील केवळ पाच रुग्णालयांना देण्यात आलेले असणे.

**मु. शी.** : नॅशनल ॲक्रिडिएशन बोर्ड ऑफ हॉस्पिटल यांच्या गुणवत्तेचे प्रमाणपत्र मुंबईतील केवळ पाच रुग्णालयांना देण्यात आलेले असणे याबाबत श्री. विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री. विनोद तावडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"केंद्र सरकारच्या क्वालिटी काऊंसिलच्या अंगीकृत असलेले नॅशनल ॲक्रिडिएशन बोर्ड ऑफ हॉस्पिटल यांच्या गुणवत्तेचे प्रमाणपत्र मुंबईतील केवळ पाच रुग्णालयांना देण्यात आलेले असणे."

यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

महाराष्ट्रात आणि विशेषत: मुंबईतील रुग्णालयांना केंद्र सरकारच्या क्वालिटी कौन्सिलचे गुणवत्ता प्रमाणपत्र दिले जाते. भारतातील 366 रुग्णालये प्रतिष्ठित असल्याची माहिती मिळाली आहे. मुंबईतील जे.जे.रुग्णालय, के.इ.एम., सेंट जॉर्ज व नायर या रुग्णालयांसाठी शासनाकडून करोडो रुपये खर्च केला जातो व या रुग्णालयांकडून चांगली वैद्यकीय सेवा पुरविली जाते असे सांगितले जाते. परंतु मुंबईतील ज्या रुग्णालयांना हे प्रमाणपत्र मिळाले आहे ती पाचही रुग्णालये खाजगी आहेत. हिरानंदानी, हिंदुजा, गोदरेज, होली फॅमिली व होली स्पिरीट अशी ही रुग्णालये आहेत. जनतेच्या करातून करोडो रुपये सरकारी रुग्णालयांच्या सोयीसुविधांवर खर्च होतो. मुंबई महानगरपालिकेचे 2000 कोटींचे बजेट आहे. शासनाकडून सरकारी रुग्णालयांसाठी सुध्दा मोठा निधी खर्च केला जातो. असे असताना मुंबईतील एकाही रुग्णालयाला नॅशनल ॲक्रिडिएशन बोर्ड ऑफ हॉस्पिटलने गुणवत्ता प्रमाणपत्र दिलेले नाही ही अतिशय चिंतेची व खेदजनक बाब आहे. त्यामुळे शासनाला या विषयात काय अडचणी आहेत, कोणते अडथळे आहेत, अजून काय केले पाहिजे हे सांगितले पाहिजे. किमान हे ॲक्रिडिएशन मिळण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय, हे जाणून घेण्यासाठी मी हा विषय आपल्यामार्फत शासनासमोर मांडत आहे.

-----

**उप सभापती** : यानंतरची विशेष उल्लेखाची सूचना सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांची आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आता जे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत त्यांचे विशेष उल्लेख राखून ठेवले पाहिजेत. सन्माननीय सदस्यांना सूचना स्वीकृत झाल्याचे पत्र आता मिळत आहे. आता माझी सही घेण्यासाठी संबंधित कर्मचारी माझ्याकडे आले होते. काही सन्माननीय सदस्य बाहेर गेले आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य बाहेर गेले आहेत ही सबब होऊ शकत नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी.**: श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचे स्मारक उभे करण्यास होत असलेला विलंब

**मु.शी.**: श्री संत ज्ञानेश्वर माऊलींचे स्मारक उभे करण्यास होत असलेला विलंब याबाबत श्री.गोपीकिशन बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.गोपीकिशन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"संपूर्ण वारकरी व महाराष्ट्रीय जनतेचे आराध्य दैवत श्री क्षेत्र देहू आळंदीचे श्री संत इ ाानेश्वर माऊली हे आहे. हया माऊलीच्या स्मारकासाठी वारकरी संप्रदायाने अनेक वेळा आंदोलने करणे, उपोषण करणे व मंत्री महोदयांना निवेदन पत्र देणे, वारकरी संप्रदाय व तत्कालीन महसूल राज्यमंत्री व अनेक आमदार लोकप्रतिनिधींनी हया स्मारकासाठी अथक प्रयत्न करणे, तत्कालीन महसूल राज्यमंत्र्यांनी तीर्थक्षेत्र विकासासाठी अंदाजपत्रकात 434.73 कोटीपैकी सिध्दबेट विकासासाठी रु.25 कोटींची तरतूद करणे, सन 2010-11 मध्ये अंदाजपत्रकात तीर्थक्षेत्र विकासासाठी अंदाजे 654.80 कोटीची तरतूद करणे, शासनाने वारकरी संप्रदायाच्या लोकांच्या भावनाचा अनादर करणे, आजपावतो फक्त शासनाद्वारे अंदाजपत्रकात तरतूद करणे व वाढीव रक्कम कागदावर राहणे, तथापि, सिध्दबेटाच्या विकासासाठी निधी देण्यात आला असणे, तो पुणे जिल्हाधिकारी यांच्याकडून पडून असल्याने दोन वर्षांहून अधिक कालावधी होऊनही येथे कोणतेही बांधकाम सुरु करण्यात आलेले नाही. सिध्दबेट स्मारकाशी हजारो भाविकांच्या भावना निगडीत असून त्या पायदळी तुडविल्या जाणे व शासनाद्वारे कार्यवाही करण्याचे पोकळ आश्वासन दिले जाणे, हयामुळे जनसामान्यात व वारकरी संप्रदायमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी."

श्री संत ज्ञानेश्वर माऊलीच्या स्मारकासाठी मागील अधिवेशनात शासनाने 434.73 कोटींची तरतूद केली होती त्याला दोन वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप स्मारकाच्या बांधकामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे हे बांधकाम तातडीने सुरु करण्यात यावे अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाला करीत आहे. धन्यवाद.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राष्ट्रीय ग्राहक संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांनी जिल्हा ग्राहक कक्षाकडे फक्त इंग्रजी व हिंदी भाषेतून तक्रारी करण्याचे काढलेले अंतरिम आदेश

**मु.शी.**: राष्ट्रीय ग्राहक संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांनी जिल्हा ग्राहक कक्षाकडे फक्त इंग्रजी व हिंदी भाषेतून तक्रारी करण्याचे काढलेले अंतरिम आदेश याबाबत श्री.दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राष्ट्रीय ग्राहक संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांनी सोमवार, दि.6.12.2010 रोजी जिल्हा ग्राहक कक्षाकडे करावयाच्या तक्रारी या फक्त इंग्रजी, हिंदी भाषेमध्ये करण्यात याव्यात, असे अंतरिम आदेश काढलेले आहेत आणि महाराष्ट्र राज्यातील जिल्हा ग्राहक संरक्षण कक्षाकडे मराठी भाषेत तक्रारी करण्याबाबत काढलेल्या आदेशाला स्थगिती दिली आहे. महाराष्ट्र राज्यात जन्मलेल्या तसेच महाराष्ट्र राज्यात 15 वर्षापासून राहणा-या लोकांना मराठी भाषा आली पाहिजे असे राज्य शासनाचे धोरण आहे. राज्य शासनाशी सर्व पत्र व्यवहार हा मराठी भाषेतून केला पाहिजे, मराठी भाषेला कुठल्याही परिस्थितीत दुय्यम स्थान देणे, हे महाराष्ट्रात राहणा-या लोकांवर अन्याय करणारे आहे, राष्ट्रीय ग्राहक संरक्षण आयोगाने वर नमूद केल्याप्रमाणे दिलेला अंतरिम आदेश हा बेकायदेशीर आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद 348 (3) अन्वये राज्याच्या उच्च न्यायालयाच्या कामकाजामध्ये हिंदी किंवा मराठीचा वापर करता येतो. राज्य शासनाने या स्थगिती आदेशाबाबत राष्ट्रीय ग्राहक संरक्षण आयोगाकडे आपली मराठी भाषेविषयीची स्पष्ट भूमिका ज्येष्ठ मराठी वकीलांमार्फत मांडणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्र शासनाची राज्य भाषा मराठी आहे. या राज्यामध्ये चालणाऱ्या न्यायिक प्रक्रियेचा संपूर्ण कारभार मराठीतून व्हावा अशाप्रकारची तरतूद आहे. संविधानातील अनुच्छेद 348 (3) अन्वये राज्याच्या उच्च न्यायालयाच्या कामकाजात मराठी किंवा हिंदीचा वापर करता येईल अशी घटनात्मक तरतूद केलेली आहे. असे असतानाही या राज्यात वावरणारे जे परप्रांतीय आहेत, ते भले पिढयांपिढया येथे रहात असले तरी ते मराठीचा द्वेष करतात, मराठी भाषेत बोलू इच्छित नाहीत, येथेपर्यंत त्यांची मजल गेली आहे.  घरामध्ये ते कोणत्या भाषेत बोलतात यापेक्षा ते ज्यावेळी राज्य कारभाराचा भाग होतात त्यावेळी त्यांनी मराठी भाषेचा वापर करणे हे अनिवार्य असतानाही ते मानायला तयार होत नाहीत.  मराठी भाषेतून दुकानांवर पाटया लावल्या पाहिजेत अशी मी भूमिका मांडली होती त्यावेळी हे सर्व परप्रांतीय सर्वोच्च न्यायालयात गेले आणि आम्ही मराठीतून पाटया लावणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. सर्वोच्च न्यायालयाने घटनेचा अन्वयार्थ लावून प्रथम मराठी भाषेतून व नंतर इतर भाषेतून पाटया लावाव्यात असे सांगितले. अशाप्रकारे राष्ट्रीय ग्राहक संरक्षण आयोग, नवी दिल्ली येथे महाराष्ट्र राज्याच्या जिल्हा ग्राहक कक्षाकडे एखादी बाब न्यायची असेल तर ती मराठीतून लिहावी लागते याच्या विरोधात जाणारे हे जे लोक आहेत अशा या मराठी द्वेष्टयांचे नाव या कार्यालयाच्या दप्तरात सुध्दा असता कामा नये असे माझे मत आहे. नागपूर येथील 'टाईम्स ऑफ इंडिया' या वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर ही बातमी आलेली आहे.  मुंबईच्या ग्राहक मंचासमोर जावे लागते म्हणून त्यांनी राष्ट्रीय ग्राहक संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांच्यासमोर अर्ज केला की, मला मराठी भाषा अनिवार्य असता कामा नये, मला जी भाषा येते त्या भाषेतूनच मी अर्ज करीन. त्यासंबंधी दिनांक 6.12.2010 रोजी जिल्हा ग्राहक कक्षाकडे करावयाची तक्रार फक्त इंग्रजी व हिंदी भाषेतून करण्यात यावी. त्यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, या महाराष्ट्रात राहणा-याला जी भाषा योग्य वाटते त्यांनी त्या भाषेत अर्ज केला पाहिजे.

यानंतर श्री.शिगम

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:25

श्री. दिवाकर रावते...

म्हणजे मराठी भाषेचा ते अवमान करीत आहेत. येथेच राहायचे, येथे खायचे, येथेच कमवायचे,येथेच आपली घरेदारे बनवायची आणि आपल्याच मातृभाषेचा अभिमान बाळगून आमच्या मराठी भाषेचा अपमान करण्याची प्रवृत्ती दिल्लीपर्यन्त गेलेली आहे. राष्ट्रीय ग्राहक संरक्षक मंच, नवी दिल्ली येथे पुढची सुनावणी होईपर्यन्त मराठी भाषेतून अर्ज करण्यासाठी स्थगिती दिलेली आहे. म्हणून या बाबतीत मी राज्य शासनाला विनंती करतो की, या प्रकरणी तातडीने योग्य तो विधिज्ञ लावावा. आम्ही आमच्या राज्यभाषेचा अधिकार अंमलात आणणारच, तसेच घटनेनुसार त्रिभाषासूत्राची अंमलबजावणी राज्यामध्ये करु असे तेथे ठामपणे सांगितले पाहिजे. त्या ठिकाणी जर अर्जदाराच्या भाषेतूनच अर्ज करण्याची परवानगी दिली गेली नाही तर तो घटनेचा अवमान होईल. म्हणून आपण वेळीच जागरुक व्हावे आणि मराठी भाषेचा अपमान दिल्लीमध्ये होऊ देऊ नये याची जाणीव मी सरकारला करुन देत आहे. त्यासाठी योग्य विधिज्ञा लावावा आणि योग्य त्या व्यक्तिला वकीलपत्र द्यावे अशी विनंती करतो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाण्यातील मराठी साहित्य संमेलनास ठाणे महापालिकेने द्यावयाच्या मदतीबाबत**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मराठी भाषेच्या संदर्भात उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्या मुद्याच्या अनुषंगाने मला एक गोष्ट येथे नमूद करावयाची आहे की, ठाण्यामध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. या साहित्य संमेलनाला शासनाने मदत केलेली आहे. तसेच या साहित्य संमेलनासाठी उभारावयाच्या मंडपाचा खर्च ठाणे महानगरपालिके मार्फत करण्यात येईल अशा प्रकारचा ठराव ठाणे महानगरपालिकेने एकमताने पारित केला आहे. असे असताना तेथील प्रशासनिक अधिका-यांनी अशी मदत करण्यासाठी नियोजन विभागाची मदत घ्यावी लागेल असे सांगितले. महापालिकेने ठराव पारित करुन दीड महिना झाला तरी अद्याप त्यानुषंगाने शासनाच्या नियोजन विभागाला कोणतेही पत्र आलेले नाही. 22 ते 23 लाख रु. मंडपासाठी खर्च होणार आहे, त्यासाठी टेंडर निघणार आहे.परंतु मदतीच्या अनुषंगाने कोणतीच हालचाल दिसत नाही. त्यामुळे मराठीच्या विषयाबाबत हे प्रशासनिक अधिकारी मुद्दामहून दुर्लक्ष करीत आहेत काय ? मराठी भाषेच्या साहित्य संमेलनामध्ये मुद्दाम अडथळा निर्माण करीत आहेत काय अशी शंका येते. म्हणून याबाबतीत शासनाचे ताबडतोब निर्देष गेले नाहीत तर हे साहित्य संमेलन होण्यामध्ये अडचण निर्माण होईल. माझी शासनाला विनंती आहे की, अशा प्रकारे मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमाकडे कोणी वक्रदृष्टीने पहात असतील, लोकप्रतिनिधींनी पारित केलेला प्रस्ताव शासनाकडे पाठवित नसतील, त्याबाबतीत अडथळा आणीत असतील तर अशा अधिका-यांवर कारवाई केली पाहिजे. तेव्हा ठाण्यामध्ये होणा-या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला कोणताही अडथळा निर्माण होणार नाही यादृष्टीने निर्णय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना माननीय नगरविकास मंत्र्यांनी सांगितले की, ठाणे महानगरपालिका ही स्वायत्त असून ती आपले निर्णय स्वत: घेऊ शकते. असे असताना आता ठाणे महापालिकेला नियोजन विभागाची परवानगी घ्यावी लागेल असे अधिकारी कसे काय सांगतात ? असे असेल तर मग मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर विसंगत आहे असे म्हणावे लागेल.

..3..



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:25

**उप सभापती** : मी या विषयाच्या संदर्भात सभागृहाला थोडीशी माहिती देतो. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे ठाण्यामध्ये दिनांक 24,25,26 आणि 27 डिसेंबर 2010 असे 4 दिवस संपन्न होणार आहे. वास्तविक ठाण्याच्या साहित्य मंडळाने ठाणे महानगरपालिकेला आणि ठाण्याच्या महापौराना या साहित्य संमेलनासाठी मदत करण्याची विनंती केली होती. त्यानुषंगाने ठाणे महानगरपालिकेने दोन महिन्यापूर्वी ठराव पारित केला आणि मंडपासाठी लागणारी 60 लाख रुपयाची रक्कम आम्ही देऊ असे सांगितले. ठाणे साहित्य मंडळाचे बरेचसे पदाधिकारी माननीय मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांना निमंत्रण देण्यासाठी आले होते. त्यांनी माझी देखील भेट घेतली. ठाणे महानगरपालिकेचे महापौर देखील आले होते. त्यांनी अशी अडचण सांगितली की ठाणे महापालिकेकडून जी मदत द्यावयाची आहे त्याबाबतीत एकही पाऊल उचलले गेले नाही.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.....

म्हणून मी स्वत: सन्माननीय आयुक्तांना फोन केला होता. त्यांनी मला असे सांगितले की, रुपये 3 लाखापेक्षा अधिक रकमेचा जर कोणत्याही एखाद्या संस्थेला किंवा इतर घटकाला मदत करायची असेल तर आम्हाला त्यासाठी राज्य शासनाची परवानगी घ्यावी लागते. वास्तविक पाहता राज्य शासनाची परवानगी आवश्यक आहे असे म्हटल्यानंतर तो ठराव ताबडतोब राज्यशासनाकडे येणे आवश्यक होते परंतु तो ठराव ऑक्टोबर महिन्यामध्ये मंजूर झाला त्या ठरावाची प्रत आज फोन केल्यानंतर या क्षणाला याठिकाणी पाठविण्यात आली. या संदर्भात गेले दोन महिने हेळसांड झाली. त्यामुळे आज वस्तुस्थिती अशी आहे की, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी आवश्यक असलेला मंडप 20 डिसेंबर, 2010 पर्यंत पूर्णत: तयार होणे आवश्यक आहे. ते काम छोटे नाही. मी या कामासाठी निधी संकलनाचे काम करीत आहे. ज्यांना कोणाला मंडप उभारणीचे काम द्यायचे असेल त्यांना कमीत कमी महिना ते दीड महिना अवधी देणे अत्यावश्यक होते. आता फक्त 10 दिवस शिल्लक राहिले आहेत. म्हणून मी स्वत: याठिकाणी नगरविकास विभागाच्या माननीय सचिवांना माझ्या दालनात बोलावले होते. त्या ठरावाची प्रत फॅक्सद्वारे मागवून घेतली आणि ती त्यांच्याकडे सुपूर्द केली. जे आता मी सभागृहाला सांगितले तेच त्यांनाही सांगितले. हा निर्णय तातडीने झाला नाही तर साहित्य संमेलनाच्या दृष्टीने अडचण निर्माण होऊ शकते. निधी अभावी साहित्य संमेलन अडेल असे मला वाटत नाही. त्यासाठी आम्ही लोकप्रतिनिधी समर्थ आहोत. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत एखाद्या संस्थेला मदत देण्यासाठी महासभेचा ठराव झ ाला असेल तर तो ठराव मंजुरीसाठी राज्य शासनाकडे तत्काळ पाठविणे हे त्याठिकाणच्या प्रशासनाचे काम होते. गेले दोन महिने तो ठराव शासनाकडे पाठविण्यात न आल्यामुळे आजचा हा प्रसंग उद्‌भवला. नगरविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले आहे की, आजच ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर केली जाईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितले की, मी स्वत: हालचाल करुन ही मदत ताबडतोब मिळेल अशा प्रकारची कृती करेन.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंडप घालता येत नाही, खुर्च्या आणता येत नाहीत असे सांगितले. मागील वर्षाचे 54 लाख रुपये शिल्लक आहेत.

**उप सभापती**: हे मराठी साहित्य संमेलन ठाणे येथे होणार आहे. मी आता पुढील कामकाज पुकारीत आहे. ----------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कुलाबा, मुंबई येथे  कारगील युध्दात शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांसाठी राखीव असलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या आदर्श सोसायटीमध्ये झालेला गैरव्यवहार

**मु.शी.**: कुलाबा, मुंबई येथे  कारगील युध्दात शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांसाठी राखीव असलेल्या भूखंडावर बांधण्यात आलेल्या आदर्श सोसायटीमध्ये झालेला गैरव्यवहार या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत,श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री चंद्रकांत पाटील,परशुराम उपरकर, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही.  या चर्चेसाठी अडीच तासाचा वेळ दिलेला आहे.  सूचना देणारे माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रस्तावावर मतदान होणार नाही हे मान्य आहे. परंतु या सभागृहाच्या प्रथा आणि परंपरा अशा आहेत की, चर्चेवरील मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर राईट ऑफ रिप्लायचा अधिकार विरोधी पक्षाला मिळतो.  तो अधिकार अबाधित आहे का? आपण सहसचिव श्री.भाऊसाहेब कांबळे यांच्यावर विसंबून राहून आम्हाला सल्ला देणार आहात का? विधिमंडळाच्या सचिवांनी प्रथा आणि परंपरांची माननीय पीठासीन अधिकाऱ्यांना आठवण करुन द्यायची असते.

**उप सभापती** : माझ्याकडे विचारणा केल्यानंतर मी आपल्याला सांगू इच्छितो की, राईट ऑफ रिप्लायला मी परवानगी देईन.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबईत कुलाबा येथील नेव्हीच्या भूखंडावर कारगील युध्दातील शहीद जवानांच्या कुटुंबांसाठी राखून ठेवलेल्या आदर्श गृहनिर्माण सोसायटीमध्ये राजकीय नेते व सनदी अधिकाऱ्यांनी सदनिका घेणे, सदर सोसायटीच्या सदस्यांमध्ये वाढ होत गेल्यामुळे इमारत सहा मजल्यावरुन एकतीस मजल्यांपर्यंत जाणे, सदर इमारतीच्या अनधिकृत मजल्यांना केंद्रीय पर्यावरण खात्याची मंजुरी नसणे, सी.आर.झेड चे उल्लघंन करणे, सदर प्रकरणी केवळ मुख्यमंत्र्यांनी राजीनामा देणे,

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मात्र सनदी अधिकारी यांच्यावर आजतागायत कोणतीच कारवाई न होणे, लष्करी अधिकाऱ्यांनी सी.बी.आय.ला दिलेल्या कागदपत्रात आदर्श सोसायटी असलेल्या भूखंडाची मालकी लष्कराच्या स्थानिक प्रशासनाकडे दाखविण्यात येणे, सदर प्रकरणातील महत्वाची कागदपत्रे गहाळ करणे, या गैरप्रकारामुळे संपूर्ण राज्यातील जनमानसात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

नंतर ३सी.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या माध्यमातून सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, सभागृहात माननीय विरोधी पक्षनेते एखाद्या महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करतात तेव्हा सदनाच्या नेत्यांनी अथवा माननीय मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहण्याची आवश्यकता असते, ती सभागृहाची परंपरा आहे. परंतु सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री अथवा माननीय मुख्यमंत्री हे दोघेही सभागृहात उपस्थित नसल्याने सभागृहाचे कामकाज थोड्या वेळासाठी स्थगित करावे व त्यांना पाचारण करावे अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : सभागृहात शासनाचे प्रतिनिधी म्हणून माननीय महसूल मंत्री उपस्थित आहेत.

श्री. विनोद तावडे : महोदय, ज्या प्रकरणामध्ये संपूर्ण सरकार बदलले........

श्री. रामदास कदम : महोदय, सभागृहाचे संकेत म्हणून एखाद्या महत्वाच्या चर्चेच्या वेळेस माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री उपस्थित नसताना कामकाज करावयाचे असेल तर आमचीही हरकत नाही. मी शासनाची सामूहिक जबाबदारी आहे हेही समजतो. पण ज्या विषयावर मुख्यमंत्री व संपूर्ण सरकारच बदलते अशा महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना सभागृहाचे नेते तरी उपस्थित राहणे आवश्यक असते.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलत असतात )

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मी प्रस्ताव मांडल्यानंतर हाच मुद्दा उपस्थित करणार होतो परंतु तो सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी उपस्थित केला आहे. खरे तर अशा चर्चेच्या वेळेस माननीय मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक असते परंतु किमान माननीय उप मुख्यमंत्री, जे या सभागृहाचे नेते आहेत, त्यांनी तरी उपस्थित रहावे अशी आमची विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री खालच्या.....

**उप सभापती** : विरोधी पक्षात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपला प्रस्ताव मांडला त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी बोलण्याची परवानगी मागितली, ती मी त्यांना दिली. त्यानंतर अन्य सदस्यांनाही परवानगी दिली. तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांनाही बोलण्याची परवानगी दिली. परंतु शासनाचे प्रतिनिधी म्हणून माननीय महसूल मंत्र्यांना काही बोलावयाचे आहे, त्यांनाही बोलण्याची संधी द्यावी.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, याच विषयावर खालच्या सभागृहात देखील चर्चा सुरु असल्याने माननीय मुख्यमंत्री तेथे उपस्थित आहेत. तेव्हा सामूहिक जबाबदारी म्हणून मी सभागृहात हजर आहे.

श्री. रामदास कदम : महोदय, सामूहिक जबाबदारीबाबत मला कल्पना आहे. कारण कुठलाही मंत्री सभागृहात सुरु असलेल्या चर्चेच्या अनुषंगाने टिप्पण घेऊ शकतात.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, अशा प्रकारे सभागृहात चालवावयाचे असेल आणि या प्रस्तावाला महत्व नसेल तर आम्ही प्रस्ताव मांडत नाही आणि बोलणारही नाही. अशा प्रकारे सभागृहाचे कामकाज करणे कितपत योग्य आहे ?

**उप सभापती** : राज्यशासनाचे प्रतिनिधी म्हणून माननीय महसूल मंत्री सभागृहात बसलेले आहेत. त्यांना काय बोलायचे आहे ते बोलण्याची संधी मी दिली आहे. कृपया आपण त्यांचे म्हणणे तरी ऐकून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, संपूर्ण राज्याच्या दृष्टीने हा विषय महत्वाचा असून राज्यातील जनतेचे लक्ष या विधिमंडळाकडे लागलेले आहे. माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री अशी व्यवस्था दोन्ही सभागृहांच्या दृष्टीने आपण केलेली आहे. म्हणून माननीय मुख्य मंत्र्यांना जरी वेळ नसला तरी किमान माननीय उप मुख्यमंत्र्यांनी तरी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. संबंधित खात्याचे मंत्री जरी विधानसभेत असले तरी किमान राज्य मंत्र्यांनी तरी येथे हजर राहणे आवश्यक आहे. अशा प्रकारे सभागृहाचे कामकाज करुन एक प्रकारे सभागृहाच्या गरिमेवर गैरविश्वास दाखविण्यासारखे हे आहे. तसेच हा सभागृहाच्या औचित्याचाही भंग आहे. अशी अपेक्षा आम्हाला पीठासीन अधिकाऱ्यांकडून नाही, किमान त्यांनी तरी सभागृहाचा सन्मान राखला पाहिजे, हीच आमची माफक मागणी आहे. प्रत्येक वेळी असे होता कामा नये अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : शासनाचे प्रतिनिधी म्हणून माननीय महसूल मंत्र्यांचे म्हणणे तरी आपण ऐकून घ्यावे, ही माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : नाही, काही आवश्यकता नाही.

नंतर श्री. अजित .....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे, ..

**उप सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, यासंदर्भातील निर्णय मी घेईन. परंतु सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांचे म्हणणे ऐकून न घेण्याची आपली भूमिका चुकीची आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, विधानसभेत याच विषयावर चर्चा सुरु आहे. त्याठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत....

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात काही स्पष्टीकरण करण्यापूर्वी मी काही बोलू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सर्व भ्रष्टाचार टोपलीत भरावेत आणि विधान भवनाला फेऱ्या माराव्यात...

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, टोपली किंवा अन्य काही असेल, आपण मागे वळून पाहिले तर सन 1995 पासून 2000 पर्यंत (अडथळा)....(गोंधळ ) ..

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माझ्याकडे महसूल विभागाचा कार्यभार आहे. माननीय मुख्यमंत्री यांचे बरोबर माझे वैयक्तिक संबंध नाहीत. सामूहिक जबाबदारी म्हणून सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची मी नोंद घेतो. मी याठिकाणी मंत्रीमंडळाची सामूहिक जबाबदारी म्हणून मी येथे उपस्थित आहे. माझी आपल्यामार्फत माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती आहे की, त्यांनी या चर्चेस सुरुवात करावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मंत्रिमंडळाची सामुदायिक जबाबदारी असते याची मला माहिती आहे. परंतु या सभागृहाच्या काही प्रथा, परंपरा व संकेत आहेत. त्यानुसार माननीय विरोधी पक्ष नेते एखाद्या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा उपस्थित करीत असतील तेव्हा माननीय मुख्यमंत्री किंवा या सभागृहाचे नेते सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. तेव्हा आपण माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा सन्मान ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे. माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री या सभागृहात उपस्थित होत नाहीत तोपर्यंत आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी सांगितल्याप्रमाणे विधानसभा सभागृहात देखील याच विषयावर चर्चा सुरु आहे... या विषयावरील चर्चा उद्या घेतली तर चालेल काय ? ....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री यांना येथे येणे शक्य होत नसेल तर या सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री यांनी येथे उपस्थित रहावे... हे कनिष्ठ सभागृह आहे काय ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री या दोहोंपैकी एकाने याठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या भावना समजू शकतो. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात उपस्थित रहावे असे मी त्यांना कळवितो. ते सभागृहात उपस्थित होतील. परंतु आपण वेळ फुकट घालविण्यापेक्षा चर्चेस सुरुवात करावी...

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण अशाप्रकारच्या प्रथा कृपया पाडू नयेत. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.शिगम 15.45

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे.

**उप सभापती** : माननीय मुख्यमंत्री थोडया वेळासाठी बाहेर गेलेले आहेत त्यामुळे माननीय उप मुख्यमंत्री खालच्या सभागृहात बसलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : दहा मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी पुन्हा सांगू इच्छितो की माननीय मुख्यमंत्री काही कामा निमित्त थोडया वेळासाठी बाहेर गेलेले असल्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीमध्ये माननीय उप मुख्यमंत्री खालच्या सभागृहात बसलेले आहेत. माननीय मुख्यमंत्री खालच्या सभागृहात आल्यानंतर ताबडतोब मी वरच्या सभागृहात येतो असा निरोप त्यांनी मला दिलेला आहे. मधल्या काळात आपण चर्चा सुरु करु या.

श्री.रामदास कदम : अत्यंत महत्वाच्या विषयावरील ही चर्चा आहे. सभागृहाच्या कामापेक्षा दुसरे महत्वाचे काम असू शकते काय ?

**उप सभापती** : या ठिकाणी महसूल मंत्री श्री बाळासाहेब थोरात उपस्थित आहेत.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

श्री.रामदास कदम : प्रोटोकॉल प्रमाणे त्यांचा नंबर दहावा आहे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जे काही सांगितले आहे ते मी ऐकलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो. मघाशी माननीय उप सभापतींनी असे सांगितले होते की, माननीय मुख्यमंत्री बाहेर गेलेले आहेत तेव्हा अधिवेशन सुरु असतांना सभागृहाच्या कामकाजापेक्षा दुसरे महत्वाचे काम असू शकते काय ? सभागृहामध्ये महत्वाचे कामकाज सुरु असतांना इतर कामासाठी ते बाहेर कसे काय जाऊ शकतात ? सभागृहाचा अपमान होता कामा नये एवढेच मला सांगावयाचे आहे.

2.

08-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3E 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहात एखाद्या महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असतांना त्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहून चर्चेला उत्तर देणे या सबंधी सन्माननीय सदस्यांनी काही भावना व्यक्त केली तर ते मी समजू शकतो. या ठिकाणी महसूल मंत्री श्री बाळासाहेब थोरात उपस्थित आहेत आणि त्यांनी देखील या ठिकाणी आपल्याला सांगण्याचा प्रयत्न केला होता.

श्री.रामदास कदम :सामुदायिक जबाबदारी असते हे मला माहीत आहे.

**सभापती** : सामुदायिक जबाबदारी हा नियमाचाच एक भाग आहे तेव्हा अशा परिस्थितीमध्ये आपण चर्चेला सुरुवात करु या.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या नेत्यांचा सन्मान राखला पाहिजे त्याचबरोबर सभागृहाच्या प्रथा आणि परंपराचे पालन झाले पाहिजे एवढी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की,त्या अनुषंगाने आपण सातत्याने प्रयत्न करीत असतो.या ठिकाणी आपली अशी अपेक्षा आहे की, अत्यंत महत्वाच्या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे....................

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा मान राखला पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभागृहाच्या प्रथा आणि परंपरा पाळल्या पाहिजेत.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांना मी सांगू इच्छितो की गेली अनेक वर्षे आपण या सभागृहामध्ये आहात तसेच या पूर्वी आपण खालच्या सभागृहात देखील होता आणि काही काळ लोकसभेचे देखील सदस्य होता. अशा प्रकारे एखाद्या महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असतांना मंत्री जर उपस्थित नसतील तर संबंधित राज्य मंत्री वा इतर मंत्री टाचण घेत असतात.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या सदनाची प्रथा आणि परंपरा मोठी आहे.मी नियमाच्या बाहेर जाऊन काहीही बोलत नाही.

(गोंधळ)

डॉ. दीपक सावंत : याठिकाणी प्रथा आणि परंपरेचा विषय आहे....

(दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

**सभापती** : याठिकाणी सभागृहाचे सन्माननीय नेते उपस्थित आहेत. आपण याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कोणत्याही अति महत्वाच्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होत असतांना त्या अनुषंगाने संबंधित विभागाचे मंत्री महोदय चर्चेच्यावेळी टांचण लिहून घेत असतात. आणि चर्चा संपल्यानंतर उत्तर ध्यावयाच्या वेळी सन्माननीय मुख्यमंत्री हे ठरवतील त्या पध्दतीने उत्तर दिले जाते. ही सभागृहाची परंपरा आहे, व ती मोडणे बरोबर नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, अजिबात नाही.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. रामदास कदम मी सुध्दा गेली 31 वर्षे विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये सदस्य म्हणून काम केले आहे. त्यामुळे हा अत्यंत महत्वाचा विषय असल्यामुळे या चर्चेला सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर ध्यावे अशी आपण अपेक्षा व्यक्त केली तर मी समजू शकतो. परंतु या चर्चेच्या अनुषंगाने माननीय महसूल मंत्र्यांनी जर टांचण लिहून घेतले तर ते आम्हाला मान्य नाही असे जर आपण म्हटले तर ते सभागृहाच्या असलेल्या प्रथा आणि परंपरेच्या दृष्टीने चुकीचे आहे. आणि आपण हे अनेक वेळा या सभागृहामध्ये पाहिले आहे.

(गोंधळ))

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, खरे तर आदर्श घोटाळयासंदर्भात संपूर्ण देश पातळीवर व राज्यपातळीवर मोठया प्रमाणात चर्चा सुरु आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी काल सांगितले होते की, उद्या आपण या संदर्भात चर्चा ठेवू. त्याला माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सुध्दा दुजोरा दिला होता. . एक गोष्ट खरी आहे की, ज्याप्रमाणे या सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे, त्याप्रमाणे विधानसभेमध्ये सुध्दा या विषयावर चर्चा सुरु आहे. हा महत्वाचा विषय असल्यामुळे दोन्ही सभागृहामधील चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, ज्यावेळी सभागृहामध्ये सन्माननीय विरोधी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. अजित पवार...

पक्षनेते एखाद्या प्रस्तावावर बोलण्यास उभे रहातात त्यावेळी सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहिले पाहिजे असे संकेत असून आपण ते याठिकाणी पाळीत आहोत ही वस्तुस्थिती नाकारीत नाही. परंतु या राज्याच्या महसूल मंत्र्यांचा यामध्ये जमिनीशी संबंध येतो. आपल्याला एक गोष्ट मान्य करावी लागेल की, अलिकडच्या काळात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांची आघाडीची सरकारे असतात म्हणून ही ॲडजेस्टमेंट करावी लागते. नाहीतर माननीय मुख्यमंत्र्यांनंतर नंबर दोनचे महत्वाचे खाते हे महसूल खाते समजले जाते हे माननीय सदस्य श्री. रावते साहेब आपल्यालाही माहीत आहे. सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये आलो आहे. परंतु विधानसभेमध्ये माझ्या समक्ष माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांना असे सांगितले की, मी विधानसभेमध्ये उपस्थित असल्यामुळे आपण विधान परिषदेमध्ये जाऊन या संबंधीच्या चर्चेमधील महत्वाचे टिपण लिहून घ्यावे. आणि ही चर्चा जर लवकर संपली तर आजच या सभागृहामध्ये उत्तर देण्याची त्यांची तयारी आहे. आणि जर चर्चा लांबली तर त्यांनी माननीय सभापतींना व माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती केली आहे की, मी या सभागृहामध्ये उद्या उत्तराचे भाषण करीन. त्यामुळे माझी विनंती आहे की, या चर्चेच्या अनुषंगाने गोंधळाचे वातावरण निर्माण न करता माननीय विरोधी पक्षनेते, माननीय श्री. दिवाकर रावते, शेतकरी कामगार पक्षाचे माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील असे समोरच्या बाजूकडील दोन-तीन माननीय सदस्य व आमच्या बाजूकडील एक-दोन माननीय सदस्यांनी भाषणे केली तर माननीय मुख्यमंत्र्यांना आजच उत्तर देणे सोईचे होईल अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहामध्ये हा प्रस्ताव मांडल्यानंतर मी हा मुद्दा उपस्थित करणार होतो. परंतु माननीय सदस्य श्री. रामदासभाई कदम यांनी हा मुद्दा उपस्थित केला. इतकी महत्वाची चर्चा सभागृहामध्ये सुरु होत आहे. ज्या चर्चेच्या मागणीसाठी काल या सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यात आले. त्याचप्रमाणे विधानसभेमध्ये सुध्दा या विषयावर गोंधळ झाला. आणि या चर्चेची टेंटेटीव्ह वेळ, दिवस ठरला, आपल्या आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये तो विषय दाखविण्यात आला. आमची अशी अपेक्षा होती की, दोन्ही सभागृहामध्ये एकाच वेळी चर्चा सुरु झाली तर विधानसभेमध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित रहातील व विधान परिषदेमध्ये माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उपस्थित रहावे. यापेक्षा आमची दुसरी कोणतीही अपेक्षा नव्हती. परंतु महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये एका महत्वाच्या विषयावर कामकाज सुरु असतांना...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/ KTG/ प्रथम श्री. सरफरे.... 15:55

श्री. पांडुरंग फुंडकर ....

ही जाहिरात आहे. विधिमंडळाचे कामकाज सोडून जर मुख्यमंत्री जाणार असतील आणि विधिमंडळाच्या कामकाजाकडे दुर्लक्ष करणार असतील तर सभापती महोदय, हे योग्य होणार नाही म्हणून आम्ही तसा आग्रह धरला होता.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांबद्दल आम्हाला रास्त आदर आहे. परंतु जाहिरातीच्या रुपाने माननीय मुख्यमंत्र्यांना तिकडे जावयाचे आहे, वगैरे असे काही रेकॉर्डवर येऊ नये. विधानसभेतील चर्चा थोडी लांबलेली आहे त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना विधानपरिषदेत येण्यास थोडा विलंब होत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची उत्तर देण्याची तयारी आहे. विरोधी पक्षातील दोन-चार सन्माननीय सदस्यच भाषण करणार असतील तर माननीय मुख्यमंत्र्यांची आता याठिकाणी येऊन उत्तर देण्याची तयारी आहे हे मी पुन्हा या सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. कुठलाही हेतू नाही पण माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या सभागृहात बसावे अशी आमची अपेक्षा होती. सभापती महोदय, विधानसभेमध्ये या विषयावर चर्चा चालू असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री विधानसभेत बसले असतील याची आम्हाला कल्पना आहे. सभापती महोदय, संपूर्ण देशामध्ये शरमेने मान खाली घालावी लागेल अशा पध्दतीने हे आदर्शचे प्रकरण समोर आले आहे. आदर्शचे प्रकरण समोर आले आणि या राज्याच्या माननीय माजी मुख्यमंत्र्यांला राजीनामा द्यावा लागला. सभापती महोदय, या प्रकरणामध्ये इतके भयंकर काय होते? सभापती महोदय, यापूर्वी या राज्यात घोटाळे झालेले आहेत. आताही काही घोटाळे उघकीस आलेले आहेत. माझ्याजवळ लोकमतचा एक अंक आहे. या लोकमतच्या अंकामध्ये नव्या मुंबईत 80 आजी-माजी आयएएस,आयपीएस अधिकाऱ्यांचा आदर्श घोटाळयाचा "वनश्री पॅटर्न" असे छापून आलेले आहे. "10802 चौ.मी.चा भूखंड शगुफा, व्हीनस, ययाती आणि अमर सोसायटयांना दिले मोक्याचे भूखंड." सभापती महोदय,यामध्ये कमीत कमी 80 आजी आणि माजी आयएएस आणि आयपीएस अधिकारी आहेत. सभापती महोदय, आदर्शचा घोटाळा उघडकीला आला आणि त्याबाबत चर्चा सुरु झाली. काही लोकांनी असे म्हटले की, श्री. अशोक चव्हाण यांचा गेम केला गेला. आता तो गेम झाला की झाला नाही याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. पण श्री. अशोक चव्हाण यांना राजीनामा का द्यावा लागला? त्यांनी आपल्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर...

सासूच्या नावाने, आपल्या जावयाच्या नावाने, आपल्या मुलीच्या नावाने अशा प्रकारे त्यातील फ्लॅट त्यांनी घेतले आहेत. सभापती महोदय, हे प्रकरण एवढयावरच थांबले काय? या घोटाळयाची चर्चा जेव्हा सुरु झाली तेव्हा या राज्याच्या माजी तीन मुख्यमंत्र्यांचाही यामध्ये समावेश असल्याचे आढळून आले.

सभापती महोदय, या घोटाळयाची लष्करामार्फत व सी.बी.आय. चौकशी सुरु झाली. त्यानंतर एक बातमी अशी आली की, मंत्रालयातील फाईलमधील काही महत्वाचे कागदपत्र गहाळ झाले. काही वर्तमानपत्रामध्ये असे छापून आले की, ती फाईल समुद्रात फेकून देण्यात आली. एका वर्तमानपत्रात तर अशी बातमी छापून आली की, यामध्ये नगरविकास राज्य मंत्र्यांने पाच लाख रुपयाची लाच मंत्रालयातील कर्मचाऱ्याला दिली आणि ते कागदपत्र गायब केले. यामुळे संशय प्रचंड प्रमाणात वाढत गेला. वर्तमानपत्रात बातम्या छापून यायला लागल्या. सभापती महोदय, आदर्श बरोबर हा वनश्री पॅटर्न काय आहे याचीही चौकशी झाली पाहिजे. कोण आयएएस अधिकारी आहेत? सभापती महोदय, मला आश्चर्य वाटते की, आदर्शच्या घोटाळयात माननीय मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. 26/11 च्या दहशती हल्ल्यामध्ये या राज्याचे मुख्यमंत्री बदलले. या राज्याचे गृहमंत्री बदलले. केंद्र शासनातील गृहमंत्री बदलले पण एकाही सनदी अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. त्यामुळे सभापती महोदय, संशय बळावला आणि माननीय माजी मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यायला लावून हे प्रकरण मिटविले जाणार अशी चर्चा सुरु झाली. सभापती महोदय, मी मुंबईतून ज्या रस्त्यावरुन जातो त्या रस्त्यावर एक शोरुम आहे. त्या शोरुमचे नाव 'द लूट' असे आहे.

यानंतरन श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

या पध्दतीने या ठिकाणी लूट झालेली दिसते. या सोसायटीला सहा मजल्यांची परवानगी दिलेली होती परंतु सहा मजल्याच्या सोसायटीचे 31 मजले झाले. ज्या टेबलावर फाईल जाईल त्या टेबलावर एक एक फ्लॅट वाढत गेला. काही ठिकाणी दोन फ्लॅट वाढले. काही ठिकाणी तीन फ्लॅट वाढले. जितका वजनदार अधिकारी तितके फ्लॅट त्याला दिले गेले. असे करता करता ती इमारत 31 मजल्यांची झाली.

सभापती महोदय, मी या ठिकाणी फार भाषण करणार नाही. मी या ठिकाणी दोन चार गोष्टी सांगणार आहे. 'रेणुका' सोसायटीचा घोटाळा झाला. वांद्रे कॉम्प्लेक्सजवळ आणखी काही घोटाळे झाले. त्या ठिकाणी 'मित्रप्रेम' सोसायटीचा घोटाळा झाला. या घोटाळ्यांना सुध्दा आदर्श, मित्रप्रेम, वनश्री अशी नावू असू शकतात. 'मित्रप्रेम' सोसायटीचे प्रकरण वांद्रे येथील आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची ती जागा आहे. सरकारी अधिकारी आणि कर्मचारी ज्या ठिकाणी राहतात त्या वसाहतीच्या बाजूला सार्वजनिक बांधकाम विभागाची एक जागा होती. त्या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाने त्या वसाहतीतील कर्मचाऱ्यांना ज्या गरजेच्या वस्तू लागतात त्यासाठी काही गाळे बांधले होते. त्या ठिकाणचा जो काही चौरस फुटांचा प्लॉट आहे तो प्लॉट दादागिरीने या विभागातील अधिकाऱ्यांनी लाटला आणि त्या ठिकाणी 'मित्रप्रेम' सोसायटी उभी राहिली. शासन त्या सोसायट्यांची चौकशी करणार की नाही ?

सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, मुंबईमध्ये आता एकाला एकच घर मिळणार असा कायदा आम्ही करु. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करु.. एकाला एकच घर द्या परंतु ज्या आयएएस अधिकाऱ्यांनी 20-20, 25-25 फ्लॅट लाटले, आपसातच पोलीस अधिकाऱ्यांच्या जागा लाटल्या. म्हणजे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी मुंबईमध्ये जी जागा राखून होती ती जागा सुध्दा त्यांना पुरली नाही. ती जागा त्यांनी घेतली आणि त्या ठिकाणी सोसायटी उभी राहिली. सभापती महोदय, काल आपण सांगितले की, इतर विषयावर बोलू नका. मी इतर विषयावर बोलणार नाही. माझ्याकडे 10 प्रकरणे आहेत. फक्त या आदर्श सोसायटीचा छोटासा प्रवास मी सांगणार आहे. या सोसायटीच्या प्रवासाची सुरुवात 21 सप्टेंबर, 1999 साली झाली. तत्कालीन

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मुख्यमंत्री श्री. नारायणराव राणे यांच्याकडे सोसायटीच्या लोकांनी त्याबाबतचे पत्र दिले. त्या पत्रावर त्यांनी 'लक्ष घालावे' असा शेरा मारला. त्यानंतर वर्ष बदलले आणि दिनांक 7 फेब्रुवारी, 2000 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्याकडे हेच निवेदन देण्यात आले. श्री. नारायण राणे यांनी लक्ष घालावे असे लिहिले होते आणि त्यांच्या लक्षात आले की, या ठिकाणी हे काही जमणार नाही म्हणून त्यांनी श्री. विलासराव देशमुख यांना निवेदन दिले. माझ्याकडे सर्व पत्रे आहेत. त्या पत्रांच्या प्रती माझ्याकडे आहेत. तत्कालीन मुख्यमंत्र्यांना निवेदन दिल्यानंतर त्यावर श्री. विलासराव देशमुख यांनी "Call for proposal and put up immediately" असा शेरा लिहिला. त्यांनी श्री. नारायण राणे यांच्यासारखा 'लक्ष घालावे' असा शेरा लिहिला नाही. त्यांनी "Call for proposal and put up immediately" असा शेरा लिहिला आणि फाईल मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविली. याचा प्रवास कसा गतीने झाला हे बघावे.

मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांनी 29 मार्च, 2000 रोजी याबाबत जनरल ऑफीसर कमांडींग या लष्कराच्या कार्यालयाकडे सदर जमीन या सोसायटीला देण्याबाबत आपली हरकत आहे काय अशी विचारणा केली. 29 मार्चला पत्र गेले. 5 एप्रिल, 2000 रोजी लष्काराच्या जनरल ऑफीसर कमांडिंग या कार्यालयाने मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांना कळविले की, ही जागा संरक्षण खात्याच्या सीमेबाहेरील असून शासनाने योग्य ती कार्यवाही करावी परंतु हे सांगताना लष्करी अधिकारी, माजी सैनिक आणि त्यांच्या विधवांच्या बाबतीत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे स्पष्ट करण्यात आले. असा उल्लेख त्या पत्रामध्ये त्यांनी केला. दिनांक 12 मे, 2000 ला जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाला अहवाल दिला. त्यामध्ये असे म्हटले की, ही जागा राज्याच्या महसूल विभागाची असली तरी त्यावर संरक्षण खात्याचा ताबा आहे. त्यांनी या जागेच्या वापराबद्दल एनओसी दिलेली आहे. मात्र या जमिनीवर रस्ता होणार असल्याने योग्य तो निर्णय घ्यावा असे त्यांनी त्यामध्ये लिहिले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

दिनांक 10 एप्रिल, 2002 रोजी ही फाईल नगरविकास विभागाकडे होती. त्या विभागाच्या तत्कालीन सचिवांनी व मुख्यमंत्र्यांनी रस्त्याची रुंदी 60 मीटरवरुन 18 मीटर करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी तो निर्णय का घेतला ते त्या फाईलमध्ये लिहिले नाही. त्यामुळे 3824 चौ.फू.जागा उपलब्ध झाली. ती जागा सोसायटीसाठी उपलब्ध करावयाची होती. दिनांक 2 जून, 2000 रोजी पुन्हा या सोसायटीचा अर्ज त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्याकडे आला. त्यांनी तो अर्ज तत्कालीन महसूल मंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्याकडे पाठविला. या अर्जात प्रथमच कारगिलचा उल्लेख झाल्याचे आढळतो. या अर्जामध्ये सोसायटीचे सदस्य असलेल्या लष्करी अधिका-यांनी आमच्यापैकी काहीजणांनी कारगिल युध्दात सहभाग घेतला होता म्हणून सरकारने लवकरात लवकर ही जमीन द्यावी असे म्हटले होते. त्यावेळी महसूल विभागाचे सचिव श्री.शंकरन यांनी दोन अटी घातल्या होत्या. त्यातील पहिली अट अशी होती की, सोसायटीतील सर्व सभासदांची पात्रता तपासली पाहिजे. दुसरी अशी अट होती की, जमीन सीआरझेड-2 खाली असल्यामुळे त्याला केंद्रीय पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी लागेल. माननीय श्री.विलासराव देशमुख यांचे दिनांक 17 जानेवारी रोजी पद गेले. त्या फाईलवर त्यांनी दिनांक 16 जानेवारी, 2003 रोजी म्हणजे आपले पद जाण्यापूर्वी सही केली. 16 जानेवारी, 17 जानेवारी, 18 जानेवारी अशी शीघ्र गतीने ती फाईल इकडून तिकडे फिरत होती. दिनांक 18 जानेवारीला या सोसायटीचे हेतू पत्र निर्गमित करण्यात आले. ही जमीन सीआरझेड-2 मध्ये असल्यामुळे केंद्र सरकारची परवानगी घ्यावी व सभासदांना कुटुंबाच्या उत्पन्नाप्रमाणे सदनिका मिळेल असे सांगण्यात आले. त्यानंतर राज्याच्या नगरविकास खात्याने केंद्रीय पर्यावरण विभागाकडे या सोसायटीच्या सीआरझेडच्या परवानगीबाबत विचारणा केली. त्यानंतर केंद्राने राज्याला असे कळविले की, ही जागा सीआरझेड-2 मध्ये आहे. याबाबत राज्य सरकारने योग्य तो निर्णय घ्यावा. त्यानंतर पुन्हा ती फाईल महसूल विभागाकडे आली. दिनांक 29.7.2004 रोजी तत्कालीन महसूल मंत्री श्री.शिवाजीराव निलंगेकर व तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांच्या सहीने सोसायटीला जमीन वाटण्याचे पत्र देण्यात आले. त्यावेळी 20 सभासदांची ही यादी फायनल झालेली होती.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर....

दिनांक 24.8.2004 रोजी पुन्हा एकदा माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी 51 सभासदांना वाढीव मान्यता दिली. ती का दिली, कशासाठी दिली, काय कारण होते ते समजले नाही. दिनांक 20.9.2004 रोजी वाढीव सभासदांसाठी हे प्रकरण शासनाकडे आले, त्यासाठी हे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आले. या जमिनीच्या शेजारीच बेस्टची जमीन होती. 2669 चौरस मीटर इतकी ती जागा आहे. या जागेचा एफएसआय वापरण्यासाठी आदर्श सोसायटीने शासनाकडे संमती मागितली. म्हणजे बेस्टची जागा वापरण्यासाठी त्यांनी शासनाकडे परवानगी मागितली. त्याबाबतची फाईल तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी दिनांक 5.8.2005 रोजी त्यालाही परवानगी दिली. माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांच्यानंतर माननीय श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री झाले होते. तोपर्यंत सभासदांच्या संख्येत वाढ होऊन ती संख्या 51 पर्यंत गेली. त्यानंतर पुन्हा एफएसआय वाढवून मिळण्याची परवानगी मागण्यात आली. दिनांक 23.9.2005 रोजी शासन दरबारचा प्रवास आटोपून आदर्श सोसायटीची फाईल महानगरपालिकेकडे आली.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 16:10

(श्री. पांडुरंग फुंडकर...

अशा प्रकारे आदर्श सोसायटीच्या फाईलचा संपूर्ण प्रवास सहजपणे झाला आणि हे प्रकरण नियमाप्रमाणे मंजूर झाले असे भासविण्याचा प्रयत्न झाला. जागा कुणाची ? या प्रकरणी काय अनियमितता झाल्या ?

सन 1950च्या दरम्यान लष्कराने हाय वे बांधण्यासाठी शासनाला सांताक्रूझ रायफल रेंजची जमीन दिली. दिनांक 13 जुलै 1958ला तत्कालीन मुख्यमंत्री व संरक्षण मंत्री यांच्यामध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे सांताक्रूझ रायफल रेंजच्या मोबदल्यात कुलाबा ब्लॉक 6 मधील जागा लष्कराला देऊन लष्कराचे आर्थिक नुकसान भरुन काढायचे असे ठरले. त्यानंतर दिनांक 13 जानेवारी 1984 रोजी लष्कराच्या मुख्यालयाने कुलाबा जिल्हाधिका-यांना पत्र लिहिले. त्यामध्ये असा स्पष्ट उल्लेख केला आहे की, बेस्ट डेपोच्या दोन्ही बाजूकडील जागा ही लष्कराची असून ती पूर्वीपासून लष्कराच्या ताब्यात आहे. ती ट्रेनिंगसाठी वापरत असल्याने रिक्त ठेवण्यात आलेली आहे. नंतर त्या पत्रामध्ये 12 जानेवारी 1984ला लेफ्टनण्ट कर्नल आर बिटकीकर यांनी जिल्हाधिका-यांना पत्र लिहिले की ही जमीन लष्कराची असून अतिक्रमण होऊ नये यासाठी कंपाऊंड वॉल आणि फेन्सिंग करण्यात आलेले आहे. ही जागा पूर्वी पासून लष्कराच्या ताब्यात आहे. 1980 पासून त्या जागेवर लष्कराने झाडे लावली . दिनांक 27 ऑक्टोबर 1996 रोजी तत्कालीन मेजर जनरल करिअप्पा यांच्या हस्ते या जमिनीवर इको पार्कचे उद्घाटन करण्यात आले. दिनांक 16 जून 2003 रोजी सौरव र, डिफेन्स इस्टेट ऑफिसर, मुंबई सर्कल यांनी जिल्हाधिका-यांना पत्र लिहिले. त्यामध्ये असे स्पष्ट म्हटलेले आहे की, राज्य शासनाचा या जागेवर कोणताही अधिकार नाही. ले.जनरल करिअप्पा यांच्या हस्ते इको पार्कचे उद्घाटन होऊनही त्याबाबत राज्य सरकारने तक्रार केली नाही. सद्य:स्थितीत या जागेवर इको पार्क असून त्या जागेवर निवासी इमारत बांधणे योग्य होणार नाही. लष्कराचे अधिकारी अशा पध्दतीने या जागेवर हक्क सांगत होते. त्यासंबंधीचे त्यांनी पुरावे दिले होते. त्यांनी हेही सांगितले की या परिसरामध्ये बांधलेली बहुमजली इमारत ही सुरक्षिततेच्या दृष्टीने हानीकारक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन या जागेवर निवासी इमारत बांधू नये असे त्यांनी कळविले. दिनांक 8 मार्च 2004ला डायरेक्टर जनरल ऑफ डिफेन्स यांनी आर्मी कमांडरला पत्र लिहिले की ही जागा लष्कराच्या अधिपत्याखालील असून त्यावर लष्कराने कंपाऊड वॉल

..2..

(श्री. पांडुरंग फुंडकर...

उभारलेली आहे. यावरुन स्पष्ट होते की ही लष्कराची जागा आहे. सीबीआयने देखील ही बाब मान्य केलेली आहे. लष्कर प्रमुख एन.सी.व्हीज ले.जन.शंतनू चौधरी हे दोघेही आदर्श सोसायटीचे सभासद आहेत. ते सभासद कसे झाले हे त्यांच्या पदावरुन लक्षात येते.

ही जागा सैन्य दलाच्या ताब्यात असल्यामुळे या जागेवर निवृत्त सैनिक व सैनिकांच्या विधवा पत्नीसाठी घरे बांधण्याचा प्रस्ताव होता. ही जागा निवृत्त सैनिक आणि सैनिकांच्या विधवा पत्नी यांच्यासाठी आरक्षित होती. इतरांसाठी ती आरक्षित नव्हती. परंतु प्रस्तावाचा वापर भूखंड लवकर ताब्यात मिळविण्यासाठी करण्यात आला. आदर्श सोसायटीला केन्द्रीय पर्यावरण विभागाची परवानगी मिळत नव्हती ती परवानगी लवकर मिळविण्यासाठी या प्रस्तावाचा वापर करण्यात आला आणि प्रत्यक्षात प्रभावी मंत्र्यांनी आणि वरिष्ठ सनदी अधिका-यांनी या आदर्श सोसायटीमध्ये घरे लाटली. सद्य:स्थितीत भूखंडावर सेनादलाचा ताबा व ही जमीन सरकारने सेनादलाला दिल्याची ग्वाही दिल्याची कागदपत्रे फाईलमधून गहाळ झाली आहेत.

...नंतर श्री. भोगले...

+

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

कोणती कागदपत्रे गहाळ झाली हे प्रत्यक्षात समोर आलेले नाही. परंतु असा संशय आहे की, नेमकी हीच कागदपत्रे आहेत. ज्यामध्ये भूखंडावरील सेनादलाचा ताबा व ही जमीन सेनादलास देण्याबाबतची ग्वाही दिलेली आहे. हीच कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. आता ही जमीन महसूल विभागाची असल्याचा दावा सोसायटीचे पदाधिकारी करीत आहेत. सीआरझेड नियमानुसार 5 कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी व केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाची मान्यता आवश्यक आहे. या प्रकरणात अशी मान्यता घेतली आहे का? सीआरझेड नियमानुसार कोणतीही इमारत रस्त्याला लागून असलेल्या समुद्राच्या दिशेने बांधता येत नाही. ऊंचीबाबत बंधने घालण्यात आली आहेत. रस्त्याला लागून जमिनीच्या दिशेने बांधता येते. परंतु तसे या प्रकरणात घडलेले नाही. ही एक अनियमितता आहे. अशा कितीतरी अनियमितता झालेल्या आहेत. कोणाच्या आशीर्वादाने हे घडले आहे? शिफारशींचे पत्र गेले त्यांच्या आशीर्वादाने झालेले आहे. उलट पर्यावरण मंत्रालयाने परवानगी दिलेली नसताना तत्कालीन नगरविकास विभागाचे उपसचिव श्री.देशमुख हे पुढे आले. पर्यावरण विभागाने परवानगी दिलेली नसताना नगरविकास विभागाचे उपसचिव श्री.देशमुख व सचिव श्री.रामानंद तिवारी यांनी पर्यावरण विभागाने परवानगी दिल्याचे खोटे सांगितले.

सद्यस्थिती अशी आहे की, केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाची परवानगी न घेताच इमारत उभारली गेल्यामुळे या इमारतीच्या कागदपत्रांची तपासणी करण्यास सांगितले आहे. केंद्रीय पर्यावरण विभाग या प्रकरणामध्ये स्वत: लक्ष घालीत आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी जाहीर केले की, अशी जर बेकायदेशीर इमारत उभारली गेली असेल तर 6 मजल्यांच्या वरचे मजले तोडून टाकण्यात यावेत. हे वक्तव्य केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी केलेले आहे. बांधकामासाठी आवश्यक त्या परवानग्या घेतल्या का, घेतल्या नसल्यास त्याबाबत काय कारवाई होणार अशी विचारणा केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी केली आहे. सेनादलाने बांधकामाला सुरुवात करण्यापूर्वी सेनादलाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे अशी हरकत एमएमआरडीएकडे घेतली. सेनादलाच्या क्षेत्रापासून 1 हजार मीटर परिसरात कोणतेही बांधकाम करता येत नाही. संरक्षणदृष्ट्या संवेदनशील परिसरात 30 मीटरपेक्षा जास्त ऊंच इमारत असू नये असा दंडक आहे. परंतु बांधकाम परवानगीसाठी घ्यावयाची एनओसी सेना दलाने दिनांक 10 ऑगस्ट, 2010 पर्यंत दिलेलीच नाही. मूळ सहा मजल्यांची इमारत बांधण्यात यावयाची होती. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 16:15

श्री.पांडुरंग फुंडकर.....

आता ही इमारत 100 मीटरपर्यंत म्हणजेच 31 मजल्यांची बांधण्यात आली आहे. सेनादलाचे मेजर एस.के.लांबा यांनी दिनांक 16 ऑगस्ट, 2010 रोजी लिहिलेल्या पत्रात स्पष्ट उल्लेख केलेला आहे. नौदलाने नुकतीच तक्रार केली आहे. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ही इमारत हानीकारक असल्याने या सोसायटीला ऑक्यूपेशन सर्टिफिकेट देऊ नये असे नौदलाने एमएमआरडीएला कळविले आहे. तरी देखील एमएमआरडीएने या इमारतीला ऑक्यूपेशन सर्टिफिकेट दिले. नौदलाने हरकत घेऊनही ओ.सी.देण्यात आली. बेस्टच्या डेपोसाठी असलेल्या भूखंडाचा एफएसआय या इमारतीसाठी वापरण्यात आला. रस्त्याची रुंदी 60 मीटरवरुन 18 मीटरवर आणण्यात आली. बेस्टच्या डेपोचा एफएसआय वापरल्याप्रकरणी बेस्टने चौकशी करण्याची तयारी दर्शविली आहे. हा एफएसआय कोणी दिला? दिनांक 18 जानेवारी, 2003 रोजी महसूल विभागाने आदर्श गृहनिर्माण संस्थेला कुलाबा येथील बीबीआर प्लॉट 6 मधील प्लॉट 87(सी) येथील 3857.82 चौ.मी.जमीन मंजूर करण्याबाबत पत्र निर्गमित केले. हे पत्र निर्गमित करीत असताना पत्रासोबत जोडपत्र-अ मध्ये सभासदांसाठी अर्हता नमूद केली. गृहनिर्माण संस्थेचा सभासद कोण होऊ शकतो याच्या पात्रतेसंबंधीच्या अटी नमूद केल्या.

नंतर 3एल.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

त्यात एक अट कुठल्याही व्यक्तिचे उत्पन्न गट निश्चित करण्याच्या प्रयोजनासंबंधी होती. त्यातील सदस्याच्या मागील 36 महिन्यांचे एकूण मासिक उत्पन्न विचारात घेतले व त्यानुसार त्या सदस्यांना सदनिका वितरित करण्यात येईल असे सांगितले. मग उत्पन्न कसे कमी दाखवावयाचे येथून सुरुवात झाली. समजा माझ्या स्वत:च्या नावाने फ्लॅट घ्यावयाचा असेल तर माझे उत्पन्न कसे कमी दाखवावे असे प्रयत्न सुरु झाले. आदर्श सोसायटीमधील सदस्यांनी दि. 23 जानेवारी, 2004 रोजी जे उत्पन्न घोषित केले त्याप्रमाणे एवढे कमी उत्पन्न मिळविणारा माणूस कुलाब्यासारख्या प्राईम लोकेशनच्या ठिकाणी असलेल्या सोसायटीत सदनिका कशी घेऊ शकेल याबाबत शंका निर्माण होते. सामान्य उत्पन्न असणारा माणूस कुलाब्यात घर घेऊच शकणार नाही. कारण या आदर्श सोसायटीतील सदनिका रु. 80 लाखाला त्यांना पडली आणि सदनिका घेणाऱ्याचे मासिक उत्पन्न मात्र फक्त 15 हजार रुपये, अशा प्रकारे यामुळे संशय निर्माण व्हायला लागला. 15 हजार रुपये मासिक उत्पन्न घेणारी व्यक्ती 80 लाखाची सदनिका कशी घेऊ शकते, हाच खरा प्रश्न आहे. कारण या मासिक उत्पन्नापेक्षा त्या सोसायटीतील सदनिकेचा महिन्याचा मेंटेनन्स 15 हजार रुपये आहे. 13 जानेवारीला या आदर्श सोसायटीत जे सभासद झाले त्यांची यादी माझ्याकडे आहे, मी ती वाचून दाखवितो. त्यात श्री. सी.आर.गायकवाड हे कोणाच्या शिफारशीने सोसायटीत आले किंवा कोण त्यांच्या पाठीमागे आहेत हे चौकशीत स्पष्ट होईलच. परंतु त्यांचे मासिक उत्पन्न फक्त 17000 रुपये, कैलाश गिडवाणी यांचे 12500/- रुपये, कनिष्क फाटक यांचे रु. 12500/-, सुप्रिया म्हस्के यांचे मासिक उत्पन्न 12500/-, मुनिला सेठी यांचे 12500/-, सुशील शाळीग्राम यांचे मासिक उत्पन्न 10000/-, अमोल कारभारी यांचे उत्पन्न 10000/- एवढे असून त्यांनाही अशा महागड्या सोसायटीत सदनिका मिळाल्यामुळेच जनतेत मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला. लोकांच्या मनात एक प्रकारे संशय निर्माण झाला यात आश्चर्य नाही. कारण नागपूर तर सोडाच पण अकोलासारख्या मध्यम शहरात सुध्दा 10 हजार रुपये उत्पन्न असणारा शेतकरी एक वारभर जागा सुध्दा घेऊ शकत नाही आणि 10 हजार रुपये मासिक उत्पन्न असणाऱ्या लोकांना कुलाबासारख्या ठिकाणी जागा मिळते त्यामुळेच हा संशय पक्का होता.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ........

महोदय, दि. 31 डिसेंबर, 2007 रोजी आदर्श सोसायटीचे आणखी काही सभासद घोषित झाले. त्यांचे मासिक उत्पन्न पाहिले तर श्री. ओकार तिवारी रु. 16667/-, अमरसिंग वाघमारे रु. 16025/- रणजित संगीतराव रु. 15500/-, बाळासाहेब सावंत रु. 15466/-, श्रीमती देवयानी खोब्रागडे यांचे मासिक उत्पन्न रु. 15000/-. मला कल्पना नाही की, या देवयानी खोब्रागडे कोण आहेत ? याचा अर्थ असा आहे की, ज्याच्या हातात फाईल गेली त्यांना किंवा नातेवाईकांना त्या सोसायटीमध्ये सदनिका मिळाल्या. त्याचबरोबर पुढे नमूद केलेल्या अधिकाऱ्यांच्या हातून आदर्श सोसायटीच्या फाईलचा प्रवास झाला. या सर्व अधिकाऱ्यांनी सर्व अनियमिततांकडे डोळेझाक केली आणि एक एक सदनिका आपापल्या नातेवाईकांच्या पदरात पाडून घेतली. असे म्हणतात की, "जिचे हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी".

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ D/ KTG/ प्रथम श्री.खर्चे.... 16:25

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, आदर्श प्रकरणाच्या बाबतीत आपल्याला असे दिसून येईल की, "ज्याच्या हाती फाईलची दोरी ती व्यक्ती स्वत:ची व स्वत:च्या नातेवाईकांचा उध्दार करी," असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. आदर्श इमारतीमध्ये सभासद असलेल्या सनदी अधिका-यांची नावे व त्यांनी धारण केलेले पद यासंदर्भात मी आपल्याला माहिती देतो.

सभापती महोदय, श्री.रामानंद तिवारी हे नगरविकास विभागाचे सचिव होते. त्यांनी या सोसायटीत ओंकार तिवारी म्हणजे आपल्या मुलाला फ्लॅट मिळवून दिला. श्री.व्ही.यु.देशमुख, नगरविकास विभागाचे तत्कालीन उप सचिव यांनी स्वत:च्या नावे फ्लॅट घेतला आहे. श्री.उत्तम खोब्रागडे, जनरल मॅनेजर, बेस्ट यांनी देवयानी खोब्रागडे या आपल्या मुलीला फ्लॅट मिळवून दिला. श्री.डी.के.शंकरन हे महसूल विभागाचे प्रधान सचिव होते. त्यांनी श्री.संजोग शंकरन या आपल्या मुलाच्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्रीमती कुंदन तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी स्वत:च्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.प्रदीप व्यास तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी आपली पत्नी श्रीमती सीमा व्यास यांच्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्रीमती सीमा व्यास या आय.ए.एस. अधिकारी आहेत. श्री.संगीतराव तत्कालीन परिवहन सचिव यांनी आपल्या मुलाच्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.जयराज फाटक हे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त होते, त्यांनी श्री.कनिष्क फाटक या आपल्या मुलाच्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.जयराज फाटक आता केंद्रामध्ये गेले आहेत, अशी माहिती मिळालेली आहे. श्री.जे.एम.अभ्यंकर हे शिक्षण संचालक असून त्यांनी स्वत:च्या नावाने फ्लॅट घेतला आहे. श्री.राजेशकुमार दास हे एम.एम.आर.डी.ए.चे उपाध्यक्ष असून त्यांनी आपल्या नावानेच फ्लॅट घेतलेला आहे. श्री.बर्वे सहपोलीस आयुक्त, वाहतूक यांनी वडीलांच्या नावाने फ्लॅट घेतलेला आहे. श्री.सुभाष लाला हे माननीय श्री.विलासराव देशमुख यांचे सचिव होते. त्यांनी दोन फ्लॅट घेतले आहेत. त्यापैकी एक फ्लॅट सुमिता सेठी व दुसरा सुशिला शालिग्राम या नावाने आहे. म्हणजे आई आणि मुलीच्या नावाने फ्लॅट घेतलेला आहे. ज्या ज्या अधिका-यांकडे आदर्शची फाईल गेली त्यांनी संधीचा फायदा घेतला, अधिकाराचा वापर केला व स्वत:साठी सदनिका मिळवली. यातील एक जरी अधिकारी प्रामाणिक निघाला असता तर आदर्शचे प्रकरणच घडले नसते. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात एकही अधिकारी प्रामाणिक निघाला नाही.

....2........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, आदर्श प्रकरणात सत्ताधा-यांनीही फायदा करुन घेतलेला आहे. सगळयांची नावे बाहेर आलेली आहे. आदर्श प्रकरणात माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख, श्री.सुशिलकुमार शिंदे, श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकर, श्री.नारायण राणे, डॉ.पतंगराव कदम, श्री.आर.आर.पाटील, श्री.अनिल देशमुख, श्री.बाबासाहेब कुपेकर तसेच जितेंद्र आव्हाड यांचेही नाव यामध्ये आलेले आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्रात काय चालले आहे ? एका बाजूला शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाकडे पैसे नाहीत. विजेच्या कनेक्शनची शेतक-यांकडे 5 हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. म्हणून आपण शेतक-यांच्या विजेचे कनेक्शन्स कापलेले आहेत. दुसरीकडे शासनाचे हजारो कोटी रुपये भूखंडामध्ये चालले आहेत. आदर्श प्रकरणात गुंतलेल्या प्रत्येक अधिका-याची चौकशी झाली पाहिजे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी ज्या कठोरतेने या प्रकरणाच्या संदर्भात आपली भूमिका मांडलेली आहे त्याच कठोरतेने या प्रकरणातील अधिका-यांवर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. आयएएस व आयपीएस अधिका-यांच्या नावावर कोठे कोठे आणि किती फ्लॅट आहेत, याची चौकशी होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नाशिकमध्ये सुध्दा लष्कराची जमीन लाटली गेली आहे. नांदेडच्या अधिका-यानीही जमीन लाटली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होण्याची आवश्यकता आहे. तसेच आयएएस व आयपीएस अधिका-यांच्या संपत्तीची पूर्ण चौकशी झाली पाहिजे. आदर्श प्रकरणात ज्या अधिका-यांची नावे आहेत त्यांना आपण केवळ शो-कॉज नोटीस दिलेली आहे. या अधिका-यांना शो-कॉज नोटीस देऊन काय साध्य होणार आहे ? काही अधिका-यांच्या नावावर 25-25 फ्लॅट आहेत. त्यामुळे अशा अधिका-यांची चौकशी केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री.अजित........

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

.

ही चौकशी तर झाली पाहिजेच, परंतु आदर्श सोसायटीमध्ये ज्या आय.ए.एस.अधिकाऱ्यांचे फ्लॅटस आहेत त्यांना ताबडतोब निलंबित करुन त्यांची चौकशी करावी अशी माझी मागणी आहे. या प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायाधीशांकडून केली जाऊ नये किंवा एखाद्या आयोगामार्फत चौकशी करण्यात येऊ नये. आतापर्यंत किती आयोग धूळ खात पडून आहेत याची आम्हाला कल्पना आहे. आतापर्यंत कोणत्याही अे.टी.आर.वर चर्चा झाली नाही. तेव्हा या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन्ही सभागृहातील सर्व पक्षीय सदस्यांची समिती नेमावी आणि त्या समितीकडून या प्रकरणाची चौकशी करावी अशी माझी मागणी आहे. ज्या आय.ए.एस.अधिकाऱ्यांनी गरीबांचे 25-30 फ्लॅट लाटले आहेत त्यांची चौकशी झाली पाहिजे. आपण अशाप्रकारची समिती गठीत केल्यास या प्रकरणातील सत्य महाराष्ट्रातील जनतेसमोर येईल, अशी विनंती करुन माझे वक्तव्य पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, संपूर्ण देशाचे आणि आणि राज्यातील 11 कोटी जनतेचे लक्ष ज्या प्रकरणाकडे लागले आहे अशा अतिशय गंभीर आणि संवेदनशील प्रकरणावर माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे, त्या प्रस्तावावर माझी मते मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपल्या देशाच्या लोकशाही पध्दतीबाबत जगातील इतर राष्ट्रांना आदर आहे. जगातील 272 देशांनी सर्वात मोठी वैभवशाली लोकशाही म्हणून आपल्या देशाचा आदर केला आहे. परंतु त्या लोकशाहीच्या प्रक्रियेबद्दल आज प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणाचा संबंध फक्त आदर्श सोसायटी पुरता मर्यादित नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दोन दिवसांपूर्वी एक चांगला उल्लेख केला होता. "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, परंतु काळ सोकावतो."त्यांच्या या मताशी मी सहमत आहे. हा काळ गेल्या 50-62 वर्षापासून सोकावला आहे. हा काळ का सोकावला त्याचे कारण सर्वांसमोर येणे गरजेचे आहे. किंबहुना या प्रकरणाने आपणा सर्वांना अंतर्मुख होऊन विचार करावयास लावले आहे. या विषयाने आपणा सर्वांना चिंता आणि चिंतन करण्याची संधी दिली आहे, असे माझे स्वत:चे मत आहे. या प्रकरणात दोषी कोण आहे त्यावर चर्चा होईलच. या प्रकरणाची चौकशी सुरु झालेली आहे. तेव्हा आपण त्यावर वक्तव्य करणे योग्य राहणार नाही. आपणास हे जाणून घ्यावे लागेल की, ज्या वेळेला या प्रकरणाच्या मुळाशी प्रशासन आणि प्रशासक म्हणून भूमिका मांडतो,

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ....

त्या वेळेस योग्य प्रशासन कोठे आहे, काय आहे याची सुध्दा या ठिकाणी चर्चा होणे् गरजेचे आहे. यातील काही मुद्यावर मी नक्कीच बोलणार आहे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही गोष्टीचा उल्लेख केला होता त्यातील काही बाबी ख-या आहेत. त्यातील काही बाबी असत्य असण्याचे कारण नाही.परंतु काही बाबी मात्र सोयीस्करपणे का वगळल्या आहेत ? हे मला समजले नाही.ज्यांनी रेफरन्स दिला मग ते श्री.विलासरावजी देशमुख असतील वा अन्य कोणी असतील त्यांचा उल्लेख आपण केला होता. या ठिकाणी श्री. आर. आर. पाटील यांचे नाव सुध्दा आपण घेतले होते जे कोणी लाभधारक आहेत त्यांचे नाव आपण घेतले परंतु श्री. सुरेश प्रभू यांचे नावच आपण घेतले नाही. त्यांचे नाव घ्यावयाला काहीच हरकत नव्हती. आपणच असे सागितले होते की, सगळे काही जाहीर झालेले आहे असे असतांना त्यांचे नाव लपवून ठेवण्यात काय हशील आहे ? हे मला माहीत नाही.या ठिकाणी काही जणांची नावे घेत असतांना त्यांचे उत्पन्न बारा हजार वा साडेबारा हजार रुपये आहे असे सांगितले होते. अर्थात हे वाईटच आहे.त्याचे समर्थन होऊ शकत नाही आणि मी देखील त्याचे समर्थन करणार नाही. त्याचा पर्दाफाश हा व्हावयालाच पाहिजे.या सबंधीची माहिती देत असताना श्री संचेतीच्या ड्रायव्हरचे उत्पन्न किती होते त्याचा आकडा मला ऐकावयास आला नाही . बाकीच्या कोणत्या सन्माननीय सदस्यांना जर तो आकडा ऐकावयास आला असेल तर ते मला माहीत नाही. श्री.संचेती यांच्या ड्रायव्हरच्या उत्पन्नासंबंधी मी उल्लेख करीत आहे. तेव्हा त्यांच्या उत्पन्नाचा आकडा जाहीर झाला असता तर आम्हाला बरे वाटले असते. श्री.मडके नावाच्या ड्रायव्हरचे उत्पन्न किती आहे यासबंधीचा आकडा आला असता तर बरे झाले असते. मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे हे प्रकरण कोणत्याही सरकारने, कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही विशिष्ट घटकाने केलेले आहे एवढयाच चष्म्यातून जर आपण पाहिले तर या देशाची लोकशाहीसुध्दा तुम्हाला व मला माफ करणार नाही. म्हणूनच या प्रकरणाचा धागा पकडून सगळया गोष्टींचा उल्लेख करावा लागेल.महाराष्ट्रातील या प्रकरणाचा उल्लेख देशातील सार्वभौम अशा लोकसभेमध्ये जर होत असेल तर कर्नाटकाचा उल्लेख महाराष्ट्राच्या या सभागृहात झाला तर त्यात काय चुकीचे आहे ? भ्रष्टाचाराच्या बाबतीत बोलत असतांना ती व्यक्ती कोणीही असो. तिचा उल्लेख केला पाहिजे.एका सोसायटीचा हा प्रश्न नाही.... अडथळा.. या ठिकाणी मी फक्त संदर्भच देत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी फक्त आदर्श सोसायटीच्या बाबतीतच बोलावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी आपल्याला आणि सर्व सन्माननीय सदस्यांना अशी विनंती आहे की....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री भाई जगताप यांचा मुद्दा बरोबर असेल. परंतु कर्नाटक राज्यातील कॉग्रेस पक्षाचे आमदार त्यांच्या विधिमंडळात भ्रष्टाचाराचा विषय मांडण्यास नपूंसक आहेत म्हणून तुम्ही हा मुद्दा या ठिकाणी मांडावा असे सन्माननीय सदस्य श्री भाई जगताप यांना कळविण्यात आले आहे काय ? कर्नाटक राज्यात आपला पक्ष आहे व त्या विधानसभेच्या गरिमेचा विषय आहे. त्यामुळे त्यांच्या विधानसभेचा अवमान आपल्या विधानसभेत आपण करणार असू तर त्याबाबतीत माझे काहीही म्हणणे नाही परंतु कर्नाटक विधानसभेमध्ये कॉग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य असून आपले म्हणणे मांडण्याची त्यांना संधी आहे.

श्री.भाई जगताप : सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते ज्या ज्या वेळेस बोलण्यासाठी उभे राहतात त्यावेळी आपण संपूर्ण देशासंबंधी आणि राज्यासंबंधी तसेच संपूर्ण समाजासंबंधी बोलतात. मी देशाच्या लोकशाहीबद्दल बोललो असून ज्या लोकशाहीचा आदर संपूर्ण जग करीत आहे आणि ज्या लोकशाहीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले आहे त्याबाबतीत मी जर काही उल्लेख केला तर कोणाला काही टोचत आहे काय , कोणाला बोचत आहे काय ?अशा प्रकारे जर कोणाला टोचत वा बोचत असेल तरी मला चालेल याचे कारण असे की, भ्रष्टाचारासारख्या विषयावर तुम्ही आम्ही बोलत आहोत. या देशाच्या लोकशाहीसंबंधीचा उल्लेख मी सुरुवातीलाच केला होता.या लोकशाहीचा उल्लेख करीत असतांना एक आमदार म्हणून आणि या देशातील 130 कोटी नागारिकांपैकी एक नागरिक म्हणून सुध्दा माझ्या मनाला खूप वेदना होत आहे. माझ्या देशाच्या लोकशाहीवर अशा प्रकारे जर शिंतोडे उडत असतील तर इतर ठिकाणी जे काही चालले आहे त्या बाबतीत बोलण्याचा देखील अधिकार मला घटनेने दिला आहे. इतकेच नव्हे तर मला हा अधिकार सदस्य म्हणूनही दिलेला आहे. तेव्हा त्या संबंधीचा उल्लेख करण्याचा मला जरुर अधिकार दिलेला आहे असे मला वाटते. या बाबतीत उल्लेख केल्यानंतर कोणालाही वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही. विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून असाही उल्लेख करण्यात आला होता की, धिस इज अ टीप ऑफ आइसबर्ग म्हणजेच हे हिमनगाचे एक टोक आहे. तेव्हा या हिमनगाच्या एका टोकाचा जर मी उल्लेख केला तर आपणास फार थंडी वाजते काय ? .....

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

किंवा कुणाला आणखी काहीतरी होत आहे काय? तर मग याठिकाणी मीडिया ज्या आईसबर्गचा वारंवार उल्लेख करीत आहे, त्या मीडियाला धन्यवाद दिले पाहिजेत. या देशाला स्वातंत्र्य मिळून 62 वर्षे झाल्यानंतर याठिकाणी प्रशासन आणि प्रशासक या दोन गोष्टींचा मी उल्लेख करीत आहे .प्रशासन म्हणजे काय? आज हे प्रशासकीय अधिकारी ज्या बेतालपणे वागत आहेत, आणि त्या बेतालपणे या लोकांनी हे प्रकरण हाताळण्याचा नव्हे तर लाटण्याचा प्रयत्न केला आहे. हा एक आईसबर्ग आहे, त्याच्या खाली फार मोठा आईसबर्ग आहे. त्या आईसबर्गमध्ये अनेक संदर्भ येतील. त्यामध्ये एका माणसाचा संदर्भ येणे गरजेचे नाही, किंवा कोणत्याही विशिष्ट पक्षाचा संदर्भ येणे गरजेचे नाही. ज्यावेळी या विषयासंदर्भात मीडियामध्ये उकल झाली, मीडियामार्फत सर्वत्र चर्चा झ ाली, मीडियाने या प्रश्नाचा पाठपुरावा केला त्यावेळी एक नैतिक जबाबदारी म्हणून, कॉग्रेस पक्षाचा एक शिपाई म्हणून तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी स्वत:हून राजीनामा दिला. त्यांच्याकडे तो मागितला गेला नाही. 1995-99 या काळात पुण्याच्या व्यास बिल्डरने केलेला घोटाळा तुम्हा-आम्हाला माहीत आहे, त्याचा तपशील माझ्याकडे आहे. त्यावेळी आपणही नैतिकता स्वीकारुन राजीनामा दिला पाहिजे असे कुणाला वाटले नाही. त्याचप्रमाणे त्या काळात डाळीचा देखील घोटाळा झाला होता. त्यावरुन एक म्हण तयार झाली होती की, "दाल में कुछ काला है" "अरे पूरी दाल काली है".

(गोंधळ)

हे आपल्याला टोचायला लागले कां?

(गोंधळ)

सभापती महोदय, मी विषयाला धरुन बोलत आहे. मी कुठेही विषय सोडलेला नाही....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काल आम्ही हा प्रस्ताव दिल्यानंतर आपण आम्हाला सूचना केली की, फक्त आदर्श या विषयापुरताच हा प्रस्ताव सीमित असावा. त्यामुळे आपण केलेल्या सूचनेनुसार आजच्या प्रस्तावामध्ये बाकीचे विषय वगळण्यात आले. तेव्हा या चर्चेच्या अनुषंगाने माननीय सदस्यांकडून मागील उणे-दुणे काढावयाचे ठरविले तर ते योग्य होणार नाही. ही चर्चा आदर्शपुरतीच सीमित राहिली पाहिजे. जर समोरच्या बाजूने इतर विषय उपस्थित करण्यात आले तर आमच्या बाजूने देखील इतर विषय उपस्थित होतील. आणि मग त्या पध्दतीने चर्चा सुरु होईल. त्या चर्चेला आपण परवानगी द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जो विषय उपस्थित केला आहे, त्या संदर्भात न्यायालयीन चौकशी झालेली आहे व न्यायालयाने आपला निर्णय दिलेला आहे. तेव्हा त्या संदर्भात आपण पुन्हा विषय उपस्थित केल्यास त्यामुळे न्यायालयाचा अवमान होईल हे आपण समजून घ्यावे.

**सभापती** : काल माननीय विरोधी पक्षनेते व अन्य माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये 3 प्रस्ताव दिले होते. त्या प्रस्तावामध्ये आदर्श व्यतिरिक्त इतर विषयांचे संदर्भ होते. त्यावेळी मी नियम 97 अन्वये चर्चा करण्यासाठी हा प्रस्ताव स्वीकारतांना माननीय विरोधी पक्षनेते व अन्य माननीय सदस्यांना सांगितले की, या नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या तिन्ही प्रस्तावांमध्ये अन्य विषयांचे संदर्भ जरी असले तरी आदर्श व्यतिरिक्त अन्य विषयांच्या संदर्भातील प्रस्ताव मी स्वीकारणार नाही. त्या दृष्टीने आपल्याला याठिकाणी चर्चा करावयाची आहे. हे नकळत असलेले बंधन आपण स्वीकारले आहे, त्यामुळे त्याच्या अवती-भोवती आपण चर्चा करणे योग्य होईल असे मला वाटते.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. आपण कोणत्या रंगाच्या चष्म्यामधून पहात आहात यावर सर्व अवलंबून आहे. मी याठिकाणी समर्थन करण्यासाठी उभा नाही. परंतु आपण अर्धवट स्वरुपामध्ये समर्थन करीत आहात याचे वाईट वाटते. याठिकाणी आपण लोकशाहीच्या गोष्टी करावयाच्या, नैतिकतेच्या गोष्टी करावयाच्या व प्रथा, परंपरेच्या गोष्टी करावयाच्या. आणि ज्यावेळी चार बोटे आपल्याकडे येतात त्यावेळी आपण कोणत्या प्रथा परंपरा पाळता असे विचारले गेल्यानंतर हात वर करणे बरोबर नाही.

(माननीय सदस्य श्री. विनोद तावडे बसून बोलतात)

मला असे वाटते की, ते 100 फ्लॅट आपण मला दाखविले तर त्यातील एक फ्लॅट माझ्याकडे ठेवीन आणि बाकीचे 99 फ्लॅट आपल्याला देऊन टाकीन.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी बसून बोललेले रेकॉर्डवर येणार नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी विषयाला धरुन बोलत आहे. मी सुरुवातीला सांगितले आहे की, या प्रश्नाची व्याप्ती लहान नाही आणि ही जर वेळ आली असेल तर देशाच्या सर्व सभागृहांनी....

(यानंतर श्रीमती थोरात)

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

देशाचे राजकारण आणि खऱ्या अर्थाने या देशाची लोकशाही या मंथनातून स्वच्छ होत असेल तर मला असे वाटते की, तुम्हाला आणि मला ते केले पाहिजे. किंबहुना तुमची आणि माझी तीच जबाबदारी आहे. म्हणून या भावनेतून या सगळया गोष्टीचा उल्लेख करण्याचा प्रयत्न करीत आहे. हेत्वारोप करण्याचा माझा उद्देश नाही.

सभापती महोदय, या विषयावर बोलत असताना सगळयात पहिल्यांदा असा आरोप करण्यात आलेला आहे की, सरकारने आरक्षण बदली करुन या सोसायटीला परवानगी दिली. मला या ठिकाणी असे विचारावेसे वाटते की, यापूर्वी असे कधी झाले नाही काय, या देशातील इतर राज्यांमध्ये असे झाले नाही काय, फक्त महाराष्ट्रात आणि याच सोसायटीच्या बाबतीत असे झालेले आहे काय? तर त्याचे उत्तर नाही असे आहे. एमआरटीपीच्या ॲक्ट 1996 च्या कलम 37 अन्वये शासनाला हा अधिकार आहे आणि तो या देशाच्या घटनेने सर्व राज्यांना दिलेला आहे. या कलमाच्या आधीन राहून एखाद्या गोष्टीचे आरक्षण बदलले गेले असेल तर त्याचे समर्थन आपल्याला सगळयांना कायद्याच्या चौकटीत राहून करावे लागेल आणि जर अशा पकारे समर्थन केले गेले नाही तर माझा प्रश्न असा आहे की, वरळी कॅम्पमध्ये जी हाऊसिंग सोसायटी झालेली आहे त्यामध्ये सगळयांचे फ्लॅट्स आहेत. सन्माननीय कै. प्रमोद महाजनांचा फ्लॅट आहे. सन्माननीय श्री. मुंडेचा फ्लॅट आहे. सन्माननीय श्री. गडकरींचा सुध्दा फ्लॅट आहे. बाकीच्यांचे सुध्दा फ्लॅट्स आहेत. ती जागा पोलिसांच्या हाऊसिंग सोसायटीसाठी आरक्षित ठेवण्यात आली होती मग तिचे आरक्षण कां बदलण्यात आले.? त्या जागेचे आरक्षण कुठच्यातरी कायद्याचा आधीन राहून केले असेल. सभापती महोदय, माझी नम्रपणे विनंती आहे की, फ्लॅट घेतले ते कोणी घेतले यासंबंधीची सगळी चौकशी होईलच आणि ती व्हायलाच पाहिजे. "दूध का दूध, पानी का पानी" व्हायलाच पाहिजे याबद्दल दुमत नाही. सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये आपण सुदैवी आहोत. गेल्या 65 वर्षामध्ये एकदाच सरकार बदलले आहे. परंतु ते बदलले होते. या सगळया खात्यांचे अधिकारी बदललेले आहेत.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे खरे आहे की, इतकी तात्काळ गरज काय होती? की, या सोसायटीसाठी सीआरझेडचा क्लीअरन्स मिळाला. एन्वायरमेंटचा क्लिअरन्स न मिळता तो मिळेल असे गृहीत धरुन त्या ठिकाणी परवानगी देण्यात आली. या सगळया गोष्टींच्या मुळाशी जाणे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

गरजेचे आहे.सभापती महोदय, मला या ठिकाणी नम्रपणे सांगावेसे वाटते की, "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो." हे आपल्या लक्षात आलेले आहे. या काळाला आपण कसे आवरणार आहोत? सनदी अधिकाऱ्यांना जी कवच कुंडले मिळालेली आहेत. त्या कवचकुंडलाच्या आधारे ते असे समजत असतील की, आम्ही हा देश जसा पाहिजे त्या पध्दतीने विकायला काढू. जसा पाहिजे तसा तो आम्ही वापरु. सभापती महोदय, मला तर या गोष्टीचे आश्चर्य वाटते की, नेहमी राजकारण्याचीं मुले आणि राजकारण्याचे नातेवाईक यांचीच चर्चा होते. ती व्हायलाही पाहिजे. त्यांना सुध्दा ताम्रपत्र दिलेले नाही. मी त्यांचे समर्थन अजिबात करीत नाही. पण त्याचबरोबर अधिकाऱ्यांच्या मुलांना अधिकाऱ्यांच्या बायकांना आणि अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना कवचकुंडले दिलेली आहेत काय? मला यासंदर्भात उलट प्रश्न विचारावयाचा आहे. 1999 सालच्या पत्रांचा संदर्भ या ठिकाणी देण्यात आला. ती पत्रे माझ्याकडे सुध्दा आहेत. त्या पत्रांचा संदर्भ मी या ठिकाणी देत नाही. नाही तर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य पुन्हा असे म्हणतील की, भाई आपण पुन्हा ते सगळे उगाळत आहात. म्हणून मी ते उगाळणार नाही.

सभापती महोदय, माझा साधा आणि सरळ प्रश्न असा आहे की, मग ते सन्माननीय माजी मुख्यमंत्री असतील, सन्माननीय महसूल मंत्री असतील किंवा आणखी कोणी सन्माननीय मंत्री असतील त्यांना ती बाब योग्य आहे की नाही हे सांगण्याचे काम कोणी करायचे.? एखाद्या सन्माननीय आमदारांचे पत्र गेले, एखाद्या नगरसेवकाचे पत्र गेले, किंवा एखाद्या सर्व सामान्य माणसाचे पत्र गेले की, आमच्या विभागामध्ये अमुक ही योजना करण्यात यावी. अशा वेळी ती योजना कशी होणार नाही या पध्दतीने टिप्पणी लिहिणारे हे सगळे अधिकारी असतात.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

त्यांच्या बाबतीत अशा प्रकारच्या टिप्पण्या का लिहिल्या गेल्या नाहीत ? म्हणून हे सगळे जाणून घेणे गरजेचे आहे. या सगळ्या गोष्टींची या ठिकाणी उकल होणे गरजेचे आहे. तरच या चर्चेला खऱ्या अर्थाने तुम्ही आम्ही एकत्रित काही तरी न्याय दिला असे होईल असा माझा स्वत:चा समज आहे. म्हणून मी सुरुवातीलाच सांगितले की, त्या त्या वेळी काय झाले एवढाच फक्त प्रश्न नाही. विरोधी पक्षाला बोलण्याची संधी आहे. कारण 62 वर्षापैकी 57 वर्षे आमचा पक्ष सत्तेवर होता. काही असेल तर आपणही काढा, काही हरकत नाही. परंतु हे करीत असताना हे कोठे तरी थांबविण्यासाठी आपल्याला काय करावे लागेल याची कधी तरी चर्चा आपण करणार आहोत की नाही असा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी या आरक्षणाच्या बाबतीत बोलत असताना, या सोसायटीच्या बाबतीत बोलत असताना या ठिकाणी दोन गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या पत्रांचा उल्लेख केला ती 2003 सालातील पत्रे मी सुध्दा पाहिलेली आहेत.. 2003 सालातील दोन महिन्यातील ती पत्रे आहेत. हे खरे आहे की, तितकी तत्परता त्यांनी दाखविली. या ठिकाणी बोलत असताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 28 एप्रिल आणि 5 एप्रिल असा उल्लेख केला. तो उल्लेख 3 एप्रिल आणि 28 एप्रिल असा आहे. संरक्षण खात्याचे माझ्याकडे जे पत्र आहे ते मला माहितीच्या अधिकाराखाली मिळाले आहे. संरक्षण खात्याने त्या ठिकाणी भिंत बांधली होती आणि ती भिंत बांधल्याचे जेव्हा शासनाच्या लक्षात आले तेव्हा ती भिंत का पाडू नये अशा प्रकारचा जेव्हा पत्रव्यवहार झाला तेव्हा संरक्षण खात्याला असे विचारण्यात आले की, ही जागा तुमची आहे काय, जर नसेल तर आपण भिंत कशी बांधता ? त्यासंदर्भात संरक्षण खात्याने स्पष्टपणे पत्र दिले आहे की, त्यांच्या शेड्युल 6 प्रमाणे ही जागा त्यांची नाही. अशा प्रकारचे पत्र माझ्याकडे आहे. सभापती महोदय, हे पत्र पाहिजे तर मी आपल्यामार्फत माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या माहितीसाठी पाठवून देईन.

सभापती महोदय, एक महत्वाची गोष्ट आहे ज्याचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला की, त्या ठिकाणी 60 मीटरचा रस्ता 18 मीटरवर येतो आणि त्याचा सेटबॅक या ठिकाणी

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. भाई जगताप ...

दिला जातो. त्याचा एफएसआय या ठिकाणी दिला जातो. तसा तो देता येत नाही. त्यासाठी काही प्रक्रिया आहे. त्यासाठी काही कायदेशीर तंत्र आहे. ते कोठेच वापरण्यात आले नाही. बाजूचा बॅकबे आगार आहे त्या आगाराची जी जागा होती त्याचा सेटबॅक, त्याचा एफएसआय या ठिकाणी देण्यात आला. तो कसा दिला गेला, का दिला गेला, कशासाठी दिला गेला ? म्हणून मी आपल्या त्या मताशी पूर्णत: सहमत आहे की, ज्या ज्या टेबलावर ती फाईल गेली त्या टेबलाप्रमाणे ते एक एक माळा वर करत गेले. यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. मी या ठिकाणी समर्थन करण्याचे कारण नाही. पण मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितों की, कारगीलमधील शहिदांच्या विधवांचा उल्लेख या सोसायटीमध्ये कोठेही माझ्या निदर्शनास आला नाही. आपण म्हणाला त्याप्रमाणे एक उल्लेख नक्कीच आहे. 1999 साली ज्यावेळी हा प्रस्ताव सुरु झाला त्यावेळी हा प्रकारच नव्हता. त्यावेळी कारगील हा विषयच नव्हता हे आपणा सर्वांना मान्यच करावे लागेल. म्हणून आपण त्या चष्म्यातून पाहतो. या ठिकाणी समर्थन करण्यासाठी किंवा कोणाची भूमिका योग्य आहे, अयोग्य आहे हे सांगण्यासाठी मी उभा नाही. परंतु आज मीडियामध्ये आणि बाहेर संपूर्ण देशामध्ये ज्या पध्दतीचे परसेप्शन होत आहे की, हे असे झाले आहे आणि हे लाटायला निघाले का, हे असे झाहे, हे करायला निघाले का ते पाहता खऱ्या अर्थाने आपणा सगळ्यांच्या राजकीय जीवनासाठी हे योग्य राहणार नाही. अशा प्रकारच्या विचार कोणत्याही राजकारण्यांनी कधीही केल्याचे मला तरी आठवत नाही. म्हणून मला या ठिकाणी नम्रपणे सांगावेसे वाटेल की, मीडिया असेल किंवा जी प्रसार माध्यमे आहेत ती खऱ्या अर्थाने आज वेगळ्या पध्दतीने काम करीत आहेत. आम्ही त्याचे स्वागत करतो. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. त्यांना आम्ही जेव्हा समाजाचा चौथा स्तभ म्हणतो तेव्हा हा स्तंभ जितका मजबूत होईल तितका समाज मजबूत होईल. याबद्दल कोणाच्या मनामध्ये शंका असता कामा नये. माझ्या मनामध्ये सुध्दा शंका नाही. परंतु एखादी गोष्ट भावनिक करुन ती भावना किती योग्य आहे किंवा ती भावना आहे का किंवा ती गोष्ट आहे का याच्या मुळाशी सुध्दा जाणे गरजेचे आहे असे मला वाटते. म्हणून या आदर्श प्रकरणाकडे एक प्रकरण म्हणून पाहू नये. मघाशी मी कर्नाटकचा उल्लेख केला त्यावेळी काही सन्माननीय सदस्य चिडले. मला असे विचारावयाचे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

आहे की, या ठिकाणी 100-150 कोटी रुपयांचा किंवा दीड रुपयाचा जरी घोटाळा झाला तरी तो घोटाळाच आहे. कर्नाटकमध्ये जवळजवळ 1500 कोटी रुपयांचा घोटाळा आहे. आता मी ते वाचत नाही. माझ्याकडे ते सर्व आहे. परंतु आपण सांगितले त्यामुळे मी त्या गोष्टीकडे जाणार नाही. या ठिकाणी बोट दाखवित असताना मलाही कळते की, या ठिकाणी काय चालले आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 16:55

श्री.भाई जगताप....

म्हणून मी त्या मूळ प्रश्नावर येईन. आम्ही ज्या प्रशासनाची नेहमी दुहाई देतो, ज्या प्रशासनाबद्दल असे बोलतो की, प्रशासन नेहमी गतिशील असले पाहिजे. परंतु ही गती प्रशासनाची राहिली तर ते योग्य नाही. त्यावेळी सचिवांनी प्रशासकाच्या लक्षात आणून दिले पाहिजे होते. सभापती महोदय, आपला आदेश आम्ही नेहमी पाळतो. परंतु आज थोडीशी गडबड झाली.

**सभापती** : कधी कधी गडबड होते.

श्री.भाई जगताप : कधी कधी होते, लोकशाहीमध्ये प्रथा, परंपरांबद्दल चर्चा करतो. सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा मान सन्मान आपल्याकडून ठेवला जातो. परंतु माननीय सभापती बोलत असताना आम्ही त्यांच्या अंगावर गेलो असे बोलणे कितपत योग्य आहे ? याबद्दल मलाही अंतर्मूख होऊन विचार करावा लागेल, समोरचे सन्माननीय सदस्य सुध्दा तसा विचार करतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. या देशाची लोकशाही, या देशात बोकाळलेला भ्रष्टाचार आणि या भ्रष्टाचाराचे समर्थन करणारी सर्व यंत्रणा, या यंत्रणेवर ख-या अर्थाने आपल्याला आघात करता आले तर, ही यंत्रणा तुम्हाला आम्हाला दुरुस्त करता आली तर मला वाटते की, येणा-या पिढया तुम्हाला आम्हाला नक्कीच धन्यवाद देतील. या देशातील 60 टक्के तरुणांचा उल्लेख करीत असताना, 2020 साली भारत हा देश महासत्ता होईल असे स्वप्न तुम्ही आम्ही पहातो. त्या स्वप्नाच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. पण अशी परिस्थिती झाली तर 2020 साली देश महासत्ता होण्याचे दूरच राहील. जे सनदी अधिकारी आहेत तेच फक्त महासत्ता होतील. बाकीच्या सर्वांना असेच फिरावे लागेल असा माझा स्वत:चा अंदाज आहे.

मी मघाशी कवचकुंडलांचा उल्लेख केला होता. सनदी अधिका-यांच्या सर्व्हिस कंडिशन्समध्ये अनेक गोष्टी आहेत. याठिकाणी नेहमी सांगितले जाते की, सनदी अधिका-यांवर कारवाई करण्याचे अधिकार राज्य सरकारला नाहीत. हे काही अंशी बरोबर आहे. देशाच्या घटनेचा व लोकशाहीच्या चौकटीचा आदर तुम्हाला आणि आम्हाला आहे. परंतु त्यांनी जर एखादी चुकीची गोष्ट केली तर त्यांच्या सर्व्हिस कंडिशन्समध्ये ती बाब नमूद केलेली आहे. त्यांनी जर चुकीचे निर्णय घेतले, त्यांनी जर राज्याचे, देशाचे नुकसान केले, त्यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी असा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ KTG/

श्री.भाई जगताप.....

प्रकार केला तर राज्य शासन त्यांच्याविरुध्द कारवाई करु शकते, अशाप्रकारे त्यांच्या सर्व्हिस बुकमध्ये नमूद केलेले आहे. मग अशी कोणती गोष्ट आहे की, शासनाने त्यांच्याशी नरमाईची भूमिका घेतलेली आहे ? मी शासनाचे आभार मानतो, शासनाने या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करुन काही अधिका-यांच्या बाबतीत शो कॉज नोटीस दिलेली आहे. (अडथळा) त्यामध्ये त्यांच्या उत्पन्नाचा उल्लेख आहे. (अडथळा) यामध्ये तुम्ही आणि आम्ही ठोस विचार केला पाहिजे. या देशाच्या लोकशाहीला आज घुसळून त्यातून जर अमृत निघत असेल तर तुम्ही आणि आम्ही ते करण्यास काही हरकत नाही. एकमेकावर शिंतोडे उडविण्यापेक्षा, अर्थात याचा जराही असा अर्थ लावू नये की, मी या गोष्टीचे समर्थन करीत आहे. समर्थन करण्याचे मला काहीही कारण नाही. परंतु याबाबत देशभरामध्ये जो समज आहे त्याबाबत खरे काय आहे ते लोकांसमोर जाणे गरजेचे आहे, त्यादृष्टीकोनातून मी माझ्या भावना व्यक्त केल्या आहेत. या भावना व्यक्त करताना कोणालाही दुखविण्याचा हेतू नव्हता, हे मला मुद्दाम सांगावयाचे आहे. परंतु हे सर्व मांडत असताना, खरे बोलत असताना कोणाची थोडीशी अडचण होत असेल तर माझा नाईलाज आहे.

ज्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते बोलत होते त्यावेळी अनेक गोष्टी ऐकल्यानंतर आमच्याही ज्ञानात भर पडत होती. कदाचित या माध्यमातून राज्याच्या 11 कोटी जनतेला सुध्दा कळेल.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 17:00

श्री. भाई जगताप...

हा आईसबर्ग फार मोठा आहे असे मी म्हणेन. सभापती महोदय, आपण मला माझे विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. आपण सर्वांनी माझे भाषण शांतपणे ऐकून घेतले. फक्त मी एकच सांगू इच्छितो की, माझे नाव भाई असले तरी मी अभ्यास करणारा भाई आहे. म्हणून आम्ही दोन्ही भाई विधानसभेतून विधानपरिषदेमध्ये आलो आहोत. या ठिकाणी न्यायालयाचा उल्लेख करण्यात आला. न्यायालयाचा अवमान करण्याचा माझा हेतू असूच शकत नाही. या प्रकारातून काही लोक सहीसलामत बाहेर निघतील, त्यांच्या करियरवर शिंतोडे उडालेले आहेत...(अडथळा)... सुपारी तिकडची असते, ती आमच्याकडे असण्याचे कारण नाही. सभापती महोदय, मी पुनश्च आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मला बोलण्याची जी संधी दिली त्याबद्दल सर्वप्रथम सभापती महोदय, मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फंडकर यांनी आपल्या भाषणामध्ये अनेक मुद्दे मांडले. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांचे भाषण देखील मी ऐकले. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे आभार यासाठी मानतो की त्यांनी आपल्या भाषणामध्ये शेवटी असे सांगितले की, या आदर्श सोसायटी प्रकरणाची चौकशी करण्यासाठी या सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची समिती नेमा. याचा अर्थ या प्रकरणामध्ये त्यांनी राजकारण आणले नाही. त्यांनी या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांवर विश्वास ठेवला. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे अभ्यासू असल्यामुळे ते आमच्यावर घसरले. ज्याला काविळ होते त्याला दुनिया पिवळी दिसते असे म्हणतात, खाई त्याला खवखवे असेही म्हणतात. मग एकदा भ्रष्टाचाराचे प्रकरण पुढे आल्यानंतर त्याचे समर्थन सन्माननीय सदस्य कशासाठी करीत आहेत ? मग सुरेश प्रभू असोत की अन्य कोणी असोत, सर्वांना समान न्याय असेल. त्यामधून कोणीही सुटणार नाही. म्हणून या प्रकरणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची समिती नेमण्याची मागणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केली. त्या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे देखील असतील. मग डाळीमध्ये काय होते, ती काळी होती का ? या सारख्या बाबीमध्ये त्यांना जाण्याची आवश्यकता नव्हती...(अडथळा).. सभापती महोदय, आपण जर मला वेळ दिलात तर 1960 पासूनचे काँग्रेसचे 50 भ्रष्टाचार मी उघडकीस आणले नाही तर माझे नाव रामदास कदम म्हणून सांगणार नाही...

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी कुणाला पाठीशी घालतो, खाई त्याला खवखवे असा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. मग कर्नाटक जास्त खवखवत होते का ? कशासाठी करता ? सभापती महोदय, आपण जी चौकट घालून दिलेली आहे आणि जिच्या आधारे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भाषण केलेले आहे त्या चौकटीचा आदर सर्वांनी करावा असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : हरकतीचा मुद्दा हा अल्पकालीन चर्चेचा जो विषय आहे त्याच्या मर्यादेत असला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी कोणाचे नाव घेतलेले नाही. मी नियमांचे उल्लंघन केलेले नाही. आपण बसण्याची विनंती केल्यामुळे मी थांबलो होतो.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, एक गोष्ट मला याठिकाणी सांगितली पाहिजे. या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी जाहीर सभा घेऊन काही वक्तव्ये केली आहेत. आम्ही त्यांचे भाषण दूरचित्रवाणीवर पाहिले आणि ऐकले आहे. त्यांनी आपल्या भाषणात जाहीरपणे सांगितले की, मला मुख्यमंत्री पदावरुन दूर करण्यासाठी माझी सुपारी दिली गेली. सभापती महोदय, ज्यावेळी सन्माननीय श्री.अशोक चव्हाण यांच्यासारखी मुख्यमंत्री पद भूषविलेली व्यक्ती जाहीरपणे सांगते की, माझी सुपारी दिली गेली, मला उद्ध्वस्त करण्याची सुपारी दिली गेली. म्हणून आमची मागणी आहे की, यामागे नेमका कोणाचा हात आहे,त्याबाबत चौकशी झाली पाहिजे. त्यांना मुख्यमंत्री पदावरुन दूर करण्याचे प्रयत्न कोणी केले, सुपारी देण्याचे काम कोणी केले? त्यांनी स्वत:च सांगितले की, माझी सुपारी दिली गेली. ही व्यक्ती त्यांच्याच पक्षातील आहे. शिवसेना किंवा भारतीय जनता पक्षातील नाही. म्हणून मी म्हटले की, खाई त्याला खवखवे. ज्यांना ज्यांना मुख्यमंत्री व्हायची इच्छा आहे त्यांनीच ही सुपारी दिलेली आहे. विरोधी पक्षातील सदस्य मुख्यमंत्री होऊ शकतो का?

सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. सन्माननीय श्री.अशोक चव्हाण यांनी माझी सुपारी देणाऱ्याची चौकशी झाली पाहिजे असे सांगितले. आम्ही देखील मागणी करीत आहोत की, त्यांना उद्ध्वस्त करण्याची सुपारी ज्यांनी दिली त्याबाबत चौकशी झाली पाहिजे. आम्ही त्यांच्या मागणीचे जोरदार समर्थन करीत आहोत.

सभापती महोदय, आदर्श घोटाळा हा भयानक मोठा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काल सभागृहात टी शर्ट घालून प्रवेश केला होता. त्या टी शर्टवर 'आदर्श' असा उल्लेख केलेला होता. आपण विनंती केल्यामुळे त्यांनी तो टी शर्ट अंगावरुन काढून टाकला. आपल्या निदेशाचे पालन करणे हे आमचे कर्तव्यच आहे. आम्ही नेहमीच आपला आदर करीत आलो आहोत. मला भीती वाटते की, भविष्यामध्ये शासन एखादा कायदा करुन ज्या ज्या ठिकाणी 'आदर्श' असे नाव लिहिले असेल ते नाव मिटवून टाकण्याची सक्ती करते की काय? इतकी आदर्श या शब्दाची आता सगळ्यांना भीती वाटू लागली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 17:05

श्री.रामदास कदम.................

सभापती महोदय, विरोधी पक्षाने माननीय सभापतींचा मान राखलाच पाहिजे. आम्ही माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या अंगावर चाल करुन जात नाही. शासनाचा निषेध करण्यासाठी आम्हाला वेलमध्ये धाव घ्यावी लागते. माननीय पीठासीन अधिकाऱ्यांना संरक्षणाची गरज नाही. सभागृहातील सगळेच माननीय सदस्य त्यांचा मान राखतात व भविष्यातही राखतील. नाईलाजाने शासन आम्हाला त्याठिकाणी जाण्यास प्रवृत्त करते. अशा प्रकारचा घोटाळा झाला नसता तर आम्हाला वेलमध्ये धाव घेण्याची गरज भासली नसती. आदर्श घोटाळा हा साधा घोटाळा नाही. अट्टल गुन्हेगारांना लाजवेल इतके महापाप घडलेले आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. या घोटाळयामध्ये जवळजवळ 34 आय.ए.एस.अधिकारी व 13 आय.पी.एस.अधिकारी सामील आहेत. असे असताना माननीय सदस्य श्री.भाई जगताप का इतक्या पोटतिडकीने बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत हे आम्हाला कळलेले नाही.

नंतर 3व्ही.1...

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ........

17 आजी व माजी आमदारांची नावे आहेत आणि बाकीचे बेनामी सदनिकाधारक जे आहेत ते पडद्यामागे आहेत. काही सभासदांना तर माहिती सुध्दा नाही की माझा आदर्श सोसायटीत फ्लॅट आहे. ज्यांनी आयुष्यात कधी मुंबई पाहिलीच नाही अशा लोकांची सुध्दा या सोसायटीत नावे आहेत, म्हणूनच हा साधा घोटाळा नाही हे मी पुन्हा सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.....अडथळा......आपला पक्ष कसा चांगला आहे, कसा शुध्द आहे हे सांगण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न, आपण त्या पक्षाचे शिपाई म्हणून चांगला केला हे मी सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. सर्वात महत्वाची बाब म्हणजे नौदलाच्या तळाच्या बाजूला असलेल्या या जागेवर इमारत बांधण्यासाठी मुळात परवानगी मिळालीच कशी हाच प्रश्न पडतो. या निमित्ताने मी प्रामुख्याने दोन गोष्टी येथे मांडणार आहे. त्या निमित्ताने आदर्श सोसायटी फेज-1 आणि फेज-2 बाबत मला सांगावयाचे आहे. कारण आदर्श सोसायटीचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर दुसरा टप्पा घेण्यासाठी देखील पावले उचलण्याची तयारी केली होती, त्यासाठी जागेची मागणी केली होती व त्याच प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे माझ्याकडे आहेत. पहिल्या फेजमधील भ्रष्टाचाराचे मजले यशस्वी झाल्यानंतर पुन्हा दुसरा फेज चालू होणार होता, ही बाब अतिशय भयानक आहे. अशा प्रकारे यामध्ये जवळपास पाच मुख्यमंत्र्यांच्या हाताखालून ही फाईल गेली. या प्रवासात मूळ 6 मजल्याची असलेली इमारत 31 मजल्यापर्यंत गेली. प्रथम श्री. शिवाजीराव निलंगेकर, त्यानंतर माननीय श्री. नारायण राणे, माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे, माननीय श्री. विलासराव देशमुख आणि शेवटचे मुख्यमंत्री माननीय श्री. अशोक चव्हाण हे पाच मुख्यमंत्री या काळात होऊन गेले व त्यांच्या हातून या सोसायटीची फाईल प्रवास करीत गेली. अशा प्रकारे या सोसायटीच्या मजल्यांचे शेपूट 6 मजल्यापासून 31 मजल्यापर्यंत वाढत गेले, 100 मीटरपर्यंत पोहचले. या सोसायटीशी संबंधित एक पत्र देखील माझ्याकडे आहे. या भागातील सदनिकेचा पर स्क्वेअर फुटाचा दर 80 हजार रुपये एवढा आहे. दि. 26 सप्टेबर, 2005 रोजी म्हणजेच माननीय श्री. विलासराव देशमुख यांच्या काळात या सगळया मान्यता संपल्या व तेथेच या फाईलचा प्रवास संपला. 27 जानेवारी, 2003 रोजी माननीय सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री झाले. त्या काळात कार्यरत असलेले माननीय श्री. शिवाजीराव निलंगेकर यांनी त्या फाईलमध्ये शेवटची मान्यता दिली व त्यासंबंधीची

....2...

श्री. रामदास कदम .........

कागदपत्रे सुध्दा माझ्याकडे आहेत. विशेषत: सभागृहात चर्चा करीत असताना ज्यांच्या स्वत:च्या अथवा नातेवाईकांच्या सदनिका या सोसायटीत आहेत अशा सर्वांची नावे सभागृहात घेतली गेली. पण त्या व्यतिरिक्त याच आयएएस अधिकाऱ्यांची नावे आणखी कोणकोणत्या सोसायटीत आहेत ती नावे सुध्दा मी आपल्या परवानगीने सभागृहात वाचणार आहे. जेणेकरुन आयएएस अधिकारी काय करतात हे संपूर्ण राज्यातील जनतेलाही कळू शकेल.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ ST/ प्रथम श्री.पी.एफ.खर्चे........ 17:15

श्री.रामदास कदम...

माजी लष्कर प्रमुख श्री.एन.जी.वीज, डॉ.डी.के.शंकरन, सर्वश्री.संगितराव, जयराज फाटक, उत्तम खोब्रागडे, रामानंद तिवारी यांची सुध्दा या आदर्श घोटाळयात नावे आहेत. ही जी प्रमुख नावे आहेत ती नावे आपल्याला काय सांगतात ? आदर्श सोसायटीत ज्यांची घरे आहेत, अशा पाच अधिका-यांची दुस-याही सोसायटीत नावे आहेत. ही साधी गोष्ट नाही. ज्यांची या ठिकाणी घरे आहेत, त्यांची चौकशी करण्याची काय गरज आहे ? एका एका आयएएस आणि आयपीएस अधिका-यांचे 5-5, 3-3 ठिकाणी फ्लॅट आहेत, हे कळल्यानंतर त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे काय, त्यांना नोटीस देण्याची आवश्यकता आहे काय ? त्यामुळे यासंदर्भात शासनाकडून आम्हाला ठोस असे उत्तर हवे आहे. आपण या प्रकरणातील व्यक्तींवर किती दिवसात कारवाई करणार आहात, याची माहिती आम्हाला हवी आहे. श्री.एन.सी. वीज आणि दीपक कपूर हे लष्करातील अधिकारी आहेत. खरे म्हणजे त्यांच्यावर कोर्ट मार्शल झाले पाहिजे. हे लष्कराचे अधिकारी भ्रष्टाचारामध्ये गुंतले आहेत. देशाचे संरक्षण करण्याची ज्यांची जबाबदारी आहे, तेच जर भ्रष्टाचारामध्ये गुंतले असतील तर या देशाचे काय होईल ? याचा विचार न केलेला बरा. ही केवळ काँग्रेसचीच डोकेदुखी नाही तर प्रत्येकाने आपण काय करतो आहोत, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. ज्यांच्या हाती फाईल, त्याच्या हाती फ्लॅट, असे या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितलेले आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, आदर्श सोसायटीची जागा लष्कराची नाही. परंतु माझ्याकडे यासंदर्भातील कागदपत्रे आहेत. त्या कागदपत्रावरुन ही जागा लष्कराचीच आहे. 16 डिसेंबर, 1981 रोजीच्या पत्रानुसार लष्कराच्या अधिकाऱ्याने सीटी सर्व्हे व ब्लॉकच्या संदर्भात सहकार्य मागितले होते. त्यांनी आपल्या पत्रात असा उल्लेख केला होता की, ही जागा लष्कराची असल्यामुळे ती लष्कराला परत द्यावी म्हणजे ते सार्वजनिक हिताच्या दृष्टीने होईल. या पत्रामध्ये 'सार्वजनिक हित' हा जो शब्द वापरलेला आहे, तो महत्वाचा वाटतो. आदर्श सोसायटीचा प्रवास सन 1996 पासून सुरु झाला, असे नाही. माझ्याकडे माजी महसूल मंत्री, माजी मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीची काही पत्रे आहेत. दिनांक 4.9.1996 मध्ये आदर्शची फाईल तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांच्याकडे गेली होती. त्यावेळेस त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, ही जागा 1991 च्या सी.आर.झेड. कायद्यामध्ये

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम........

येत असल्यामुळे या सोसायटीला परवानगी मिळणार नाही. या पत्रावर महसूल मंत्र्यांची व उप सचिवांची देखील सही आहे. 1996 मध्ये ही जागा आदर्श सोसायटीला देता येणार नाही, अशा प्रकारचे जे कागदपत्र आहेत ते मी माननीय सभापती महोदयांना देणार आहे. परंतु माननीय मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी त्या पदावरुन गेल्यानंतर पुन्हा या फाईलला चालना मिळाली, ही वस्तुस्थिती आहे. दिनांक 3.3.2000 मध्ये डिफेन्सचे ऑफिसर श्री.गुरुस्वामी यांनी डिफेन्सच्या वतीने या सोसायटीला परवानगी दिलेली आहे व त्यांचा देखील फ्लॅट या आदर्श सोसायटीमध्ये आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

ज्याचे पेपर्स माझ्या हातात आहे. दिनांक 5.4.2000 रोजीचे लष्कर प्रमुखांचे पत्र आहे. त्यामध्ये उल्लेख आहे की, सदर जागा कुलाबा डिव्हीजनच्या अखत्यारीत असून डिफेन्स सीमा रेषेच्या बाहेर आहे" त्या लष्कर प्रमुखांचा देखील आदर्श सोसायटीमध्ये फ्लॅट आहे.

दिनांक 12 सप्टेंबर 2000 रोजीचे जिल्हाधिकाऱ्यांचे महसूल सचिवांना पत्र आहे. त्यामध्ये आदर्श सोसायटीमध्ये 39 सभासद आहेत. संरक्षण विभागात सेवेत असलेल्या अथवा सेवानिवृत्त प्रथम श्रेणीतील नौसेना, डिफेन्सचे अधिकारी यांना ही जागा देण्याबाबतचा उल्लेख आहे. दिनांक 26.11.2000 रोजीचे महसूल विभागाच्या सचिवांचे पत्र आहे. महसूल विभागाचे अवर सचिव श्री.घरत यांच्या नावाने सर्व नोटीफिकेशन्स निघाल्या आहेत. त्यांचा देखील आदर्श सोसायटीमध्ये फ्लॅट आहे. या अवर सचिवांनी प्रत्येक फाईलचा फॉलोअप केलेला आहे. तेव्हा या अवर सचिवांची देखील तातडीने चौकशी झाली पाहिजे. दिनांक 7.5.2001 रोजी प्रधान सचिव, महसूल यांनी मिलिटरी ऑफीसर्स सहकारी गृहनिर्माण संस्थेला बीबीआर ब्लॉक क्रमांक 6, कुलाबा विभाग, ही जमीन देण्याबाबतची शिफारस केलेली आहे. ते पत्र माझ्याकडे आहे. महसूल विभागाचे अवर सचिव श्री.घरत यांचे दिनांक 9 जुलै 2004 रोजीचे पत्र आहे. त्यामध्ये संरक्षण विभागाच्या ताब्यात असलेली जागा असा त्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे.

दिनांक 18.1.2003 रोजी 3758 चौ.मीटरच्या जागेची मंजुरी दिली आहे. त्या पत्रावर श्री.घरत यांची सही आहे. दिनांक 18.1.2003 रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरीचे पत्र दिले, त्याची प्रत माझ्याकडे आहे. केंद्रीय पर्यावरण विभागाने या सोसायटीला परवानगी नाही असे पत्र दिलेले आहे, त्याची प्रत माझ्याकडे आहे.

सभापती महोदय, 60 मीटरचा रस्ता 18 मीटर करण्यात आला. ही जागा लष्कराची आहे. एखाद्या ठिकाणी रस्ता लहान असेल तर तो मोठा करण्यासाठी आपण झोपडपट्टी उठवितो,बिल्डींग पाडतो. परंतु या ठिकाणी 60 मीटरचा रस्ता छोटा करुन तो 18 मीटर करण्यात आला. हे काम

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या सहीने झाले आहे, त्याची प्रत देखील माझ्याकडे आहे. ही जागा लष्काराच्या परेडसाठी आरक्षित असताना ते आरक्षण उठविण्यात आले. हॅलीपॅडसाठी आरक्षण होते, ते आरक्षण देखील उठविण्यात आले. तसेच बेस्ट डेपोचे आरक्षण होते, हे आरक्षण देखील उठविण्यात आले. त्याठिकाणी गार्डनचे आरक्षण होते, ते देखील उठविण्यात आले. माझ्याकडे त्या जागेच्या नकाशाची प्रत आहे. नौदलाच्या क्षेत्रा जवळील ही जागा आहे. संरक्षण विभागाच्या गोडावून जवळ ही जागा आहे. म्हणजे या इमारतीच्या दहाव्या मजल्यावरुन काही टाकल्यास संपूर्ण गोडावून उद्ध्वस्त होईल इतकी ही संवेदशनील जागा आहे. अशा जागांवरील सर्व आरक्षणे उठवून, नियम 33(1) बाजूला ठेवून शासनाने स्वत:ला असलेल्या अधिकाराचा वापर करुन नियमबाह्य काम केलेले आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ..

दिनांक 6.9.2005 रोजी एम.एम.आर.डी.ए.ला पत्र देण्यात आले होते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना अजून किती वेळ लागणार आहे?. त्यांनी दोन मिनिटांमध्ये भाषण संपवावे.

श्री.रामदास कदम :सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे दोन मिनिटांमध्ये माझे भाषण पूर्ण होणार नाही.या प्रकरणामुळे एका मुख्यमंत्र्यांना आपल्या पदावरुन जावे लागले आणि सरकार बदलले आहे. मला जर पुरेसा वेळ दिला नाही तर मी न बोलता खाली बसेन.

**सभापती** : आपण 22 मिनिटे बोलला आहात.

श्री.रामदास कदम : मला आणखी वेळ द्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.मला एक तास वेळ देण्यात यावा.

**सभापती** : एक तास देता येणार नाही.

श्री.रामदास कदम : आमच्या पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांचा वेळ मला देण्यात यावा.

**सभापती** : आपल्या पक्षातील अजून सहा सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे.

श्री.रामदास कदम : त्यांच्या ऐवजी मी बोलेन. आमच्या पक्षाच्या सन्माननीय सदस्याऐवजी जर मी बोललो तर आपली काही हरकत नाही ना ?

**सभापती** : माझी काही हरकत नाही परंतु आपल्या पक्षाच्या सहा सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे बोलण्यासाठी नावे दिलेली आहेत.

श्री.रामदास कदम : आमच्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची काहीही अडचण नाही.

**सभापती** : पाच सहा मिनिटांमध्ये आपण भाषण संपवावे.

श्री.रामदास कदम: तसे असेल तर अधिक न बोलता मी खाली बसेन.या ठिकाणी आमच्यावर अन्याय होता कामा नये. आमच्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचा वेळ मला देण्यामध्ये आपल्याला काय अडचण आहे ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना काय सांगावयाचे आहे काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,त्यांना का विचारले जात आहे ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ते पक्षाचे गट नेते आहेत

श्री.रामदास कदम : मी सांगितल्यानंतर आमच्या पक्षाच्या कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी मला बोलण्यासाठी वेळ द्यावा असे उठून सांगितलेले नाही.

**सभापती** : परंतु सन्माननीय सदस्यांनी त्यांची नावे माझ्याकडे पाठवलेली आहेत.

श्री.रामदास कदम : सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर आणि इतर सन्माननीय सदस्य त्यांचा वेळ मला द्यावा असे सांगत आहेत.तरीही आपण त्यांना विचारत आहात.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा आणि सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांचा बोलण्याचा वेळ सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांना द्यावा

**सभापती** : ठीक आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणामुळे राज्याच्या एका मुख्यमंत्र्याना राजीनामा द्यावा लागला आहे . इतर चर्चेच्यावेळी आपण बोलण्यासाठी मर्यादा घालत असता आणि त्यावेळी आम्ही आपल्या आज्ञेच्या बाहेर जात नाही परंतु मी आपल्याला नम्रपणे सांगतो की, या चर्चेसाठी आणखी दोन तास लागले आणि उद्या उत्तर ठेवले तरी चालेल परंतु या विषयी सविस्तर चर्चा झाली पाहिजे तसेच या प्रकरणात जे काही दोषी आहेत त्यांना शासन केले जाणार आहे अशा प्रकारचा संदेश लोकांपर्यंत गेला पाहिजे. दोन तीन दिवस आपण वाया घालवलेले आहे तेव्हा या चर्चेसाठी आणखी वेळ दिल्यास दोन दिवस आणखी कामकाज वाढवू

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या चर्चेला सुरुवात होऊन दीड तास झालेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे या सभागृहामध्ये एखाद्या विषयावर चार पास तास चर्चा करण्यासाठी आपण आम्हाला संधी दिली त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. अडीच तास चर्चा करावी असे जरी म्हटलेले असले तरी काही वेळेला एखादा महत्वाचा विषय असेल तर परिस्थितीनुसार अधिक वेळ चर्चेसाठी दिला जातो आपण आम्हाला आता सुध्दा खाली बसवू शकता परंतु मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. आपण जर पुरेसा वेळ दिला नाही तर माननीय सभापतींनी चर्चा आवरती घ्यावयास लावली असा जनतेपर्यंत संदेश जाईल आणि आदर्श सोसायटीच्या बाबतीत राज्यातील

2..



VTG/ ST/ D/ KGS/ प्रथम श्री. अजित शिगम 17.25

श्री.दिवाकर रावते ...

झोपडीत राहणा-या माणसापर्यंत असंतोष आहे असे असतांना या चर्चेला पुरेसा वाव दिला गेला नाही असा आपल्या माध्यमातून राज्यातील जनतेपर्यंत संदेश जाईल. तेव्हा आपल्या खुर्चीच्या सन्मानासाठी सन्माननीय सदस्यांना मुक्तपणे  बोलू द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. राज्यात असा प्रकार या पूर्वी कधीही घडला नव्हता हा प्रकार प्रथमच घडत आहे.सन्माननीय अजित पवार या ठिकाणी उप मुख्यमंत्री म्हणून बसलेले आहेत त्याचा आम्हाला आनंद झाला, हा भाग वेगळा आहे परंतु या प्रकारामुळे माननीय मुख्यमंत्री आणि सरकार बदलले आहे तसेच  दिल्ली पासून मुंबईपर्यंत हलकल्लोळ झाला आहे. माजी मुख्यमंत्र्यानी खालच्या सभागृहात जे काही मांडले आहे ते सुध्दा कोणाच्या तरी माध्यमातून कधी तरी समोर आले पाहिजे.या प्रकरणामध्ये त्यांनी गंभीर स्वरुपाच्या बाबी मांडल्या आहेत म्हणून या संदर्भात बोलत असतांना  वेळेचे बंधन घालू नये आणि या खुर्चीचा मान ,सन्मान राखावा,असे मला आपल्याला सांगावयाचे आहे. उगाचच अधिक वेळ चर्चा करावी असे आमचे मत  नाही. खालच्या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी काही निर्णय सांगितले आहे. परंतु या निमित्ताने आम्हाला काही मुद्दे मांडावयाचे आहेत या प्रकरणाची जेव्हा चौकशी होईल तेव्हा हे मुद्दे सुध्दा त्या चौकशीसाठी उपयोगी पडणार आहेत तेव्हा सदस्यांना बोलण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा.

**सभापती** : या सभागृहामध्ये एखाद्या प्रस्तावावर चार किंवा पाच तास सुध्दा चर्चा केलेली आहे. आता सुध्दा या विषयावर  दीड तास चर्चा  झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम 22 मिनिटे बोलले आहेत अजून त्यांना किती वेळ लागणार आहे  असे मी त्यांना विचारले होते. शिवसेनेच्या 6 सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे बोलण्यासाठी नावे दिली होती म्हणूनच मी त्यांना विचारले होते आणि त्यामध्ये काहीही गैर नाही. ठीक आहे सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी बोलण्यास सुरुवात करावी.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण याठिकाणी मला पुन्हा बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. दिनांक 6.9.2005 रोजी एमएमआरडीएला सचिवांकडून पुन्हा पत्र पाठविण्यात आले. त्यामध्ये म्हटले आहे की, "हा प्लॉट हेलिपॅडसाठी राखीव असल्यामुळे नागरी उड्डाण प्राधिकरण यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळविणे व ते जमा करणे आवश्यक आहे". परंतु एमएमआरडीएला ही सूचना दिल्यानंतर सुध्दा नागरी उड्डाण प्राधिकरण या विभागाकडून कोणतीही संमती मागविली गेली नाही. या लेखी पत्राची प्रत मी आपणाकडे पाठवितो.

सभापती महोदय, मी सभागृहाचा अधिक वेळ न घेता थोडक्यात माझे मुद्दे मांडणार आहे. बेस्टच्या वापरासाठी असलेली जागा संस्थेच्या मूळ भूखंडामध्ये वापरण्यास परवानगी देऊन पुन्हा एकदा अवर सचिव श्री. म्हात्रे यांनी बेस्टला अंधारात ठेऊन ती सर्व जागा देवून टाकली. यापूर्वी किमान त्या बेस्टला विश्वासात घेणे आवश्यक होते. झालेला निर्णय नंतर बेस्टला कळविण्यात आला, त्या संदर्भातील महसूल विभागाचे पत्र माझ्याकडे आहे. त्यामुळे बेस्टला विश्वासात न घेता कलम 50 चा वापर करुन ही जागा देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, मुंबई महानगरपालिकेचे अधिकार जर काढून घेतले नसते तर हा आदर्शचा घोटाळा झाला नसता. ही सर्व कार्यवाही झाल्यानंतर मुंबई महानगरपालिकेला फक्त माहितीसाठी कळविले गेले. आम्ही हा 60 फूटाचा रस्ता कमी केला, आम्ही हे आरक्षण उठविले आहे अशाप्रकारे मुंबई महानगरपालिकेला कळविले गेले. महानगरपालिकेकडे मंजूरीकरिता ही फाईल पाठविण्यात आली असती तर हा भ्रष्टाचार झाला नसता, हे मला याठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, ही जागा 10 कोटी 12 लक्ष 29 हजार 652 रुपयांना या संस्थेला देण्यात आली. जवळ जवळ ही जागा 50 कोटींची आहे. ही 50 कोटींची जागा एवढया कमी किंमतीमध्ये दिली गेली. एवढेच नाही तर माझ्याकडे असलेली अन्य कागदपत्रेही आपणास दाखवितो. ही इमारत केवळ रेसिडेंशिअल परपजकरिता बांधण्यात आली नाही तर त्यामध्ये 700 चौरस मीटर इतकी जागा कमर्शिअल परपजकरिता दिली गेली आहे. सभापती महोदय, नियमामध्ये काय तरतूद आहे याची चौकशी झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे.

(माननीय मंत्री श्री. नारायण राणे बसून बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KGS/ ST/

श्री. रामदास कदम....

आता माझ्याकडे जी माहिती आहे ती मी सभागृहापुढे ठेवीत आहे. ही माहिती कशी द्यावयाची हा माझा विषय आहे, हा आपला विषय नाही. आपण बसून कशासाठी बोलत आहात? जर काही बोलायचे असेल तर उठून बोला ना मला जे काही द्यावयाचे असेल ते मी देईन.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. रामदासभाई कदम, आपण माझ्याकडे बघून बोलावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याठिकाणी मंत्री महोदयांनी बसून बोलणे बरोबर नाही. यासाठी आपण पहिल्यांदा त्यांना ताकीद दिली पाहिजे.

**सभापती** : मी दोघांनाही सांगत आहे, आपण माझ्याकडे बघून बोलावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मंत्री महोदय माझ्या बाबतीत बसून बोलल्यामुळे मी त्यांच्याकडे बघून बोलत आहे. अन्यथा मला त्यांच्याकडे बघण्याची आवश्यकता नाही. आपण त्यांना ताकीद द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे, वेळ आल्यानंतर ती देण्यात येईल.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, नियमातील तरतुदीचे उल्लंघन करुन त्याठिकाणी कमर्शिअल परपजसाठी जागा देणे ही तरतूद नियमात आहे काय? म्हणून ज्यांनी हे नियमबाह्य काम केले आहे, त्यांच्यावर तात्काळ कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, दिनांक 13 जुलै 2005 रोजी पुन्हा एमएमआरडीएने कळविले आहे की, ती संरक्षण विभागाची जमीन नाही. त्याठिकाणी आयडीपी टॉवर, वर्ल्ड ट्रेड सेंटर यासारख्या उत्तुंग इमारती झालेल्या आहेत असा उल्लेख त्यामध्ये केलेला आहे. म्हणून याठिकाणी 1981 पासून सर्व कागदपत्रे आपणास दिलेली आहेत.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, सन्माननीय श्री. जयराम रमेश हे केंद्र शासनामध्ये मंत्री आहेत. त्यांनी नोटीस दिली आहे त्या नोटीसची प्रत माझ्याकडे आहे. नियमामध्ये आहे असे या ठिकाणी सांगण्यात येत असेल तर सन्माननीय केंद्रीय मंत्रिमहोदयांना वेड लागले म्हणून त्यांनी नोटीस दिली आहे काय? त्यांनी कशासाठी नोटीस दिलेली आहे. सभापती महोदय, सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री. जयराम रमेश यांच्या नोटिसीमध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, यामध्ये सीआरझेडचे पूर्णपणे उल्लंघन झ ालेले आहे. ही इमारत सात दिवसाच्या आत का तोडू नये, याचे उत्तर सात दिवसाच्या आत द्यावे, अशा प्रकारची नोटीस दिलेली आहे. ती नोटीस माझ्या हातात आहे. ही इमारत नियमबाहय आहे असे मी म्हणत नाही तर हे सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री. जयराम रमेश देखील म्हणत आहेत. ही नोटीस त्यांनी दिलेली आहे.

सभापती महोदय, श्री. सुभाष लाला यांच्या सासूचा आणि मुलीचा फ्लॅट आहे. खोब्रागडेंच्या मुलीचा फ्लॅट आहे. श्री. अशोक चव्हाण यांच्या सासूचा फ्लॅट आहे. मेव्हण्याचा फ्लॅट आहे. या सगळया मंत्र्यांच्या नातेवाईकाचे फ्लॅट आहेत. तसेच आयएएस अधिकाऱ्यांचे फ्लॅट आहेत. या सगळयांची चौकशी होईलच पण त्याबरोबरच उत्पन्नाची खोटी माहिती शासन दप्तरी देणारे सनदी अधिकारी आहेत. सभापती महोदय, सोसायटीच्या अभिलेखावर खोटी उत्पन्नाची माहिती देणाऱ्यांच्या विरुध्द भारतीय दंड संहिता कलम 167, 193, 199 अन्वये गुन्हे तात्काळ दाखल झाले पाहिजेत. कारण हे स्पष्ट झाले आहे. बेनामी फ्लॅट घेणाऱ्या तोतया व्यक्ती, संशयीत आढळून आलेल्या अधिकाऱ्यांनी शासकीय व सार्वजनिक फसवणुकीकरिता गुन्हेगारी कट रचून हे कृत्य केल्यामुळे या सर्वा विरुध्द कलम 419,420, 120 (ब) या प्रमाणे तातडीने कारवाई झाली पाहिजे अशी मागणी मी या ठिकाणी करतो. या प्रकरणामध्ये उक्त सहकार विभागाच्या अधिकऱ्यांनी त्यांच्या लेखा परीक्षकांनी गैरकृत्यास पाठिंबा दिला आहे, मदत केली आहे. शासकीय अभिलेख खोटा व दूषित तयार केला त्या सर्व अधिकाऱ्यांविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम 167 अन्वये तात्काळ कारवाई झाली पाहिजे.

सभापती महोदय, एका बाजूला नियमबाहय या आदर्श सोसायटीला परवानगी दिली आहे. आदर्श घोटाला पार्ट-2 बद्दल मी याठिकाणी मुद्दाम माहिती देत आहे. तत्कालीन सन्माननीय

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

श्री. रामदास कदम...

मुख्यमंत्री श्री. नारायण राणे यांचे त्यावेळचे खाजगी सचिव श्री. एस.एस.पाटील यांचे पत्र दि. 27 सप्टेंबर, 1999 चे आहे. ते मी आपल्याला वाचून दाखवितो. "सोबत सिंधुसागर को. हाऊसिंग सोसायटी व आदर्श को. हाऊसिंग सोसायटीच्या मुख्य प्रवर्तकांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केलेल्या विनंती अर्जा सोबत जोडून पाठवित आहे.सदरहू अर्जावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अहवाल त्वरित सादर करावा असे निदेश दिलेले आहेत. उपरोक्त सोसायटीच्या नस्त्या दोन दिवसामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अवलोकनार्थ व आदेशार्थ अभिप्रायासह या कार्यालयास सादर कराव्यात असे आपणास कळविण्याचे मला स्पष्ट निदेश आहेत. कृपया त्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई सत्वर करण्यात यावी ही विनंती.

उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना हे पत्र दिलेले आहे.

या ठिकाणी दोन सोसायटया आहेत. आदर्श सोसायटीचे प्रकरण सभागृहासमोर आलेले आहे. सिंधुसागर को. हाऊसिंग सोसायटीचे प्रकरण अजून सभागृहासमोर आलेले नाही त्यामध्ये नेमके काय आहे? याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात या ठिकाणी सांगावे अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, या ठिकाणी आदर्श सोसायटीचे दिनांक 3 डिसेंबर, 2007 रोजीचे त्या वेळचे सन्माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांना दिलेले पत्र माझ्या हातामध्ये आहे. त्या पत्रामध्ये फेज टू असे लिहिले आहे. श्री. नारायण राणे साहेबांनी त्यावर फक्त 'अहवाल द्यावा' असे लिहिले आहे. माझ्या हातामध्ये तिसरे आणखी एक पत्र आहे. हे पत्र आदर्श सोसायटीने जिल्हाधिकाऱ्यांना लिहिले आहे. हे पत्र 31 डिसेंबर, 2007 चे आहे. म्हणजे या सोसायटीचे काम झ ाल्यानंतरचे हे पत्र आहे. या सोसायटीची 103 सदस्यांची जी यादी आहे त्यामध्ये क्रमांक 38 वर श्रीमती सुजाता एन. माने यांचे सभासद म्हणून नाव आहे. त्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, या यादीतील त्यांचे सदस्यत्व आम्ही काढून घेत आहोत आणि फेज टू मध्ये त्यांचा समावेश करुन घेणार आहोत. म्हणजे आदर्शच्या फेज टू मध्ये त्यांचा समावेश करुन घेणार आहोत असे त्या सोसायटीचे पत्र माझ्या हातामध्ये आहे. हे फेज टू नेमके काय आहे, ते नेमके कधी होणार आहे, श्रीमती माने यांना फेज टू इमारतीमध्ये कधी सदस्यत्व मिळणार आहे ? याची माहिती देखील सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी मला द्यावी अशी मागणी मी या ठिकाणी करतो.

सभापती महोदय, माझी आपल्याला या ठिकाणी विनंती आहे. सन्माननीय माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी वांद्रे या ठिकाणी जी रेणुका सहकारी गृहनिर्माण संस्था काढली, त्या सोसायटीचे मुख्य प्रवर्तक नांदेडचे आमदार आहेत. ते या ठिकाणी नसल्यामुळे मी त्यांचे नाव घेत नाही. त्या सोसायटीमध्ये मुख्यमंत्र्यांचे सचिव श्री. राजीव शिवणकर, मल्लेश कापडे, सतीश सावंत, प्रधान सचिव श्री. नितीन करीर, मुख्यमंत्र्यांचे नांदेड येथील जेवणावळी व पार्ट्यांचे कंत्राट सांभाळणारे चंद्रलोक हॉटेलचे दिवाकर शेट्टी, शाम दळक, रामानंद तिवारी आदींचा देखील समावेश आहे.

सभापती महोदय, 80 अधिकाऱ्यांचा हा घोटाळा आहेच पण सिडकोने निविदा न काढता जी वनश्री सोसायटी केली त्या सोसायटीमध्ये देखील मुख्य सचिव श्री. जे.पी. डांगे, श्री. जयराज फाटक, श्री. उत्तम खोब्रागडे, श्री. स्वाधीन क्षत्रीय, श्री. सत्यपाल सिंह, श्री. सुरेश जोशी यांची नावे आहेत. ही नावे काय सांगत आहेत ? सभापती महोदय, या ठिकाणी पोलिसांच्या जागेवर वसुंधरा सोसायटीची जुडवा झाली. ती सोसायटी कोणाची आहे ? श्रेयस होम मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, ...

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा सांगतो. अधिकारी जमिनी कसे लाटत आहेत, कोणाच्या आशीर्वादाने लाटत आहे ते मी सांगत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप ज्यावेळी बोलत होते त्यावेळी या मुद्यांचे स्पष्टीकरण झाले की, आजची चर्चा आदर्श सोसायटीच्या अनुषंगाने आहे आणि या ठिकाणी त्या मर्यादेत आपण बोलण्याचा प्रयत्न करावा.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, फक्त याच अधिकाऱ्यांचे फ्लॅट कोठे कोठे आहेत हे सांगण्याचा प्रयत्न मी केला. मी नियमाच्या बाहेर गेलेलो नाही. आपल्या शब्दाच्या बाहेर देखील मी जाणार नाही. आपण कृपा करुन समजून घ्यावे. असे अनेक प्रकार आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपले निदेश बरोबर आहेत. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप ज्यावेळी बोलत होते त्यावेळी ते हिंदुस्थान फिरावयास चालले होते. म्हणून आम्ही सांगितले की, आदर्शवर या. आता सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी बोलण्यास सुरुवात केली त्यावेळी आदर्श सोसायटीमध्ये जे जे अधिकारी आहेत त्यांचे इतर कोठे फ्लॅट आहेत हे शेवटी सांगा असे मी सांगितले. हे रिलेव्हंट आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : हा जो घोटाळा आहे मग ते लोकप्रतिनिधी असोत, शासकीय बाबू असोत की अधिकारी असोत. त्यांच्याविरुध्द कारवाई झाली पाहिजे. दिनांक 26 नोव्हेंबरची घटना घडली त्यावेळी मी खालच्या सभागृहात असताना आम्ही 5 वेळा विधानसभेची बैठक तहकूब करण्यास भाग पाडले होते. त्यावेळी आमचे म्हणणे हेच होते. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी राजीनामा दिला. त्यावेळी सुध्दा गृह मंत्री असलेले श्री.आर.आर.पाटील यांनी राजीनामा दिला. केंद्रीय गृह मंत्र्यांनी राजीनामा दिला. त्यावेळी माझी हीच मागणी होती की, श्री.अनामी रॉय, श्री.हसन गफूर यांच्याबाबतीत शासन कोणती कारवाई करणार आहे ? आम्ही 5-5 वेळा सभागृह बंद पाडले होते. परंतु शेवटपर्यंत या अधिका-यांचे राजीनामे घेतले गेले नाहीत. याला केवळ लोकप्रतिनिधी जबाबदार आहेत काय ? ज्या ज्या टेबलवर फाईल गेली त्या प्रत्येकाचे फ्लॅट त्या आदर्श सोसायटीत आहेत. त्यांचा यामध्ये काहीच दोष नाही काय ? माझी आपल्यामार्फत शासनाला, माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, कोणत्याही परिस्थितीत दिनांक 26 नोव्हेंबर रोजी जे घडले त्याची पुनरावृत्ती होता कामा नये. या प्रकरणाला जे जे अधिकारी जबाबदार असतील त्याचा केवळ राजीनामा आम्हाला नको, मग ते कोणतेही अधिकारी असोत, कोणत्याही पक्षाचे लोकप्रतिनिधी असोत, त्या सगळयांविरुध्द गुन्हा दाखल झाला पाहिजे, त्यांना अटक करुन त्यांच्या हातामध्ये बेडया ठोकल्या पाहिजेत. हे केले तरच भ्रष्टाचार थांबेल. त्यांचा राजीनामा घेतला म्हणजे स्वच्छ झाले असे नाही, या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी अशी मी मागणी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो, धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, व्यथित मनाने मी या चर्चेत भाग घेत आहे. आपण बरीच वर्षे या सभागृहात काम केल्याचे सांगितले आहे. पूर्वी मंत्रालयाचे नाव सचिवालय असे होते. सचिवालय नाव होते त्यावेळी मंत्री काम करीत होते असे आम्हाला वाटत होते. मी लहान असताना वडिलांबरोबर व काकांबरोबर आपल्या कार्यालयात अनेक वेळा आलो होतो. त्यावेळी मंत्री सचिवांशी बोलल्यानंतर सचिव त्यांचे कसे ऐकायचे आणि कशा पध्दतीने राज्याचा कारभार चालू होता ते मला आठवते. सचिवालयाचे नाव मंत्रालय झाले असले तरी राज्याचा कारभार मात्र सचिव करीत आहेत अशी या राज्याची दुर्दैवी परिस्थिती झालेली आहे. ही वस्तुस्थिती आहे. मंत्री हे खाजगीत सांगतात किंवा कबूल करतात. वित्त विभागाने आदेश दिले नाहीत असे सांगितले जाते. मंत्र्यांनीच या अधिका-यांना डोक्यावर बसविले आहे. ख-या अर्थाने तुम्हीच सचिवांचे राज्य निर्माण केले आहे. म्हणून दुर्दैवाने या सभागृहात चर्चा करण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे.

आम्ही माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांच्याकडे गेलो तर ते आमचे स्वागत करतात, चहा देतात. गोड बोलतात. मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना आणि मंत्र्यांना आवाहन करतो. कोणतेही सचिव तुम्ही चोर आहात या नजरेने तुमच्याकडे बघून तुमचे स्वागत करतात. आम्ही गेलो तर ते उभे सुध्दा रहात नाहीत. आदर्श सोसायटीच्या निमित्ताने ख-या अर्थाने ही चर्चा झाली पाहिजे. मंत्री पद गेल्यानंतर आमदार झाल्यावर ही व्यथा सांगितली जाते. ही व्यथा खरी आहे. माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत. माझ्यापूर्वी जे वक्ते बोलले आहेत त्यातील कोणत्याही मुद्याचा मी पुनरुच्चार करणार नाही. मी थोडक्यात माझे मुद्दे मांडणार आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी असे सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी स्वत:हून राजीनामा दिला. परंतु ही वस्तुस्थिती नाही. हायकमांडने दिल्लीवरुन अे.के.अँथनी आणि प्रणव मुखर्जी हे दोन निरीक्षक या प्रकरणाचा अहवाल देण्यासाठी पाठविले. या दोन निरीक्षकांनी तीन-चार दिवस अभ्यास करुन अहवाल दिला. त्या दरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री. बराक ओबामा हे मुंबईमध्ये येणार होते. त्यांचे स्वागत राजीनामा दिलेल्या मुख्यमंत्र्यांनी करता काम नये म्हणून त्यांना राजीनामा देण्यास सांगण्याचा निर्णय लांबविण्यात आला आणि जेव्हा बराक ओबामा विमानामध्ये बसले त्याच्या एक तासानंतर राजीनामा देण्यासंबंधीचा निर्णय जाहीर झाला. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी स्वत:हून राजीनामा दिलेला नाही. केन्द्रीय निरीक्षकांनी हायकमांडला दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने त्यांनी राजीनामा दिलेला आहे. माजी मुख्यमंत्री हे निर्दोषही असतील. माझ्या भावाने काय करावे हा माझ्या भावाचा प्रश्न आहे. तसेच माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांच्या मेव्हणीने काय करावे हा त्यांच्या मेव्हणीचा प्रश्न आहे. माझा सख्खा भाऊ आहे. त्याचा व्यवसाय वेगळा आहे. त्याने कुठे प्रॉपर्टी करावी हा त्याचा प्रश्न आहे. परंतु हे प्रकरण बाहेर आल्यानंतर त्यांनी दुस-या दिवशी असे स्टेटमेण्ट केले की जर यामध्ये काही दोष असेल, अनियमितता झाली असेल तर ते फ्लॅट परत करायला तयार आहेत. खरे म्हणजे हे विधान केल्यामुळेच ते फसले. त्यांनी सल्लागार बरोबर नेमायला पाहिजे होते. सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांचा सल्ला त्यांनी घेतला असता तर तो कामी आला असता. तत्कालीन मुख्यमंत्र्यांना कुणाचा सल्ला घ्यावा हे कळले नाही. सल्ला घेण्यासाठी चांगले लोक ठेवायला पाहिजे. त्यांनी जयंत शहा नावाच्या व्यक्तीचा सल्ला घेतला. त्यानंतर हे प्रकरण वाढले. मी त्याबाबतीत बोलू इच्छित नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप आणि सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आपले विचार या ठिकाणी मांडले.

सभापती महोदय, मी हे सांगणार नव्हतो, परंतु ही वस्तुस्थिती आहे की तुमच्या वेळचा कारभार खूप चांगला होता. सभापती महोदय आपण ग्रामविकास मंत्री आणि पर्यावरण मंत्री असताना मी माझ्या वडिलांसमवेत आणि माझ्या काकांसमवेत आपल्या चेंबरमध्ये अनेक वेळा आलो होतो. आता दोन-तीन मंत्री सोडले तर कोणीही तशा प्रकारचा न्याय देत नाही. मंत्री महोदय श्री. नारायण राणे हे न्याय देतात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

सभापती महोदय, हे राज्य कुणाचे आहे ? माननीय उप मुख्यमंत्री हे सभागृहामध्ये हजर नाहीत. ते माझे भाषण त्यांच्या चेंबरमध्ये ऐकत असतील तर बरे होईल. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सर्व आयएएस आणि आयपीएस अधिका-यांना त्यांची कुठे कुठे संपत्ती आहे हे जाहीर करण्यास सांगितले. त्यासंबंधी ॲफिडेव्हिट करण्यास सांगितले आणि त्यापेक्षा जास्त संपत्ती कुणाकडे आढळली तर कारवाई केली जाईल असेही त्यांनी सांगितले. सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या बरोबर मी या विधिमंडळामध्ये गेली 20 वर्षे काम करीत आहे. ते स्पष्टवक्ते आहेत.... मी "आदर्श" प्रकरणावर येतो.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील......

याठिकाणी माझी एकच मागणी आहे की, जे अधिकारी आज सरकारमध्ये कार्यरत आहेत त्यांनी स्वत:ची मालमत्ता जाहीर करावी. किती सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये त्यांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे फ्लॅट आहेत हे जाहीर करणारे शपथपत्र त्यांनी सादर करावे. त्यात नमूद केलेल्या मालमत्तेपेक्षा अधिक मालमत्ता आढळून येईल त्यांच्यावर कारवाई करावी.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री नव्या दमाचे आहेत, स्वच्छ प्रतिमेचे आहेत, धडाडीचे आहेत. ते निश्चितपणे या संदर्भात कारवाई करतील. मी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मानतो. त्यांनी एक दिवस सकाळीच मला फोन केला. ते फोनवरुन रडू लागल्याचे निश्चित कळत होते. मला म्हणाले, जयंता काय चालले आहे? मी एकटा, माझा एकच फ्लॅट तो मी माझ्या मुलाला दिला आणि म्हाडाचा फ्लॅट घेतला. म्हणाले, मी तो फ्लॅट परत करतो. आमदारांनी म्हाडाचे फ्लॅट घेतले म्हणून मोठया प्रमाणात प्रसिध्दी देण्यात आली. मी पण म्हाडाचा फ्लॅट घेतला आहे. परत करण्यास तयार आहे. नाही तरी तो फ्लॅट गळका आहे. इमारतीमध्ये लिफ्ट चालत नाही. स्वच्छता नाही. अजिबात पाणी पुरवठा नाही. माननीय ज्येष्ठ विधानसभा सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांनाही फ्लॅट मिळाला आहे. ते घ्यायला तयार नव्हते. मी त्यांना सांगितले की, तुम्ही आता निवृत्त होणार आहात, त्यामुळे मी त्यांना तो फ्लॅट घ्यायला लावला. सरकारी अधिकाऱ्यांचे चार-चार, पाच-पाच फ्लॅट. काय चालले आहे या राज्यात? यांना मलिदा मिळणार असेल तर रोज फायली चालतात. फायली मंजूर होण्याचा विक्रम होतो. चर्चा होऊ द्या. पुढाऱ्यांची, मंत्र्यांची चौकशी होत असताना आम्हाला कागदपत्रे कोण देतो? सचिवालयातील अधिकारी ते क्लार्कपर्यंत सगळी मंडळी कागदपत्रे देतात. सचिवालयातील कागदपत्रे आम्ही हुडकून काढू शकतो का? विभागाचे सचिव आम्हाला कागदपत्रे देतात आणि तेच सांगतात की, असे असे बोला. किती बोलायचे हे आम्ही ठरवतो. याठिकाणी मी इतरांचे नाव घेणार नाही. परंतु माझे मित्र या सदनाचे माजी सदस्य आणि विद्यमान विधानसभा सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, मी आदर्श सोसायटीमध्ये फ्लॅट घेतला. आमच्याकडे कधीच कोणी आले नाही. आम्ही 20-25 वर्षे मुंबईत येत आहोत. यांनाच कसे लोक भेटतात? आम्हाला कोणी का भेटायला येत नाही? माननीय मंत्री श्री.राणे साहेब यांनी हा रस्ता आम्हालाही दाखववावा. आम्ही आमची प्रॉपर्टी जाहीर केलेली आहे. आम्ही भरपूर इन्कम टॅक्स भरतो. आम्हाला कशाचीही भीती नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील......

कायद्याचे पालन करीत असल्यामुळे आम्ही ताठ मानेने बोलू शकतो. सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना फ्लॅट मिळाला आहे. ज्यांनी ज्यांनी प्रश्न विचारला, प्रश्नाच्या वेळी गैरहजर राहिले त्यांना फ्लॅट मिळाला का? सर्व रेकॉर्डवर आहे. ज्यांनी प्रश्न विचारला आणि प्रश्न विचारताना गैरहजर राहिले त्यांना फ्लॅट. माझ्याजवळ असलेल्या रेकॉर्डवर आहे.

सभापती महोदय, विधानसभा सदस्य व माजी मंत्री श्री.कृपाशंकर सिंह यांचा फ्लॅट आहे. श्री.जयराज फाटक हे सनदी अधिकारी म्हणजे संत तुकाराम. त्यांच्याकडे गेलो तर संत तुकारामाची भूमिका. मी त्यातला नाही...... पुढचे मी बोलत नाही. श्री.जयराज फाटक यांचे 7 फ्लॅट आहेत. ते शिक्षण विभागाचे सचिव असताना मी त्यांच्याकडे कामानिमित्त गेलो होतो. दुसरे एक सनदी अधिकारी श्री.उत्तम खोब्रागडे. मी आज लक्षवेधी सूचनेच्या वेळी बोललो होतो. हा अधिकारी म्हणजे अतिशय मग्रूर अधिकारी आहे. या राज्यातील मंत्र्यांनी बोलावल्यानंतर तो जाहीरपणे सांगतो की, मी येणार नाही. यांची सगळी लफडी मी काढतो. यांची लफडी कोण काढणार? श्री.उत्तम खोब्रागडे यांचे दक्षिण मुंबईत 19 फ्लॅट्स आहेत. हे या राज्यात काय चालले आहे? माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांच्याबद्दल बाकीची चर्चा जरुर करावी. मी त्यात येणार नाही. परंतु उत्तम खोब्रागडे टी.व्ही.वर जाहीरपणे सांगतात. माननीय मंत्री महोदय श्री.राणे साहेब, हे योग्य आहे का?

नंतर 4एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ ST/ KTG/ पूर्वी श्री. भोगले...... 18:00

श्री. जयंत प्र. पाटील...........

हा काय प्रकार आहे ? हेच मला समजत नाही. माननीय मंत्री महोदय, श्री. बबनराव पाचपुते हे आदिवासी विकास मंत्री म्हणून त्यांना बोलावितात आणि ते खुशाल टी.व्ही. वर जाहीरपणे सांगतात की, मी येणार नाही. याचा अर्थ शासनाचाच सनदी अधिकारी जाहीर बोलतो, आपले ऐकत नाही. मला वाटले होते की, श्री. उत्तम खोब्रागडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे विद्वान असतील पण त्यांचे नाव आदर्श सोसायटीमध्ये आल्याबरोबर मात्र वस्तुस्थिती समजली. अशा प्रकारे त्यांनी देखील मुंबईत फ्लॅट घेण्याचा विक्रम केलेला आहे. त्यांनी तर होणाऱ्या नातवाच्या नावाने सुध्दा फ्लॅट घेऊन ठेवलेला असावा असे वाटते, एवढा विक्रम त्यांनी केला आहे.

सभापती महोदय, त्यानंतर श्रीमती कुंदन यांचाही त्यात फ्लॅट आहे. श्रीमती कुंदन हया आमच्याकडे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. आता ते सचिव पदावर आहेत. या चर्चेच्या निमित्ताने शासनाकडून आम्हाला उत्तर पाहिजे की, ही संपूर्ण प्रोसिजर आणि या आयएएस अधिकाऱ्यांची मक्तेदारी व अरेरावी आपण बंद करणार आहात की नाही ? राज्यात जी त्यांची दादागिरी चालली आहे ती पाहता या अधिकाऱ्यांना खऱ्या अर्थाने चौकशीच्या ज्युरिडिक्शनमध्ये आणले पाहिजे ही मागणी सुध्दा या निमित्ताने मी करीत आहे. त्यानंतर श्री. ओमकार तिवारी, जे रामानंद तिवारी यांचे सुपूत्र आहेत. माननीय मंत्री महोदय श्री. राणे साहेब, आपण मंत्रिमंडळातील एक ज्येष्ठ मंत्री महोदय आहात. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, हे तिवारी साहेब सचिव असताना तसेच माननीय श्रीमती मिनाक्षी पाटील या मंत्री असताना, जवळपास 12 वर्षापूर्वी त्यांच्याकडे एका कामासाठी गेलो होतो, अद्यापही ते काम झालेले नाही. ते म्हणत होते की, "यह चप्पल पहनने वाले मराठी लोग क्या करते है ?" हा माणूस दिसायला तसा साधा दिसतो परंतु त्याचे असंख्य फ्लॅट मुंबईत आहेत. अशा प्रकारे यांचाही पराक्रम मोठा आहे. एकट्या सुधागड तालुक्यात त्यांनी 32000 एकर जमीन घेतलेली आहे. त्यांचा ओमकार तिवारी नावाचा मुलगा आहे, त्याच्या नावावर तसेच मेहुण्याच्या नावावर ही जमीन आहे. त्यामध्ये एजंट म्हणून आपल्याच राष्ट्रवादीचा अध्यक्ष आहे. तसेच सुधागडला 3200 एकर जमीन त्याने घेतली आहे. आपण विचारही करु शकत नाही एवढी संपत्ती व मालमत्ता या अधिकाऱ्याने जमविली आहे. वरुन आपल्या पुरोगामी सरकारने, जे प्रामाणिक सरकार आहे या सरकारने अशा अधिकाऱ्याला

....2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील........

आता तर माहिती आयुक्त म्हणून नेमलेले आहे. याचा अर्थ असा की, आम्हाला त्यांच्याकडून माहिती मिळविण्यासाठी देखील चोरी करावी लागेल, अशी परिस्थिती आहे. अशा अधिकाऱ्याला खरे तर अशा महत्वाच्या पदावरुन काढून टाकले पाहिजे. सभागृहात अशा महत्वाच्या विषयावर चर्चा होत असताना एक आमदार म्हणून जनतेमध्ये आम्ही जातो तेव्हा आम्हाला लोकांकडून विचारणा होते की, आपल्याला किती सदनिका मिळाल्या, आपण किती जमीन घेतली ? अशा प्रकारे संशयाने आमच्याकडे जनता पाहते, तेव्हा वाईट वाटते. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने खरी परिस्थिती राज्यातील जनतेला समजली पाहिजे की चोर कोण आणि साव कोण आहे ? खरे तर या सिस्टममध्ये बदल करण्याचीच वेळ आता आलेली आहे. कारण हे आयएएस अधिकारी इतके तरबेज असतात की, कोणाकडून कशी मान्यता घ्यायची, कोणाला कसे बोलायला लावायचे आणि कोणाला गप्प कसे करायचे याची संपूर्ण कला या आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांना अवगत असते.

महोदय, या आदर्श सोसायटीमध्ये श्री. सुरेश आत्राम नावाच्या चंद्रपूरच्या सामान्य माणसाच्या नावाने देखील एक सदनिका आहे. तसा मी टी.व्ही. अगदी कमीच पाहतो आणि ज्यावेळेस पाहतो तेव्हा आमच्या नीलम ताई दिसतात काय हे पाहतो. कारण नीलमताई एकदम आक्रमकरित्या आपले म्हणणे मांडत असतात, पक्षाची बाजू मांडत असतात, आक्रमकपणे भांडतात. अशा प्रकारे टी.व्ही. वरच मी चंद्रपूरच्या श्री. सुरेश आत्राम नावाच्या माणसाने मी मुंबई कधीच पाहिली नाही आणि माझा मुंबईमध्ये एकही फ्लॅट नाही.......

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

मुंबई काळी आहे की, गोरी आहे हे त्याने कधी पाहिले नाही त्यामुळे या ठिकाणी फ्लॅट घेण्याचा प्रश्नच येत नाही असे त्या व्यक्तीने सांगितले. आदर्श सोसायटीमध्ये ज्यांनी बेनामी पध्दतीने फ्लॅट घेतलेले आहेत त्यांची आपण चौकशी करणार आहात की, नाही ? सभापती महोदय, हा जो प्रकार आहे तो अतिशय गंभीर आहे. या प्रकरणाला मंत्रिमंडळाची साथ आहे असे मी म्हणत नाही. त्यामुळे माननीय राणे साहेबांना एकच सल्ला मला द्यावासा वाटतो की, राणे साहेब, आपण सही करतांना काळजीपूर्वक सही करा नाही तर हे आयएएस व आयपीएस अधिकारी आपल्याला कधी गोत्यात आणतील ते तुम्हाला कळणार देखील नाही. ब-याच वेळा आयएएस अधिका-यांनी तयार केलेल्या फाईलवर आपण डोळे मिटून सही करतो परंतु यापुढे तरी आपण असे काही करु नका. मी तरी माझ्या संस्थांमध्ये सही करतांना सर्व वाचल्याशिवाय सही करीत नाही, एवढा मी आता "आदर्शमुळे" घाबरावयास लागलो आहे. या विषयाच्या संदर्भात माझ्याकडे भरपूर कागदपत्रे आहेत

माझी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांकडून वेगळीच अपेक्षा आहे. माननीय दादांनी आताच उपमुख्यमंत्री पद स्वीकारलेले आहे. ज्या तडफेने हे पद त्यांनी स्वीकारले आहे त्याच तडफेने त्यांनी या प्रकरणात लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांची जी धडाडी आहे ती त्यांनी कायम ठेवावी. त्यांनी ही धडाडी बंद केली तर आयएएस आणि आयपीएस अधिका-यांनी त्यांना ताब्यात घेतले असे आम्हाला वाटू लागेल. हा जो काही प्रकार झालेला आहे तो दादांनी बंद करण्याची आवश्यकता आहे. हा कारभार मी थांबवीन असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले पाहिजे. कारण माननीय मुख्यमंत्री साहेब नवीन आहेत. अजून मी त्यांना भेटलो नाही. ते मला ओळखत सुध्दा नसतील. त्यांना महाराष्ट्र समजण्यास काही वेळ लागेल. त्यामुळे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मा. मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र दाखवावा, महाराष्ट्र समजून सांगावा. आमच्या सारख्या छोटया लोकांचे विचार मुख्यमंत्र्यांनी घ्यावेत. या विषयाच्या संदर्भात मी एकच सांगू इच्छितो की, ज्या आयएएस आणि आयपीएस अधिका-यांनी महाराष्ट्राची मान शरमेने खाली घालावयास लावली अशा आयएएस आणि आयपीएस अधिका-यांचा चोख बंदोबस्त माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या पध्दतीने करावा अशी विनंती करतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मी आपल्याला आठवण करुन देतो की, महाराष्ट्र, बेळगाव, कारवार एकत्र यावा म्हणून मी लहान पणी समितीचे काम करीत होतो त्यावेळेस मी प्रचाराच्या वेळेस माननीय शिवाजीरावांच्या प्रचारासाठी, शिवाजी नगर येथे आलो होतो त्यावेळी वीरश्रीचे गाणे म्हणत होतो.

"शपथ् तुला आईच्या दुधाची, घेऊ नकोस माघार,
मराठ्या उचल तुझी तलवार,
मराठ्या शपथ तुला छत्रपतींची,
काय विसरशी तुझी किमया, तलवारीची धार,
मराठ्या उचल तुझी तलवार,"

सभापती महोदय, या तलवारीचा वार करुन महाराष्ट्रातील भ्रष्टाचार, आदर्श सारख्या सोसायटया भस्मसात व तोडण्याचे काम नवीन माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री करतील अशी अपेक्षा बाळून मी माझे विचार थांबवतो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांनी मा. मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र दाखववावा, महाराष्ट्र समजून सांगावा हे जे वाक्य वापरले आहे ते कामकाजातून काढून टाकावे अशी मी आपल्याला विनंती करतो. कारण माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण हे या महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. त्यांना महाराष्ट्राची चांगली ओळख आहे.

**सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी उच्चारलेले संबंधित शब्द कामकाजातून वगळण्यात यावे. सभागृहाची वेळ सहा वाजेपर्यंत होती परंतु मा. जयंत पाटील साहेबांची ट्रेन फास्ट निघाली होती. त्यामुळे मी त्यांचे भाषण मध्येच थांबवले नाही. त्यामुळे सभागृहाची वेळ सभागृहाच्या अनुमतीने सात वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. या चर्चेमध्ये अजून 12 सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. आता सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी आपले विचार मांडावयास सुरुवात करावी.

यानंतर श्री. अजित...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या आदर्श सोसायटी विषयावर फॅक्च्युअल मुद्दे आलेले आहेत. मी त्या डिटेलमध्ये जात नाही. या विषयाच्या अनुषंगाने जे महत्वाचे मुद्दे आहेत ते मी मांडतो.

सभापती महोदय, या विषयावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक होते. आपण राज्य निर्मितीचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा महाराष्ट्र आहे. छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने महाराष्ट्र ओळखला जातो. परंतु या आदर्श घोटाळ्यामुळे महाराष्ट्राचे नाव कलंकित झालेले आहे. आम्ही दुसऱ्या राज्यात गेलो आणि तेथील लोकांनी आम्हाला विचारले आपण कोणत्या राज्यातून आलात. आम्ही महाराष्ट्रातून आलो असे सांगितल्यावर ते म्हणतात आदर्श घोटाळावाला महाराष्ट्र काय ? ( अडथळा)... मी टू जी वर येऊ का ?..या आदर्श सोसायटीमध्ये सनदी अधिकारी व ज्यांच्या नावाच्या शिफारशीवरुन फ्लॅटचे वाटप करण्यात आले ती नावे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे सांगितली. कोणत्याही सनदी अधिकाऱ्याने वा राजकीय नेत्याने त्यांच्याकडे सहीसाठी फाईल आल्यानंतर त्यामध्ये काही चूक आहे किंवा कसे याबाबत एक चकार शब्द देखील काढला नाही. बोफोर्स प्रकरणामध्ये श्री.व्ही.पी.सिंग बाहेर पडले "राजा नहीं फकीर है, देश की तकदीर है." कारण भ्रष्टाचार थांबविण्याची जो हिम्मत करु शकतो त्यांना लोक डोक्यावर घेऊन नाचतात. परंतु महाराष्ट्राच्या दुर्दैवाने एकाही सनदी अधिकाऱ्याने वा राजकीय नेत्याने अशी हिम्मत दाखविली नाही.

सभापती महोदय, नवीन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या शपथ विधीच्या कार्यक्रमाला मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथराव गणपणतराव खडसे (पाटील) यांच्या सोबत गेलो होतो. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण तेथून चालले होते. त्यांच्या समोरुन त्या पूर्वीचे दोन-तीन मुख्यमंत्री गेले. त्यावेळी श्री.अशोक चव्हाण म्हणाले की,"भला इसकी कमीज मेरी कमीज से सफेद कैसे". सद्या त्यांच्या काळात जास्त झालेल्या आहेत, परंतु मला फासावर लटकविण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी नांदेड मध्ये भाषण करताना सांगितले की,".... सुपारी देण्यात आली." त्यांचे म्हणणे खरे आहे. ज्यावेळी हे प्रकरण बाहेर आले त्यावेळी आमच्या कार्यालयात फाईलच्या फाईल येत होत्या. मला एका गोष्टीचे वाईट वाटते की, गँगवॉर असते तसे राजकीय नेतृत्वाचे वॉर सुरु आहे. सनदी अधिकारी आणि राजकीय लोकांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

फाईलच्या फाईल बाहेर जात आहेत. यापूर्वी महाराष्ट्रात असे चित्र कधीही नव्हते. हे प्रकरण कोणत्या नेत्याने बाहेर काढले त्याच्या खोलात मी जात नाही. लष्करी अधिकारी श्री.संजीव बसी यांना स्कोप मिळाला नाही म्हणून त्यांनी पत्र देऊन हे प्रकरण सुरु केले.

सभापती महोदय, या आदर्श सोसायटी प्रकरणी तीन-चार गोष्टींवर काटेकोरपणे चौकशी झाली पाहिजे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितल्याप्रमाणे तेथील 60 मीटरचा रस्ता 18 मीटर करण्यात आला. एम.एस.आर.डी.सी.चे व्हाईस चेअरमन श्री.निंबाळकर यांचे पत्र आहे. सजेशन ऑब्जेक्शन मागविण्यात आले होते, त्याला असे ऑब्जेक्शन आहे की, वांद्रे-वरळी, वरळी-हाजीअली, हाजीअली -नरीमन पॉईंट, नरीमन पॉईट-उरण असा समुद्र मार्ग जोडावयाचा असेल तर...

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

या रस्त्याशिवाय दुसरा रस्ता नाही असे ,श्री.निंबाळकर यांनी अगोदर सांगितले होते आणि मुख्य सचिव झाल्यानंतर त्याला घाई घाईने परवानगी दिली होती .तेव्हा ही परवानगी का दिली याची अधिक खोलात जाऊन चौकशी करण्याची गरज आहे. त्या ठिकाणच्या बेस्टच्या डेपोच्या जागेचा देखील विषय महत्वाचा आहे. त्या ठिकाणी एफ.एस.आय. वापरण्यासाठी कोण कोणते मार्ग अवलंबले गेले. त्यामध्ये कोण कोणत्या राजकीय नेत्यांचा आणि सनदी अधिका-याचा दबाव आला होता, याची देखील खोलात जाऊन चौकशी केली पाहिजे. 2000 मिटर्सच्या वर 15 टक्के आर.जी. आरक्षणाचा मुद्दा आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटर, मनोरा आमदार निवासच्या इमारतीची उदहारणे देऊन त्याचा वापर स्वार्थासाठी करणे बरोबर नाही. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे सी.आर.

झेड.टूमध्ये हा भाग येतो असे बोगस पत्र दाखवून सगळया फाईल्सच्या मुव्हमेट झाल्या आहेत याची देखील अधिक सविस्तरपणाने चौकशी होण्याची गरज आहे. या फाईल्सची मुव्हमेंट होत असतांना कोणत्याही अधिका-याने वा कोणत्याही राजकीय नेत्याने या मुव्हमेन्ट का थांबविल्या नाहीत. लहानपणी मुले कोणीही यावे आणि टिकली मारुन जावे असा खेळ खेळत असतात त्याप्रमाणे कोणीही यावे आणि सही करुन फलॅट घेऊन जावे असा खेळ मंत्रालयात चालला होता. . माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी मघाशी काही नावांची यादी वाचली होती. परंतु त्यातील काही नावे वाचावयाची त्यांच्याकडून राहिले आहे. त्यामध्ये डॉ.अरुण डवले यांचे नाव असून श्री.शिवाजीराव पाटील निलंगेकराचे ते जावई आहेत अशी माझी माहिती आहे.श्री.आनंद भरोसे यांचे देखील नाव त्यामध्ये आहे. त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीचे ते जावई आहेत. त्याचबरोबर सुप्रिया मस्के यांचे देखील त्यात नाव आहे. डेप्युटी आय.जी ऑफ स्टॅम्प या पदावर काम करणारे अधिकारी एक दोन महिन्यापूर्वी निवृत्त झाले होते त्यांच्या या कन्या आहेत. महसूल खाते सांभाळणा-यांना त्याची चांगली माहिती असते. आदर्श सोसायटीमध्ये त्यांच्या कन्येचा आणि त्यांच्या निकटवर्तीयाचे फ्लॅटस आहेत. आदर्श सोसायटीमध्येच अनियमितता झाली आहे असे नाही तर त्याच्या आजुबाजूला देखील महसूल विभागाच्या अधिका-यांनी कशी अनियमितता केली आहे हे दिसून येते आणि त्यासबंधीची माहिती काही लोक आमच्याकडे आणून देत आहेत. श्री.धवल राजेश शहा , श्री मानव जयंत शहा यांचे देखील फ्लॅटस आहेत. श्री शहा यांच्या संदर्भात मीच प्रथम आवाज उठवला होता.त्यावेळी वर्षा इमारतीच्या समोर

..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

"जय हो आणि जयंत हो " अशा घोषणा दिल्या होत्या त्यावेळी जर आपण माझे म्हणणे ऐकले असते तर असे दिवस आपल्यावर आले नसते. त्याचबरोबर श्री. आदित्य भगतसिंग पाटील यांचे देखील नाव आहे. सांगलीतील कोणत्या पाटलाच्या मोठया भावाचा हा मुलगा आहे.हे शोधून काढले पाहिजे. श्री. चंद्रशेखर गायकवाड यांचे देखील नाव आहे. ते सांगलीतील कोणत्या पाटलांच्या जवळचे आहेत हे आपल्याला माहीत असेल. श्री.शिवाजीराव शंकरराव काळे यांचे सुध्दा त्यात नाव असून असून बारामती होस्टेल आणि अजित सहकारी बॅकेचे ते चेअरमन होते, तेव्हा या बाबतीत संबंधित व्यक्तीला विचारले पाहिजे. श्री.कृ.धो. भेगडे हे माजी आमदार होते परंतु त्यांना कोणाच्या सांगण्यावरुन फ्लॅट दिला हे त्या त्या भागातील पालक मंत्र्यांना माहिती असले पाहिजे. तेव्हा या बाबतीत जर त्यांना विचारणा केली तर त्यांच्याकडून अधिक माहिती मिळू शकते. श्रीमती सोनिया कोल्हापुरे कोण आहेत ? याची माहिती विचारली तर बरे होईल. विधिमंडळ कामकाज मंत्री सगळीकडे बारीक लक्ष ठेवून असतात त्यामुळे त्यांना त्यांची नक्की माहिती असेल.ते सुध्दा याबाबतीत माहिती सांगू शकतील. श्री..धोडीराम गणपती वाघमारे ,मागासवर्ग सेल, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस आणि माजी आमदार माण यांचा देखील फ्लॅट आहे. अशा प्रकारे या सोसायटीमध्ये अनेक जणांची नावे आहेत.ही नावे मी मुदद्‌ाम वाचली आणि रेकॉर्डवर आणली आहेत.वेळ कमी असल्यामुळे विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर आणि बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी कमी नावे रेकॉर्डवर आणली होती.आदर्श सोसायटीमध्ये मोठा घोटाळा झाला असून त्याची सत्ताधारी पक्षाच्या हायकमांडने दखल घेतली व या प्रकरणाची सीबीआय चौकशी सुरु केली, त्या मुळे राज्यात राजकीय भूकंप झाला होता.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ 18:20

श्री. विनोद तावडे...

त्या नंतरसुध्दा अशी कुणीतरी व्यक्ती आहेत की, ती ही कागदपत्रे गहाळ करण्याची हिंमत करते. यामध्ये कोणती कागदपत्रे गहाळ झाली याचा शोध घेतला तर ती कुणी गहाळ केली हे आपोआप बाहेर येईल.

त्या फाईल्समध्ये एक नोट शीट असते त्याबरोबर पत्रव्यवहार असतो. सी.आर. झेडचे, वन टूचे जे काही झाले त्या संबंधातील कागदपत्रे गहाळ झाली. रोड टू रेसिडेन्सचे कन्व्हर्जन झाले अशी दोन महत्वाची कागदपत्रे आहेत ज्यामध्ये या विषयाचा गाभा आहे. चौकशीकरिता सीबीआयला जे आवश्यक आहे ते पुन्हा आपल्या अधिकाऱ्यांनी तयार केले आहे. त्यामुळे तसा शोध घेण्यापुरती माहिती मिळेल हे मला मान्य आहे. परंतु या प्रकरणात माझी सही नव्हती असे जर संबंधित व्यक्तीने डीनाय केले तर ते कोर्टामध्ये सिध्द करता येणार नाही. एखादा बॉम्बस्फोट झाल्यानंतर रेड अॅलर्टचा इशारा दिल्यानंतर सिक्युरिटी टाईट केल्यानंतर सुध्दा पुन्हा दुसरा बॉम्बस्फोट होऊ शकतो अशाप्रकारची घुसखोरी राजकीय नेतृत्व आणि सनदी अधिकारी हातात हात घालून करीत आहेत हे यामधील सर्वात मोठे दुर्दैव आहे. या निमित्ताने मघाशी माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील म्हणाले की, या सनदी अधिकाऱ्यांवर सर्वांचा राग आहे. ज्यावेळी असा काही घोटाळा होतो त्यावेळी राजकीय नेतृत्वाचा बळी जातो. परंतु हे सनदी अधिकारी एवढे सुसाट कां सुटतात? ते पहातात की, राजकीय नेतृत्व याच सुसाट पध्दतीने हात मारण्याचा धंदा करीत आहेत. तर मग आपण कां मागे रहावे? सन 1990 पूर्वीची किंवा सन 2000 पूर्वीची जी सरकारे होती, त्यावेळी इतका सुळसुळाट झाला नव्हता. याबाबत अशी आख्यायिका आहे की, धारावीच्या पाच भूखंडाचा प्रकल्प आपल्याला डेव्हलप करावयाचा आहे तर एक याला, एक त्याला, आणि एक दिल्लीला व एक ब्यूरोक्रॅटला अशाप्रकारे उघडपणे मनमानी होते व त्याची चर्चा होते. यामध्ये आपण सनदी अधिकाऱ्यांना मोकाट सोडल्यानंतर त्यांना माहीत आहे की, हे देखील चोरत असल्यामुळे "तेरी भी चूप आणि मेरी भी चूप". म्हणून यामध्ये सनदी अधिकारी काही करणार नाही परंतु किमान एखादा राजकीय नेता उभा राहिला असता आणि त्यांनी असे काही होणार नाही असे म्हटले असते. परंतु तसे होतांना दिसत नाही.

2...

श्री. विनोद तावडे...

मला यानिमित्ताने असे वाटते की, या राजकीय व्यवस्थेत आपल्या सारख्या काम करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांनी काही गोष्टींचा विचार प्रामाणिकपणे करणे अत्यावश्यक आहे. मघाशी माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी वरळीच्या सोसायटयांचा उल्लेख केला. अशा काही आमदारांच्या, सनदी अधिकाऱ्यांच्या, आयपीएस अधिकाऱ्यांच्या सोसायटया झाल्याही आहेत. विधानसभागृहात बोलतांना, सनदी अधिकाऱ्यांची बाजू घेतांना त्यांनी झोपडपट्टीत रहावे कां? असा प्रश्न विचारला गेला. ज्यावेळी वांद्रयाच्या सरकारी वसाहतीमधील कर्मचाऱ्यांचा प्रश्न आम्ही या सभागृहात मांडला आणि त्यावेळी अर्धा एफएसआय वाढविल्यास तुम्ही त्यांना परमनंट घर देऊ शकता असे सांगितले होते. विधानसभागृहात हे सांगणाऱ्या माननीय माजी मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी ही मागणी नाकारली होती. एवढा सनदी अधिकाऱ्यांचा तुम्हाला पुळका कां येतो. तर मग त्या तृतीय श्रेणी चतुर्थ श्रेणी, वर्ग 2 च्या सरकारी कर्मचाऱ्याला घर कां नाही त्यांनी झोपडपट्टीमध्ये रहावयाचे काय? शासकीय वसाहतीच्या बाजूला असलेल्या परमनंट झोपडपट्टीला एसआरए योजना मिळते. परंतु त्या वसाहतीमध्ये राहणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्याला सेवानिवृत्ती नंतर आपले घर रिकामे करावे लागते. याचे कारण आपण त्याला अर्धा एफएसआय वाढवून देण्यास तयार नाही. आणि या सनदी अधिकाऱ्यांनी झोपडपट्टीमध्ये रहावे कां असा प्रश्न आपण कसा विचारु शकतो? मी सनदी अधिकाऱ्यांचा, खोब्रागडे साहेबांच्या 19 घरांचा उल्लेख केला.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

त्यांच्या काळात म्हाडामध्ये डेव्हलप झालेल्या प्लॉटच्या बिल्डरांची यादी काढण्यात यावी. मग ते बीईएसटीमध्ये गेले. त्यानंतर बीईएसटीचे जे प्लॉट डेव्हलप झाले, ते ज्या बिल्डरंना मिळाले त्या बिल्डरांची यादी काढण्यात यावी. सभापती महोदय, एवढे करुनही ते शहाणपणा शिकवायचे, हे त्याच्या पुढचे आहे. बहुदा त्यांना कुठल्यातरी पक्षाचे खासदारकीचे तिकीट मिळणार होते असे मी ऐकले होते. सन्माननीय सदस्य श्री. बाळासाहेब जाधव यासंबंधी सांगू शकतील. या अधिकाऱ्यांना शासन किती डोक्यावर बसविणार आहे. सनदी अधिकाऱ्यांना या पध्दतीने वागणूक देण्यात येत असेल तर स्वाभाविकपणे ते डोक्यावर बसणारच आहेत.

सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या हद्दीत एक घर घेता येईल. मुंबईची हद्द कुठ पर्यंत आहे तर ती माहीम आणि सायनपर्यंत आहे. पण वरळीपर्यंत ही हद्द गृहीत धरावी असे मध्येच एक नोटिफिकेशन काढण्यात आले. म्हणजे एक फ्लॅट वरळीमध्ये आणि दुसरा फ्लॅट नरीमन पॉईंटला अशा पध्दतीने दोन फ्लॅट घेता येतील. यापध्दतीची नोटिफिकेशन काढली जातात आणि ते कोणी पहात नाहीत. या पध्दतीने घरे मिळविली जातात.श्री.तिवारी साहेबांचा उल्लेख झाला. श्रीमती शंकरन मॅडमचा उल्लेख झाला. या सगळयांचे फ्लॅट आहेत आणि त्या फ्लॅटच्य संदर्भात त्यांनी जी प्रतिज्ञापत्रे जोडली आहेत, ती सगळी खोटी आहेत. "स्टार ऑफ सी" सहकारी संस्थेमध्ये श्रीमती शंकरन मॅडमचा फ्लॅट आहे.श्री. रामानंद तिवारींचा बराच उल्लेख या ठिकाणी झालेला आहे. मुंबई उपनगर जिल्हा कलेक्टरकडे त्यांचे प्रतिज्ञापत्र आहे. अमर टावर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील त्यांचे प्रतिज्ञापत्र खोटे आहे. खोटे म्हणजे चुकीची माहिती देऊन हे फ्लॅट घेतलेले आहेत. श्री. संगीतराव असतील, श्री. सुभाष लाला असतील. सनदी अधिकाऱ्यांच्या मुंबई शहरामध्ये "पोर्णिमा, सागर तरंग, दिलवारा, प्रणिता, चार्लेविला, बोनाविष्टा, शलाका इतक्या सोसायटया आहेत. आता आदर्शमध्ये काही जण आहेत. इतक्या सोसायटया आहेत. म्हणजे मुंबईच्या पोस्टिंगसाठी अधिकारी कां धावतात? ते मुंबई आणि महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी नाही तर येथे 1200 ते 1500 चो.मी.फ्लॅट मिळाला की, त्यांची आयुष्यभराची कमाई झाली. उपनगरामध्ये अमर टावर, ममता, संगम, पाटलीपुत्र, यशश्री, शिवतीर्थ, जस्मीन, स्टार ऑफ सी, वनश्री, शिवांजली, मीरा-मधुरा अशा प्रकारच्या सोसायटया आहेत त्या सोसायटयातील सगळया सदस्यांचे ॲफेडेव्हिट चेक करण्यात

श्री. विनोद तावडे....

यावेत. मला असे वाटते की, या सगळयांची तपासणी झाली पाहिजे. गेल्या दहा वर्षात कलेक्टर लँड ज्या ज्या सहकारी संस्थांना घरे बांधण्यासाठी दिली त्या सहकारी संस्थामधील राजकीय आणि सनदी अधिकारी किंवा त्यांचे निकटवर्ती असणारे सदस्य कोण आहेत याबाबतची श्वेत पत्रिका महाराष्ट्र शासनाने घोषित करावी. होऊ द्या "दूध का दूध, पानी का पानी." आमचेही नाव त्यामध्ये आले तरी चालेल. पण महाराष्ट्र हा लँड माफियांचा प्रदेश अशी जी बदनामी झालेली आहे ती बदनामी पुसून काढावयाची असेल तर राज्य सरकारने गेल्या दहा वर्षातील श्वेत पत्रिका घोषित केली पाहिजे. लोक कागद आणून देतात. सांताक्रुझला एका कुटुंबातील लोक सोसायटी बनवित आहेत असे रोज वर्तमानपत्रात छापून येत आहे. अशा पकारे किती एंटरटेन करायचे. राजकीय नेतृत्वाला एकमेकांशी भांडत बसवायचे. मग आम्ही सत्तेत आलो की, तुम्हाला माहिती आणून द्यायची, मला माहीत आहे.

सभापती महोदय, गेट वे ऑफ इंडियाच्या ठिकाणी श्री. चरणजितसिंग सप्राच्या कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्री महोदय, राष्ट्रगीताला थांबले नाही. त्यावेळी मीडियाने आम्हाला फोन करुन बाईट मागितली. आम्ही म्हटले बाईट देणार नाही. माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाणांना मी ओळखतो. राष्ट्रगीत चालू आहे हे जर त्यांना कळले असते तर ते नक्कीच खाली उतरले नसते. त्यांनी त्याचा सन्मान केला असता म्हणून आम्ही बाईट दिला नाही. We are not playing in the hands of media. But surely we will not spare anything wrong going with the media. यामध्ये आम्ही नक्की रोल प्ले करु. आम्हाला हे मान्य आहे. अक्षरश: आम्ही त्या दिवशी भारतीय जनता पार्टीच्या सगळया नेत्यांना कळविले की, यावर प्रतिक्रया द्यावयाची नाही.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

पण एक राहिले होते ते केले. पुढच्या वेळी असे करावयाचे की नाही हा प्रश्न उपस्थित होतो. मी श्री.चरणसिंह सप्रा यांना सांगू इच्छितो की, राजकारणाच्या बाहेर जाऊन आम्ही हे केलेले आहे याचे आपण कौतुक केले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. चरणसिंह सप्रा आणि श्री. मिलिंद देवरा हे हायकमांडला थांबविण्याचे काम विनम्रपणे करीत असल्याचे दिसत होते. पण पुढच्या कार्यक्रमाची घाई आणि त्या खुल्या हवेमध्ये राष्ट्रगीताची धून लक्षात येत नसेल हे आम्हाला 100 टक्के मान्य आहे. या सगळ्या गोष्टी कागदोपत्री पुराव्यानिशी समोर येतात.

नवी मुंबईतील पामबीच रोडवरील सोसायट्यांच्या बाबतीत जे सुरु झाले आहे त्यामध्ये वनश्री, शगुफा, रिव्हेरीया, अमर अशा सोसायट्यांमध्ये 2500 चौरसफुटाचे फ्लॅट घेतात. पामबीच रोड हा मुंबईच्या पेडर रोडच्या बरोबरीने मानला जातो. 103 कोटीचा भूखंड आपण त्यांना दोन अडीच कोटी रुपयांना देता. ज्या फ्लॅटची किंमत अडीच ते तीन कोटी रुपये आहे तो फ्लॅट त्यांना 40 लाख रुपयांमध्ये मिळतो. हे कोठे तरी थांबले पाहिजे की नाही ? याबाबत केवळ सनदी अधिकारीच नाही तर राजकीय नेतृत्वाला सुध्दा ठरवावे लागेल. मागे मुंबईची जी चर्चा झाली ती चुकीच्या अर्थाने घेतली गेली. 10 टक्के घरांचे जे वाटप होते त्यामध्ये जी अप्सरा मनामध्ये भरते तिला फ्लॅट मिळतो आणि हृदयावर राज्य करणारे श्री. विठ्ठल उमप यांना फ्लॅट मिळत नाही आणि हा मुद्दा जर आम्ही मांडला तर काय चुकीचे आहे ? ज्यांनी देशासाठी प्राण दिला त्यालाच सदनिका मिळेल किंवा कलाकार असेल तर, ज्यांना पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण आणि महाराष्ट्राचा महाराष्ट्र भूषण हा सर्वोच्च पुरस्कार मिळाला असेल, अशातील कोणी फ्लॅट मागितला तर त्यांना मिळेल असे काही तरी केले पाहिजे. मुंबई, ठाणे, नागपूरमधील ज्या कलेक्टर लँड आहेत आहे त्या लोकांना परवडणाऱ्या घरांसाठी, सामान्य माणसांसाठी वितरित करा. आपल्याला आपली लँड माफियाची इमेज पुसून काढली पाहिजे. हे निर्णय घेतले पाहिजेत. या चर्चेच्या निमित्ताने मला असे वाटते की, विधानसभा सभागृहामध्ये यासंदर्भात चर्चा झाली आणि चौकशी समिती नेमण्यात आली. यामध्ये चौकशी होईल. विधानसभा सभागृहामध्ये तेथील माननीय विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथ खडसे साहेबांनी उल्लेख केला. आताचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण हे पंतप्रधान कार्यालयामध्ये मंत्री म्हणून काम करुन आलेले आहेत. जे जे सनदी अधिकारी

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

डायरेक्ट यामध्ये सापडतील त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविलेच पाहिजे. त्याशिवाय नीट चौकशी पूर्ण होणार नाही.

मला माहीत आहे की, नवीन मुंबईतील काही बाबतीत मागे ज्या चौकशा घोषित केल्या आणि ज्या चौकशा झाल्या त्यामध्ये चौकशी करणारा आयएएस आधिकारी आणि दोषी असणारा आयएएस अधिकारी यांनी एकत्र बसून रिपार्ट तयार करुन पाठविले आहेत, हे मला चांगले माहीत आहे. आज विधानसभा सभागृहामध्ये जो निर्णय घोंषित केला आहे त्यामध्ये एक न्यायमूर्ती आणि एक सेवानिवृत्त मुख्य सचिव पातळीवरचा सनदी अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्याचे घोषित केले आहे. आजही बरेच सनदी अधिकारी नक्कीच चांगले आहेत. पण आज वातावरण एवढे दूषित आहे की, कोणताही सनदी अधिकारी चौकशीला बसला तर तो मदत करणार. त्यामुळे मला असे वाटते की, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी जी मागणी केली होती त्याप्रमाणे सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्षाच्या सदस्यांना बसू द्या. दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीमध्ये अध्यक्ष सत्ताधारी पक्षाचा असतो. त्यामध्ये सत्ताधारी पक्षाचे जास्त सदस्य असतात. त्या ठिकाणी जर मतदानाने निर्णय झाला तर तो सत्ताधाऱ्यांच्या बाजूनेच होईल. पण एकदा खरे काय आहे ते बाहेर येऊ द्या. आपण कशाला घाबरायचे ? ही संधी आहे असे आपण मानले पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने काही कठोर पावले उचलली पाहिजेत. कठोर घोषणा झाली पाहिजे. आम्हा लोकप्रतिनिधींना सुध्दा या कठोरतेमुळे काही गोष्टींच्या बाबतीत पायबंद बसणार असेल तर तो बसू द्या. आम्ही तो स्वीकारु. पण महाराष्ट्राचे लँड माफियाचा प्रदेश म्हणून जें नाव झालेले आहे ते नाव पुसून पुन्हा एकदा छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र, शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र हे नाव पुन्हा आणण्यासाठी कठोर पावले उचलावीत अशी मी सरकारला या चर्चेच्या माध्यमातून मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ D/ KTG/

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी भाषण केले. त्यांचे भाषण अतिशय सुंदर होते असे मला वाटते. पण मी सांगू इच्छितो की, हे उच्च सभागृह आहे आणि या उच्च सभागृहामध्ये कायदा काय आहे हे सन्माननीय सदस्यांना माहीत असले पाहिजे. सरकार चुकले की नाही याबाबत कायद्यानुसार आपण बोलू शकतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत.....

शासनाने जर तशी पॉलिसी केली असेल आणि त्या पॉलिसीनुसार एखादे काम झाले असेल तर ते कायद्याला सोडून केले नाही असेच म्हणावे लागेल. त्यासाठी पॉलिसी वाचली पाहिजे. मघाशी माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे असे म्हणाले की, त्या जी.आर.ची प्रत समोरच्या सन्माननीय सदस्यांना द्यावी. त्या जी.आर.ची प्रत वाचली असती तर आपल्याला कळले असते. मी शासकीय अधिका-यांना पाठिशी घालत नाही. शासकीय अधिका-यांनी चुकीची ॲफिडेव्हिटस् दिली असतील तर तर त्यांना शिक्षा होईल. ज्या अधिका-यांनी 2-2 फ्लॅट घेतले असतील त्यांना कायद्यानुसार सजा द्यावी. परंतु मंत्री महोदयांनी घेतलेल्या निर्णयामध्ये काही चूक असेल तर ती चूक झाली आहे असे म्हणण्यास मी तयार आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे एका पैशाचीही चूक झालेली नाही. याठिकाणी घोटाळा घोटाळा अशी ओरड केली जात आहे. यामध्ये फ्रॉड झाला असेल तर संबंधितांना शिक्षा झाली पाहिजे. चुकीचे ॲफिडेव्हिट करुन दोन फ्लॅट घेतले असतील तर त्यामध्ये घोटाळा झाला आहे असे म्हणता येईल. पण लॅण्ड ग्रॅण्ट करण्यामध्ये यामध्ये अजिबात घोटाळा झालेला नाही. कायदे पाहिले तर बिल्डिंग बांधण्यामध्ये सुध्दा घोटाळा झाला आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे यामध्ये घोटाळा झाल्याचे दिसून येत नाही. मी आपल्याला उदाहरण सांगेन.

आपल्याकडे लॅण्ड ग्रॅण्टचा कायदा आहे. हा कायदा सुरुवातीला 1983 साली झाला. त्यानंतर त्या कायद्यामध्ये 1986 साली, 1987 साली, 1992 साली, 1996 साली आणि 1999 साली अशाप्रकारे अनेक वेळा सुधारणा करण्यात आली. सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन देण्यासंबंधीचे धोरण आखण्यात आले. त्या धोरणात चूक असती तर चूक म्हणता आले असते. मंत्री महोदयांनी यातील जागा घेतली असती तर ती चूक झाली असे मी म्हणालो असतो. यामध्ये कोणत्याही मंत्र्यांची किंवा मुख्यमंत्र्यांची चूक झालेली नाही. कारण सरकारच्या धोरणाप्रमाणे सर्व निर्णय घेतले गेले आहेत. तुमचे सरकार होते त्यावेळी जे धोरण स्वीकारले होते त्यात कोणती चूक झाली तेही मी सांगतो.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत.....

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांप्रमाणे मी सुध्दा थोडेसे विषयांतर करुन सांगू शकतो. या सोसायटीला जागा स्वस्त दरामध्ये देण्यात आली असे सांगण्यात आले. त्याबाबतची तरतूद धोरणामध्येच आहे. एखाद्या सोसायटीत 300 चौ.फूटांचे फ्लॅट असतील तर त्यांना बाजार भावाच्या 5 टक्के रेट लावला जातो. जर 450 चौ.फूटांचे फ्लॅट असतील तर 10 टक्के, 650 चौ.फूटांचे फ्लॅट असतील तर 15 टक्के आणि 1076 चौ.फूटांचे फ्लॅट असतील तर त्यांच्यासाठी 20 टक्के रेट लावला जातो. सवलत देण्याचे शासनाचे धोरणच आहे. त्यामुळे या सोसायटीला जागा स्वस्तात दिली, कोणी मलई खाल्ली या बोलण्याला काही अर्थ नाही. मुंबई शहरात एखाद्या सोसायटीला जागा दिल्यानंतर त्याचे चटई क्षेत्र ठरलेले असते. मुंबई शहरामध्ये 7.33 इतके चटईक्षेत्र दिले जाते. उपनगरामध्ये ते 1 आहे. जागा देण्याबाबत सुध्दा शासनाने धोरण निश्चित केलेले आहे. जर 10 फ्लॅटपेक्षा कमी फ्लॅट असेल तर त्याचे कसे वाटप करावयाचे आणि दोनच फ्लॅट असतील तर त्याचे कसे वाटप करावयाचे याबाबतचे धोरण ठरलेले आहे. शासकीय कर्मचारी, जनरल पब्लिक, खासदार, आमदार, नगरसेवक, मिलिटरीच्या लोकांना, मागासवर्गीयांना जागा देण्याचे धोरणातच अंतर्भूत आहे. लॅण्ड मंजूर करेपर्यंत जर चूक झाली नसेल, बांधकाम करताना चूक झाली नसेल तर व त्यात महानगरपालिकेची चूक झाली आहे असे म्हणण्यास सुध्दा वाव दिसत नाही. यामध्ये सीआरझेडच्या कायद्याचे उल्लंघनही झालेले नाही. साप साप म्हणून रस्सीला धोपटत बसायचे आणि लोकांची दिशाभूल करावयाची असे या वरिष्ठ सभागृहाकडून होऊ नये एवढेच मी आपल्याला सांगतो. शासनाच्या धोरणाप्रमाणे ही सर्व कार्यवाही झालेली आहे. सभासदांचे किती उत्पन्न असावे तेही या धोरणात नमूद केलेले आहे. उत्पन्नाचे चुकीचे दाखले दिले असतील तर त्यासाठी शिक्षा करण्यास हरकत नाही. यामध्ये कोणत्याही राज्यकर्त्यांची चूक झालेली नाही. माननीय श्री.अशोकराव चव्हाण यांच्या सासूबाईंना फ्लॅट घेण्यास सांगितले किंवा आणखी कोणाला सांगितले त्यात अजिबात चूक नाही. एखाद्या सोसायटीच्या अध्यक्षांनी माझ्या माणसाला सभासद करुन घ्या असे सांगितले तर त्यात काही चूक होत नाही. परंतु सभासद पात्र नसताना त्याला सभासदत्व दिले गेले किंवा चुकीचे ॲफिडेव्हिट दिले गेले तर ती चूक आहे. 10 हजार रुपये पगार असताना 10 लाख पगार आहे असे चुकीचे सांगितले तर त्याबाबत क्रिमिनल केस करता येईल, परंतु सरकारला कोणताही दोष देता येणार नाही.

यानंतर श्री.शिगम





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत....

सभापती महोदय, सीआरझेडचा मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला. सीआरझेडचा कायदा आहे. 22.4.2003 पर्यन्त सीआरझेडच्या संदर्भात एनओसी देण्याचे अधिकार राज्य शासनाला होते. 5000 मीटरच्या आत बांधकाम करण्यास परवानगी घेण्यासाठी केन्द्राकडे जावे लागण्यासंबंधीचा कायदा आपणच केला. आदर्श सोसाटीला द्यावयाच्या जागेचे प्रपोझल 15.3.2003ला मंजूर झालेले आहे. म्हणजे या प्रकरणी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन झालेले नाही. हे प्रकरण सीआरझेड कायद्यातील कलम(एक) मधील आहे की (दोन)मधील आहे, यानुषंगाने देखील कायद्यात तरतूद आहे. इमेजनरी लाईन असेल, एक बिल्डिंग तिकडे बांधलेली असेल, एक बिल्डिंग पुढे बांधलेली असेल आणि मध्ये जागा असेल आणि इमेजनरी लाईन आपण लक्षात घेतली तर त्या साईटवर आपल्याला बिल्डिंग बांधता येते. याला सीआरझेड (2) म्हणतात. यामध्ये कोणत्याही अधिका-याने चूक केली असेल तर त्याला पाठीशी घालण्याचे कारण नाही. डिस्ट्रिब्यूशन करण्यामध्ये चूक केली असेल किंवा डिस्ट्रीब्यूशन घेण्यामध्ये चूक झाली असेल. परंतु त्यामुळे कुणाचे तरी नाव घेऊन विनाकारण बदनाम करणे योग्य नाही. याप्रकरणी योग्य प्रकारे डिस्ट्रीब्यूशन झालेले आहे. त्यामध्ये कुठेही चूक झालेली नाही.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आदर्श इमारत ही सुरवातीला 6 मजल्यांची बांधावयाची होती असे सांगितले. या 6 मजल्यांचे 31 मजले कसे झाले याचा मी विचार करीत बसलो. सभापती महोदय, मी बिल्डर असून 1968 सालापासून या व्यवसायामध्ये आहे. त्यामुळे कायद्याची मला पूर्ण माहिती आहे. या प्लॉटची जागा 3782 चौ.फूट होती. त्या जागेला 1.33 एफएसआय दिल्यानंतर 54000 चौ.फूटाची ती जागा झाली. मी गणित केले. या जागेवर 1076 चौ.फूटापेक्षा मोठा फ्लॅट बांधता येत नाही, बालकनी एक्स्ट्रा असते. या प्रमाणे हिशेब केला तर 51 ते 52 फ्लॅट होतात. चौकशी केल्यानंतर मला समजले की या इमारतीच्या एका मजल्यावर 4 फ्लॅट आहेत. 52 फ्लॅट बांधण्यासाठी 13-14 मजल्यांची इमारत बांधणे आवश्यक आहे. हायराईज बिल्डिंगचे प्रपोझल लवकर मंजूर होण्यासाठी हायराईज कमिटीची एनओसी लागते. ती एनओसी घेण्यासाठी वेळ लागतो. दरम्यान काम चालू व्हावे म्हणून सुरुवातीला 6 मजल्यांची परवानगी घेतली असेल आणि त्यानंतर हायराईज बिल्डिंग बांधण्याची परवानगी घेतली असेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..



श्री. विजय सावंत....

सभापती महोदय, त्या इमारतीच्या ठिकाणी असलेला रस्ता लहान केला असे सांगितले गेले. रस्ता लहान केला असेल तर त्यामध्ये कोणतीही चूक केलेली नाही. टाऊन प्लॅनींग ॲक्ट 1966च्या कायद्यामध्ये कलम 37(2) नुसार एखादा रस्ता मोठा असेल तर तो लहान करता येतो किंवा एखाद्या गार्डनसाठी जागा ठेवलेली असेल तर ती रिलिज करता येते...(अडथळा).. सभापती महोदय, थोडाशा टेक्निकल बाबी सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. मी कायद्याच्या बाहेर जाणार नाही. सर्वांनी वस्तुस्थिती सागितलेली असून त्याच्या बाहेर मी जाऊ इच्छित नाही. आपले वरिष्ठ सभागृह आहे त्यामुळे विधानपरिषदेतील सदस्यांना कायदा कळत नाही असा संदेश प्रसार माध्यमाद्वारे बाहेर जावू नये म्हणून काही तांत्रिक बाबींचा उहापोह मी या ठिकाणी करीत आहे. (अडथळा) विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हे कायद्याला सोडून बोलले आहेत. साप साप म्हणून दोरीला धोपटायचे हेच विरोधी पक्षाचे काम आहे. आपल्याला रस्ता लहान करावयाचा असेल तर कलम 37(2) नुसार त्यासंबंधीचा प्रस्ताव घेतला जातो आणि त्यानुसार कारवाई करण्यास महानगरपालिकेला सांगितले जाते. तीन किंवा दोन महिन्यामध्ये 37(2)ची कारवाई केली गेली नाही आणि अर्जदाराने पुन्हा शासनाला सांगितले तर कलम 50 नुसान 37(2)चे नोटीफिकेशन काढले जाते. हे नोटीफिकेशन काढल्यानंतर त्या बाबतीत विविध स्तरातील लोकांकडून लोकप्रतिनिधीकडून, तज्ज्ञांकडून हरकती मागविण्यासाठी 60 दिवसांचा कालावधी दिलेला असतो. या हरकती आल्यानंतर त्याबाबतीत डेप्युटी डायरेक्टर दर्जाच्या अधिका-याकडून हिअरिंग घेतले जाते आणि त्याप्रमाणे रिपोर्ट तयार करुन तो शासनाला सादर केला जातो. त्यानंतर कलम 37(1)ची कारवाई होते. त्यासाठी 30 दिवसांची मुदत दिलेली असते. म्हणजे कुणाला अंधारामध्ये ठेवून ह्या गोष्टी केलेल्या आहेत असे झालेले नाही. एका रात्रीमध्ये ही इमारत झालेली नाही.

सभापती महोदय, बस डेपोच्या जागेचा उल्लेख करण्यात आला. ही जागा बेस्टची होती हे कोणी सांगितले ? तसे असेल तर त्यासंबंधीची कागदपत्रे दाखविण्यात यावीत. ही जागा बेस्टची नसून महाराष्ट्र शासनाने ती बेस्टला लिजवर दिलेली आहे. म्हणजे ज्या जागेवर आदर्श इमारत बांधली ती जागा शासनाची आहे आणि बेस्टची जागा देखील शासनाचीच जागा आहे.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत.............

बेस्टसाठी हे आरक्षण नाही. बेस्टचा डेपो बांधावयाचा म्हणजे डेव्हलपमेंटल रिझर्व्हेशन आहे. म्हणून बेस्टला सांगितले की, तुम्हाला एफएसआयची गरज आहे का? त्यांनी सांगितले की, आम्हाला गरज नाही. बेस्टच्या डेपोला आवश्यक असलेला एफएसआय ठेवला आणि उर्वरित एफएसआय या सोसायटीच्या बांधकामासाठी ॲड केला. एफएसआयमध्ये कोणतीही चूक केलेली नाही. संरक्षण खात्याने पत्र दिले असते तर गोष्ट वेगळी. तसे पत्र दाखवू शकता का? संरक्षण खात्याची जागा असल्याचा कोणता पुरावा आहे? आर्मी विभागाने ही जागा आमची आहे असे सांगणारा एकही पुरावा आतापर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केलेला नाही. मी अतिक्रमण केले आणि सांगितले की, जागा माझी आहे. मी ती जागा सोडत नाही. विरोधी पक्षनेत्यांनी बरेच काही सांगितले. लँड डॉक्यूमेंट म्हणजे काय? प्रॉपर्टी कार्ड, 7/12 चा उतारा आणि सनद असेल तर सादर करावे. ही डॉक्यूमेंट दाखवण्यास तयार नाहीत. मग ही जागा आर्मीची आहे असे कसे म्हणता येईल? या संदर्भात आर्मी विभागाने कोणतीही सनद दाखविलेली नाही. लिज दिल्याचे कागद सादर केलेले नाहीत. ब्रिटिश सरकारने जागा दिली असे सांगितले जाते, त्यावेळी कागदपत्र दाखवावयास पाहिजे. ही जागा रिक्त होती, त्या जागेवर आर्मीने कंपाऊंड बांधले. गार्डन करण्याचा प्रयत्न केला. त्यांना ही जागा मिळावी, म्हणून त्यांनी हा प्रयत्न केला. माझी जागा असेल तर मी मागेन कशाला? जागा द्यावी म्हणून त्यांनी अर्ज दिलेला आहे. जागा जर माझी असेल तर मीच परत कशी मागणी करणार? पत्रव्यवहार दाखविला जातो तो चुकीचा आहे. तो कायद्याला धरुन नाही. ही जागा आर्मीची आहे असे दर्शविणारे एकही सिंगल डॉक्यूमेंट जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केलेले नाही. सोसायटीचा सदस्य कोणीही होऊ शकतो. त्यात चुकीचे काही नाही.

सभापती महोदय, अथर्व सोसायटीचे मी उदाहरण देतो. कायदा हाच होता. सगळे हेच आहे. अथर्व सोसायटीला जागा दिली ती जागा कुठे आहे? .....(अडथळा)....सभापती महोदय, आपण विरोधी पक्षाच्या मंडळींना विषय सोडून बाजूला जायला परवानगी दिली. मी या विषयावर चार तास बोलू शकतो. इतर विषय मांडू शकतो. आमच्यावर शिंतोडे उडविले आहेत, ते मला पुसून काढले पाहिजेत. अथर्व सोसायटीचे अध्यक्ष कोण आहेत? श्री.गोपीनाथ मुंडे हे अध्यक्ष आहेत. ही जागा कशी दिली गेली? ही जागा देतेवेळी......

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सदर अल्पकालीन चर्चा ही आदर्श सोसायटीपुरती मर्यादित व्हावी`. आतापर्यंत सन्माननीय सदस्यांनी जे भाष्य केले आहे ते योग्यच आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्या भाषणाच्या वेळी एक अपवाद केला गेला होता.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, विरोधी पक्षनेते आपल्या भाषणामध्ये आदर्श सोसायटीवर बोलत असताना नवी मुंबईला पोहोचले, बांद्र्याला पोहोचले. वनश्री सोसायटीचा उल्लेख केला. मग आम्हाला अथर्व प्रकरणापर्यंत जायला काय हरकत आहे?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अत्यंत गंभीरपणे माननीय सदस्यांना विनंती करण्यास उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांच्याकडे या विषयातील भरपूर ज्ञान असेल, परमेश्वराने त्यांना प्रचंड बुध्दी दिली असेल. या सभागृहात बसलेले सगळे मूर्ख आहेत असे ते कसे सांगू शकतात?

श्री.विजय सावंत : सांगितले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विजय सावंत स्वत:ला काय समजतात? त्यांना भरपूर ज्ञान आहे याचा आम्हाला अभिमान आहे. ते स्वत: बिल्डर आहेत. 400 कोटी रुपये त्यांनी कमावले. बिल्डर म्हणून त्यांना या विषयातील ज्ञान असणारच. परंतु इतर सगळे मूर्ख आहेत, त्यांना अक्कल नाही, ते सगळे बेअकली आहेत असे त्यांचे जे म्हणणे आहे ते आम्ही सहन करणार नाही. ते स्वत:ला काय समजतात?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी अथर्व एज्यूकेशन सोसायटीसंबंधी उल्लेख केला आहे. अथर्व एज्यूकेशन सोसायटीला शासनाने जागा दिलेली आहे. त्या जागेवर कोणत्याही प्रकारचे डिफेन्स विभागासाठी आरक्षण नव्हते. आदर्श सोसायटीच्या विषयावर चर्चा सुरु असल्यामुळे त्याच विषयावर चर्चा व्हावी. स्वत:चे पाप झाकण्यासाठी विनाकारण दुसरा विषय उपस्थित करु नये अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

नंतर 4पी.1...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सभागृहात नियम 289 अन्वयेची सूचना दिलेली असताना नियम 97 अन्वये चर्चा घेण्याचे मी मान्य केलेले आहे. या चर्चेत भाग घेताना त्यावर मर्यादा अशी आहे की, सन्माननीय सदस्यांनी फक्त आदर्श सोसायटीच्या अनुषंगानेच आपले विचार व्यक्त करावेत, असे मी चर्चेला सुरुवात केली होती तेव्हाच सांगितले होते. एखाद दुसरा अपवाद वगळता अशी चर्चा झाली, परंतु या मर्यादेच्या बाहेर सन्माननीय सदस्यांनी जाऊ नये अशी माझी विनंती आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी ज्यावेळेस थोडेसे विषयांतर करण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा आपण थांबविले व मी सुध्दा थांबलो. पण माझा मुद्दा एवढाच होता की, आदर्श सोसायटीत ज्या अधिकाऱ्यांची नावे आहेत त्यांनी दुसऱ्या सोसायट्यांमध्ये देखील सदनिका घेतलेल्या आहेत.

**सभापती** : आपण आदर्श सोसायटीच्या संदर्भात बोलत असताना काही संदर्भ दिले होते परंतु सर्वच सन्माननीय सदस्यांनी ही मर्यादा सोडून बोलणे योग्य नाही, म्हणून शक्यतो दुसरे विषय येथे घ्यावयाचे नाहीत, अशी माझी सूचना आहे.

श्री. रामदास कदम : महोदय, सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांचे नाव या ठिकाणी घेतले, परंतु ते या सभागृहाचे सदस्य नसल्याने त्यांचे नाव कामकाजातून काढून टाकावे.

**सभापती** : ठीक आहे, हे तपासून वगळण्यात येईल.

श्री. विजय सावंत : महोदय, आपण सभागृहात सर्व सन्माननीय सदस्यांना सारखाच न्याय द्यावा अशी विनंती मी करतो. ज्यावेळेस वनश्री सोसायटीचा उल्लेख झाला, त्यात नाव घेतले. मला मुंडे साहेबांचे नाव घ्यावयाचे नाही परंतु अथर्व सोसायटीची जागा जिल्हा सैनिक कल्याण मंडळासाठी राखीव होती हे सांगावयाचे आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया मूळ विषयाच्या बाहेर जाऊ नये.

श्री. विजय सावंत : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले की आम्हाला अक्कल नाही, कायदा कळत नाही, अशा प्रकारे मी बोललो नाही. मी कायदा सोडून काहीच बोललो नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रथम हे लक्षात घ्यावे की, या सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांना चांगल्या प्रकारे कायदा समजतो, अशी माझी खात्री आहे.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे यांचे नाव सभागृहात घेतले आहे पण या निमित्ताने माझी अशी विनंती आहे की, ज्यांना सभागृहात खुलासा करण्याची संधी नाही त्यांची नावे कामकाजातून वगळण्यात यावीत.

**सभापती** : ज्यांना सभागृहात खुलासा करण्याची संधीच नाही त्यांची नावे तपासून वगळण्यात येतील.

श्री. रामदास कदम : महोदय, माझ्याकडे असलेल्या शासकीय कागदपत्रावरुन ती नावे पुढे आली आहेत म्हणून मी ती वाचून दाखविली.

**सभापती** : आपल्या सभागृहाची एक परंपरा अशी आहे की, ज्या व्यक्तिला सभागृहात खुलासा करण्याची संधीच नाही त्यांची नावे आपण शक्यतो घेत नाही. असे असताना सुध्दा येथे जी नावे घेण्यात आली असतील ती कामकाजातून वगळणे गरजेचे आहे. त्यानुसार सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनीही सूचना केली आहे, तशी ती तपासून घेण्यात येतील.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम बोलत असताना त्यांनी अवर सचिव श्री. घरत यांचेही एक सदस्य म्हणून उल्लेख केला, परंतु ते या सोसायटीमध्ये सदस्यच नाहीत, असे मी निदर्शनास आणून देत आहे.

श्री. रामदास कदम : मी अवर सचिव श्री. घरत यांच्या सहीचे पत्र माझ्याकडे असलेल्या कागदपत्रांमध्ये आहे म्हणून घेतले. मी आपल्याकडे माझ्याकडील संपूर्ण कागदपत्रे सुपूर्द करतो आणि जर तसे पत्र त्यात नसेल तर आपण त्यांचे नाव काढू शकता.

श्री. उल्हास पवार : महोदय, मी राजकीय नेत्यांच्या बाबतीत उल्लेख करतो.

श्री. रामदास कदम : महोदय, ज्या घरत नावाच्या अधिकाऱ्याने पत्र दिले आहे त्याचा मी उल्लेख केला. असाही उल्लेख चर्चेच्या दरम्यान करायचा नसेल तर मग अशी चर्चा करायचीच कशाला ?

श्री. दिवाकर रावते : ज्यांच्या काळात हे घडले, त्या राज्यकर्त्यांनी राज्य केले, निर्णय सुध्दा घेतले आणि आम्ही मात्र त्यावर बोलायचे सुध्दा नाही, हे काय चालले आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे ......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी जी सूचना केली होती त्यावर मी निर्णय दिला आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, आदर्श सोसायटीची जागा कारगील युध्दातील शहीद जवांनांच्या कुटुंबियांसाठी होती, असे या ठिकाणी सांगण्यात आले. मुंबई महानगरपालिकेचा डेव्हलपमेंट प्लॅन खरे तर 1980 मध्येच व्हावयास पाहिजे होता. मुंबई महानगरपालिकेने डेव्हलपमेंट प्लॅन तयार करुन तो शासनाकडे 1990 मध्ये आला व सन 1991 मध्ये मंजूर झाला. ज्यावेळी तो मंजूर झाला त्यावेळी कारगीलचे युध्द झालेच नव्हते. त्यामुळे आदर्शच्या जागेवर कोणत्याही प्रकारचे रिझर्व्हेशन नव्हते. तसेच या ठिकाणी हेलिपॅडचे कोणत्याही प्रकारचे रिझर्व्हेशन नव्हते. हेलिपॅड करावयाचे आहे, अशी मागणी केली म्हणजे रिझर्व्हेशन होत नाही. आदर्श सोसायटीच्या जागेवर कोणत्याही प्रकारचे रिझर्व्हेशन नव्हते. या ठिकाणी रोडचे, बस डेपोचे तसेच आर झोनचे रिझर्व्हेशन होते. कारगील युध्दातील शहीद जवानांच्या कुटुंबियांसाठी असलेली जागा काढून घेतली, लष्कराची जागा काढून घेतली, अशा प्रकारचा विषय नाही. या ठिकाणी जे काही केले गेले ते कायद्याला धरुन केलेले आहे. कायद्याच्या बाहेर जाऊन या ठिकाणी कोणतेही काम करण्यात आलेले नाही, एवढेच मी या निमित्ताने सांगतो व माझे विचार थांबवतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र...

-----

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विषयावर माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी जे विचार व्यक्त केलेले आहेत, त्याचा मी पुनरुच्चार करणार नाही.

**सभापती** : सभागृहाच्या कामाकाजाची वेळ सात वाजेपर्यंत वाढविण्यात आली होती. सभागृहाचे कामकाज, राहिलेल्या सर्व वक्त्यांचे भाषण, त्यावरील माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत मी सभागृहाची वेळ वाढवीत आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, आदर्श घोटाळयातील जे सूत्रधार आहेत त्यांना काही शिक्षा होणार आहे की नाही ? असा प्रश्न सर्व समाजामधून विचारला जात आहे. अमेरिकेतील वॉटर गेट प्रकरण असेल किंवा आपल्या देशातील घडलेले बोफोर्सचे प्रकरण असेल, त्यांची जशी चर्चा होते, तशाच प्रकारची चर्चा आदर्श घोटाळयाबाबत होत आहे व त्याकडे संपूर्ण जनतेचे लक्ष लागलेले आहे. या घोटाळयातील काही तपशील मी मांडणार आहे. हा तपशील सभागृहात येणे गरजेचे आहे, असे मला वाटते. जून 2000 मध्ये आदर्श सोसायटीने माननीय श्री.अशोक चव्हाण यांना आदर्श सोसायटीमध्ये लष्करातील निवृत्त अधिका-यांना जागा देण्याच्या संदर्भात पत्र दिले होते. मुळातच श्री.सौरव रे हे लष्करात इस्टेट मॅनेजर म्हणून काम करीत होते. त्यांनी 14 जुलै, 2003 मध्ये या विषयाच्या संदर्भात संरक्षण विभागाला 3 ते 4 पत्रे पाच वर्षाच्या काळात लिहिली. या जागेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांना देणे योग्य नाही, अशा प्रकारची तक्रार त्यांनी नोंदविली होती. श्री.टी.के.कौल हे सदर्न कमांडचे अधिकारी होते. त्यांना देखील आदर्श सोसायटीमध्ये फ्लॅट मिळालेला आहे. श्री.सौरव रे यांनी 14 जुलै, 2003 नंतर दरवर्षी पत्र लिहिली. परंतु पत्र लिहिल्यानंतर श्री.सौरव रे यांची बदली काश्मीर येथे करण्यात आली व तेथून इशान्य भारतात करण्यात आली. महत्वाचे म्हणजे कविता मिश्रा, श्री.शैलेंद्र पांडे यांचे नातेवाईक हे सैन्यातील निवृत्त अधिकारी आहेत. शैलेंद्र पांडे हे कारगीलमध्ये लढलेले आहेत. श्री.शैलेंद्र पांडे हे कारगीलमध्ये लढलेले असल्यामुळे त्यांनी जेव्हा आदर्श सोसायटीमध्ये फ्लॅट घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा श्री.सौरव रे यांनी शैलेंद्र पांडे यांना सांगितले की, ही इमारत योग्य त्या पध्दतीने उभी राहत नसल्यामुळे तुम्ही या इमारतीमध्ये तुमचे सेव्हिंगचे पैसे घालू नका. अशा प्रकारचा सल्ला रे यांनी दिला होता.

सभापती महोदय, श्री. विजय सावंत यांचे ज्ञानपूर्ण भाषण मी ऐकलेले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

आतापर्यंत काँग्रेसच्या दिल्लीतील प्रवक्त्यांचे भाषणे ऐकले, राष्ट्रवादी काँग्रस प्रवक्त्यांचे भाषण ऐकले, भाजपच्या प्रवक्त्यांची भाषण ऐकले. परंतु नियम तोडल्यावर केंद्रातील काँग्रेस पक्ष श्रेष्ठींनी केंद्रीय वित्त मंत्री श्री.प्रणव मुखर्जी व संरक्षण मंत्री ॲन्थोनी या दोघांना चौकशीसाठी पाठविले. आमच्या माहितीप्रमाणे आर्मीने स्वत:ची जागा कशी काय दिली याबाबत सी.बी.आय.चौकशी करीत आहे. तेव्हा सी.बी.आय.चौकशी कशी चुकीची आहे याबाबतचे सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांचे ज्ञानपूर्ण भाषण ऐकायला आवडले असते. परंतु याठिकाणी कोणत्याही गोष्टींचे उल्लंघन झाले नाही असे सांगितले जाते त्याबाबत मी मुद्दाम उल्लेख करीन की, नौदलाना सुरक्षेबाबत गंभीर धोका होऊ शकतो म्हणून प्रमाणपत्र देण्यास आक्षेप घेण्यात आला होता.

दुसरे म्हणजे आमच्या असे वाचनात आले की, आदर्शमधील सर्व प्रकरणांची चौकशी सरकारी महालेखापरीक्षक करणार आहेत. श्री.बलसान नायर हे पर्यावरण विभागाचे सचिव आहेत त्यांनी या प्रकरणी पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन केले आहे अशी माहिती सी.बी.आय.ला दिलेली आहे. संरक्षण अधिकाऱ्यांनी फ्लॅटच्या मोबदल्यात परवानगी दिली का असा प्रश्न निर्माण होतो. . आदर्श सोसायटीमध्ये जनरल दीपक कपूर आणि ॲड.माधवेंद्र सिंग हे निवृत्त अधिकारी आहेत. निवृत्त अधिकाऱ्यांवर कोर्टमार्शल होऊ शकत नाही त्यामुळे या संदर्भात सी.बी.आय.चौकशी करण्याचे आदेश केंद्राने दिलेले आहेत.

सभापती महोदय, "टाईम्स ऑफ इंडिया" या दैनिकात श्री.प्रफूल मारपकवार यांचा एक लेख आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, आदर्श सोसायटीचे सदस्यत्व द्यायचे की नाही याबाबत मुंबईच्या जिल्हाधिकारी श्रीमती आय.झेड.कुंदन या स्वत: ऑथॉरिटी होत्या. श्री.जे.पी.डांगे यांनी नाराजी व्यक्त करुन सांगितले की, आपण स्वत:च्या सदस्यत्वासाठी परवानगी घेणे योग्य नाही. तेव्हा तत्कालीन मंत्री महोदयांनी या गोष्टीसाठी परवानगी दिली पाहिजे अशाप्रकारची रदबदली केली होती का याची चौकशी झाली पाहिजे, असे मला स्पष्टपणे वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, कोणत्याही पक्षाचे पक्षश्रेष्ठी राजकीय मतभेद असले तरी एखाद्या प्रकरणानंतर बदलाचा निर्णय घेतात तेव्हा त्यामध्ये कुठे ना कुठे काही तरी चूक झालेली असते आणि ते ओझे आता पक्षाला डोईजड झालेले आहे असे वाटते त्यावेळी असे राजकीय निर्णय घेतले जातात. अशावेळी जे लोक पुन्हा पुन्हा समर्थन करुन सांगतात की, काहीच चूक झाली नाही, तेव्हा काँग्रस श्रेष्ठींनी घेतलेला निर्णय अयोग्य आहे असे त्यांचे म्हणणे आहे काय, हे देखील आम्हाला समजले पाहिजे. या संदर्भात चौकशी करण्यासाठी दिल्लीतून दोन नेते आले. ते अकारण धूळफेक करण्यासाठी आले होते काय ? याचे देखील उत्तर मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, संपूर्ण एक महिना सत्तांतरामध्ये गेला. आज अनेक सनदी अधिकाऱ्यांची नावे समोर आली आहेत. या अधिकाऱ्यांबद्दल कोणाच्या मनात वैर नव्हते. परंतु या अधिकाऱ्यांनी स्वत: फ्लॅट घेतलेले आहेत. स्व.यशवंतराव चव्हाण म्हणायचे की, "अधिकाऱ्यांनी "होय" म्हणायला शिकले पाहिजे आणि नेत्यांनी "नाही" म्हणायला शिकले पाहिजे. दोघेही "हो" म्हणायला लागले तर काय होते हे आदर्श घोटाळ्यावरुन दिसून आले.

सभापती महोदय, या घोटाळ्याचे पुढे काय होणार आहे असा गंभीर प्रश्न आहे. या आदर्श सोसायटीमध्ये ज्या सनदी अधिकाऱ्यांचे फ्लॅटस आहेत त्यांना सक्तीने रजेवर पाठविले पाहिजे. या संदर्भातील चौकशी करण्यासाठी अधिकारी नेमले जातील अशा प्रकारचे संकेत आम्हाला मिळाले आहेत. यु.एल.सी.चा कायदा बदलण्यासंबंधीचा अधिनियम ज्यांच्या सहीने निघाला ते श्री.रामानंद तिवारी यांचा आदर्श सोसायटीमध्ये फ्लॅट आहे. हे अधिकारी अशा मोक्याच्या जागेवर बसून आमची ते चर्चा ऐकत असतील आणि आम्हाला खरोखरच काही ज्ञान नाही म्हणून हसत असतील. तेव्हा ज्या सनदी अधिकाऱ्यांचे किंवा त्यांच्या नातलगांचे आदर्श सोसायटीमध्ये फ्लॅटस आहेत त्या सर्व अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याची हिम्मत हे सरकार दाखविणार काय ? जी हिम्मत हाय कमांडमध्ये आहे ती हिम्मत या सरकारमध्ये आहे काय, असा प्रश्न इतिहास आपल्याला विचारणार आहे.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KGS/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 19:00

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, समोरच्या बाकावरील सदस्य आमच्यावर आरोप करीत आहेत. या प्रकरणात केंद्र सरकारचा हस्तक्षेप नसता आणि संरक्षण विभागाने लक्ष घातले नसते तर या सरकारने ही चौकशी केली असती काय, असा प्रश्न त्यांनी स्वत:च्या मनाला विचारावा. आदर्श घोटाळ्यावर पांघरुण घालण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण म्हणत होते की, ही जमीन सरकारची आहे. महसूल मंत्री श्री.नारायण राणे देखील तेच म्हणत होते. दोघेही नेते असे म्हणत असतील तर सी.बी.आय.कसली चौकशी करीत आहे ? जर केंद्र सरकारने हस्तक्षेप केला नसता तर कोणत्याही प्रकारची चौकशी झाली नसती अशी आम्हाला भीती वाटते. आपण सत्ताधारी पक्षातील आहात. आपण आमचे आभार मानले पाहिजेत की, आम्ही विरोधी पक्ष आपल्यावर टीका करीत आहोत. अन्यथा आपल्या घरावर सुध्दा गुगल सर्च मधून माहिती घेऊन 7/12 उतारा केव्हा बदलतील हे आपणाला कळणार देखील नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे......

म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकवता कामा नये. आम्हाला जेव्हा तुम्ही सांगत आहात तेव्हा तुमच्या जमिनीवर सुध्दा नांगर फिरवला जाईल. प्रत्येक ठिकाणी जमिनीचे काय व्यवहार चालले आहेत ? या ठिकाणी स्वत: माननीय महसूल मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सभापती महोदय, आदर्श शिवाय इतर मुद्यावर बोलू नका, असे आपण वारंवार सांगितले होते व आपण दिलेले आदेश आम्ही मान्य केले आहेत. परंतु पूर्वीच्या महसूल मंत्र्यांचे आप्तस्वकीय आणि निकटचे कायकर्ते, मॅनेजर यांची देखील आदर्श सोसायटीमध्ये नावे आहेत. रुपाली रावराणे हिचे देखील नाव त्यामध्ये आले आहे. पूर्वीचे जर महसूल मंत्री आता पुन्हा महसूल मंत्री असते तर त्यांनी काय उत्तर दिले असते ? विरोधी पक्षाच्या सदस्यांना आपण वेगवेगळया प्रथा परंपराची आठवण करुन देता त्यावेळी तुमच्या पायाखाली काय जळत आहे, हे सुध्दा आपण पहा. या प्रकणात काहीही झालेले नाही, असे आपण सांगत आहात, परंतु या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर त्यातील दोषींना जर शिक्षा झाली नाही तर नागपूरमध्ये अप्पु यादवचा लोकांनी कोर्टात खून केला होता तशाच प्रकारे नक्षलवाद आणि कायदा हातात घेणारे लोक वाढतील, असे मी आपल्याला सांगते.

सभापती महोदय, शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, आदर्श सोसायटीमध्ये फ्लॅट देण्यात यावा यासाठी कोणी कोणासाठी शिफारसी केल्या होत्या यासंबंधीची पत्रे देखील सर्वाच्या समोर आली पाहिजेत. त्या संदर्भातील माहिती आम्हाला समजली पाहिजे. माहितीचा अधिकार वापरणा-या कार्यकर्त्यानी हाच अधिकार वापरुन माहिती सर्वासमोर आणली, त्या बद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करते. त्याचबरोबर या प्रकरणामध्ये प्रसार माध्यमांना सुपारी दिली गेली, असे सांगण्यात आले आहे. त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छिते की, एखाद्या व्यक्तीचा खून करण्यासाठी सुपारी दिली जाते आणि अंडर वर्ल्डमध्ये सुपारी हा शब्द वापरला जातो. परंतु ज्यावेळी पूजा केली जाते, त्यावेळी सुपारीला अधिष्ठान करुन देवाला आपण निमंत्रण देत असतो. तीच सुपारी आम्हाला हवी आहे. अंडरवर्ल्डमध्ये वापरली जाणारी सुपारी आम्हाला नको. जे थोडे लोक राजकारणात काम करीत आहेत ते जोपर्यंत जीवंत आहेत तोपर्यंत आदर्श सोसायटीच्या घोटाळयाबद्दल आम्ही कधीही शांत बसणार नाही. एवढे सांगून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चरणजितसिंग सप्रा ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आदर्श सोसायटीचा मुद्दा अतिशय गंभीर स्वरुपाचा असून तो संपूर्ण् देशभर गाजला आहे. विरोधी पक्षाचे नेते सन्माननीय श्री पांडुरंग फुंडकर यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे व यासंबंधी गेल्या तीन तासापासून सभागृहात चर्चा सुरु आहे. या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी काही डिफेन्स अधिका-यांचे पेपर्स तसेच इतर अधिका-यांचे पेपर्स आणून दाखविलेले आहेत. या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, हे सर्व पेपर्स सगळयांकडे आहेत, हे खरे आहे. आदर्श सोसायटीच्या संदर्भात सीबीआयची चौकशी सुरु झालेली आहे. त्याचबरोबर सीबीआय या प्रकरणाची चौकशी करीत आहे हे उघडपणे दिसत आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, या प्रकरणाची आणखी चौकशी व्हावी. काही अधिका-यांची चौकशी व्हावी. त्यांचे म्हणणे खरे असून त्या बाबातीत आमचे काहीही दुमत नाही. या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे आणि जे कोणी दोषी असतील त्यांच्या विरुध्द कारवाई देखील झाली पाहिजे. जे कोणी अधिकारी दोषी असतील त्याच्यावरही कारवाई करण्यात आली पाहिजे. राष्ट्रवादी कॉग्रेस असो वा कॉग्रेस पक्ष असो, आघाडीच्या सरकारने नेहमीच नैतिक जबाबदारी लक्षात घेऊन काम केलेले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख आणि तत्कालीन उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील आणि तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारुन राजीनामा दिला होता. आमचा पक्ष कर्नाटक राज्यातील पक्षासारखा नाही. त्या ठिकाणच्या एका मुख्यमंत्र्यांनी मोठा घोटाळा केला असला तरी त्यांचा राजीनामा घेण्या ऐवजी त्यांचे कौतुक करण्यात येत आहे आणि त्यांना पुन्हा मुख्यमंत्र्याच्या आसनावर बसण्याचा निदेश देण्यात येत आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील म्हणाले की, माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांचा राजीनामा मागितला गेला होता परंतु तशी वस्तुस्थिती नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री. ओबामा यांच्या मुंबई भेटीच्या एक आठवडया अगोदर कॉग्रेसच्या सन्माननीय अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांच्याकडे श्री. अशोक चव्हाण गेले होते. त्यावेळी त्यांनी स्वत: होऊन सांगितले होते की, या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारुन मी राजीनामा देण्यास तयार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचे म्हणणे चुकीचे आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चरणसिंग सप्रा....

माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, जेव्हा आम्ही महाराष्ट्राबाहेर जातो तेव्हा तेथील लोक विचारतात, क्या आप "आदर्श" वाले महाराष्ट्र के हो? मी सुध्दा असे सांगू इच्छितो की, जेव्हा आम्ही दुसऱ्या राज्यात जातो तेव्हा तेथील लोक आम्हाला म्हणतात, "बंगलौर तो बहुत छोटा है, कर्नाटक तो बहुत छोटा है लेकिन महाराष्ट्र से बडा काम उन्होंने करके दिखाया है", ये बात भी लोग हमसे बोलते हैं. आरक्षणाबद्दल बऱ्याच माननीय सदस्यांनी सांगितले की, आम्ही आरक्षणामध्ये बदल केले. आरक्षणामध्ये बदल करण्याचे कलम 37 अन्वये महानगरपालिका आणि शासनाला अधिकार आहे. त्या संदर्भात अनेक सोसायटयांची चर्चा झाली. मघाशी वरळी सागर, अथर्व सोसायटीबाबत चर्चा झाली. त्याचप्रमाणे मुक्ती फौंडेशनची सुध्दा चर्चा झाली आहे. त्या आरक्षणामध्ये बदल करण्याचे काम केवळ आघाडीच्या सरकारमध्ये नाही तर युतीच्या सरकारमध्ये जास्त झाले आहे. आणि आपण जर पाहिले तर अशा अनेक सोसायटया आपणास पहावयास मिळतील, त्याची यादी माझ्याकडे आहे. आदर्शमध्ये खूप मोठा भ्रष्टाचार झाला आहे हे सर्वांनी सांगितले आहे. त्यामध्ये माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी चर्चेची मर्यादा ओलांडून ते नवी मुंबईपर्यंत गेले. आणखी कुणी कांदिवली-बोरीवलीपर्यंत गेले. हा भ्रष्टाचार केवळ आदर्शपुरता सिमित नाही, केवळ हाऊसिंगपुरता सीमित नाही. हा भ्रष्टाचार अनेक ठिकाणी पोहोचला आहे. आपण जर पाहिले तर ॲडॉप्शन पॉलिसीच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेमध्ये सर्वात मोठा भ्रष्टाचार सुरु आहे. त्याठिकाणी किती भूखंडाचे श्रीखंड घेतले आहे याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. महानगरपालिकेमध्ये खड्डे बुजविण्याचे कंत्राट, पावसाळयापूर्वी नाले सफाई करण्याचे कंत्राट, रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे कंत्राट या सर्व कामांमधील भ्रष्टाचाराची चौकशी झाली पाहिजे. पीएच ही कंपनी 1982 मध्ये काळया यादीमध्ये आलेली आहे. त्या कंपनीला सन 2005 मध्ये पुन्हा जेएनएनयुआरएमचे कंत्राट दिले गेले आहे...

**सभापती** : माननीय सदस्यांनी फक्त आदर्श सोसायटीपुरते मर्यादित स्वरुपामध्ये भाषण करावे.

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, मी आदर्शच्या बाहेर गेलेलो नाही. अनेक माननीय सदस्य भ्रष्टाचाराबद्दल बोलले. भ्रष्टाचार हा सर्वच ठिकाणी आहे. मुबई महानगरपालिकेमध्ये भ्रष्टाचाराला तर सीमाच नाही. रिगल ते हुतात्मा चौकापर्यंत पाच भुयारी वाहनतळ उभे करण्याची

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

तुमची योजना आहे. त्यामुळे हा भ्रष्टाचार केवळ आदर्शपुरता मर्यादित नसल्यामुळे तुम्हाला महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराकडे सुध्दा पहावे लागेल.

(गोंधळ)

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सदस्य आदर्शच्या मर्यादेबाहेर जाऊन बोलणार असतील तर आम्हाला सुध्दा बोलावयास दिले पाहिजे, हे काय चालले आहे.यांच्यासाठी वेगळा नियम आहे काय?

**सभापती** : माननीय सदस्य श्री. सप्रा जी आपण चांगले मुद्दे मांडीत आहात. परंतु आदर्श सोसायटीच्या मर्यादेमध्ये राहून आपण आपले विचार मांडावेत.

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, ठीक आहे. मी आदर्शच्या मर्यादेबाहेर जात नाही. आता सभागृहामध्ये सन्माननीय मुख्यमंत्री उपस्थित झालेले आहेत. त्यांना या चर्चेला उत्तर द्यावयाचे असल्यामुळे मी जास्त बोलत नाही.आपण मला संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : या सभागृहामध्ये आम्हाला माननीय सदस्य श्री. चरणसिंग सप्रा साहेबांकडून एक नवीन संदेश मिळाला आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित झाल्यानंतर "अब मैं उनकी तरफ से नहीं बोल रहा हूँ" म्हणजे सरदारजी कसा असतो हे त्यांनी सांगितले. आदर्शची एवढी मांडणी सभागृहामध्ये झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्री चर्चेला उत्तर देण्यासाठी सभागृहामध्ये उपस्थित झाले आहेत.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी आपल्याला धन्यवाद देतो आणि आपले आभार मानतो. मी माझ्या शर्टवर फक्त आदर्श एवढेच लिहिले होते. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना त्याबद्दल काही बोलता येत नव्हते. त्याबद्दल कोणत्या पध्दतीने आक्षेप घ्यायचा हे कळत नव्हते. पण सभापती महोदय, आपल्याला ते जाणवले की, आदर्श म्हटल्यानंतर महाराष्ट्रातील जनतेच्या भावना वेदनामय झालेल्या आहेत. त्यामुळे सभापती महोदय, आपल्याला आदेश द्यायचा अधिकार असताना आपण मला विनंती केली. त्यानंतर मी आपल्या भावनांचा आदर करण्याकरिता मी परिधान केलेले ते शर्ट काढून ठेवले. आदर्श या शब्दामुळे फार मोठा घोळ निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, मला या गोष्टीचे वाईट वाटते की, काल मी लोकसत्ता हे वर्तमान पत्र वाचण्यासाठी उघडले तेव्हा त्याच्या पहिल्या पानावरच "नागपूरातला आदर्श घोटाळा, सनदी अधिकाऱ्यांना भूखंड," असे छापलेले होते. मी दुसरा पेपर उघडला त्यामध्ये "म्हाडा इमारतीत अतिक्रमण असाही आदशर्." म्हणजे या देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये कोणी घोटाळा केला की, त्याला आदर्शच म्हणणार काय? सभापती महोदय, दुर्दैवी असे रणकंदन या एका प्रकरणातून घडलेले आहे. हजारो आणि शेकडो वर्षे आदर्श या शब्दाला सांस्कृतिक सन्मान होता. जे जे चांगले आहे त्याला आदर्श म्हणून आपण लोकांकडे बोट दाखवत होतो. मला या सभागृहात कोणी विचारले तर या सभागृहात सभापती आदर्श आहेत. माझी आई आदर्श आहे. माझे आई-वडिल आदर्श आहेत. माझे गुरु आदर्श आहेत. असा आदर्श हया शब्दाचा अर्थ होता पण तो आदर्श शब्द आता धसकामय झालेला आहे की, जे जे वाईट आहे त्याला लोक आदर्श म्हणत आहेत. सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य या सभागृहात उभे राहून आम्हाला कायदे कानून शिकवतात. त्याबद्दल हरकत नाही. तो तुमचा अधिकार आहे. आपण कशाची शिफारस करीत आहोत हे आपल्या सगळयांना कळायला पाहिजे. नाव घ्यायला नको पण खालच्या सदनामध्ये या संदर्भात तत्कालीन मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. पण ते अभिमानाने सांगतात की, एक चव्हाण गेले आणि दुसरे चव्हाण आले. तसेच खालच्या सभागृहात भाषण करताना त्यांनी स्पष्ट शब्दात जी नावे घेतलेली आहेत ती नावे मी येथे घेणार नाही कारण ती रेकॉर्डवर घ्यायची नाहीत. पण उद्याच्या वर्तमानपत्रात माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेला खुलासा किंवा इतर सन्माननीय सदस्यांनी केलेल्या

..2...

श्री. दिवाकर रावते.....

भाषणापेक्षा श्री. अशोक चव्हाण यांनी याचा जो पर्दाफास विधानसभेत केलेला आहे तोच जास्त छापून येणार आहे.

सभापती महोदय, यामध्ये दोन गोष्टी विचित्र दिसत आहेत. माझ्याकडे एक विचित्र संदेश आला होता. त्यामध्ये असे म्हटले होते की, "एका नेव्हीच्या अधिकाऱ्याने असे म्हटले आहे की, सैन्याची माणसे यामध्ये गुंतलेली आहेत ही या देशाला आणि सैन्याला अत्यंत शरमेची बाब आहे". सभापती महोदय, यात तुमचा आणि माझा व्यक्तिगत विषय नाही. सदनाच्या माध्यमातून एखादी घटना घडली असेल तर राजकारण्याला कधीही दोष देता येतो. त्याला घरीही पाठविता येते. परंतु सनदी अधिकाऱ्यांनी या संदर्भात जे घडविलेले आहे ते गंभीर आहे. चिंताजनक आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी माननीय श्री. यशवंतराव चव्हाणांचे वाक्य सांगितले ते तुम्हाला आणि आम्हाला आज अंतर्मुख व्हायला लावणारे वाक्य आहे. ते वाक्य असे आहे की,"अधिकाऱ्याने होय म्हणण्याची सवय ठेवावी आणि राज्यकर्त्यांनी नाही म्हणायची सवय ठेवावी." हे दोघेही जेव्हा होय म्हणतात तेव्हा आदर्श निर्माण होतो. म्हणजे हे किती गंभीर आहे. मला पाहिजे, मला पाहिजे अशी हाव सुटली आहे. मी टी.व्ही.च्या माध्यमातून बोलत असताना मला एक प्रश्न विचारण्यात आला होता तेव्हा मी होय असे म्हटले. आमच्या जीवनामध्ये आणि राजकारणामध्ये कधी कधी अशी परिस्थिती निर्माण होते की इच्छा असो अथवा नसो कोणाला तरी नाईलाजाने ओबेलाईज करावे लागते. पण हे करत असताना ते थांबविण्याची ज्या शाईची आणि पेनची ताकद आहे ती शाई आणि पेन का थांबवू शकले नाही, हा आदर्श घोटाळयाचा खरा प्रश्न आहे. सभापती महोदय, यामुळे आणखी दोन विचित्र घटना घडत आहेत. त्याबद्दल बोलून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे.

सभापती महोदय, सगळया अधिकाऱ्यांच्या बद्दल या ठिकाणी सांगण्यात आले. या अधिकाऱ्याने महाराष्ट्राला लुटले आहे हे बघून मला तर धक्काच बसला. कुठल्याही राजकारण्यांनी एवढे लुटले असेल असे मला वाटत नाही. एवढे भयानक पध्दतीने महाराष्ट्राला लुटले आहे. 18-18, 17-17 फ्लॅट घेतले आहेत. सभापती महोदय, या प्रकरणामुळे महाराष्ट्रामध्ये संपूर्ण अधिकारी क्षेत्रामध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या बाबतीत कुचंबणा निर्माण झालेली आहे. या प्रामाणिक अधिकाऱ्यांना असे वाटते की, आता आम्ही काय करायचे? त्या जागेवर बसलेल्या अधिकाऱ्यांच्या नावाने जेव्हा छापून येते तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

श्री. दिवाकर रावते...

काम केले असेल  त्याला बंधन कसे घालायचे? अशा प्रकारचे षडयंत्र चालणार असेल तर मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगणार आहे की, या प्रमाणिक अधिकाऱ्यांच्या पाठीमागे शासनाला खंबीरपणे उभे रहावे लागेल.

यानंतर श्री. बरवड......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आपल्या अधिपत्याखाली असलेल्या खात्याच्या बाबतीत जर असे घडणार असेल आणि अशा प्रकारची घटना चालणार असेल तर आपल्याला त्या प्रामाणिक अधिकाऱ्याचे पूर्ण संरक्षण करावे लागेल आणि त्यांच्यामध्ये पूर्ण विश्वास निर्माण करावा लागेल. कारण याच यंत्रणेमधील हेच प्रामाणिकपणे काम करणारे अधिकारी प्रशासनामध्ये घोळ करणाऱ्या अधिकाऱ्यांचा कर्दनकाळ ठरणार आहेत. मला एवढीच मागणी करावयाची आहे. मला जास्त बोलावयाचे नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, ज्या ज्या अधिकाऱ्यांचा यामध्ये थेट संबंध आहे त्या सर्व अधिकाऱ्यांना आपण कोणत्या प्रकारे शिक्षा करणार आहात ? आपण त्यांना तातडीने रजेवर पाठवू शकतो पण मायावतींची हिंमत आपण दाखविणार काय हा प्रश्न आहे. मायावती हे करु शकते. भारतीय प्रशासकीय सेवेतील 27 अधिकाऱ्यांना मायावती घरी पाठवू शकते तर महाराष्ट्रामध्ये तो धडा आपण देणार आहात की नाही ? त्यामधून धाक निर्माण होईल की नाही हे मला माहीत नाही पण त्यातून एक शिस्त निश्चितपणे निर्माण होईल याची मला खात्री आहे. आपण ही चौकशी सीबीआयकडे देणार काय ? कारण आपल्याला सीबीआयची जास्त माहिती आहे. आपण पंतप्रधान कार्यालयात होता आणि सीबीआय हाताळत होता. सीबीआयचे अधिकारी कोणत्या पध्दतीने काम करतात हे आपल्याला माहीत आहे. तेव्हा आपण कोणत्या पध्दतीने चौकशी करणार हे तर सांगितलेच पाहिजे. आमचे असे ठाम मत आहे की, आज आपण कोणत्याही परिस्थितीमध्ये निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दोन्ही सभागृहाच्या सर्वपक्षीय सदस्यांच्या समितीची मागणी केलेली आहे. ती समिती कमिशन ऑफ एन्क्वायरी ॲक्टच्या अंतर्गत असेल तर त्या कमिटीचा उपयोग होईल नाही तर त्या कमिटीला कोण विचारतो ? आपण तशी समिती करणार असाल तर आनंदच आहे पण इतर कोणतीही मागणी करीत असताना आज आपण कोणता निर्णय घेत आहात यादृष्टीने या चर्चेकडे संपूर्ण महाराष्ट्र बघत आहे. आज आपण संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने रजेवर पाठवावे. या संपूर्ण चौकशीच्या काळामध्ये ते रजेवर राहतील अशा पध्दतीने आपण प्रशासकीय शिस्त निर्माण करणार का ? कारण प्रशासनाच्या बाबतीत तो आपला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

लौकिक आहे. एवढीच एक मागणी मी ठाम भूमिकेतून करतो आणि स्पष्टपणाने चौकशी होईल अशी जी चौकशीची पध्दत असेल त्याप्रमाणे चौकशी करावी. माझ्या माहितीप्रमाणे आपण विधानसभा सभागृहामध्ये दोन महत्वाच्या माजी न्यायमूर्तीमार्फत चौकशी जाहीर केली आहे. हरकत नाही. पण त्याची परत प्रधान समिती होऊ नये. कारण त्याचा अहवाल येणार आणि नंतर त्याचा एटीआर आमच्यापुढे मांडणार. यामुळे आदर्शची ही गोष्ट थांबणार नाही. श्री. जयराम रमेश यांनी जी नोटीस दिली होती की, यामध्ये 100 टक्के पर्यावरणाचे आणि सीआरझेडचे उल्लंघन केलेले आहे आणि सर्व मजले पाडावे लागतील त्यासंदर्भातील सुध्दा शासनाची भूमिका या खात्याच्या माध्यमातून आमच्यापुढे आली पाहिजे एवढेच म्हणणे मांडतो. भविष्यामध्ये जे जे वाईट ते आदर्श, अशा जर घटना छापून यावयास लागल्या तर ती या महाराष्ट्र राज्याची कायम स्वरुपी ओळख होईल. म्हणून मी माझ्या अल्प निवेदनामध्ये एवढीच मागणी करुन माझे भाषण संपवितो.

----

श्री. राजन तेली : सभापती महोदय, मला एक माहिती पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अशी मागणी केली की, संयुक्त समिती नेमावी आणि सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी मागणी केली की, न्यायालयीन चौकशी करावी. यामध्ये नेमके काय आहे. एकमत नाही काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम 97 अन्वये चर्चा असेल तर आधी विरोधी पक्ष नेते आणि गटनेते आणि इतर सदस्य बोलतात आणि मग सत्तारुढ पक्षाचे सदस्य बोलतात. यावेळी आपण सर्वांना संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचा गैरसमज झालेला आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, महाराष्ट्रात गेल्या दीड दोन महिन्यांपासून गाजत असलेल्या आदर्श सोसायटीच्या प्रकारणाच्या संदर्भात आज या सभागृहामध्ये खूप अर्थपूर्ण चर्चा झाली. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी या चर्चेला सुरुवात केली त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. भाई जगताप, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, विनोद तावडे, विजय सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे तसेच श्री. चरणसिंग सप्रा, श्री. दिवाकर रावते साहेब या सर्वांनी चर्चेमध्ये भाग घेतला. यामध्ये साधकबाधक चर्चा झाली. मी जरी विधानसभा सभागृहामध्ये असलो तरी सगळे मुद्दे लिहून घेतलेले होते आणि ते सगळे मी पाहिलेले आहेत. या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध देशामध्ये अत्यंत तीव्र आणि संतापजनक प्रतिक्रिया निर्माण झाली याबद्दल कोणाच्याही मनात दुमत असण्याचे कारण नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

महाराष्ट्र हे देशातील सर्वात वेगाने नागरिकरण होणारे राज्य आहे. विशेषत: मुंबईसारख्या महानगरामध्ये जमिनीच्या वाढत्या किंमती ही मुख्य समय आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वांना शासन घर देऊ शकत नाही. त्यामुळे झोपडपट्टयांचे प्रश्न असतील किंवा एक चांगले घर राहण्यासाठी मिळावे, म्हणून येनकेन प्रकारेन चांगल्या ठिकाणी चांगले घर मिळाले पाहिजे अशी भावना निर्माण झाली आहे. ही भावना कोठपर्यंत जाऊ शकते याचे या प्रकरणावरुन ज्वलंत उदाहरण निर्माण झालेले आहे. राज्यकर्ते आणि नोकरशहा यांची संपूर्ण विश्वासार्हता धोक्यात आलेली आहे. ही ढासळलेली प्रतिमा सुधारण्याकरिता व गेलेली विश्वासार्हता पुन्हा मिळविण्याकरिता आपल्या सर्वांना एकत्रितपणे प्रयत्न करावे लागतील. याबाबत मीडियातून किंवा वर्तमानपत्रातून आलेली प्रतिक्रिया चुकीची होती किंवा अनाठायी होती असे मी म्हणणार नाही. कदाचित त्याची फार मोठी राजकीय शिक्षा सुध्दा दिली गेली आहे. कारण आमच्या पक्षाने किंवा नेतृत्वाने जेव्हा जेव्हा अशा घटना घडल्या त्यावेळी फार मोठी चौकशी वा न्यायालयीन प्रक्रियेची वाट न पाहता राजकीय नेत्यांना जबाबदारी घेण्यास भाग पाडलेले आहे. मग ते दिनांक 26 नोव्हेंबरचे उदाहरण असो किंवा आदर्श सोसायटीचे प्रकरण असो. अर्थात ही राजकारणाला स्वच्छ करणारी ही महत्वाची प्रक्रिया आहे. दुर्दैवाने इतर राजकीय पक्षांनी त्याचे अनुकरण केलेले नाही. यातून मार्ग कसा काढावयाचा असा प्रश्न आपल्या सर्वांसमोर आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी महत्वाच्या सूचना केल्या आहेत. हे प्रकरण अत्यंत क्लेषदायक आहे. यामध्ये कोण दोषी आहे, कोठे चुका झ ााल्या, कोणत्या कार्यपध्दतीचे उल्लंघन झाले याबाबत अनेक चौकशा चालू असल्यामुळे त्यातून हे निष्पन्न होईल.

सभापती महोदय, यामध्ये पाच मुद्दे प्रकर्षाने पुढे येतात. यातील पहिला मुद्दा असा आहे की, या गृहनिर्माण संस्थेला देण्यात आलेली जागा कोणाच्या मालकीची आहे ? सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी ही जागा संरक्षण खात्याची आहे असा तर्क मांडला आहे, त्याचे उत्तर मी देण्याचा प्रयत्न करीन. दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, या संस्थेला जागा देताना आरक्षण बदलण्याचा प्रयत्न झाला का, तिसरा मुद्दा असा आहे की, या जागेचे वाटप करणे योग्य होते का, चौथा मुद्दा असा आहे की, पर्यावरणाचे, सीआरझेडच्या कायद्याचे उल्लंघन झाले आहे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ ST/

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

काय, केंद्रीय पर्यावरण विभागाची मान्यता मिळविली होती काय ? आणि पाचवा सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, या संस्थेचे सभासदत्व देताना त्यामध्ये क्वीड प्रो को होता काय ? एखाद्या अधिका-याने निर्णय घेतल्यानंतर त्यांना सोसायटीचे सभासदत्व मिळाले किंवा सोसायटीचे सभासदत्व मिळाल्यानंतर अनियमितता करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशाप्रकारचा क्वीड प्रो को होता काय हे सिध्द करणे अतिशय महत्वाचे आहे. या पाच मुद्याचे उत्तर शोधणे, त्यातून धडा घेणे, निष्कर्ष काढणे, त्यातून प्रक्रिया स्वच्छ करण्याचा प्रयत्न करणे हे आपल्या सर्वांसमोर असलेले उद्दिष्टय आहे.

सभापती महोदय, प्रथम या जमिनीच्या मालकीचा विषय हातामध्ये घेतला तर आपल्याला सर्वांना माहीत आहे की, ही जागा समुद्रात भर टाकून तयार केलेली आहे. बँकबे रिक्लेमेशनवर ही जागा आहे. त्यावेळी 5-6 ब्लॉक निर्माण झाले होते त्यापैकी सहाव्या ब्लॉकमधील ही जागा आहे. बॅकबे रिक्लेमेशनची ही जागा असल्यामुळे त्याचा सिटी सर्व्हे झालेला नाही आणि सिटी सर्व्हे क्रमांक सुध्दा उपलब्ध नाही. परंतु हा भूखंड त्यावेळच्या नियमाप्रमाणे शासनाच्या मालकीचा असून असा आशय दर्शविणारे अनेक पुरावे आहेत. याबाबत मी थोडक्यात सांगतो. 1958 साली सह सचिव संरक्षण विभाग यांनी राज्य शासनाच्या बांधकाम विभागाच्या सचिवांना एक पत्र लिहिले होते.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथीराज चव्हाण...

त्यामध्ये सांताक्रूझ मधील जी जमीन संरक्षण खात्याच्या मालकीची होती ती राज्य सरकारला विमानतळासाठी वगैरे पाहिजे होती. ती जमीन जर तुम्हाला पाहिजे असेल तर त्या बदल्यात तुमच्याकडे असलेली कुलाब्यातील जमीन आम्हाला परत द्या असे 1958 सालातील एक पत्र आहे. 1963 साली जनरल कमांडिंग ऑफिसर महाराष्ट्र-गुजराथ एरिया यांनी महाराष्ट्राच्या सचिवांना राज्य शासनाच्या मालकीचा ब्लॉक 6 या जमिनीचे हस्तातंरण संरक्षण विभागाकडे करावे अशी विनंती केली. त्यांच्या मालकीची जमीन असती तर असे लिहिण्याचे कारण नव्हते. अशी अनेक उदाहरणे आहेत. 1964 आणि 1968 सालचे उदाहरण आहे. 11 मार्च 1968ला सचिव नगरविकास यानी मिलिटरी ऑफिसर यांना सदरील जागा राज्य शासनाच्या मालकीची असल्याबद्दलचे पत्र लिहिलेले आहे. असे बरेचसे संदर्भ आहेत. अगदी अलीकडचा संदर्भ घेतला तर 5 एप्रिल 2000ला कर्नल एस.एस.जोग महाराष्ट्र-गुजराथ मुख्यालय यांनी सदरील भूखंड बीबीआर ब्लॉक-6मध्ये समाविष्ट आहे आणि संरक्षण विभागाच्या हद्दीत नाही असे लिहिलेले आहे. त्यानंतर जिल्हाधिका-यांनी त्यासंदर्भात उत्तर दिले होते.डिफेन्स इस्टेट ऑफिसरने जिल्हाधिका-यांना पत्र लिहून या जमिनीच्या मालकीबद्दलची संदिग्धता मान्य केली होती. पण भूखंडावर नौदलाचा किंवा सैन्याचा दावा असल्याचे मान्य केले होते. म्हणजे मालकी राज्य सरकारची आणि ताबा मात्र सैन्याचा अशी परिस्थिती आपल्या समोर येते. अशाच प्रकारची परिस्थिती आहे की नाही हे शोधण्यासाठी संरक्षण खात्याने सीबीआयची चौकशी जाहीर केलेली आहे. सीबीआयचे अधिकारी मंत्रालयात आले. ते मुख्य सचिवांकडे गेले. त्यांना चौकशी संबंधीचे पत्र देऊन अशा प्रकारची चौकशी आम्ही करीत आहोत असे त्यांना सांगितले. मला जेव्हा ते पत्र मिळाले त्यावेळी मी सीबीआयला सर्व प्रकारचे सहकार्य करण्यासबंधीचे लेखी आदेश दिले. त्यांना ज्या ज्या फाईल्स लागतील त्या देण्यास सांगितले. यामध्ये दोन बाजू आहेत. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकल्या शिवाय आपल्याला निवाडा करता येणार नाही. एकाच बाजूचे ऐकून चालणार नाही. म्हणून कागदपत्रे सीबीआयला देण्याचे मी आदेश दिले. सीबीआयला आपण सर्व सहकार्य करीत आहोत. त्यानंतर आरक्षण वगळण्याची कारवाई झाली. त्यामध्ये नियमितपणा होता की अनियमितपणा होता हा मुद्दा आहे. यासंबंधी उलटसुलट तर्क वर्तविण्यात आलेले आहेत. सकृतदर्शनी त्यामध्ये अयनियमितपणा

..2..

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

होता हे मान्य करावे लागेल. आपण भूखंड दिला पाहिजे. गृहनिर्माण खात्या मार्फत गृहनिर्माणासाठी जमीन दिली जाते आणि ती कमी खर्चात दिली जाते, हे सर्व मान्य आहे. परंतु आरक्षण बदलणे योग्य होते का, बेस्ट डेपोचा एफएसआय त्यामध्ये मिसळणे योग्य होता का याबाबतीत साशंकता आहे. यामध्ये चूक झालेली आहे असेही म्हणता येणार नाही आणि ती झाली नसेल तर तसे सांगितले पाहिजे. याबाबतीत उलटसुलट तर्क आहेत. याबाबतीत स्पष्टता येण्यासाठी शासनाने निर्णय घेतलेला असून तो शासन सांगणार आहे.

पर्यावरणाच्या बाबतीत दोन-तीन गोष्टी स्पष्ट झालेल्या आहेत. त्यामध्ये हा सीआरझेड मधील भूखंड होता हे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेण्ट ॲथॉरिटी यांची अनुमती घेणे आवश्यक होते. ती अनुमती घेण्यात आलेली नाही असे सकृतदर्शनी दिसते. म्हणून महाराष्ट्रातील पर्यावरण खात्याने याबाबतीत तीन निष्कर्ष काढून दिल्लीला कळविलेले आहे की, आदर्श सोसायटीने सीआरझेड विषयक परवानगी संबंधित प्राधिकरणाकडून म्हणजे महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेण्ट ॲथॉरिटी आणि केन्द्र सरकारच्या पर्यावरण खात्याकडून घेतलेली नाही. सीआरझेड क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावली 1967मध्ये मुंबई क्षेत्रासाठी लागू असलेली इमारतीची उंची, स्टेअरकेस, लिफ्ट, लॉबी यासाठी वापरण्यात आलेला एफएसआय हा अनुज्ञेय एफएसआय पेक्षा जास्त असल्याचे सिध्द झालेले आहे. तिसरा महत्वाचा निष्कर्ष म्हणजे संदर्भित जमिनीसह बेस्टच्या जमिनीचे एकत्रिकरण करणे, रस्ता लहान करणे, चटई क्षेत्र निर्देशकांचे स्थलांतर करणे यामध्ये सीआरझेडच्या दृष्टीकोनातून मान्यता घ्यायला पाहिजे होती ती घेण्यात आलेली नाही. त्यामुळे केन्द्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने आदर्श सोसायटीला दिनांक 12 नोव्हेंबर 2010 रोजी कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 19:35

श्री.पृथ्वीराज चव्हाण......

हे जर बांधकाम बेकायदेशीर असेल तर त्याबाबत केंद्रीय पर्यावरण विभाग कोणताही निर्णय घेऊ शकेल. मग त्यामध्ये ती इमारत ठेवायची किंवा काही मजले पाडायचे वा संपूर्ण इमारत जमीनदोस्त करायची हा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. कारण यामध्ये सुरक्षिततेचा प्रश्न आहे. नेव्हीची सर्व व्यवस्था या इमारतीमधून दिसून येते. माननीय पंतप्रधानांचे हेलिकॉप्टर त्याठिकाणी असलेल्या नेव्हीच्या हेलीपॅडवर उतरते. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने ही इमारत तेथे उपयुक्त नाही अशा प्रकारचा निर्णय झाला तर शासन प्रामाणिकपणे मान्य करेल. संस्थेच्या सभासदत्वाचा तिसरा मुद्दा महत्वाचा आहे. कोण कोण या सोसायटीमध्ये सभासद झाले? यादृष्टीने शासनाने यापूर्वीच एक निर्णय घेतला आहे. जे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असतील त्यांना कोड ऑफ कण्डक्टप्रमाणे वागावे लागते. त्यांनी कोणतीही मालमत्ता खरेदी केली तर घोषित करावे लागते. तसे घोषित करण्यामध्ये कोणी दोषी आहेत का? नातेवाईकांच्या नावावर घेतली तरी घोषित करावे लागते. हा एक मुद्दा महत्वाचा आहे. याकरिता 21 अधिकाऱ्यांना नोटीस दिली गेली आहे. त्यापैकी 15 अधिकारी भारतीय प्रशासन सेवेतील आजी-माजी अधिकारी आहेत. सदनिका खरेदी करण्यासाठी पैसे कोठून आणले हा वेगळा मुद्दा आहे. कदाचित त्यांनी बँकेचे लोन दाखविले असावे. परंतु कोड ऑफ कण्डक्टचा भंग केला आहे. प्रॉपर्टी घेताना उच्च अधिकाऱ्यांकडे जाहीर केले पाहिजे, हे अगदी स्पष्ट आहे. कारण मी केंद्रात दोन-तीन वर्षे त्या विभागाचे काम पाहिले आहे. नियम अगदी स्पष्ट आहेत. तसे घडले नाही म्हणून नोटीस दिली गेली आहे.

सभापती महोदय, मी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे ज्यांना या सोसायटीमध्ये सभासदत्व दिले गेले आहे, ज्यांचा या सर्व प्रकरणाबाबत निर्णय घेण्यामध्ये हात आहे, त्यांनी निर्णय घेण्यापूर्वी किंवा निर्णय घेतल्यानंतर त्यातल्या त्यात अनियमितपणे निर्णय घेतला असे सिध्द झाले तर हा भ्रष्टाचाराचा आणि प्रिव्हेंशन ऑफ करप्शन ॲक्टचा विषय आहे का हे सुध्दा पाहणे गरजेचे आहे. या सगळ्या गोष्टी डोळ्यासमोर ठेवून मी काही शासनाचे निर्णय सभागृहाला सांगितले. कोणत्या प्रकारच्या चौकशा सुरु आहेत त्याची माहिती मी सभागृहाला देऊ इच्छितो. सर्वप्रथम या गृहनिर्माण संस्थेला जमीन वाटपाबद्दल सर्वसाधारण जनतेमध्ये तीव्र संतापाची, तिरस्काराची भावना आहे. त्यामध्ये राज्यकर्ते असतील, प्रशासकीय अधिकारी अधिक प्रमाणात आहेत त्याबद्दल आपल्याला काहीतरी मार्ग काढणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या वातावरणामध्ये प्रशासन करणे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण......

योग्य नाही. ज्या अधिकाऱ्यांनी निर्भयपणे सल्ला दिला किंवा हे चुकीचे आहे, योग्य नाही असे सांगितले त्यांच्यामागे प्रशासन खंबीरपणे उभे राहील. त्यांना संरक्षण दिले पाहिजे. सगळे प्रशासन दोषी आहे असे नाही. आज प्रत्येकाच्या डोक्यावर काळी छाया उभी आहे, ती प्रथम दूर केली पाहिजे. कोण दोषी आहे त्याचा बचाव करा असे कोणी म्हणणार नाही. शासनाने निर्णय घेतला आहे. पहिला निर्णय झाला आहे. केंद्र शासनाने सीबीआय चौकशी सुरु केलेली आहे. त्यामध्ये आम्ही संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांना दिलेले आहे. माझी त्यांच्याशी चर्चाही झालेली आहे. त्याचबरोबर दोन जनहित याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. त्या खटल्यातील सुनावणी पुढील आठवड्यात पुन्हा होणार आहे. राज्य सरकार त्या प्रकरणामध्ये न्यायालयात आपली बाजू मांडणार आहे. या प्रकरणात पुढे काय करायचे याचा निर्णय उच्च न्यायालयाच्या माननीय न्यायमूर्तींनी घ्यायचा आहे. याचिका दाखल करताना सर्वच प्रकरण चौकशीसाठी सीबीआयकडे द्या असे म्हटले गेले आहे.

सभापती महोदय, पर्यावरण विभागाने आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेविरुध्द पर्यावरण कायदा, 1986च्या अंतर्गत स्वतंत्रपणे कारवाई सुरु केली आहे. त्याची माहिती मी सभागृहाला दिली. सोसायटीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. याबाबत पर्यावरण विभागाला संपूर्ण सहकार्य करण्याची शासनाची भूमिका आहे. त्याचबरोबर मी मघाशी सांगितले की, ज्या अधिकाऱ्यांनी सदनिका मिळविल्या आहेत त्या कशाप्रकारे त्यांनी मिळविल्या? त्यांनी निर्णय घेतला त्यामुळे त्यांना सदनिका मिळाली वा ती सदनिका मिळाल्यानंतर निर्णय घेतला हेही पाहणे गरजेचे आहे. वृत्तपत्रामध्ये छापून आलेल्या बातम्याच्या आधारे, ट्रायल बाय मीडियामुळे कोणाला दोषी धरणे योग्य नाही. एक प्रकारे न्यायालयाने फ्रेम ऑफ रेफरन्स चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे.

नंतर 4झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .......

दोषी अधिकाऱ्यांना बिलकूल पाठीशी घातले जाणार नाही आणि निर्भीडपणे ज्या अधिकाऱ्यांनी निर्णय घेतले त्यांनाही संरक्षण दिले जाईल. या प्रक्रियेबरोबरच कोड ऑफ कंडक्टचे उल्लंघन केले म्हणून त्यासंबंधी देखील प्रक्रिया चालू आहे.

तसेच महत्वाचा मुद्दा म्हणजे फाईल गहाळ झालेली आहे ती वस्तुस्थिती आहे. पहिल्यांदा जुलै महिन्यात माहितीच्या अधिकाराखाली कोणी तरी त्या फाईलची मागणी केली होती, तेव्हा त्यांना उत्तर देण्यात आले होते की, ही फाईल सापडत नाही, ती सापडल्यावर आपल्याला उत्तर पाठविण्यात येईल. त्यावेळेस फाईल गहाळ झाल्याचा संशय आला. मी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर प्रथम नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता मला सांगण्यात आले की, 1 नोव्हेंबर, 2010 ला ही फाईल गहाळ झाली होती, ती आम्हाला आता सापडली. या फाईलची पाहणी केली असता करस्पॉन्डन्समधील चार पेपर्स गहाळ झाले आहेत. त्या अनुषंगाने ताबडतोब कोणती कारवाई केली अशी अधिकाऱ्यांना विचारणा केली असता याप्रकरणी गुन्ह्याची नोंद करुन एफआयआर दाखल करण्यात आला व सध्या ही चौकशी क्राईम ब्रांचकडे आहे. त्या ब्रांचकडून मी माहिती घेतली असता चौकशीत काही सुराग मिळाले, तर काही क्ल्युज देखील मिळाले असल्याचे सांगितले. अजूनही अपेक्षा आहे की, कोणी फाईल चोरली अथवा लपविली व तेही लवकरच समजेल. हे करीत असताना आणखी काही फाईल्स गायब होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून या प्रकरणाशी संबंधित सर्व फाईल्स जबाबदार अधिकाऱ्यांनी आपल्याकडे ठेवल्या पाहिजेत तसेच त्याची फोटो कॉपी सुध्दा ठेवली पाहिजे. याबरोबरच सर्व प्रक्रिया कंप्युटर स्कॅनिंगच्या माध्यमातून, इलेक्ट्रॉनिकच्या माध्यमातून स्कॅन करण्यासंबंधीचे आदेश देण्यात आले असून ते काम सुध्दा चालू आहे. शेवटी आपल्याला एक न्यायिक प्रकारची चौकशी करावयाची आहे. त्यात खरे दोषी कोण आहेत त्यांना शिक्षा झाली पाहिजे. केवळ वर्तमानपत्रातील बातम्यांच्या आधारे किंवा ट्रायल बाय मीडियाकडून कोणालाही दोषी ठरवून राजकीय लोकांना फासावर लटकविले तर ते योग्य ठरणार नाही. तसेच जे अधिकारी खरोखरच दोषी नसतील त्यांनाही जबाबदार धरु नये म्हणून ही न्यायिक चौकशीची गरज आहे.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ ST/ पूर्वी श्री. भोगले....... 19:40

श्री. पृथ्वीराज चव्हाण ............

अशा प्रकारे आदर्श सोसायटीच्या प्रकरणातील अनियमितता आणि तक्रारींची चौकशी ही सर्वंकष स्वरुपाची न्यायालयीन चौकशी करण्याचा निर्णय राज्यशासनाने
घेतलेला आहे. ही चौकशी कमिशन ऑफ एन्क्वॉयरी ॲक्ट, 1952 अन्वये होईल व ती द्विसदस्यीय समिती असेल. त्या चौकशी आयोगाचे अध्यक्षपद सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांच्याकडे असेल आणि त्यांच्या मदतीला ज्यांना प्रशासन व्यवस्थेचा प्रदीर्घ अनुभव आहे अशा मुख्य सचिवाच्या दर्जाचा अधिकारी असेल. असा आयोग नियुक्त करुन ही न्यायिक चौकशी केली जाईल. या आयोगाच्या फ्रेम ऑफ रेफरन्स तसेच त्याची कार्यकक्षाही लवकरच जाहीर करण्यात येईल आणि त्या माध्यमातून ही चौकशी करण्यात येईल. माननीय विरोधी पक्षाला सुध्दा माझी विनंती आहे की, या आयोगाच्या चौकशीची कार्यकक्षा ठरवित असताना आपल्याकडेही काही मुद्दे असतील अथवा आपल्याला काही सुचवावयाचे असेल ते सुचवावे. जेणेकरुन त्यातून काही तरी चांगले निष्पन्न होईल या भावनेने ही चौकशी करण्यात येईल. तसेच यामध्ये मी स्वत: जातीने लक्ष घालणार आहे. मी आल्या आल्या तडकाफडकी काही तरी निर्णय घेतला असता परंतु यामध्ये राजकीय नेते मंडळींची नावे आलेली आहेत, त्यामुळे योग्य मार्गानेच चौकशी होणे आवश्यक आहे. त्यात कदाचित आपल्याकडील काही लोकांची नावे आली असतील तर त्यातून बाहेर पडण्याकरिता हा अतिशय योग्य असा मार्ग राहील. मला जाणीव आहे की, खालच्या सभागृहात आणि या सभागृहात सुध्दा या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीची मागणी केली आहे. परंतु आपण जरा शांतपणे विचार केला तर, राज्याच्या हितासाठी, प्रशासनाच्या हितासाठी तसेच जनतेच्या हितासाठी देखील हा निर्णय योग्य आहे. म्हणून न्यायालयीन चौकशी ही सर्वंकष अशी चौकशी असून त्याच्या फ्रेम ऑफ रेफरन्ससंबंधी लगेच निर्णय घेऊन अशी चौकशी केली तर आपल्याला काही तरी उत्तर नक्कीच सापडेल. त्याचबरोबर नुसतेच काही तरी शोधून दोषी लोकांना जबाबदार धरुन शिक्षा करुन भागणार नाही तर या संपूर्ण पध्दतीमध्ये जे जे दोष आहेत ते दूर करण्याचा सल्लाही या चौकशीतून मिळू शकेल व त्याचा निश्चितच चांगला परिणाम दिसून येईल. एकीकडे देशाचा आणि राज्याचा झपाट्याने आर्थिक विकास होत असताना अशी चौकशी न्यायिक पध्दतीने, समतोल पध्दतीने व सर्वसमावेशक असली

....3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ........

पाहिजे, किंवा आपल्या सर्वांचीच भावना आहे. त्याचबरोबर प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेत देखील पारदर्शकता असली पाहिजे यासाठीही प्रयत्न करणे आवश्यक आहे. या सर्व प्रकरणात सर्व सहकाऱ्यांचे सहकार्य लाभेल अशी मला खात्री आहे. एवढे सांगून माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : खरे म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांनी या चर्चेला उत्तर दिल्यामुळे ही चर्चा आता संपलेली आहे परंतु माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात विचार मांडण्याची संधी द्यावी अशी विनंती केल्यामुळे मी एक दोन सदस्यांना यासंदर्भात विचार मांडण्याची संधी देणार आहे. मी प्रथम माननीय विरोधी पक्ष नेत्यांना यासंदर्भात विचार मांडण्याची संधी देत आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भात जो काही रिप्लाय दिलेला आहे त्यावर मला एक मिनिट विचार मांडण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर हे बोलण्यासाठी उभे राहिल्यामुळे मी त्यांना प्रथम विचार मांडण्याची संधी देत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी आदर्श सोसायटीच्या संदर्भात ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. ज्या गांभीर्याने राज्यातील जनतेने हा विषय घेतलेला आहे त्यापेक्षाही अधिक गांभीर्याने राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी हा विषय घेतलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जे काही मुद्दे मांडलेले आहेत त्यामध्ये 2-3 मुद्यांच्या उल्लेख त्यांच्याकडून राहिलेला आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला आहे की, सैनिकी किंवा नौदलाच्या दृष्टीने चुकीच्या पध्दतीने या सोसायटीची उभारणी झाली असेल किंवा पर्यावरणाच्या दृष्टीने चुकीच्या पध्दतीने उभारणी झाली असेल तर ही इमारत तोडली जाईल. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात द्विसदस्य समितीची नियुक्त केली जाईल असे सांगितलेले आहे. या कमिटीबद्दल आमचा थोडासा आक्षेप आहे. मुंबईवर जो अतिरेकी हल्ला झाला होता त्यावेळी राम प्रधान समिती गठीत करण्यात आली होती व या राम प्रधान समितीतून काय निष्पन्न झाले याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. आताचे आदर्श सोसायटीचे जे प्रकरण आहे त्या प्रकरणामध्ये माजी मुख्यमंत्र्यांची सुध्दा नावे आहेत, काही आमदारांची तसेच काही सनदी अधिका-यांची सुध्दा नावे आहेत. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी न्यायमूर्तीकडून झाली असती तरी योग्य झाले असते. कमिशन ऑफ इन्क्वायरी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

ॲक्ट खाली या प्रकरणाची चौकशी द्विसदस्य समिती मार्फत केली जाणार आहे. या समितीच्या माध्यमातून सनदी अधिका-याची चौकशी सनदी अधिका-यांनी करणे आणि राज्य कर्त्यांची चौकशी या सनदी अधिका-याकडून करणे संयुक्तिक होणार नाही असे मला वाटते. या प्रकरणाची चौकशी पारदर्शीपणे करावयाची असेल तर दोन्ही सभागृहाच्या सर्व पक्षीय सदस्यांकडून यासंदर्भात चौकशी होण्याची नितांत आवश्यकता आहे. या समितीचा अध्यक्ष हा राज्यकर्त्यापक्षाचा असतो. दोन्ही सभागृहाच्या सर्व पक्षीय सदस्यांमार्फत कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गतच चौकशी व्हावयास पाहिजे अशी आमची मागणी होती. माननीय मुख्यमंत्र्यांच्या बाकी उत्तराने आमचे समाधान झाले परंतु चौकशी समितीबद्दल आमचा आक्षेप आहे. या संदर्भात टर्म ॲन्ड कंडीशन विरोधी पक्षाने सुचवावे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. आम्हाला जर बोलावले तर चौकशीची कक्षा काय असावी व तिचा कालावधी किती असावा हे आम्ही सुचवू शकतो. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन्ही सभगृहाच्या संयुक्त समिती कडून या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय घोषित करावा एवढी आग्रही मागणी या निमित्ताने करतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, ...

**सभापती** : सन्माननीय सदस्य दिवाकर रावते यांनी आपले विचार थोडक्यात मांडावे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्याचा रिप्लाय झाल्यापासून मला बोलण्याची संधी देण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करीत आहे. तुमच्यात आणि माझ्यात काहीही वैयक्तिक नाही असे असतांना आपण मला बोलण्याची संधी न दिल्यामुळे मी सभात्याग करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे शिवसेनेचे गट नेत असल्यामुळे मी त्यांना प्रथम बोलण्याची संधी दिलेली आहे. आता तुमच्यापैकी कोणी प्रथम बोलावे हे तुम्हीच ठरवावे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम सभात्याग करतात.)

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जी समिती नियुक्ती केली त्यामध्ये सनदी अधिकारी आहेत असे आम्ही आज म्हणणे गैर ठरेल. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी समितीच्या कार्यकक्षा ठरविण्यामध्ये विरोधी पक्षाला सामील करुन घेतले त्याचे मी स्वागत करतो. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी समितीचा कार्यकाळ जाहीर केलेला नाही. समितीचा कार्यकाळ निश्चित स्वरुपाचा असला पाहिजे. त्यांनी ही गोष्ट सदनामध्ये जाहीर केली असली तरी आमचा मागील वेळेचा अनुभव कटू आहे. या सभागृहात "प्रधान समिती" जाहीर केली होती. त्या समितीचा अहवाल सभागृहात मांडल्यानंतर त्या अहवालाची प्रत आम्हाला देण्यात आली नाही. प्रधान समितीच्या अहवालावरुन आमचे हौतात्म्य झाले होते. तेव्हा या समितीचा अहवाल केवळ अे.टी.एस.च्या रुपाने न येता पूर्ण अहवाल सभागृहासमोर ठेवला पाहिजे. तसेच समितीची कालमर्यादा जाहीर केली पाहिजे. समितीमध्ये सनदी अधिकारी असल्याचा उल्लेख करण्यात आला. माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रामाणिक हेतू आमच्या पर्यंत पोहोचला. त्याबाबत मी त्यांना धन्यवाद देतो. किमान एक महिन्याच्या कालावधीत सनदी अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रथम दर्शनी कारवाई करण्या बाबतचा निर्णय घ्यावा अशी माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे. तसेच प्रामाणिक अधिकाऱ्यांना संरक्षण दिले पाहिजे अशी विनंती मी स्वत: केली आहे. तेव्हा दोषी अधिकाऱ्यांच्या बाबतीत एक महिन्याच्या कालावधीत कारवाई होईल आणि एका कालमर्यादेमध्ये अहवाल येऊन तो सभागृहात ठेवला जाईल आणि त्यावर चर्चा होईल असे माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून आश्वासन मिळेल अशी मी विनंती करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय चांगले उत्तर दिले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या विषयाच्या अनुषंगाने माझे विचार मांडले त्यावेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. परंतु मी उपस्थित केलेल्या मुद्यांचे त्यांना ब्रिफींग मिळाले असेल. माझा एकच मुद्दा आहे. या संदर्भातील चौकशी करीत असताना ज्या अधिकाऱ्यांना नोटीसेस दिलेल्या आहेत त्यांच्या बाबतीत सकृतदर्शनी पुरावा आढळला तर त्यांना पदावरुन दूर केले पाहिजे असे मला वाटते. माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरात मला प्रामाणिकपणा दिसला. मी पहिल्यांदाच आपले विचार ऐकले. आपण केंद्रात असल्यामुळे आपला कधी संबंध आला नाही. जे प्रमाणाणिक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.......

अधिकारी आहेत त्यांची आपण माहिती घ्यावी. नाव सांगायचे झाले तर श्री.देशपांडे हे माननीय राज्यपालांचे पी.आर.ओ.आहेत. श्री.निपुण हे रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. हे प्रामाणिक अधिकारी मंत्र्यांचे ऐकत नाहीत म्हणून त्यांना बाजूला ठेवण्यात येते. तेव्हा अशा प्रामाणिक अधिकाऱ्यांबद्दल माहिती घेऊन त्यांची योग्य जागी नियुक्ती केली तर प्रशासन निश्चितपणे सुधारेल अशी माझी अपेक्षा आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी आदरणीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. या प्रकरणाकडे पूर्ण देशाचे लक्ष लागले होते.राज्यातील 11 कोटी जनता दोन्ही सभागृहातील चर्चेच्या माध्यमातून या प्रकरणाकडे पाहत होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय प्रांजळपणे, अतिशय मनापासून आपल्या उत्तरामध्ये भावना व्यक्त केल्या. आपण थोड्या कालावधीत जे काही निर्णय घेतले त्यातून महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेला त्यांनी दिलासा देण्याचा प्रयत्न केला. परंतु हे सर्व करीत असताना आपण उत्तरामध्ये सांगितले की, "हे महत्वाचे आहे, हे जास्त महत्वाचे आहे, हे आणखी जास्त महत्वाचे आहे.. " त्यांनी आपल्या उत्तरामध्ये "कोड ऑफ कंडक्टचा" उल्लेख केलेला आहे. प्रथम दर्शनी कोड ऑफ कंडक्टमध्ये अनियमितता दिसली आहे. मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांचा त्या सोसायटीमध्ये फ्लॅट आहे, हा सरळ सरळ कोड ऑफ कंडक्ट आहे. अशा अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करुन राज्यात आणि देशात एक मेसेज जाऊ द्यावा. जे प्रामाणिक अधिकारी आहेत त्यांना पूर्ण सहकार्य केले पाहिजे, परंतु जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री.गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते माननीय श्री.पांडुरग फुंडकर यांनी दोन तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. केन्द्रीय पर्यावरण विभागाकडून आदर्श इमारतीसंबंधी जो काही निर्णय होईल, तो आम्हाला मान्य आहे.ती इमारत भाडयाने द्यावी किंवा तेथे वसतीगृह करावे, असे आम्ही काहीही करणार नाही. त्या ठिकाणी जर अनियमितता झाली असेल तर त्याबाबतीत केन्द्रीय पर्यावरण विभाग निर्णय घेईल. या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता एक चौकशी समिती नेमण्यात आली आहे. आपण त्या समितीची तुलना प्रधान समितीबरोबर केली आहे.मी आपल्याला अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की, प्रधान समिती 'कमिशन ऑफ इन्क्वॉयरी ॲक्ट"खाली नेमण्यात आलेली नव्हती. परंतु ही समिती मात्र या ॲक्टखाली नेमण्यात आलेली आहे. त्याचबरोबर या प्रकरणाची चौकशी संयुक्त समिती मार्फत करण्यात यावी, असे मत बहुतेक सर्वच सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात मांडले आहे. मला देखील, संयुक्त संसदीय चौकशी समितीबद्दलचा अनुभव आहे. त्यामुळे मला प्रामाणिकपणे असे वाटते की, आपल्याला जर काही निष्कर्षापर्यत पोहोचावयाचे असेल तर आपण न्यायिक चौकटीमध्ये चौकशी करण्याचा विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिका-याची नेमणूक करण्याची तरतूद यामध्ये यासाठीच केलेली आहे की,फाईल कशा मुव्ह होतात, त्याबाबतीत कोठे रेकॉर्ड होत असते, जे काही कागद चोरीला गेलेले आहेत, ते आपल्याला रिकन्स्ट्रक्ट करता येतील किंवा नाही याबाबतीत चीफ सेक्रेटरीच्या रँकच्या ज्येष्ठ सनदी अधिका-यांना जास्त माहिती असते. त्याच बरोबर गेल्या दहा वर्षात काम करणारे हे अधिकारी नसतील आणि आताच्या प्रकणाशी, ंसबंधित ते अधिकारी नसतील तर अधिक चांगले होईल, म्हणूनच तशा प्रकारची तरतूद या समितीत केलेली आहे . या संदर्भात आपण जर शांतपणे विचार केला तर आपण जी चौकशी करावयाचे ठरविले आहे, ती चांगल्या प्रकारे होईल याची मला खात्री आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ही चौकशी विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्यात यावी, अशी सूचना केलेली आहे. या चौकशीला किती वेळ लागेल हे न्यायमूर्तीना विचारावे लागेल व त्यांनाही विश्वासात घ्यावे लागेल. लवकरात लवकर चौकशीचा अहवाल आला पाहिजे, अशी आपल्या सर्वाचीच भावना आहे. त्याचबरोबर योग्य प्रकारे न्याय झाला पाहिजे, हे सुध्दा तितकेच महत्वाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : त्यांना नंतर मुदतवाढ देता येईल.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : त्याबाबत चर्चा करु. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी काही मुद्दे सांगितले आहेत ते मला पूर्णपणे मान्य आहेत. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सुध्दा तोच मुद्दा मांडला होता. प्रशासकीय अधिका-यांसाठी जे कोड ऑफ कन्डक्ट आहे ते केन्द्रीय कार्मिक प्रशासन खात्याशी संबंधित असून, गेल्या दोन तीन वर्षापासून मी त्या खात्याचा कारभार पाहिला आहे. हा विषय त्या खात्याच्या चौकटीत बसणारा आहे.त्याकरिता न्यायालयीन चौकशी करण्याची गरज पडणार नाही. इंटर्नल इन्क्वॉयरी करण्यासंबंधी त्या बाबत तशी प्रोसेस आहे. जर कोणी दोषी आढळून आले तर त्याबाबतीत निश्चितपणे ॲक्शन घेता येईल. त्याचप्रमाणे जे प्रामाणिक अधिकारी आहेत आणि ज्यांनी निर्भिडपणाने निर्णय घेतला आहे, अशा अधिका-यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, त्यांना संरक्षण दिले पाहिजे, यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी ज्या काही भावना व्यक्त केल्या आहेत, त्याचे मी स्वागत करतो आणि आपण सर्वांनी जे विचार मांडले त्याबद्दल पुन्हा एकदा आपल्याला धन्यवाद देऊन मी आपली रजा घेतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी माझ्या भाषणात आदर्श सोसायटी "पार्ट टू" संबंधी विषय मांडला होता. कदाचित मला असे वाटले की, त्यासंबंधीची नोट आपण त्याना दिली असेल परंतु आपण ती दिलेली नाही. त्याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात कोठेही उल्लेख केलेला नाही.आदर्श सोसायटी पार्ट टू बाबतीत तशा प्रकारचे पत्र जिल्हाधिका-यांकडे गेलेले आहे.त्या पत्रात जिल्हाधिका-यांना स्पष्टपणे असे सांगितलेले आहे की, "श्रीमती माने नावाच्या महिलेला पार्ट टू मध्ये सभासद म्हणून घेऊ." ते पत्र सुध्दा मी माननीय सभापतींना दिलेले आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. रामदास कदम : सन्माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी माजी मुख्यमंत्री श्री नारायण राणे यांचे खाजगी सचिव श्री.एस.एस.पाटील यांचे मी पत्र दिलेले आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, आपण पाठविलेले पत्र मी सन्माननीय महसूल मंत्र्यांकडे पाठवतो. अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

3..



VTG/ D/ ST/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 19.55

सभापती ...

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, गुरुवार, दिनांक 9 डिसेंबर 2010 रोजी सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

सकाळी 11.00 ते 12.45 या वेळेत सत्ताधारी पक्षाने नियम 245 अन्वये कुपोषण या विषयावर दिलेल्या प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेली चर्चा पूर्ण होईल व माननीय मंत्री महोदयांचे उत्तर सुध्दा पूर्ण होईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक 7 वाजून 59 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 9 डिसेंबर 2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यत स्थगित झाली )

-----

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही